सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सोलापूर
रविवार, १६ मार्च २०२५ । युगाब्द ५१२६ । वर्ष ४१ वे अंक १२७ । पाने १२+८ । किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## क्राईम वृत्त

### पंतप्रधानांचा आक्षेपार्ह व्हिडीओ व्हायरल करणाऱ्या दोघांविरुध्द गुन्हा दाखल

**सोलापूर, दि. १५ मार्च-**

पंतप्रधानांचा आक्षेपार्ह व्हिडीओ सोशल मिडीयावर व्हायरल करणाऱ्या दोघां रिक्षाचालकांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत सुनिल दत्तात्रय ढोणे (वय २९, रा. आदर्श नगर, शेळगी, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सर्फराज नबीरसुल बागवान (रा. शास्त्री नगर, मौलाली चौक, सोलापूर) आणि महंमद रफिक अब्दुल कय्युम महालतबडे (रा. मुमताज नगर, कुमठा नाका, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



१२ मार्च रोजी दुपारी सुनिल ढोणे हे शिवगंगा मंदीर येथे थांबले असताना त्यांचा मित्र लक्ष्मण सलगर याच्या मोबाईलमधील वॉटसअॅपमधील वाहतूक संघटना संयुक्त महासंघ अॅटो रिक्षा या ग्रुपवर पंतप्रधान मोदी यांचा आक्षेपार्ह व्हिडीओ सर्फराज बागवान व महंमद महालतबडे यांनी शेअर करून धार्मिक भावना दुखावल्या. म्हणून जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक बामणे पुढील तपास करीत आहेत.

### पेट्रोलिंग करणाऱ्या पोलिसांची गच्ची पकडून मारहाण

**सोलापूर, दि. १५ मार्च-**

कारमध्ये बसून दारू पिणाऱ्यास पेट्रोलिंग करणाऱ्या पोलिसांनी विचारणा केली असता दारूड्याने चक्क खाकीतल्या पोलिसाची गच्छी पकडून मारहाण केली. त्यामुळे याबाबत शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याने दोघांवर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना १२ मार्च रोजी रात्री साडे दहाच्या सुमारास सोलापुरातील साखर पेठ या ठिकाणी घडली आहे. याबाबत चालक पोलिस कॉन्स्टेबल कुंभार यांनी दिलेल्या फिर्यादीवरून किरण श्रावण क्षीरसागर (वय ३२, रा. इंदिरा वसाहत भवानी पेठ, सोलापूर), लकी भीमराव गायकवाड (रा. जुना तुळजापूर नाका सोलापूर) या दोघांवर जेलरोड पोलिसांत गुन्हा नोंद करण्यात आला आहे.



जेलरोड पोलिस ठाण्याच्या हद्दीत पीसीआर वन मधून पोलिस हवालदार मेडके, शेख, चालक कुंभार हे पेट्रोलिंग करीत होते. पेट्रोलिं करीत असताना किरण क्षीरसागर व लकी गायकवाड हे साखर पेठ येथे (एमएच १३ सीके १६८३) कारमध्ये बसून दारू पित होते. पेट्रोलिंग करणाऱ्या पोलिसांच्या निदर्शनास आले. त्याबाबत पोलिसांनी विचारणा केली असता लकी व श्रावण यांनी माझ्या पैशाची दारू पित आहे. तुझ्या बापाची पीत नाही असे रागात बोलून कारमधून उतरला. कुंभार हे वर्दीमध्ये असूनही गच्छी पकडली. गच्छी पकडून पीसीआर मोबाईलमधून बाहेर काढले व हातानो गालावर मारले, तसेच धक्काबुक्की करून दुखापत करून कुंभार करीत असलेल्या शासकीय कामात अडथळा आणून मारहाण केली आहे. म्हणून याबाबत जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास पोलिस उपनिरीक्षक डेरे करीत आहेत.

### जमीन वाटणीच्या कारणावरून चाकूने वार; दोघांवर गुन्हा

**सोलापूर, दि. १५ मार्च-**

वडीलोपार्जित शेत जमिनीच्या वाटणीच्या कारणावरून व भांडणाच्या रागातून चाकुने हात व खांद्यावर चाकुने मारून जखमी केले आहे.यावरून दोघांवर जेलरोड पोलिसांत गुन्हा नोंद झाला आहे. ही घटना १३ मार्च रोजी मार्केट यार्डसमोर,सोलापूर या ठिकाणी घडली आहे. याबाबत ज्योतिबा ज्ञानेश्वर भोसले (वय २६, रा. जोशी गल्ली रविवार पेठ, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून धर्मराज विलास शिंदे, विजय प्रकाश सरवदे (रा. जोशी गल्ली रविवार पेठ) या दोघांवर गुन्हा नोंद झाला आहे.



ज्योतिबा भोसले व त्याचे मामाचा मुलगा दादासाहेब सरवदे हे दोघेजण चहाच्या टपरीवर चहापित बसले होते. त्या ठिकाणी फिर्यादीच्या आत्याचा मुलगा धर्मराज व त्याचा मित्र विजय सदर ठिकाणी येवून वडीलोपार्जित शेत जमीनीच्या वाटणीच्या कारणावरून व रात्री झालेल्या भांडणाचा राग मनात धरून शिवीगाळ करून मारहाण केली. धर्मराज शिंदे यांनी फिर्यादीच्या उजव्या हातावर खांद्यावर चाकुने मारून जखमी केले. तसेच परत मारहाण करण्याची धमकी दिल्याचे पोलिसांत दिलेल्या फिर्यादीत म्हटलं आहे. याबाबत जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस हवालदार मस्के पुढील तपास करीत आहेत

### कोयता, ब्लेडने वार करून महिलेला केले जखमी; चौघांवर गुन्हा

**सोलापूर, दि. १५ मार्च-**

शेती वाटपाची चर्चा सुरु असताना तु मध्ये येवू नको म्हणत एका महिलेस ब्लेड, कोयत्याने मारून जखमी केले. या प्रकरणी चौघांवर जोडभावी पेठ पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना १२ मार्च रोजी रात्री आठ च्या सुमारास रविवार पेठेत घडली आहे. याबाबत दिपाली प्रभाकर सरवदे (वय ३५ रा. जोशीगल्ली,रविवार पेठ सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून विठ्ठल रामा शिंदे, गणेश विठ्ठल शिंदे, आकाश विठ्ठल शिंदे, धनराज विठ्ठल शिंदे (रा रविवार पेठ सोलापूर) यांच्या जोडभावी पेठ पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



पोलिसांत दाखल झालेल्या माहितीनुसार फिर्यादीचे आई व आरोपींमध्ये शेतीच्या वाटपाबाबत चर्चा सुरु होती. त्यावेळी समाजातील पंच भाऊ ज्योतीबा भोसले यांच्याबरोबर शेती वाटपाबाबत चर्चा चालू होती. जमीनीचा निकाल हा फिर्यादीच्या आई व भावाच्या बाजूने लागला, तो आरोपींना मान्य नव्हता. तेव्ही चर्चा चालू असताना फिर्यादीला मोठा आवाज आला. फिर्यादी सदर ठिकाणी गेल्या असता तू मध्ये येवू नको, तुला बघून घेतो म्हणून धनराज शिंदे यांने दमदाटी करून लाथाबुक्यांनी मारहाण केली. विठ्ठल शिंदे याने हातातील कोयत्याने फिर्यादीच्या डाव्या हातावर वार केले. गणेश यांने डोक्यात दगड घातला तर आकाश याने त्याच्या हातातील ब्लेडने फिर्यादीच्या उजव्या खांद्यावर व पाठीवर वार केलेत. मारहाणीत फिर्यादीच्या डोक्याला हाताला मार लागला आहे. यावरून त्या चौघांवर जोडभावी पेठ पोलिसांत गुरुवारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास सहा पोलिस निरीक्षक गायकवाड करीत आहेत.

# प्रांत, तहसीलदारांना भेटण्याची वेळ केली निश्चित

### १०० दिवसीय कार्यालयीन सुधारणांची विशेष मोहीम




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि.१५ मार्च-**

सोलापूर जिल्हयात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेला १०० दिवसीय कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. त्या अनुषंगाने जिल्हयातील सर्व उपविभागीय अधिकारी व तहसिल कार्यालयांनी अभ्यागतांसाठी भेटीचे दिवस व वेळ निश्चित करण्यात आलेली आहे.

जिल्ह्यातील नागरिकांना आपल्या समस्या सोडविण्यासाठी उपविभाग निहाय व तालुकानिहाय भेटीच्या दिवसाचे वेळापत्रकाप्रमाणे अभ्यागतांनी भेटावे, असे जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर, तहसीलदार सर्वसाधारण यांचे कडून कळविण्यात आले आहे. जिल्ह्यातील उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांना भेटण्याचे दिवस व वेळ पुढील प्रमाणे- उपविभागीय अधिकारी क्र.१ सोलापूर, सोमवार, मंगळवार व गुरुवार स. ११ ते दुपारी २ वाजेपर्यंत, उपविभागीय अधिकारी क्र.२ सोमवार व गुरुवार वेळ सकाळी ११.०० ते दुपारी २.०० वा.,उपविभागीय अधिकारी मंगळवेढा विभाग मंगळवेढा सोमवार व शुक्रवार, सकाळी १२.३० ते दुपारी २.३०, उपविभागीय अधिकारी माळशिरस विभाग अकलूज- सोमवार, बुधवार, शुक्रवार स. ११.०० ते दु. १.०० उपविभागीय अधिकारी पंढरपूर विभाग पंढरपूर सोमवार व शुक्रवार सकाळी ११ ते दुपारी २.०० उपविभागीय अधिकारी माढा विभाग कुर्डवाडी सोमवार व शुक्रवार, सकाळी ११.०० ते दुपारी २.०० वाजेपर्यंत अभ्यागतांना भेटता येईल. तसेच तहसिल कार्यालय उत्तर सोलापूर- सोमवार व शुक्रवार सकाळी ११ ते दुपारी १.३०,तहसिल कार्यालय दक्षिण- सोमवार व गुरुवार दुपारी ३ ते ५ तहसिल कार्यालय अक्कलकोट सोमवार दु. ३.०० ते ६.०० व शुक्रवार दु. १२.०० ते २.००, तहसिल कार्यालय मोहोळ-सोमवार, बुधवार, शुक्रवार स. ११.०० ते दु. १.००,तहसिल कार्यालय माढा- मंगळवार, गुरवार सकाळी ११ ते दुपारी १.००,तहसिल कार्यालय मंगळवेढा -सोमवार, बुधवार, शुक्रवार स. ११.०० ते दु. २.००,तहसिल कार्यालय पंढरपूर- सोमवार व गुरुवार दु.३ ते सायं ५.००, तहसिल कार्यालय माळशिरस- सोमवार व शुक्रवार, सकाळी ११.०० ते दुपारी २.००. तहसिल कार्यालय बार्शी- मंगळवार, गुरुवार सकाळी ११ ते दुपारी १.००, तहसिल कार्यालय करमाळा- सोमवार व शुक्रवार, सकाळी ११.०० ते दुपारी २.००, अप्पर तहसिल कार्यालय मंद्रुप - सोमवार व मंगळावर वेळ दुपारी ३.०० ते सायं ५.०० वाजता,अपर तहसिल कार्यालय अनगर- सोमवार, मंगळवार दुपारी ३.०० ते सायं ५.०० वाजता तहसिल कार्यालय सांगोला - सोमवार, बुधवार व शुक्रवार वेळ दु.३ ते सायं सायं ५.०० वाजेपर्यंत अभ्यागतांना भेटता येईल.

# पावणे दोन लाखाचे दागिने केले लंपास

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ मार्च-**

घरातील दुख दूर करून सर्व करणी,भनामती काढतो,यासाठी पूजा करण्याचा बहाणा करीत घरातील १ लाख ७६ हजाराची दागने लंपास केले. या प्रकरणी एका महिलसह दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत रेखा तानाजी हेबाळे (वय ४५ रा. आकांक्षा सोसायटी सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात एक महिला व पुरुषांवर सदर बझार पोलिसांत गुन्हा गुन्हा नोंद झाला आहे.

१२ मार्च रोजी सायंकाळी सहाच्या सुमारास आकांक्षा सोसायटी येथे आरोपींनी फिर्यादीच्या घरी आले. फिर्यादीच्या घरात येवून फिर्यादीस तुमच्या घरातील दूख दूर करतो,सर्व करणी,भानामती काढतो, यासाठी पूजा करावी लागेल असा बहाणा करीत १लाख ७६ हजाराचे सोने व चांदीचे दागिने लंपास पणतीमध्ये ठेवण्यास सांगितले. फिर्यादी घरात वेगवेगळ्या ठिकाणी पणत्या लावण्यास व्यस्त होते. त्यावेळी आरोपींनी फिर्यादीचे लक्ष विचलित करून पणत्यामध्ये ठेवलेले १ लाख ७६ हजाराचे दागिने लंपास केले आहेत. याप्रकरणाचा तपास पोलिस उपनिरीक्षक शिंदे करीत आहेत.

# ड्रीम युवा प्रेरणा पुरस्कार, कार्पोरेट हुरडा पार्टीचे उद्या आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ मार्च-**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त ड्रीम फाउंडेशन व बसवसंगम शेतकरी गटातर्फे कार्पोरेट हुरडा पार्टी व ड्रीम युवा प्रेरणा पुरस्काराचे सोमवारी १७ मार्च रोजी सकाळी १० ते दुपारी ३ या कालावधीत हॉटेल बालाजी सरोवर, पृथ्वी हॉल, होटगी रोड, सोलापूर येथे वितरण होणार असल्याचे संस्थापक अध्यक्ष काशिनाथ भतगुणकी यांनी सांगितले.



महिला बचत गट, शेतकरी गटाचे उत्पादन, तृणधान्यापासून बनविलेल्या खाद्य पदार्थ स्टॉलच्या प्रदर्शनाचेही आयोजन करण्यात आले आहे. उद्‌घाटन उपजिल्हाधिकारी अमृत नाटेकर यांच्या हस्ते होणार असून, अध्यक्षस्थानी बालाजी अमाईन्सचे व्यवस्थापकीय संचालक राम रेड्डी राहणार आहेत. जयहिंद शुगरचे संचालक बब्रुवान माने-देशमुख स्वागताध्यक्ष राहणार आहेत. या कार्यक्रमाला गजराबाई भतगुणगी यांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

यावेळी दैनिक तरुण भारतचे मुख्य संपादक प्रशांत माने, निवृत्त सहायक पोलिस आयुक्त दीपक आर्वे, डॉ. प्रकाश घटोळे, सहकारी पतसंस्था फेडरेशनचे संस्थापक अध्यक्ष दिलीप पतंगे, गंगाधर बिराजदार, तानाजी माने, प्रा. जितेंद्र पवार, डॉ. वैजीनाथ कुंभार, संगमेश्वर जेऊरे, वैशाली कुलकर्णी, प्रमोद डोंगरे, सूर्यकांत बिराजदार, सचिन थिटे, पल्लवी वाले, संगीता जोगधनकर, स्नेहा देशमुख, राहुल काटकर, पंचाक्षरी स्वामी, संतोष कासे, अमोगसिद्ध लांडगे, विजय पटणे, श्रीनिवास काटवे, अस्मिता ढेपे, प्रविण तळे यांना पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. यावेळी ज्येष्ठ पत्रकार सिद्धाराम पाटील, सचिन चव्हाण, संतोष पाटील, डॉ. मल्लिनाथ साखरे यांचा सत्कार करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन समर्थ माने-देशमुख, कल्लप्पा भतगुणगी, संगीता पाटील यांनी केले आहे.

# संतशिरोमणी सावता महाराजांसह संतांच्या रचनांवर आधारित भक्तीगीतांचा कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ मार्च-**

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक विभाग आणि सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने संत शिरोमणी सावता महाराजांच्या अभंगांवर आधारित विठ्ठल देखियेला डोळां हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.



सोमवार दिनांक १७ मार्च रोजी संध्याकाळी ६.३० वाजता हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या किर्लोस्कर सभागृहात हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून सर्वांसाठी प्रवेश खुला असल्याची माहिती सांस्कृतिक कार्य विभागाचे अप्पर सचिव विकास खारगे आणि सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक बिभीषण चवरे यांनी दिली आहे. सोम वारी दिनांक १७ मार्च रोजी संध्याकाळी ६.३० वाजता किर्लोस्कर सभागृहात होणाऱ्या कार्यक्रमात संतशिरोमणी सावता माळी यांचे अभंग सादर केले जातील. तसेच महाराष्ट्रातील अन्य संतांच्या रचनाही सादर केल्या जाणार आहेत. तसेच या कार्यक्रमासाठी श्रीक्षेत्र अरण येथिल संत सावता महाराजांचे १७ वे वंशज ह.भ.प. रविकांत महाराज वसेकर यांची विशेष उपस्थिती असणार आहे. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, अरण येथिल विद्यार्थ्यांची दिंडी आणि श्रीफळ हंडीचा देखावा सादर करणार आहेत.

या कार्यक्रमात गायक विश्वास शाईवाले, उन्मेष शहाणे, श्रीराम पोतदार, सौ. वीणा बादरायणी, अपूर्वा शहाणे, स्वरदा मोहोळकर हे सर्वजण संत सावता महाराजांसह सर्व संतांच्या रचना सादर करतील. तर समीर जैन रणदिवे, अविनाश इनामदार (सिंथेसायझर), उमेश मोहोळकर (तबला), सन्मित जैन रणदिवे (पखवाज), नंदकुमार रानडे (तालवाद्य) यांची साथसंगत लाभणार आहे. या कार्यक्रमाचे निवेदन माधव देशपांडे हे करणार आहेत.

# खुनी हल्ल्याप्रकरणी जामीन मंजूर

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १५ मार्च -**

चौघांनी मिळून संगनमताने पोते फाडायच्या चाकूने प्राणघातक हल्ला करून जखमी केल्याप्रकरणातील चार आरोपींपैकी दर्शन मनोज सराफ या आरोपीस अतिरिक्त सत्र न्यायाधीश आर. जे. कटारिया यांनी जामीन मंजूर केला.

घरासमोर दारू पिण्यास मज्जाव केल्याचा राग मनात धरून दि. २३ नोव्हेंबर २०२४ रोजी पहाटे ३.४५ वाजता इम्रान शब्बीर इनामदार यास आरोपी दर्शन सराफ सह चौघांनी मार्केट यार्ड सोलापूर येथे गाठून त्याच्यावर पोते फाडायच्या चाकूने तसेच लाथा बुक्यांनी प्राणघातक हल्ला केला. त्या हल्ल्यात इम्रान हा गंभीर जखमी झाल्यामुळे त्यास सिव्हिल हॉस्पिटल सोलापूर येथे दाखल करण्यात आले होते. या बाबत इम्रानची आई रुखसाना इनामदार यांनी जेलरोड पोलीसात फर्याद दिली होती.गुन्ह्याचा तपास पोलिस उपनिरीक्षक अमोल डेरे यांनी केला.

या खटल्याच्या सुनावणीवेळी आरोपीचे वकील यांनी केलेला युक्तिवाद ग्राह्य मानून न्यायाधीशांनी आरोपी दर्शन सराफचा जामीन मंजूर केला. या खटल्यात सरकार तर्फे अॅड. अल्पना कुलकर्णी यांनी तर आरोपी तर्फे अॅड. अथर्व अंदोरे, अॅड. आल्हाद अंदोरे, अॅड. सुयश पुळूजकर यांनी काम पाहिले.

# १९ तासाच्या अथक प्रयत्नानंतर सापडला पृथ्वीराजचा मृतदेह

### वांगी येथील घटना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ मार्च-**

उत्तर सोलापूर तालुक्यातील वांगी येथे दोन मुलासह आईने विहीरीत उडी मारून आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना घडली. यात पृथ्वीराज हा मिळून आला नव्हता. त्यामुळे विहीरीतील पाणी विद्युत मोटारीच्या सहाय्याने काढून त्याचा शोध घेतला जात होता. गावकरी, पोलीस यांनी केलेल्या शोधमोहिमेला तब्बल १९ तासांनी यश आले. गुरुवारी सकाळी सात वाजता पृथ्वीराजचा मृतदेह लाकडात विहीरीत पडलेल्या लाकडात अडकलेल्या अवस्थेत आढळून आला.

पृथ्वीराज बाबासाहेब हक्के (वय ५, रा. वांगी ता. उत्तर सोलापूर) असे मुलाचे नाव आहे. बुधवारी दुपारी १२ च्या सुमारास ही दुर्दैवी घटना घडली होती. यात चित्रा बाबासाहेब हक्के (वय २८) व स्वराज बाबासाहेब हक्के (वय २) यांचाही मृत्यू झाला आहे. चित्रा यांनी बुधवारी दुपारी १२ नंतर दोन मुलांसह जवळच असलेल्या ८० फूट खोल विहीरीत उडी घेतली होती. विहीरीत काही तरी पडल्याचा आवाज शेजारील शेतक-यांना आला, परंतु काय पडले याचा अंदाज आला नव्हता. परंतु काही तासानंतर स्वराज हा पाण्यावर तरंगताना दिसल्याने तेथील लोकांनी गडबड करून इतरही दोघांना काढण्याचा प्रयत्न केला.

यात अरुंद आणि खोल विहीर असल्याने अनेक अडचणी निर्माण झाल्याने गावक-यांनी अग्निशामक दलाला पाचारण केले. अग्निशामक दलाच्या जवानांनी गावकरी व तालुका पोलिसांच्या मदतीने चित्रा यांना बाहेर काढले. परंतु बुधवारी रात्री उशिरा प्रयत्न करूनही पृथ्वीराज आढळला नसल्याने, गावक-यांनी विहीरीतील पाणी उपसण्याचा निर्णय घेतला. विहीरीवर असलेल्या विद्युत मोटारी व इतर दोन मोटारी लावून रात्रभर पाणी उपसा करण्यात आला.

सकाळी सातच्या सुमारास विहीरीतील पाणी कमी झाल्यानंतर विहीरीत पडलेल्या लाकडात अडकलेल्या अवस्थेत पृथ्वीराजचा मृतदेह आढळून आला. तो विहीरीतून बाहेर काढल्यानंतर शवविच्छेदनास पाठविण्यात आले. बुधवारी तिघांवर गावाच्या परिसरात अंत्यसंस्कार करण्यात आले. वांगी गावासह परिसरात या घटनेनंतर हळहळ व्यक्त केली जात आहे. याप्रकरणी तालुका पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यू अशी नोंद झाली आहे. या गुन्ह्याचा तपास सपोनि कदम करत आहेत.

# सोलापूर जिल्ह्याची वीजबिल थकबाकी ४४ कोटींची

### ४२७९ ग्राहकांचा वीजपुरवठा खंडीत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ मार्च-**

महावितरणच्या पुणे प्रादेशिक विभागातील पाच जिल्ह्यांमध्ये घरगुती, व्यावसायिक व औद्योगिक ग्राहकांकडे ३१० कोटी ८४ लाख रुपयांची थकबाकी आहे. थकीत वीजबिलाच्या वसुलीसाठी महावितरणकडून एका महिन्यात ५१ हजार ७३५ ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित करण्यात आला आहे. यामध्ये सोलापूर जिल्ह्यात ४४ कोटी ७ लाख रुपये थकबाकी असून सोलापूर जिल्ह्यातील ४२७९ ग्राहकांचा वीजपुरवठा खंडीत करण्यात आला आहे.

महसुलाचा आर्थिक स्रोत प्रामुख्याने वीजबिलांची वसुली हाच असून थकबाकीचा भरणा होत नसल्याने वीजपुरवठा खंडित करण्याची कारवाई करण्यात येत असल्याचे महावितरणकडून सांगण्यात आले.



शेजाऱ्यांकडून किंवा इतर ठिकाणाहून थकबाकीदार विजेचा वापर करीत असल्याचे आढळल्यास शेजारी व संबंधित थकबाकीदारांविरोधातही भारतीय विद्युत कायदा २००३ च्या कलम १३५/१३८ नुसार कारवाई करण्यात येणार असल्याचेही महवितरणकडून कळविण्यात आले.

पुणे जिल्ह्यात १९९ कोटी ९९ लाख रुपये, सातारा जिल्ह्यात २० कोटी ४० लाख रुपये, सोलापूर जिल्ह्यात ४४ कोटी ७ लाख रुपये, कोल्हापूर जिल्ह्यात २० कोटी ८० लाख रुपये आणि सांगली जिल्ह्यात २४ कोटी ९५ लाख रुपयांची थकबाकी आहे. त्यामुळे जिल्ह्यातील ४२ हजार ७३ थकबाकीदारांसह सातारा जिल्ह्यातील १९२०, सोलापूर जिल्ह्यातील ४२७९, कोल्हापूर जिल्ह्यातील १४९० आणि सांगली जिल्ह्यातील १९७३ थकबाकीदारांचा वीजपुरवठा खंडित करण्यात आला आहे.

# घर तिथे शिवसैनिक आणि गाव तिथे शाखा संकल्पना तारणार

- गळती लागलेल्या सेनेला उद्धव ठाकरे सोलापूर दौऱ्यातून देणार नवसंजीवनी
- एप्रिल किंवा मे महिन्यात बांधणार पक्षसंघटनात्मक मोट
- जिल्हा संपर्कप्रमुख अनिल कोकीळ यांची माहिती



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ मार्च-**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे सोलापूर दौऱ्यावर येणार आहेत. एप्रिल किंवा मे महिन्यात त्यांचा दौरा सोलापूर शहरात संपन्न होणार आहे. त्याचा पार्श्वभूमीवर सोलापूर जिल्ह्याचे संपर्कप्रमुख अनिल कोकीळ यांनी उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातील सर्व प्रमुख पदाधिकारी आणि शिवसैनिक यांच्या गाठीभेटी तसेच बैठकांचे सत्र सुरू केले आहे. त्या अनुषंगाने कोकीळ यांनी शनिवारी सोलापूर दौऱ्यावर आले असता, त्यांनी विश्रामगृह येथे शिवसेनेच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची भेट घेऊन चर्चा केली.

दरम्यान, शनिवारी सायंकाळी पूर्व भागातील दाजीपेठ येथे प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक घेऊन पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या सोलापूर दौऱ्यासंदर्भात माहिती दिली. तत्पूर्वी एप्रिल किंवा मे महिन्यामध्ये पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचे सोलापूर शहर जिल्ह्यासाठी मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात येणार असल्याचे सांगितले. त्याच पद्धतीने दौऱ्या संदर्भात आढावा घेत पदाधिकाऱ्यांना शिबिरा बाबत माहिती दिली. तत्पूर्वी अनिल कोकीळ यांनी या शिबिराबाबत माहिती देताना सांगितले की, पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी मुंबईतून या मार्गदर्शन शिबिराचे उद्घाटन केले आहे. राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात तालुक्यात आणि गाव पातळीवर हे मार्गदर्शन शिबिर संपन्न होणार आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सर्व निवडणुका लक्षात घेता, शिवसेनेने मार्गदर्शन शिबिरातून पक्ष संघटन तसेच पक्ष मजबुतीकरण करण्यावर लक्ष केंद्रित करणार असल्याचे सांगितले. महापालिका निवडणुकांमध्ये शिवसेनेला गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी ग्रामीण भागामध्ये घर तिथे शिवसैनिक आणि गाव तिथे शाखा या संकल्पनातून शिवसेना कार्यरत राहणार आहे. यासंकल्पनेतून सच्चा शिवसैनिकांस महत्त्वाच्या पदावर नेमून जबाबदारी निश्चित करण्यात येणार आहे. त्यासाठी संघटनात्मक बैठकी घेण्याचे सत्र सुरू झाले आहे. त्या अनुषंगाने सोलापूर शहर जिल्ह्याच्या संघटनात्मक बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. आगामी निवडणुका जिंकण्यासाठी प्रत्येक पदाधिकारी आणि शिवसैनिकांवर जबाबदारी देण्यात येणार असल्याचे कोकिळ यांनी सांगितले.

> सोलापूर शहर तसेच ग्रामीण भागातील शिवसेनेला अधिक बळकट येण्यासाठी, ग्रामीण भागामध्ये तसेच शहरी भागांमध्ये नवनवीन शाखा सुरू करण्यात येणार आहेत. नवीन पदाधिकाऱ्यांच्या निवडी तसेच त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करण्यात येणार आहे. यासाठी नवीन संकल्पना सुरू करण्यात येणार आहे. घर तिथे शिवसैनिक आणि गाव ते शाखा..या नव्या संकल्पनेच्या माध्यमतून शिवसेनेला गतवैभव प्राप्त करून देण्यासाठी प्रयत्नशील राहणार आहे.
>
> **- अनिल कोकीळ,**
> जिल्हा संपर्कप्रमुख शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे

यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अजय दासरी, संतोष पाटील, उपजिल्हाप्रमुख प्रताप चव्हाण, दत्तात्रय गणेशकर, विधानसभा संपर्कप्रमुख काशीनाथ बासूतकर, प्रशांत मडाळकर, उमेश सारंग, उपशहरप्रमुख अजय खांडेकर पांडूरंग पवार, अतुल भवर, आदीं उपस्थित होते.

# अल्पवयीन मुलीला पळवणाऱ्याविरुध्द गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ मार्च-**

अल्पवयीन मुलीचा विनयभंग करून तिला बेशुध्द पाडून रेल्वे स्टेशन येथे पळवून नेणाऱ्याविरुध्द जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पिडीतेच्या नातेवाईकाच्या फिर्यादीवरुन तोंडास रुमाल बांधलेल्या अनोळखी व्यक्तीविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील पिडीत अल्पवयीन मुलगी ही १२ मार्च रोजी दुपारी पावणे तीनच्या सुमारास कन्ना चौक येथील रामकृष्ण मेडीकलसमोरील रोडवर अॅटोरिक्षातून उतरून पायी चालत जात होती. त्यावेळी अनोळखी व्यक्तीने पिडीतेचा हात पकडून तिच्या मनास लज्जा वाटेल असे कृत्य करीत असताना पिडीतेने ओरडण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी त्या अनोळखी व्यक्तीने पिडीतेला ओरडू नको, गुपचुप रहा असे म्हणून तोंडास रूमाल दाबून तिला बेशुध्द केले. त्यानंतर पिडीतेचे अपहरण करून तिला कोणत्यातरी वाहनातून सोलापूर रेल्वे स्टेशन येथे घेऊन गेला. म्हणून जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. महिला सहायक पोलिस निरीक्षक भांबिष्टे पुढील तपास करीत आहेत.

CMYK




सोलापूर

# तरुण भारत

SOLAPUR TARUN BHARAT

न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

आसमंतसह

सोलापूर | रविवार, १६ मार्च २०२५ | युगाब्द ५१२६ | वर्ष ४१ वे अंक १२७ | पाने १२+८ | किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com

epaper.dainiktarunbharat.com


## आज तुकाराम बीज



*आम्ही जातो आपुल्या गावा।*
*आमचा राम राम घ्यावा।।*
*तुमची आमची हेचि भेटी।*
*येथुनियां जन्मतुटी।।*
जगद्गुरू तुकोबारायांच्या
चरणी साष्टांग दंडवत

# औरंगजेबाची कबर नष्ट करण्यासाठी 'कारसेवे'चा बजरंग दलाचा इशारा

● बजरंग दल महाराष्ट्र-गोवा क्षेत्राचे संयोजक विवेक कुलकर्णी यांनी मांडली भूमिका

अहिल्यानगर, दि. १५ मार्च

परकीय आक्रमकाचा वंशज असलेल्या औरंगजेबाने हिंदूंवर अत्याचाराचा कळस केला. जिहादी मानसिकतेच्या औरंगजेबाच्या कबरीचे राज्य सरकार व मुख्यमंत्र्यांनी अस्तित्व ठेवू नये. अन्यथा प्रत्यक्ष 'कारसेवा' कृती करण्याचा इशारा बजरंग दलाने दिला आहे. ही कारसेवा आयोध्येतील दि. ६ डिसेंबर १९९२ प्रमाणे असेल असेही बजरंग दलाने स्पष्ट केले



बजरंग दलाच्या महाराष्ट्र-गोवा क्षेत्राचे संयोजक विवेक कुलकर्णी यांनी हा इशारा दिला आहे. विश्व हिंदू परिषदेचे जिल्हा सहमंत्री शरद नगरकर यावेळी उपस्थित होते. यासाठी सुरू करण्यात आलेल्या राज्यव्यापी आंदोलनाच्या पहिल्या टप्प्यात, सोमवारी (दि. १७),.छत्रपती शिवाजी महाराज जयंतीदिनी, राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना विश्व हिंदू परिषद देणार असल्याचेही त्यांनी सांगितले. आलमगीर या नावाने जिथे-जिथे उदातीकरण सुरू आहे. ती सर्व ठिकाणे राज्य सरकारने नष्ट करावीत, कोणत्याही परकीयाचे नामोनिशाण या स्वतंत्र भारतात असू नये. औरंगजेबाचे अहिल्यानगर शहरात निधन झाले. पुढे त्याचे अवयव छत्रपती संभाजीनगर शहरात पुरण्यात आले. तिथेच खबर करण्यात आली. आज त्याचे उदत्तीकरण सुरू आहे. स्थानिक प्रजेला अत्यंत पीडा देणारा, अन्यायी, दुराचारी, राष्ट्राचा शत्रू असणाऱ्या औरंगजेबाची कबर अस्तित्वात असणे ही एक प्रकारची म ानसिक गुलामगिरी असल्याचा दावाही विवेक कुलकर्णी यांनी केला.

हिंदूंच्या कराच्या निधीतून पुरातत्व विभाग औरंगजेबाची कबर जतन करतो आहे. या पुरातत्त्व विभागाचीही फेररचना करावी, अशी मागणी त्यांनी केली. हिंदुद्वेषी असलेल्या औरंगजेबाने छत्रपती संभाजी महाराजांचा छळ करून वध केला. त्याचे कोणतेही स्मारक कबर भारतात असणे हे एक प्रकारे त्याने केलेल्या अन्यायांना प्रोत्साहन देण्यासारखे आहे. त्यामुळेच छत्रपती संभाजी 'महाराजांच्या सन्मानासाठी बजरंग दल मैदानात' अशा स्वरूपाचे आंदोलन केले जात असल्याचेही त्यांनी सांगितले.

स्वाभिमानासाठी हिंदू जागृत होत आहेत. हिंदू हिताच्या मागण्या त्यातूनच पुढे येत आहेत, त्यामुळे समाजवादी व साम्यवादी उफाळून येत आहेत, अशी टीकाही विवेक कुलकर्णी यांनी केली.

## ...त्यामुळे कबर काढू नका : रोहित पवार

**अहिल्यानगर, दि.१५ मार्च**

एवढा बलाढ्य औरंगजेब २७ वर्ष या महाराष्ट्रामध्ये बलाढ्य सेनेसह राहिला. मात्र त्याला छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांचा महाराष्ट्र जिंकता आला नाही अखेर एवढा शक्तिशाली श्रीमंत औरंगजेब फक्त कबरी पुरताच शिल्लक राहिला आणि हा पराक्रम सर्व मावळ्यांचा आहे, त्यामुळे ती कबर काढू नका, असे आ. रोहित पवार म्हणाले.

ते अहिल्यानगर येथे पत्रकारांशी बोलत होते. औरंगजेबाची कबर हीच खऱ्या अर्थानं सर्व मावळ्यांच्या पराक्रम ाचे प्रतीक आहे. पराक्रमाची साक्षा आहे. जर औरंगजेबाची ही कबर काढली तर उद्या काहीजण हा इतिहास बदलतील. त्यामुळे हे सर्व टाळण्यासाठी मावळ्यांच्या शौर्याचे प्रतीक असणारी ही औरंगजेबाची कबर या ठिकाणी राहू द्या असे रोहित पवार म्हणाले. रयतेचे राज्य व्हावे, स्वराज्य स्थापन व्हावे यासाठी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली या महाराष्ट्रातील सर्व समाजाचे जाती-धर्माची मावळे आपले प्राण पणाला लावून लढले.



पुण्यातील वानवडी परिसरात असलेल्या सॅक्रेड वर्ल्ड इमारतीला शनिवारी भीषण आग लागली. जोरदार वाहणाऱ्या वाऱ्यामुळे आगीने काही क्षणातच भीषण रूप धारण केले होते

## महत्त्वाचे

### बँक कर्मचारी दोन दिवसांच्या संपावर

**कोलकाता :** भारतीय बँक महासंघ अर्थात आयबीएशी प्रलंबित असलेल्या प्रमुख मागण्यांवर झालेल्या चर्चेत तोडगा न निघाल्याने २४ आणि २५ मार्च रोजी देशव्यापी संपावर जाण्याचा इशारा बँक कर्मचाऱ्यांची संघटना युनायटेड फोरम ऑफ बँक युनियन्सने दिला आहे. नॅशनल कॉन्फेडरेशन ऑफ बँक एम्प्लॉईजचे सरचिटणीस एल. चंद्रशेखर यांनी सांगितले की, सर्व श्रेणीमध्ये त्वरित नोकरभरती आणि पाच दिवसांचा कामकाजाचा आठवडा यासह अन्य प्रलंबित मुद्दे आयबीएशी झालेल्या वाटाघाटीच्या बैठकीत उपस्थित केले. यावर कुठलाही तोडगा निघाला नाही. केंद्रीय अर्थमंत्रालयातील वित्तीय सेवा विभागाकडून कर्मचारी कामगिरी आढावा आणि कामगिरीशी संबंधित प्रोत्साहनांवर आधारित कामकाजाचे निर्देश दिले होते, मात्र अशा उपाययोजनांमुळे नोकरीची सुरक्षितता धोक्यात येते. त्यामुळे या प्रकारचे निर्देश मागे घेण्याची मागणीही संघटनांनी केली. सार्वजनिक क्षेत्रातील बँकांमध्ये केल्या जाणाऱ्या हस्तक्षेपालाही आमचा विरोध आहे. इतर मागण्यांमध्ये ग्रॅच्युईटी कायद्यात सुधारणा करून त्याची कमाल मर्यादा २५ लाख रुपये करणे, ती सरकारी कर्मचाऱ्यांच्या योजनेशी जुळवून घेणे आणि प्राप्तिकरातून सूट मिळणे यांचा समावेश आहे.

### सर्व वाहनांना फास्टटॅग बंधनकारक अन्यथा दुप्पट टोल

**मुंबई :** राज्यातील सर्व वाहनांना आता फास्टॅग बंधनकारक करण्यात आला आहे. या संदर्भातील निर्णयाला राज्य मंत्रिमंडळाने काही दिवसांपूर्वीच मंजूरी दिली होती. आता या निर्णयाची अंमलबजावणी १ एप्रिल २०२५ पासून करण्यात येणार आहे. तसेच १ एप्रिल २०२५ नंतर फास्टॅग नसलेल्या वाहनांकडून दुप्पट टोल वसूल केला जाणार आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने हा निर्णय घेतला आहे. त्यामुळे आता १ एप्रिलपासून सर्व वाहनांना फास्टॅग असणं अनिवार्य असणार आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाद्वारे चालवल्या जाणाऱ्या सर्व टोल प्लाझांवर आता फास्टॅगद्वारे पैसे भरणे बंधनकारक असणार आहे. मात्र, जे वाहनधारक या पद्धतीचा स्वीकार करणार नाहीत, किंवा या पद्धतीने शुल्क भरण्यास असमर्थ असतील तर त्या वाहनधारकांना १ एप्रिलनंतर दुप्पट टोल भरावा लागणार असल्याचे वृत्त आहे.

### अमृतसरमधील मंदिरावर ग्रेनेड हल्ला

**अमृतसर :** अमृतसरच्या खंडवाला परिसरातील मंदिरावर शनिवारी पहाटे झालेल्या ग्रेनेड हल्ला प्रकरणात पोलिसांनी तीन आरोपींना बिहारमधून अटक केली. ते शस्त्रास्त्रे आणि ग्रेनेड पुरवठा करायचे. बिहारमधून नेपाळला पळ काढण्याच्या तयारीत असताना त्यांना अटक करण्यात आल्याचे पोलिस आयुक्त गुरप्रीतसिंग भुल्लर यांनी सांगितले. ७ मार्चला मादकपदार्थ तस्करीच्या प्रकरणात एफआयआर दाखल करून दोन आरोपींना अटक करण्यात आली होती. या प्रकरणाच्या तपासात कर्ण, मुकेश आणि साजन या तीन युवकांची नावे समोर आली. कर्ण व्हीकेआयसोबत जुळलेला असून, शस्त्र पुरवठ्याचे तो काम करतो. आम्ही कर्णचा पाठलाग करीत बिहारच्या माधेपुरात गेलो आणि तिथून आरोपींना अटक केली, असे भुल्लर यांनी सांगितले. खंडवाला परिसरातील मंदिराच्या बाहेर दुचाकीवर आलेल्या दोघांनी ग्रेनेड भिरकावला.

## १८ जिल्ह्यांत प्राथमिक आरोग्य केंद्रांचे सौर ऊर्जीकरण

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची माहिती

**तभा वृत्तसेवा/ विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १५मार्च :**

पारंपरिक ऊर्जा स्त्रोत हे मर्यादीत असल्यामुळे यापुढील काळात अपारंपरिक ऊर्जा स्त्रोतांवरच अधिक भर द्यावा लागणार आहे. या क्षेत्राला प्रोत्साहन देऊन अधिकाधिक ऊर्जा निर्मिती करण्याची शासनाची भूमिका आहे. राज्यात अपारंपरिक ऊर्जेच्या उपयोगासाठी सेल्को फाउंडेशन कार्यरत आहे. फाउंडेशनच्या सहकार्याने राज्यातील १८ जिल्ह्यातील प्राथमि क आरोग्य केंद्रांचे सौरऊर्जीकरण करण्यात येणार असून सध्या आठ जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्राचे सौरऊर्जीकरण पूर्णत्वास आले आहे. तर, दहा जिल्ह्यात सौरऊर्जीकरण प्रकल्प कार्यान्वित करण्यात येणार आहेत. त्याच्या उपयोगामुळे राज्यात दर्जेदार आरोग्य सुविधांची उपलब्धता निर्माण होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे.



राज्यात नाशिक, अहिल्यानगर, जळगाव, बुलढाणा, गडचिरोली, नागपूर, लातूर आणि वर्धा या आठ जिल्ह्यातील प्राथमि क आरोग्य केंद्रांचे सौरऊर्जीकरण पूर्णत्वास आले आहे. तसेच आणखी दहा जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रांचे सौरऊर्जीकरण फाउंडेशनच्या सहकार्याने पूर्ण करण्यात येणार असून प्राथमिक आरोग्य केंद्र ऊर्जेबाबत स्वावलंबी होणार आहेत. यामुळे विजेच्या देयकांमध्ये मध्ये मोठी बचत होणार आहे. या सौर प्रकल्पामुळे प्राथमिक आरोग्य केंद्राची २४ तास अखंड वीज पुरवठ्याची गरज पूर्ण होणार असून यामुळे आरोग्य सेवा अधिक बळकट होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

फडणवीस म्हणाले, सौर ऊर्जेच्या उपयोगामुळे स्थानिक पातळीवर पर्यावरणीय जागरूकता वाढेल आणि रुग्णसेवेच्या गुणवत्तेतही सुधारणा होईल. सौरऊर्जेचा वापर केल्याने कार्बन उत्सर्जन कमी होणार असून प्रदूषण कमी होण्यास निश्चितच मदत मिळणार आहे. सेल्को फाउंडेशन ही अपारंपरिक ऊर्जा क्षेत्रात काम करणारी कंपनी आहे. सेल्को फाउंडेशनने यापूर्वी आरोग्य सेवा सुधारण्यासाठी आणि शाश्वत ऊर्जेच्या प्रचारासाठी एक महत्त्वाचे पाऊल म्हणून आयकिया कंपनीच्या सहकार्याने ८ जिल्ह्यांतील प्राथमिक आरोग्य केंद्रांचे सौरऊर्जीकरण पूर्ण केले आहे. सेल्को फाउंडेशन आणि आयकिया कंपनी या प्रकल्पासाठी ५० कोटीची मदत राज्य शासनाला करणार आहे.

## राममंदिर समितीची आज बैठक

◆ **अयोध्या, १५ मार्च**

श्री राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र न्यासाच्या विश्वस्तांची बैठक रविवारी होणार आहे. न्यासाचे अध्यक्ष महंत नृत्यगोपाल दास बैठकीच्या अध्यक्षस्थानी राहणार आहेत.

तीर्थ क्षेत्र न्यासाचे सरचिटणीस चम्पत राय, कोषाध्यक्ष गोविंद देव गिरी, सदस्य स्वामी वासुदेवानंद सरस्वती, स्वामी विश्वप्रसन्न तीर्थ आणि अनिल मिश्रा तसेच मंदिर बांधकाम समितीचे अध्यक्ष नृपेंद्र मिश्रा, केंद्राचे प्रतिनिधी या बैठकीतउपस्थित राहतील, अशी माहिती विश्वस्त समितीतील सूत्रांनी दिली.

यापूर्वी समितीची बैठक नोव्हेंबरमध्ये घेण्यात आली होती. त्यात प्राप्त झालेल्या देणग्या आणि मंदिराच्या बांधकामावर झालेल्या खर्चावर चर्चा झाली होती. मंदिराच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या मजल्यावरील मूर्ती, परिसरात आणखी मंदिरांची उभारणी, लोकसुविधा त्याप्रमाणे देणग्या व खर्चावर रविवारच्या बैठकीत चर्चा होणार आहे, असे सूत्रांनी सांगितले. ◂(वृत्तसंस्था)

## सीमापार दहशतवाद मान्य नाही

### संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेत भारत आक्रमक

◆ **संयुक्त राष्ट्रसंघ, १५ मार्च**

संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेत जम्मू-काश्मीरचे तुणतुणे वाजवणाऱ्या पाकिस्तानला भारताने फटकारले. अशा प्रकारच्या टिप्पण्यांमुळे पाकिस्तानचा दावा सिद्ध होणार नाही किंवा सीमापार दहशतवादाच्या त्यांच्या प्रथेचे समर्थन होणार नाही, असे भारताने म्हटले आहे.

नेहमीच्या सवयीप्रमाणे पाकिस्तानच्या माजी परराष्ट्र सचिवाने भारतीय केंद्रशासित प्रदेश जम्मू-काश्मीरचा अयोग्य उल्लेख केला आहे, असे भारताचे संयुक्त राष्ट्रसंघातील कायम प्रतिनिधी पी. हरीश यांनी शुक्रवारी इस्लामोफोबियाशी लढण्यासाठी आंतरराष्ट्रीय दिनानिमित्त आयोजित महासभेच्या औपचारिक बैठकीत सांगितले. पाकिस्तानकडून वारंवार उल्लेख केल्याने त्यांच्या दाव्याची पुष्टी होणार नाही किंवा सीमापार दहशतवादाच्या त्यांच्या कृतीचे समर्थन होणार नाही, असे हरीश यांनी सांगितले. या देशाची कट्टर मानसिकता आणि त्यांची धर्मांधता सर्वज्ञात आहे. यामुळे जम्मू-काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग होता, आहे आणि राहील हे वास्तव कधीच बदलणार नाही, असे ते म्हणाले. ◂(वृत्तसंस्था)

## एकनाथ शिंदे काँग्रेसमध्ये जाणार होते

### संजय राऊत यांचा गौप्यस्फोट

**मुंबई, दि.१५ मार्चः**

एकनाथ शिंदे यांचा भगव्याशी काही संबंध नाही .तपास यंत्रणेच्या भीतीपोटी त्यांनी गद्दारांना घेऊन शिवसेना फोडली. यापूर्वी ते काँग्रेसमध्ये जाणार होते. त्यासाठी त्यांनी काँग्रेसचे तत्कालिन नेते अहमद पटेल यांची भेट घेतली होती, असा गौप्यस्फोट ठाकरे गटाचे नेते खा .संजय राऊत यांनी शनिवारी केला.



धुळवडीच्यादिनी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते नाना पटोले यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांना काँग्रेस सोबत येण्याची ऑफर दिली होती त्याला उत्तर देताना शिंदे यांनी प्रत्युत्तर देताना शिंदे यांनी आमचा रंग भगवा आहे, जे कोणी येतील त्यांचे स्वागत आहे असे म्हटले होते . त्याबाबत राऊत यांनी आज शिंदे यांच्यावर टीका करीत हा गौप्यस्फोट केला. तसेच नानांच्या ऑफरमध्ये सुधीर मुनगंटीवार आहेत का असा चिमटाही काढला. ते म्हणाले, शिंदे यांचा भगव्याशी काही संबंध नाही. त्यांचा गट भाजपच्या ताटाखालचे मांजर झाली आहे. त्यांच्या आणि अजित पवार यांच्या हातात भाजपचा झेंडा आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा भगवा झेंडा आहे. भगव्या झेंड्याशी त्यांचा काही संबंध नाही. तो उध्दव ठाकरे यांच्या शिवसेनेचा आहे, असे सांगून ते म्हणाले, गद्दार शिंदे काँग्रेस आघाडी सरकारच्या काळात काँग्रेसकडे चालले होते. काँग्रेसचे नेते अहमद पटेल आता हयात नाहीत. पण दिल्लीत त्यांच्याशी पहाटे चर्चाही केली होती. पण त्यावेळी त्यांना ते शक्य झाले नाही. पृथ्वीराज चव्हाण यांना विचारा ते त्याबाबत जास्त माहिती देतील.

नाना पटोले यांच्या ऑफर बद्दल ते म्हणाले, नाना हे आमचे सहकारी आहेत. राजकारणात काहीही अशक्य नसते.मविआ सरकार येईल असे कोणाला वाटले होते का? राजकारणात सर्व शक्यता आहे. त्यांनी कुणाला ऑफर दिली आहे व कुणी मान्य केली आहे का हे त्यांच्याशी चर्चा करून बघू. राजकारणात रुसवे फुगवे आदळ आपट सुरू आहे .नाना यांनी लवकर भांडे वाजवले, थोडे थांबायला हवे होते, तसेच त्यांच्या ऑफरमध्ये मुनंगंटीवार आहेत का? असा टोलाही लगावला.

**तर मग नेतेपद कसे दिलेः खा.मस्के**

एकनाथ शिंदे यांच्या मागे राज्यातील जनता आहे त्यामुळे ठाकरे गटाकडून वारंवार त्यांच्यावर टीका करण्यात येत असल्याचा प्रत्युत्तर शिंदे गटाचे खा नरेंद्र मस्के यांनी दिले ते म्हणाले जर एकनाथ शिंदे काँग्रेसमध्ये जाणार होते हे माहीत होते तर मग त्यांना सेनेत नेतेपद कसे देण्यात आले होते? त्याचा राऊत खुलासा करावा.

## चाळीशी पार तापमानामुळे अंगाची लाही-लाही!

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ मार्च-**

सोलापुरात कमाल तापमानाचा पारा ४१ अंश सेल्सियसच्या पुढे जात असल्याने अक्षरशः दुपारच्या सत्रात नागरिकांच्या अंगाची लाहीलाही होवू लागली आहे. शनिवारी तर ४१.१ अंशांवर यंदाचे सर्वाधिक तापमान गेले होते. यामुळे दुपारी कडक ऊन, प्रचंड उकाडा अन् गरमीने सोलापूरकर हैराण झाले आहेत.



सकाळी १० वाजल्यापासूनच उन्हाचे चटके तर रात्री उशिरापर्यंत उकाडा जाणवत आहे. वाढत्या उन्हामुळे रस्त्यावर शुकशुकाट दिसून येतो मात्र शाळकरी मुले आणि चाकरमान्यांचे उन्हामुळे हाल होत आहेत. रमजानचा उपवास करणाऱ्या मुस्लिम बांधवांनाही याचा त्रास होत आहे. विद्यार्थ्यांची शाळा आता सकाळी केल्या असल्या तरी दुपारी ऐन उन्हातूनच विद्यार्थ्यांना आपले घर गाठावे लागत आहे. पहाटे गारवा लागतो आणि दिवसभर ऊन असते. दुपारी डोक्यावर टोपी, स्कार्फ, गॉगल लावूनच अनेकजण घराबाहेर पडतात. कडक उन्हामुळे चक्कर येण्याच्या घटनाही घडत आहेत.

या आठवड्यातील तापमान पाहता ११ मार्च पासून तापमान वाढताना दिसून आले. दरम्यान १३ मार्चला ४०.८ अंशावर तापमान गेले. यानंतर १४ मार्चला तर ४१.१ अंश आणि आज १५ मार्च रोजी ४०.३ अंशावर उन्हाचा पारा गेला. दरम्यान, या वाढत्या तापमानामुळे शेतकरी, शेतमजूर, कामगार आणि शाळकरी विद्यार्थ्यांचे मात्र दुपारच्या प्रहरात बेहाल होत आहेत. रब्बी हंगामाची सुगी असल्याने शेतकरी बांधवांना दिवसभर असे कडक ऊन अंगावर घेवूनच कष्ट करावे लागत आहे.

## क्रायोजेनिक इंजिनची यशस्वी चाचणी

### इस्रोचे आणखी एक यश

◆ **बंगळुरू, १५ मार्च**

तामिळनाडूच्या महेंद्रगिरी येथील इस्रो प्रोपल्शन कॉम्प्लेक्स येथे एलव्हीएम३ प्रक्षेपण वाहनाच्या (एलव्हीएम-एम६) सहाव्या मोहिमेसाठी क्रायोजेनिक इंजिनची उष्ण चाचणी यशस्वीरीत्या पार पाडण्यात आली, अशी माहिती इस्रोने शनिवारी येथे दिली.

एलव्हीएम३ ( प्रक्षेपण वाहन मार्क-३) हे भारतीय अंतराळ संशोधन संस्थेने विकसित केलेले तीन टप्प्यांचे प्रक्षेपण वाहन आहे. प्रत्येक मोहिमेच्या क्रायोजेनिक इंजिनची उड्डाणासाठी स्वीकृती प्रक्रियेचा भाग म्हणून ही उष्ण चाचणी घेतली जाते, असे इस्रोने निवेदनात म्हटले आहे. सीई२० इंजिनची कामगिरी चाचणीतील सर्व उद्दिष्टे पूर्ण करीत होती आणि चाचणीच्या संपूर्ण कालावधीसाठी ठेवण्यात आलेल्या निकषांसोबत ही चाचणी जुळत होती. पुढे हे इंजीन २०२५ च्या दुसऱ्या सहामाहीत नियोजित असलेल्या एलव्हीएम३-एम६ मोहिमेसाठी प्रक्षेपण वाहनाच्या क्रायोजेनिक वरच्या टप्प्यात एकत्रित केले जाईल, असे इस्रोने निवेदनात म्हटले. ◂(वृत्तसंस्था)

### १०० सेकंदांपेक्षा जास्त वेळ चाचणी

नाविन्यपूर्ण नोझल प्रोटेक्शन सिस्टिमचा वापर करीत इंजिनची प्रथमच १०० सेकंदांपेक्षा जास्त वेळ चाचणी घेण्यात आली. या चाचणी पद्धतीमुळे क्रायोजेनिक इंजिनच्या उड्डाण स्वीकृती चाचणीसाठी लागणारा वेळ आणि प्रयत्न लक्षणीयरीत्या कमी होते. यामुळे अंतराळ मोहिमांसाठी क्रायोजेनिक टप्प्यांचे जलद वितरण होण्यास मदत होते, असे अंतराळ संस्थेने निवेदनात म्हटले आहे.



## 'अस्त्र' क्षेपणास्त्राची चाचणी यशस्वी

### नजरेच्या पलीकडील हवाई लक्ष्य भेदणे शक्य

◆ **भुवनेश्वर, १५ मार्च**

संरक्षण संशोधन आणि विकास संस्था अर्थात्? डीआरडीओने ओडिशाच्या किनारपट्टीवर प्रगत हलके लढाऊ विमान तेजस एमके-१च्या मूळ प्रतिकृती विमानावरून नजरेच्या पलीकडील हवाई लक्ष्य अचूकपणे भेदणाऱ्या 'अस्त्र' क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी घेतली.

चांदीपूर येथे अस्त्रची चाचणी घेण्यात आली, अशी माहिती संरक्षण दलातील सूत्रांनी दिली. तेजसमधून डागलेल्या अस्त्रने एका हलत्या लक्ष्याचा अचूक वेध घेतला. या चाचणीत अस्त्रच्या सर्वच उपप्रणालींनी अचूक कार्य केले आणि मोहिमेतील सर्व उद्दिष्टे पूर्ण केली, अशी माहिती सूत्रांनी दिला. या यशस्वी चाचणीसाठी संरक्षण मंत्री राजनाथसिंह यांनी डीआरडीओ, भारतीय वायुदल, हिंदुस्थान एरोनॉटिक्स लि. आणि चाचणीत सहभागी असलेल्या सर्वांचे अभिनंदन करीत त्यांना शुभेच्छा दिल्या. ही चाचणी यशस्वी झाल्याने 'एलसीए तेजस एएफ एमके १'मध्ये 'अस्त्र' क्षेपणास्त्र बसवण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. पुढील काही महिन्यांत त्याच्या अधिक चाचण्या घेण्यात येणार आहेत. ◂(वृत्तसंस्था)



## रोखठोक

**दिनेश गुणे**

# अस्मिताचिन्हांचा संस्कृतिसंघर्ष!

भारत हा विविधतेने नटलेला देश आहे, असे या देशाचे अभिमानास्पद वर्णन केले जाते. याचा स्पष्ट अर्थ, विविधता ही या देशाला लाभलेली देणगी आहे. विविध धर्म, विविध भाषा, परंपरा, चालीरीती, विभिन्न जीवनशैली, खाद्यसंस्कृती, पेहराव आणि प्रांताप्रांतातील भौगोलिक असमानता असूनही भारत हा एक अखंड देश आहे. या देशाला लाभलेली विविधता ही भारताची शक्ती आहे, ही समजूत आजची नाही. कारण या वैविध्यतेतही, संपूर्ण देशाला एकत्र बांधून ठेवणारी, भारत हा आपला देश आहे असे मानणारी राष्ट्रीयत्वाची भावना हा संपूर्ण देशाचा एक समान धागा आहे. या भावनेमुळे भारताची अखंडता कायम राहिली आहे. जेव्हा जेव्हा समाजात कोणत्याही भेदामुळे फूट पडते, तेव्हा तेव्हा देशावर परकीय आक्रमणे होतात आणि शत्रू प्रबळ होऊन भारताच्या अखंडतेला धोका निर्माण होतो, हे इतिहासाने वेळोवेळी सिद्ध केले आहे. याउलट, जेव्हा अशा शक्तींच्या विरोधात संपूर्ण देश आपले सर्व भेद विसरून एकवटतो आणि भारतीय समाज म्हणून संघर्ष करतो, तेव्हा आक्रमकांना माघार घ्यावी लागते, हादेखील इतिहासच आहे. वेगवेगळ्या भाषा, प्रांत, जातिधर्म, रीतीरिवाज आणि परंपरांचे पालन करणाऱ्या सर्व समाजाच्या मनात ऐक्याची भावना असते आणि आपापली सामाजिक, सांस्कृतिक जीवनशैली जपतानाही ही ऐक्यभावना जोपासली जाते, तेव्हा राष्ट्रीय एकात्मतेचे दर्शन घडते हेही इतिहासाने दाखवून दिले आहे. त्यामुळेच, विकासाच्या आणि समाजहिताच्या सार्वत्रिक भावनेतून घडविले जाणारे विविधतांचे एकत्रीकरण म्हणजे राष्ट्रीय एकात्मता किंवा राष्ट्रीय ऐक्य असे म्हटले जाते. अशा कोणत्याही भेदाचे निमित्त करून देशावर राजकीय सत्ता गाजविणाऱ्या किंवा अस्मितांचे भांडवल करून समाजामध्ये फूट पाडणाऱ्या कोणत्याही हालचाली किंवा कारवाया टाळणे आणि संपूर्ण देशात देशहिताच्या व सार्वजनिक हिताच्या भावना रुजविणे ही राष्ट्रीय एकात्मता रुजविण्याची एक प्रक्रिया असते. देशावर सत्ता गाजविणाऱ्या ब्रिटिशांनी याच प्रक्रियेत खोडा घातला, संघटित समाजात फूट पाडल्याखेरीज या देशावर सत्ता गाजविता येणार नाही, हे ओळखून त्यांनी समाजात फूट पाडण्याचे प्रयत्न केले आणि अखेर समाजात फूट पाडून, देशाचे तुकडे करूनच सत्ता सोडली हादेखील इतिहासच आहे. मूठभर ब्रिटिशांच्या विरोधात संघर्ष करण्याची प्रचंड जनशक्ती भारताकडे आहे आणि ती एकवटली तर राज्य करणे साधता येणार नाही याची जाणीव असल्यामुळेच ब्रिटिशांनी देशातील शक्तींमध्ये फूट तर पाडलीच, पण त्यांना परस्परांशी लढावयास लावून विविधतेतील ऐक्याच्या भावनेला सुरुंग लावला.

इतिहासाने देशाला दिलेल्या या धड्यांचा विसर पडावा अशी स्थिती वर्तमानात डोकावताना दिसू लागल्याने, राष्ट्रभावनेच्या भविष्यात पुन्हा एकदा सांस्कृतिक भेदाच्या भावना डोके वर काढतील आणि समाजामध्ये फूट पडल्यानंतर जे काही घडल्याचे इतिहासाचे दाखले होते, त्यांची पुनरावृत्ती होईल अशी भीती आता व्यक्त होऊ लागली आहे. कोणत्याही प्रकारच्या वैयक्तिक फायद्याचा विचार न करता सामाजिक हिताचा विचार करणे व त्यासाठी प्रसंगी आपल्या लाभाच्या विचाराचा त्याग करणे ही राष्ट्रीय एकात्मतेस बळ देणारी भावना असते. अलिकडे त्या भावनेला आव्हान देणारी जी काही परिस्थिती दिसू लागली आहे, त्यामागे गेल्या काही दशकांतील राजकारणाचा मोठा सहभाग असल्याचे दिसून येते. म्हणूनच या घडामोडींची गांभीर्याने दखल घेणे गरजेचे ठरते.

तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांनी गेल्या आठवड्यात पक्ष कार्यकर्त्यांना उद्देशून लिहिलेल्या एका पत्रानंतर देशात भाषाभेदाच्या राजकारणावरून काहीसे वादळ माजले आहे. नव्या शैक्षणिक धोरणाआडून केंद्र सरकार तामिळनाडूवर हिंदी व संस्कृत भाषा लादण्याचा प्रयत्न करत असून, त्याला तामिळनाडूमध्ये प्रखर विरोध केला जाईल असा इशारा या पत्राद्वारे त्यांनी दिला. येत्या वर्षभरात होणाऱ्या विधानसभा निवडणुकांचे निमित्त करून भाषिक अस्मितेचा भांडवल करत राजकीय लाभ लाटण्याचे जे काही प्रयत्न केले जातात, त्याचाच हा एक भाग असल्याच्या नजरेने स्टॅलिन यांच्या या नव्या भूमिकेकडे पाहता येईल. तामिळनाडूमध्ये भाषिक अस्मितेच्या भावनांवर फुंकर घालून राजकीय लाभ उठविण्याचा हा प्रयत्न नवा नाही. गेल्या जवळपास सहा दशकांपासून भाषावादाचा हा मुद्दा निवडणुकांच्या तोंडावर डोके वर काढत आला आहे. हिंदीला राजभाषा म्हणून मान्यता देण्याच्या मुद्द्यावर सुमारे सहा दशकांपूर्वी, १९६३-६४ च्या दरम्यान जेव्हा देशात मंथन सुरू होते, तेव्हा तामिळनाडूमध्ये याच्या विरोधात जोरदार सामाजिक असंतोष उफाळला होता. राज्यात ठिकठिकाणी निदर्शने झाली होती, हिंसाचाराच्या काही घटनाही घडल्या आणि त्यामध्ये सुमारे ७० जणांना जीव गमवावा लागला. साहजिकच, तेव्हा केंद्र सरकारने नमते घेत हा प्रस्ताव मागे घेतला आणि १९६७ मध्ये भाषा धोरणात सुधारणाही करण्यात आली. आताच्या केंद्र सरकारच्या नव्या शैक्षणिक धोरणानुसार देशातील प्रत्येक विद्यार्थ्यास किमान तीन भाषांचे ज्ञान असावे अशी भूमिका मांडण्यात आली आहे. विद्यार्थ्याच्या मातृभाषा म्हणजे तो ज्या राज्याची प्रादेशिक भाषा बोलतो त्या भाषेबरोबरच त्याला हिंदी भाषेचेही ज्ञान असावे असे हे सूत्र आहे. हिंदी ही संपूर्ण देशाला जोडणारी भाषा असल्याने राष्ट्रीय एकात्मता मजबूत व अखंड राहावी ही यामागील केंद्र सरकारची भूमिका असल्याने, पुन्हा एकदा सहा दशकांपूर्वीच्या अस्मितावादास तोंड फुटणार आहे. स्टॅलिन यांचे हे पत्र ही त्या वादाची सुरुवात आहे. राष्ट्रीय ऐक्याच्या प्रतीकांना छेद देणाऱ्या मानसिकतेची इथे वानवा नाहीच. भारत हा एक अखंड देश नाही, तर अनेक राज्यांचा तो समूह आहे,



असा विचार काँग्रेसचे नेते व लोकसभेतील सध्याचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी देशाबाहेर जाऊन मांडला होता. ही मानसिकतादेखील नवी नाही. साम्यवादी विचारसरणीत या मानसिकतेची बीजे रुजलेली आहेत. साम्यवादाचा प्रणेता स्टॅलिन याने शतकापूर्वीच ही विचारसरणी वेगळ्या स्वरूपात मांडली होती. पुढे साम्यवादाने भारतातील विभिन्न भाषा, संस्कृती, परंपरातील भिन्नता, बोली, अशा सामाजिक वेगळेपणाच्या मुद्द्यांचा आधार घेत हाच विचार रेटण्याचा प्रयत्न केला. भारत हा कोणत्याही दृष्टिकोनातून एक देश नाही, असा दावा करणारे लेखन करून या भिन्नतेच्या आधारावर समाजात फूट पाडण्याचा आणि संघर्ष माजविण्याचा प्रयत्न म्हणजे एकात्मतेच्या संकल्पनेस आव्हान देणे ठरते. स्वातंत्र्यानंतरच्या काही वर्षांतच, स्वतंत्र आंध्राचा विचारही त्याच भावनेतून पुढे आला होता आणि आताही एकात्मतेची जी काही संपूर्ण देशाने भावनिक व सांस्कृतिकदृष्ट्या स्वीकारलेली एकात्मतेची जी काही प्रतीके आहेत, त्यांना छेद देण्याचे प्रयत्नही त्याच भावनेतून सुरू असावेत असे म्हणता येईल.

केंद्र सरकार आणि तामिळनाडू यांच्यात त्रिभाषा सूत्रावरून सुरू झालेल्या वादाने आता आणखी एक नवे, वेगळे वळण घेतले आहे. गेल्या १४ मार्च रोजी तामिळनाडूचा अर्थसंकल्प विधिमंडळात सादर झाला. तमिळ अस्मितेचा झेंडा उंचावून तामिळनाडूला प्रगतीच्या शिखरावर नेण्याचा व 'जो जे वांछील तो ते लाहो' अशी ग्वाही देणारा संकल्प या अर्थसंकल्पात स्टॅलिन सरकारने सोडला. त्याआधी गेल्या आठवड्यातच तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन यांनी राज्याच्या अर्थसंकल्पाची झलक एक्स (ट्विटर) या समाजमाध्यमावर प्रसिद्ध केली. तमिळ अस्मितेच्या मुद्द्यावरून स्टॅलिन यांनी सुरू केलेल्या या संघर्षातून केंद्राच्या त्रिभाषा सूत्राचा विरोध आता तामिळनाडूमध्ये प्रखरपणे सुरू झाला आहे. स्टॅलिन यांच्या या भूमिकेस विरोध करणाऱ्या एका शिक्षकास सालेम येथे पहिली अटक झाली आहे. कोणासही किमान दहा भाषा शिकणे शक्य आहे, या आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांच्या भाषाविषयक भूमिकेची प्रशंसा करणारी व स्टॅलिन यांच्या भूमिकेवर टीका करणारी टिप्पणी या शिक्षकाने काही दिवसांपूर्वी समाजमाध्यमावर केली होती. यानंतर तामिळनाडू पोलिसांच्या सायबर गुन्हेविरोधी पथकाने या शिक्षकास अटक केली आणि समाजात फूट पाडण्याचा प्रयत्न केल्याचा गुन्हा त्याच्यावर दाखल केला. आता त्याच्यावर कायदेशीर कारवाई सुरू झाली असून त्याची रवानगी सालेम मध्यवर्ती कारागृहात झाली आहे. देशाच्या अखंडतेस जोडणाऱ्या भाषाविषयक भूमिकेचा पुरस्कार करणाऱ्या एका व्यक्तीस समाजात फूट पाडण्याच्या आरोपावरून कायदेशीर कारवाईस सामोरे जावे लागण्याचा विरोधाभास स्पष्ट व्हावा यासाठी हे उदाहरण पुरेसे स्वयंस्पष्ट आहे.

याच अर्थसंकल्पाची झलक समाजमाध्यमावर स्पष्ट करताना समोर आलेल्या आणखी एका नव्या वादाने देशात वादळ माजले आहे. केंद्र सरकारने भारतीय चलनातील रुपयाचे स्वीकारलेले बोधचिन्ह नाकारून याऐवजी राज्याचे स्वतंत्र बोधचिन्ह वापरण्याचा निर्णय स्टॅलिन सरकारने घेतला आणि देशाच्या सांस्कृतिक ऐक्याचा आणखी एक धागा तोडण्याचा राजकीय प्रयत्न असल्याची टीका स्टॅलिन सरकारवर होऊ लागली. या देशातील विविधतेमुळे विभिन्न रूढी परंपरा आणि जीवनशैली अस्तित्वात असली तरी त्यावर मात करून सांस्कृतिक व सामाजिक ऐक्याची भावना जपणारी काही प्रतीके इथे शतकांपासून अस्तित्वात आहेत. देशाच्या वेगवेगळ्या प्रांतांत असलेली तीर्थक्षेत्रे आणि देशाच्या कानाकोपऱ्यातून श्रद्धापूर्वक त्यांचे दर्शन घेणारी जनता हा केवळ पर्यटनवृद्धीचा पुरावा नसतो. किंबहुना तीर्थक्षेत्र दर्शन हे पर्यटन नसून देशाच्या विभिन्न भागातील विभिन्न परंपरांचे पालन करणाऱ्या समाजास एकत्र आणणारा एक समान दुवा असल्याचे मानले जाते. रुपयाचे एक सामायिक बोधचिन्ह निर्माण करण्यामागची किंवा सर्वांस स्वीकारता येईल अशा एका सामायिक भाषेचा आग्रह करण्यामागची भूमिकादेखील अशीच असल्याने त्या भूमिकेस छेद देण्याचा नवा प्रयत्न स्टॅलिन सरकारने सुरू केल्याची टीकादेखील होऊ लागली आहे.

भारतापासून अलग होऊन स्वतंत्र राष्ट्र म्हणून तमिळनाडूची ओळख निर्माण व्हावी ही या राज्यातील प्रादेशिक पक्षांची भूमिका नवी नाही. द्रविडीयन अस्मितेचे जनक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पेरियार यांनी सर्वप्रथम ही मागणी केली होती आणि त्यासाठी त्यांनी काँग्रेसचा त्याग करून स्वतंत्र पक्षही स्थापन केला होता. धर्माच्या आधारावर जेव्हा भारत आणि पाकिस्तान अशी देशाची फाळणी झाली, तेव्हाही भाषा आणि संस्कृतीच्या आधारावर स्वतंत्र द्रविडी देशाची मागणी या राज्यातील काही लोकांनी केली होती. सुमारे तीन वर्षांपूर्वी द्रमुकचे नेते व माजी केंद्रीय मंत्री ए. राजा यांनी या मागणीचा अप्रत्यक्ष पुनरुच्चार केला. केंद्र सरकारकडून राज्याला डावलले जात असल्याने द्रविडीयन पक्षांना स्वतंत्र द्रविड राष्ट्राची मागणी करण्यास भाग पाडू नका, असा इशारा त्यांनी एका भाषणात दिला होता.

अस्मितावादाच्या याच संघर्षातून राज्याकरिता स्वतंत्र झेंडा असावा अशी मागणीही दक्षिणेकडील राज्यांत जोर धरू लागली होती. कर्नाटकात २०१८ मध्ये मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी तर राज्यासाठी स्वतंत्र झेंडा निर्माण करण्याकरिता समिती नेमून देशात खळबळ उडवून दिली होती. भाषावार प्रांतरचनेमुळे उत्तरेकडील हिंदी भाषक राज्यांचा वेगळा पट्टा वगळता अन्य राज्यांची स्वतंत्र भाषा आहे. त्याचा राजकीय फायदा घेऊन भाषाविषयक अस्मितांना खतपाणी घालत प्रादेशिक पातळीवर वेगवेगळे राजकीय पक्ष सक्रिय झालेले दिसतातच. पण स्वतंत्र राष्ट्रचिन्हे, स्वतंत्र राज्यध्वज अशा मागण्या कधीही झाल्या नव्हत्या. अर्थात, अशा मागण्यांमागे अस्मितेच्या नावाने होणाऱ्या राजकीय लाभांचाच विचार अधिक असतो हे स्पष्ट असले, तरी त्याच्या दूरगामी परिणामांचाही विचार व्हावयास हवा. प्रादेशिक पक्षांच्या अशा भूमिकांना खतपाणी घातले जाईल किंवा त्यांना प्रोत्साहन मिळेल अशी भूमिका राष्ट्रीय पातळीवरील पक्षांनी घेणे टाळावयास हवे. मात्र, भारत हा एक देश नसून अनेक राज्यांचा समूह आहे अशी भूमिका एखादा राष्ट्रीय पक्षाचा नेता घेतो, तेव्हा भारत तेरे टुकडे होंगे अशा घोषणा देणाऱ्यांनाही बळ मिळत असते. १९७० मध्ये तामिळनाडूमध्येही स्वतंत्र झेंड्याची कल्पना मूळ धरू लागली होती. त्याची रचना कशी असावी यासाठी द्रविड मुन्नेत्र कझगम पक्षाच्याच एम. करुणानिधी यांच्या नेतृत्वाखालील राज्य सरकारने एक प्रस्तावही तयार केला होता. त्या झेंड्याच्या २५ टक्के भागावर भारताचा राष्ट्रध्वज असेल आणि उर्वरित भागावर तामिळनाडूच्या अस्मिताचिन्हांची प्रतीके असतील, असा दावा करुणानिधी यांनी दिल्लीत पत्रकार परिषदेत केला होता. पण कर्नाटकचे वीरेंद्र पाटील व अन्य काही राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनी तामिळनाडूच्या या प्रस्तावास जोरदार विरोध केल्याने ती कल्पना बारगळली, पण अजूनही निवडणुकांच्या तोंडावर अस्मितेच्या नावाने अशा मागण्यांना वाचा फुटतेच. त्याआधी झारखंडमध्येही तेव्हाचे मुख्यमंत्री जयपाल सिंग मुंडा यांनी स्वतंत्र राज्यध्वजाची मागणी केली होती.

राजकीय लाभासाठी अस्मितेच्या मुद्द्यांना कुरवाळून जनतेच्या भावनांचे कैवारी असल्याचे भासविणारे राजकारण सर्वत्र चालते. राज्याची अस्मिताचिन्हे जपण्यात, जनतेच्या भावनांची कदर करण्यात काहीच गैर नाही. उलट त्यामुळे स्थानिक संस्कृती आणि समाजजीवनास बळकटी मिळते. पण अशा भूमिकेतून राष्ट्रीय एकात्मतेस धक्का पोहोचणार नाही याची खबरदारी राजकीय पक्षांनी घ्यावयास हवी. कारण अस्मितेच्या संघर्षातून सामाजिक दुफळी माजली, तर इतिहासाला ते इतिहासाला पुनरावृत्तीसाठी स्वतःहून दिलेले निमंत्रण ठरेल. ते घडू नये अशीच देशातील सर्वसामान्य जनतेची इच्छा असेल यात शंका नाही.

dineshgune@gmail.com

## रविवारची पत्रे

### सोयाबीनचा फास

महाराष्ट्रात दिवसेंदिवस सोयाबीन पेरणीमध्ये वाढ होत असली हे जरी खरे असले तरी दिवसागणिक वाढत चाललेला खर्च आणि उत्पादनात येत असलेली घट ही शेतकऱ्यांच्या गळ्यातील फास बनत आहे असे चित्र सध्या आहे. महाराष्ट्रात सोयाबीनचा भरपूर प्रमाणात पेरा सुरू होऊन जवळजवळ वीसेक वर्ष झाली असतील. सुरुवातीला येणाऱ्या बॅग खर्च,डवरणी, फवारणी, सोगंणी,मळणी यंत्रांचा खर्च आणि आज येणारा खर्च त्याचप्रमाणे सोयाबीन भावातील तफावत बरेच काही सांगून जाते आहे.

यावर वेगवेगळ्या तज्ज्ञांच्या मते वेगवेगळे पर्याय नक्कीच असू शकतात,परंतु शेवटी गणित येऊन थांबते ते विविध पिकांसाठी लागणारा नगदी खर्च आणि पिकल्यानंतर मिळालेला तुटपुंजा आणि मनमानी ठरवलेला भाव. आता शेवटी शेतकऱ्यांना आपल्या उत्पादन खर्चात कशी कमतरता करता येईल एवढा विषय शिल्लक राहिलेला आहे. उदाहरणार्थ सोयाबीन बियाणे उगवणशक्ती तपासणी करून घरचेच बियाणे वापरणे. रासायनिक खते काही कमी प्रमाणात वापरणे. फवारणी औषध काही प्रमाणात कमी किमतीत आणि दर्जेदार वापरावी. आता शेतकरीही शेवटी पहिलेपेक्षा थोडा आधुनिक आणि सुधारित सुशिक्षित झालेला आहे. केवळ आणि केवळ कंपनी आपल्याला काही देणार आणि आपण वापरत राहणार असे होता कामा नये. कोणत्या पिकांवर कोणता रोगआणि काय फवारावे, कोणते खत द्यावे हाही एक अभ्यासाचा विषय आहे. स्वातंत्र्योत्तर काळापासून आपण पाहात आलो आहोत. कित्येक सरकारे आली आणि गेली. हरित क्रांतीचे गाजर दाखवून झाले. अनेक योजना आल्या आणि गेल्या. काही शेतकऱ्यांच्या फायद्यासाठी तर काही तोट्यात. शेवटी सरकार, प्रशासन त्यांचं काम करते. या सर्व ताळेबंदातून जो शेतकरी सावरला, तो टिकला नाही तर आपण पाहतोच आहे.

नुकताच नागपूरला मिहानमधील पतंजली संत्रा उद्योग प्रकल्प सुरू झालेला आहे. याच प्रमाणात जर काही मोठे प्रकल्प सोयाबीन कच्च्या मालावर प्रक्रिया करून व्यवस्थित निर्यात धोरण आखले गेले तर शेतमाल आणि शेती व्यवसायाला चांगले दिवस येऊ शकतात. नाहीतर सोयाबीनचा फास गळा आवळल्याशिवाय राहणार नाही. शेवटी आयात-निर्यात धोरण तेवढ्याच प्रमाणात जबाबदार आहे. आपल्याला आयात-निर्यात धोरण जरी समजत नसले तरी मागणी आणि पुरवठा हे अर्थशास्त्र शिकवून जाते. मागणी वाढली की भाव वाढतात आणि पुरवठा वाढला की भाव गडगडतात.सरकारने डबल उत्पादनाची हमी तर दिली परंतु बाजारपेठेतील आवक आणि जावक याचा विचार केलेला अजिबातच दिसत नाही. दुसरे असे की बाजारपेठेवर नियंत्रण मिळवण्यासाठी सोडलेले नाफेड नावाचे पिल्लू सपशेल नापास झाले. व्यापाऱ्यांच्या नाफेड नोंदणी फटाफट होत होत्या आणि शेतकरी ताटकळत वाट पाहात होते तरी साधा मेसेजसुद्धा येत नव्हता. व्यापाऱ्यांनी शेकडो क्विंटल सोयाबीन, कापूस शेतकऱ्यांच्या नावावर मोडून लाखो रुपये कमविले. याउलट शेतकऱ्यांचा माल घरात पडून होता. साधे मेसेज फक्त सक्सेसफुलचे आले. त्यावर सोयाबीन घरात ठेवले गेले. सक्सेसफुलचा मेसेज येऊन गेल्यानंतर खरेदी केंद्रावर सोयाबीन केव्हा आणावे यांचे मेसेज लाखो शेतकऱ्यांना अजिबात आले नाहीत. शासनाच्या अशा दुर्लक्षामुळे शेतकऱ्यांचे बऱ्याच प्रमाणात नुकसान झाले याला जबाबदार कोण?

निसर्ग, कंपन्या, शेतमजूर आणि समजूनसुद्धा चुकत असलेली धोरणं यामुळे शेती करणाऱ्यांची संख्या दिवसागणिक कमी होऊनआर्थिक नियोजन कोलमडून जाईल, त्यावेळी बराच उशीर झालेला असेल.

**मिलिंद जोशी**/अकोला

### तुकाराम बीज

१६ मार्च, फाल्गुन कृष्ण द्वितीया म्हणजेच तुकाराम बीज. संत तुकाराम महाराजांचा जन्म पुण्याजवळील देहू या गावी झाला. पांडुरंगाचा साक्षात्कार झाल्यानंतर ते हरिनामात लीन झाले. त्यांचे अभंग ठावूक नाहीत असा कोणी महाराष्ट्रात शोधून सापडणार नाही.अवघं,जगत विष्णुमय आहे.भेदाभेद विरहित वैष्णवांचा धर्म आहे. भेदाभेद मतभिन्नता, अविचार हे अमंगल भ्रम आहे. हे शाश्वत सत्य वैष्णवी भक्तीनी स्वीकारणे यातच भक्तांचे हित सामावलेले आहे. तुकोबारायांच्या अभंगातील ही शाश्वत धर्माची शिकवण जगाचे कल्याण करणारी आहे.कुठल्याही जीवाचा मत्सर, द्वेष करू नका. ज्ञानेंद्रिय,कर्मेंद्रिये, हे देहाचे अवयव एकच आहे. त्याद्वारे विषयांची सुखदुःख भोगणारा जीव सारखाच आहे. सर्वेश्वर तत्त्व आत्मसात करून भागवत धर्माची पताका बोलत ठेवणे गरजेचे आहे. ईश्वर आणि भक्तात भेद नाही.धर्म, जात, पंथ, लिंग, उच्च-नीच ही



मनोवृत्तीचा भेद आहे. मन करारे प्रसन्न हे सिद्धीचे कारण आहे.मन आपला विचारप्रवाह ठरवते ज्याप्रमाणे मूर्तिकार मातीचा गणपती बनवतो. त्यात भाव ओततो.आपल्या कल्पनेतील मूर्ती आपण स्वीकारून तिचे पूजन करतो. मूर्ती विसर्जित झाली की ती पुन्हा माती होते.मातीतील परतत्त्व आपण पुजत नाही ईश्वराचे सगुण रूप मूर्ती असले तरी निर्गुण निराकार रूपात ईश्वर चराचरात वास करत असतो. भक्ती शुद्ध अंतःकरणातून केल्यास ईश्वराचे दर्शन घडते अशा सर्वेश्वराला भजावे.ज्ञाना रचिला पाया, तुका झालासे कळस! हे वारकरी संप्रदायाचे शाश्वत सत्य आहे. तुकाराम बीज म्हणजे संत तुकाराम महाराजांचा सदेह वैकुंठ गमनाचा दिवस. म्हणजेच साधकांचा या संतश्रेष्ठाच्या चरणी कोटी कोटी कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस. तुकाराम महाराज ज्या स्थानावरून सदेह वैकुंठ्यात गेले तेथे वृक्ष आहे. त्याचे नाव आहे नांदुरकी. आजही तो वृक्ष ज्या दिवशी आणि ज्या वेळेस म्हणजे दुपारी बारा वाजून दोन मिनिटांनी महाराज सदेह आणि काळ यांचा संगम झाला आणि ती ऊर्जा घणीभूत झाली असे वाटते. वारकरी संप्रदायात ज्ञानभक्ती प्रचार-प्रसार करण्यासाठी जी कीर्तने होतात ती तुकाराम महाराजांच्या अभंगांवर होतात आणि प्रत्येक कीर्तनाच्या शेवटी हेचि दान देगा देवा । तुझा विसर न व्हावा । हा अभंग आवर्जून म्हटला जातो.संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांच्या चरणी कोटी कोटी नमन.

**अरुण सोपानराव कराळे**/९०९६३२६२७२

### महिला सुरक्षा व संभाव्य उपाययोजना

पुण्यातील स्वारगेट प्रकरणाच्या घटनेमुळे स्त्रीवरील अत्याचाराचा तसेच त्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. पुण्यात पहाटे साडेपाचच्या दरम्यान घडलेल्या स्वारगेट बस स्थानकावर एका २६ वर्षीय युवतीवर झालेल्या बलात्काराच्या घटनेनंतर पीडित युवतीने केलेल्या तक्रारीनुसार पोलिसांनी दत्तात्रय गाडे नावाच्या आरोपीला शिरूर जवळील गुणाट गावात अटक केली आहे. या घटनेत महत्त्वाची बाब म्हणजे स्वारगेटसारख्या भर वस्तीत असलेल्या बसस्थानकावर पहाटेच्या वेळी अशी घटना घडते हेच मोठे आश्चर्यकारक आहे. प्रकरणाची रीतसर चौकशी होईल व सत्य बाहेर येईलच.

मात्र या प्रकरणामुळे पुन्हा प्रश्न उद्भवतो तो महिला सुरक्षिततेचा. या ठिकाणी सुरक्षा पथक कार्यरत नाही का? असल्यास ते गस्त घालत नाही का? गस्त घालत असल्यास त्यांना संशयास्पद घटना आढळत नाहीत का? या सर्व बाबींची उत्तरे स्थानकावरील संबंधित अधिकारीच देऊ शकतील व चौकशी दरम्यान या सर्व बाबी समोर येतीलच. परंतु या घटनेमुळे समाजात वावरणाऱ्या अशा दुष्ट व्यक्तींच्या विकृत मनोवृत्तीला बळी पडलेल्या महिलेला भोगाव्या लागणाऱ्या शारीरिक, मानसिक व सामाजिक त्रासाचे परिणाम ती पीडित व्यक्तीच जाणू शकते.

स्त्री अबला नसून सबला आहे, हे वाक्य म्हणण्यासाठी, लिहिण्यासाठी किंवा घोषणा देण्यासाठी कितीही चांगले वाटत असले, तरी प्रत्यक्षात वावरताना स्त्रीला मात्र अत्यंत कठीण परिस्थितीशी तोंड द्यावे लागते. समाजकंटकांच्या विषारी नजरा, रस्त्यावरील टीकाटिप्पणी, प्रवासात आंबटशौकिनांच्या किळसवाण्या स्पर्शाचा सामना करीत व त्यापासून स्वतःचा बचाव करीत आपले जीवन कंठावे लागते. नोकरीपेशातील काही स्त्रियांना सुद्धा त्यांच्या नोकरीच्या ठिकाणी अशा प्रकारच्या वृत्तीचा कमी-अधिक प्रमाणात सामना करावा लागण्याची शक्यता असते. आज आपण कितीही पुढारलेपणाच्या गप्पा मारत असलो तरी एकट्या स्त्रीचा प्रवास जिकरीचा झाला आहे हे कटु सत्य आहे.

काही ठिकाणी स्त्रीला घरगुती हिंसाचाराला बळी पडावे लागल्याच्या घटना ऐकावयास मिळतात. शिक्षणासारख्या पवित्र क्षेत्रातही काही विकृत वृत्तीच्या व्यक्तींमुळे विद्यार्थिनींचे यौन शोषण झाल्याच्याही घटना उघडकीस आल्या आहेत. म्हणजे घर, शाळा, कुटुंब, रस्ता, व्यवसायाचे ठिकाण, प्रवास, आदी सर्वच ठिकाणी स्त्रीमध्ये असुरक्षिततेची भावना आहे असे म्हटल्यास वावगे ठरू नये. मोबाईलच्या युगामुळे आता सायबर गुन्ह्याचाही मोठा धोका उत्पन्न झाला आहे. याद्वारे लुबाडणूक, धमकी देऊन पैसे उकळण्यासारख्या गुन्ह्याच्या घटना वाढत आहेत. त्यामुळे प्रभावी सायबर सुरक्षा उपायांची ही आवश्यकता आहे.

**महिला सुरक्षिततेच्या संभाव्य योजना :** १) यौन शोषण व बलात्कारासारख्या घटनांची गंभीर दखल घेऊन युद्धपातळीवर कारवाई करून निर्णय घेण्यात यावे.२) स्त्रीवर अत्याचार करून तिला अपमानास्पद जीवन जगण्यास भाग पाडणाऱ्या नराधमाला कोणतीही दयामाया न दाखवता फाशी देण्यात यावी. ३) महिलांना व मुलींना शालेय शिक्षणात ज्युडो कराटेचे प्रशिक्षण तसेच स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण देण्याचे काम अत्यावश्यक व युद्धपातळीवर करावे. ४) बलात्कार पीडित व्यक्तीचे या घटनेमुळे संपूर्ण जीवनअंधकारमय होते. समाजातील चर्चा व टीका यामुळे पीडीत व्यक्ती क्षणाक्षणाला मरत असते. यातूनच क्वचित आत्महत्येसारख्या घटनाही घडतात. त्यामुळे बलात्कारासारख्या हीन घटनेपासून स्वतःचा बचाव करण्यासाठी महिलांना बंदुकीचा परवाना द्यावा. ५) समाज मनावर सिनेमाचा प्रभाव जास्त पडतो. तेव्हा सिनेमात बलात्कारांच्या दृश्यावर बंदी असावी. ६) स्त्री संदर्भात घडलेल्या कोणत्याही अपराधाची गंभीरपणे दखल घेऊन त्वरित शिक्षेची कारवाई करावी.स्त्री संरक्षण ही केवळ पोलिसांचीच जबाबदारी नाही तर पूर्ण समाजाचीही आहे, याची जाणीव तसेच नजरेसमोर एखाद्यावर हल्ला होत असल्याचे दिसतांना केवळ बघ्याची भूमिका न घेता मदतीला धावून जाण्याची शिकवण समाजाला देणे आवश्यक आहे.

**भालचंद्र ठोंबरे**/९८३४३५०८९५

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल अॅड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास ९८५०७५३२८१
या व्हॉट्स अॅप क्रमांकावर पाठवावा.

## यंगिस्तान

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

# राज ठाकरे, आपलं चुकलंच!

महाराष्ट्राच्या राजकारणात शापित राजकुमार असा शब्द उच्चारला तर सर्वांत पहिलं नाव राज ठाकरेंचं येतं. शरद पवारांचे विरोधक 'कधीही न झालेला पंतप्रधान' म्हणून त्यांची खिल्ली उडवतात. कारण सर्वांना माहिती आहे की पवारांना पंतप्रधान व्हायची तीव्र इच्छा होती, पण आता ती इच्छा मावळली आहे. उद्धव ठाकरेंना अनेक वर्षांपासून मुख्यमंत्री व्हायचं होतं. कदाचित त्यांच्या पत्रिकेत शॉर्ट टर्म राजयोग होता म्हणून दोन अडीच वर्षे मुख्यमंत्री राहून त्यांनी आपली हौस भागवून घेतली. शरद पवारांनी त्यांच्या डोक्यावर हात ठेवल्यामुळे ती हौस भागवता आली मात्र त्या हौसेपोटी त्यांनी आपलं राजकीय करीअर संपुष्टात आणलं. राज ठाकरेंना देखील महाराष्ट्राचा मुख्यमंत्री व्हायचं आहे. मनसे पक्षाची स्थापना झाली तेव्हा अनेकांना असं वाटत होतं की त्यांचं हे स्वप्न पूर्ण होईल. कारण त्यावेळी राज हे राजकारणाच्या केंद्रस्थानी होते. त्यात उद्धव ठाकरेंपेक्षा ते कितीतरी पटीने उजवे आहेत असं अनेकांचं मत होतं. बाळासाहेबांप्रमाणे सभा गाजवण्याची कला त्यांच्याकडे होती. राजकारणातला अँग्री यंग मॅन अशी त्यांची ओळख निर्माण झाली होती. मात्र भाषणाव्यतिरिक्त स्वरराज असं मूळ नाव असलेल्या राज ठाकरेंना राजकारणात सूर कधी गवसलाच नाही. आता तर हा अँग्री यंग मॅन हळूहळू ओल्ड होत असताना भाषणावरील पकडही सैल होऊ लागली आहे. समोर बसलेल्या टाळक्यांनी टाळ्या वाजवल्या म्हणजे भाषण चांगलं होत नाही. ते खरोखर चांगलं असावं लागतं आणि जेव्हा राज यांचं भाषण चांगलं व्हायचं तेव्हा विरोधकही स्तुती करायचे. मात्र आता ते भरकटू लागलं आहे.

मनसेच्या वर्धापन दिनानिमित्त राज ठाकरे यांचं जोरदार भाषण झालं. पूर्वी राज ठाकरे काय बोलणार याची पुष्कळ चर्चा असायची. मात्र आता कुणाला त्याचं सोयरसुतक राहिलेलं नाही. मनसेच्या कार्यकर्त्यांनाच त्याबद्दल फारसं काही वाटत असेल असंही वाटत नाही. राज ठाकरे यांच्या पक्षाला १९ वर्षे पूर्ण झाली आहेत. या १९ वर्षांनंतर खरं तर आपलं काय चुकलं यावर चर्चा व्हायला हवी. इतरांवर टीका करण्यापेक्षा पक्ष वाढत का नाही, याबाबत गांभीर्याने विचार व्हायला हवा. पण पक्षाला १९ वर्षे झालीत म्हणजे पक्ष नुकताच वयात आलाय अशा प्रकारे सगळं सुरू आहे. पक्षाच्या वर्धापनदिन कार्यक्रमात राज ठाकरेंचे कुंभस्नानावरील वक्तव्य चर्चेत आले. राज ठाकरे यांनी बाळा नांदगावकरांचा किस्सा सांगितला. तुम्हा वाचकांना तो तपशील माहिती आहे, म्हणून इथे जागेअभावी टाळतोय. राज यांनी अतिशय विचित्र पद्धतीने अंगविक्षेप करून तो प्रसंग सांगितला. पुढे त्यांनी राज कपूरच्या 'राम तेरी गंगा मैली' हा संदर्भ दिला. ज्याचा मुळातच काही संदर्भ नव्हता. मुळात नदीचं शुद्धीकरण ही मोठी समस्या आहे, हे आपण मान्य केलंच पाहिजे. त्याबाबत राज ठाकरे आंदोलन किंवा जनजागृती करणार असतील तर स्वागत व्हायलाच पाहिजे. परंतु लोकांच्या श्रद्धेवर टीका करण्याचा अधिकार राज यांना नाही. देशभरातीलच नव्हे तर जगभरातील श्रीमंत व नावाजलेल्या व्यक्तींनी देखील विशेष म्हणजे धर्माने हिंदू नसलेल्या व्यक्तींनी तिथे श्रद्धेने स्नान केलेलं आहे. कोणी जर तिथून गंगेचं पाणी आणलं तर ते प्यायचं नसतं. पिण्यासाठी दुसरीकडून पाणी घेतलं जातं. बाळा नांदगावकर यांनी ते पाणी प्यायला का सांगितलं असेल कुणास ठावूक. कदाचित त्यांना याबाबत फारशी माहिती नसावी. पण समजा सांगितलं आणि राज यांनी नकारही दिला असेल. पण ही गोष्ट जाहीर सभेत बोलायची काय गरज होती? आणि बोलले तरी अंगविक्षेप करून



लोकांच्या भावना दुखावतील अशा पद्धतीने बोलायची गरजच काय होती? यावरून हिंदूंच्या भावना दुखावल्या आहेत. याबाबत राज ठाकरे यांनी माफी मागितली तर त्यांच्या मनाचा मोठेपणा दिसू शकेल. मागे राज्यपाल कोशियारींच्या वक्तव्यावरून त्यांच्यावर राज यांनी टीका केली होती. आता भय्याजी जोशी यांच्यावरही त्यांनी टीका केली आहे. म्हणजे इतरांचं वक्तव्य पकडण्याचा अधिकार राज यांच्याकडे आहे. राज मात्र काहीही बोलून मोकळे होऊ शकतात का? त्याला विनोद, कोपरखळी असं गोंडस नाव देता येतं. बरं मराठी भाषेविषयी ठाकरे आग्रही आहेत. पण इतकी वर्षे मराठी मातीचं मीठ खाऊन मराठी न येणारे जावेद अख्तर चालतात. त्यांना मराठी बोलण्याचा आग्रह नसतो?

गुढीपाडव्याला राज ठाकरे या सर्व विषयांवर बोलणार आहेत. पूर्वी राज बोलायचे तेव्हा उत्सुकता असायची. पण आता ती राहिलेली नाही. ते आपल्या वक्तव्यावर स्पष्टीकरण देतील. पण त्यांनी केलेलं अंगविक्षेप हे अतिशय हिडिस होतं. त्यात विनोदासाठी मंदाकिनी आणि राम तेरी गंगा मैली वगैरे संदर्भ देऊन तर हद्दच केली. वर श्रद्धा आणि अंधश्रद्धेवर भाष्य केलं. म्हणजे तिथे आलेले लाखो लोक मूर्ख आहेत? श्रद्धा आणि अंधश्रद्धा अशी वेगळी काढताच येत नाही. तुमच्या श्रद्धेमुळे कोणाच्या जीवावर बेतणार असेल तरच त्यास अंधश्रद्धा म्हणता येईल. इतर वेळी ती श्रद्धाच असते. त्याला तुम्ही अंधश्रद्धा म्हणू शकत नाही व तो अधिकारही तुम्हाला मिळालेला नाही. इथे कुणी सावरकरांचा संदर्भ देईल. हिंदूंनी विज्ञानवादी असलं पाहिजे वगैरे. मग सावरकरांनी ज्या निष्ठेने, स्वच्छ प्रतिमेने व १ पैशाचाही भ्रष्टाचार न करता राजकारण केलं, तसं कुणी करून दाखवेल का? सावरकरांना आर्थिकदृष्ट्या कधीच सबल होता आलं नाही. मग बाकीचे राजकारणी कोट्यवधी रुपयांचे मालक कसे झाले, याचं उत्तर प्रश्न उपस्थित करणाऱ्यांनी द्यावं. दुसरी गोष्ट सावरकर त्यांच्या विचारांशी प्रामाणिक होते. त्यांच्या पत्नीचा अंतिम संस्कार विद्युतदाहिनीत त्यांनी केला. मृत्यूनंतर कुणी श्राद्ध कर्म करू नये अशी इच्छा प्रकट केली. इतकं विज्ञानवादी तर स्वतःला डावे व पुरोगामी म्हणवून घेणारे नेतेही होऊ शकत नाहीत. त्यामुळे सावरकरांच्या विज्ञानवादाचा दाखला कुणी देऊच नये! राज यांनी स्वतःच्या नावापुढे हिंदुजननायक ही उपाधी लावून घेतली आहे. भोंग्याबद्दल दिलेली भाषणे याव्यतिरिक्त त्यांनी हिंदूंसाठी असं काहीच केलं नाही. मराठीच्या मुद्द्यावरून ते हिंदुत्वाच्या मुद्द्यावर येतील असं मी अनेकदा लेखांमध्ये म्हटलेलं आहे. कुणीही नरेंद्र मोदी यांना हिंदुहृदयसम्राट वगैरे म्हणत नाहीत. पण कलम ३७० व त्रिपल तलाकवरील त्यांचा निर्णय व कृती अत्यंत बोल्ड होती. ज्या काळात काश्मीरमध्ये पाय ठेवणं धोकादायक होतं अशा वेळी मोदी तिथे जाऊन भारताचा ध्वज फडकवून आले होते. याला म्हणतात डेअरिंग. मोदी नावाच्या माणसाची चर्चा आज जगभरात होतेय ती उगाच नव्हे. त्यांना हिंदुजननायक किंवा हिंदुहृदयसम्राट अशी उपाधी आपणहून लावून घेण्याची गरज नाही. त्यांचं कार्यच बोलतं.

असा हिंदुजननायक महाराष्ट्राला हवा आहे. तो राज ठाकरेंच्या रूपात मिळणार असेल तर आमची कोणतीच हरकत नाही. आम्हा मराठी माणसांना राज ठाकरेंबद्दल आपुलकी आहे. माझं स्वतःचं उदाहरण द्यायचं झालं तर मी नवतरुण असताना पहिल्यांदा कोणत्या पक्षाचं सदस्यत्व घेतलं असेल तर ते मनसेचंच. त्यानंतर कोणत्याच पक्षाचं सदस्यत्व घेतलं नाही. दुसरी गोष्ट मी पहिल्यांदा मतदान केलं ते मनसेला आणि राज ठाकरे यांच्याकडे बघूनच, ते महाराष्ट्राचे भाग्यविधाते ठरतील याच आशेने. पण ती आशा १० वर्षांपूर्वीच मावळली. राजकीय कुटुंबातून किंवा राजे महाराजांच्या कुटुंबातून येणाऱ्या लोकांचा प्रॉब्लेम म्हणजे 'हेरिटेज सिंड्रोम'. हेरिटेज सिंड्रोम म्हणजे काय तर आपल्या पूर्वजांनी केलेल्या कर्तृत्वावर ही मंडळी जगत असतात. आपल्या वडिलांना, आजोबांना जो मान मिळायचा तसाच आपल्यालाही मिळायला हवा असा अट्टहास असतो. हे एकप्रकारचं आरक्षणच आहे. मोठ्या लोकांच्या पोटी जन्माला येणं यात वाईट काही नाही. याला नेपोटिज्म म्हणता येणार नाही. पण कर्तृत्व हे खूप महत्त्वाचं असतं. या हेरिटेज सिंड्रोममधून ही मंडळी जेव्हा बाहेर पडतील तेव्हा त्यांना खऱ्या अर्थाने यश मिळायला सुरुवात होईल. 'बंगला संस्कृती' नष्ट झाली पाहिजे. लोकांनी आपल्या बंगल्यात येण्याऐवजी आपण लोकांच्या घरात पोहोचलं पाहिजे. काम केल्यावरच लोक मतदान करतात. कामे नाही केली की ईव्हीएमवर रोष व्यक्त करता येतो.

कुंभमेळ्याच्या बाबतीत, काही लोकांना तिथे श्रद्धा दिसली, पावित्र्य दिसलं, सरकारचं नियोजन दिसलं, कुणाला मोनालिसाचे डोळे दिसले. मात्र राज यांना काखा दिसल्या अशाप्रकारचे मीम्स सोशल मीडियावर फिरत आहेत. हे दुर्दैव आहे. राज ठाकरेंसारख्या जबाबदार माणसाने बोलताना विचार करायलाच हवा. नदीची स्वच्छता हा वेगळा मुद्दा आहे. मुंबईच्या मिठी नदीची अवस्था काय झाली आहे हे राज यांना माहिती असेलच. यासाठी त्यांनी कधी आंदोलन किंवा प्रयत्न केल्याचे आठवत नाही. राज ठाकरे यांनी कुंभमेळ्यावर केलेलं वक्तव्य अतिशय चुकीचं होतं. घाणेरडं होतं. या वक्तव्याची गरज नव्हती. आमच्या विशीत आमची पिढी ज्यांची फॅन होती, ते राज ठाकरे कोणत्या वैचारिक चक्रव्यूहात सापडलेत कुणास ठावूक. त्यांनी स्वतःच रचलेल्या त्या वैचारिक चक्रव्यूहातून त्यांची लवकरात लवकर सुटका व्हावी, त्यांना लवकरच राजकीय सूर गवसावा ही आई भवानी चरणी प्रार्थना!

writerjayeshmestry@gmail.com

# रनिंगसाठी वॉर्मअप आणि स्ट्रेचिंगचे महत्त्व

रनिंगपूर्वी आणि नंतर योग्य वॉर्मअप व स्ट्रेचिंग केल्याने इजा टाळता येते, स्नायू लवचिक होतात आणि रनिंगची कामगिरी सुधारते.



चला आयुष्य वाढवूया, फिटनेसकडे वळूया
भाग - ४

**वॉर्मअपचे फायदे:**

१. शरीराचे तापमान वाढते स्नायूंमध्ये रक्तप्रवाह वाढतो, त्यामुळे लवचिकता वाढते आणि इजा टाळता येते.
२. कार्यक्षमता सुधारते स्नायू आणि सांधे उत्तमरीत्या कार्यरत राहतात, ज्यामुळे वेग आणि ताकद वाढते.
३. ह्रदयाची तयारी होते ह्रदय आणि फुफ्फुसांची कार्यक्षमता वाढते, दम कमी लागतो.
४. मानसिक तयारी होते एकाग्रता वाढते आणि रनिंगमध्ये चांगली कामगिरी करता येते.

**रनिंगपूर्वी वॉर्मअप (५-१० मिनिटे) डायनॅमिक वॉर्मअप (गतिशील व्यायाम):**

१. लेग स्विंग्स पाय पुढे-पाठ व साइडला हलवा (१५-२० वेळा).
२. हाय नीज गुडघे उंच उचलत जागेवर धावा (३०-४५ सेकंद).
३. बट किक्स टाचा मागे नेत धावा (३०-४५ सेकंद).
४. लंजेस विथ ट्विस्ट पुढे लंज करताना शरीराला वळवा (१०-१५ वेळा).
५. स्किपिंग हलक्या गतीने १-२ मिनिटे स्किप करा.

**स्ट्रेचिंगचे फायदे:**

१. लवचिकता वाढते स्नायू आणि सांधे मोकळे होतात, हालचाल सुलभ होते.
२. स्नायूतील ताण कमी होतो रनिंगनंतर जडपणा व वेदना कमी होतात.
३. चोट टाळता येते स्नायू संतुलित राहतात आणि दुखापती कमी होतात.
४. रक्तप्रवाह सुधारतो ऑक्सिजनचा पुरवठा वाढतो, रिकव्हरीला मदत होते.

**रनिंगनंतर स्ट्रेचिंग (१०-१५ मिनिटे) स्टॅटिक स्ट्रेचिंग (स्थिर व्यायाम):**

१. हॅमस्ट्रिंग स्ट्रेच सरळ पाय ठेवून पुढे वाका (२०-३० सेकंद).
२. क्वाड्रिसेप्स स्ट्रेच एका पायावर उभे राहून दुसऱ्या पायाची टाच मांडीकडे ओढा (२०-३० सेकंद).
३. कॅल्फ स्ट्रेच भिंतीचा आधार घेत मागचा पाय सरळ ठेवा (२०-३० सेकंद).
४. हिप फ्लेक्सर स्ट्रेच लंज स्थितीत मागच्या पायाचे गुडघे टेकवा (२०-३० सेकंद).
५. ग्लूट स्ट्रेच बसून एका पायाला दुसऱ्या गुडघ्यावर ठेवा आणि पुढे झुका (२०-३० सेकंद).
६. बॅक आणि साईड स्ट्रेच हात वर करून एका बाजूला झुका (२०-३० सेकंद).

हे व्यायाम तुमच्या रनिंग रूटीनचा भाग बनवा आणि धावण्याचा आनंद घ्या!

**-अतिश शहा**
फिटनेस ट्रेनर आणि अल्ट्रा मॅराथॉनर चॅलेंजर स्पोर्ट्स फौंडेशन, सोलापूर.
मो. ९१७५८२८२०३

# धाराशिव, पुणे, सांगलीचे पुरुष व महिला दोन्ही संघ उपांत्य फेरीत

## हिरक मोहत्सवी पुरुष-महिला राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धा २०२५

**तभा वृत्तसेवा,**
**शेवगाव, दि. १५ मार्च -**

हिरकमहोत्सवी पुरुष व महिला राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धेच्या उपांत्य फेरीत पुरुष गटामध्ये पुणे विरुद्ध सांगली, मुंबई उपनगर विरुद्ध धाराशिव तर महिला गटामध्ये धाराशिव विरुद्ध पुणे आणि सांगली विरुद्ध नाशिक असे सामने रंगणार आहेत.

महाराष्ट्र खो-खो असोसिएशन, अहमदनगर खो-खो असोसिएशनच्या मान्यतेने व शेवगाव स्पोर्ट्स बहुउद्देशीय फाउंडेशन, सत्यभामा प्रतिष्ठान, मराठा विद्या प्रसारक समाजाचे न्यू आर्टस्, कॉमर्स आणि सायन्स कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने अहिल्यानगर, शेवगाव येथे हिरकमहोत्सवी पुरुष व महिला राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धा खंडोबा क्रिडांगणावर उत्साहात सुरू आहे.

पुरुष गटातील उपांत्यपूर्व फेरीतील चुरशीचे सामने आज सकाळच्या सत्रात पुरुष गटातील उप उपांत्य सामन्यात पुण्याने अहिल्यानगरवर १ डाव १० गुणांनी (१५-१०) मात केली. यामध्ये विजयी संघातर्फे अथर्व देहेण (३ मि. संरक्षण), शुभम थोरात (२.३०, १ मि. संरक्षण व १ गुण), साहिल चिखले (१.५० मि. संरक्षण व ३ गुण), सिद्धार्थ पवार (१ मि. संरक्षण व ३ गुण) यांनी चांगला खेळ केला. अहिल्यानगर तर्फे नरेंद्र कातकडे (२.१०, १.२० मि. संरक्षण व ३ गुण), सारंग लबडे (१.३० मि. संरक्षण व ३ गुण) व कृष्णा कोपनार (१ मि. संरक्षण व १ गुण) यांनी चांगला खेळ केला.




दुसऱ्या सामन्यात धाराशिवने ठाण्याचा २ गुण आणि २ मिनिटे ५० सेकंद राखून (२०-१८) पराभव केला. विजयी संघातर्फे विजय शिंदे (१.३०, १.५० मि. संरक्षण व ३ गुण), रोहित चव्हाण (१.२०, १.३० मि. संरक्षण व ४ गुण), सचिन पवार (१.२०, १. २० मि. संरक्षण व १ गुण) यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. पराभूत संघातर्फे लक्ष्मण गवस (१.३० मि. संरक्षण व २ गुण), शुभम उतेकर (१.१०, १ मि. संरक्षण व १ गुण) यांनी चांगला खेळ केला.

तिसऱ्या सामन्यात सांगलीने सोलापूरचा २ गुण व ५.३० मि. राखून (१४-१२) पराभव केला. सांगली संघाकडून मिलिंद चावरेकर (२, १.२० मि. संरक्षण व २ गुण), सागर गायकवाड (१, १.४० मि. संरक्षण), सौरभ घाडगे (१, १.५० मि. संरक्षण), सत्यजित सावंत (१.३०, १.५० मि. संरक्षण) यांनी विजयात मोलाची कामगिरी केली. तर सोलापूर कडून अजय कश्यप (२ मि. संरक्षण व ३ गुण), गणेश बोरकर (१, १.२० मि. संरक्षण व २ गुण), रोहन रजपूत (१.३० मि. संरक्षण) यांनी चांगला खेळ केला.

चौथ्या सामन्यात मुंबई उपनगर ने मुंबईचा (१८-१७) २० सेकंद राखून १ गुणाने पराभव केला. चूरशीच्या सामन्यात मुंबई उपनगर तर्फे अनिकेत पोटे (१.५०, १.३० मि. संरक्षण व २ गुण), ओंकार सोनवणे (१, १.२० मि संरक्षण व १ गुण), अक्षय भांगरे (१., १.१० मि. संरक्षण व ३ गुण) यांनी मोलाची कामगिरी केली. मुंबईतर्फे श्रेयस राऊळ (१, १.२० मि. संरक्षण व १ गुण), श्रीकांत वल्लकटी (१, १ मि. संरक्षण), वेदांत देसाई (१.४० मि. संरक्षण व ४ गुण) यांनी चांगला खेळ केला.

महिलांचे उपांत्यपूर्व फेरीतील धमाकेदार सामने महिला गटामध्ये पहिल्या सामना सांगली आणि रत्नागिरी यांच्यात चूरशीचा झाला. सांगलीने १ गुणाने (१३-१२) विजय मिळवला. सानिका चापे (२.३०, १.४० मि. संरक्षण व ३ गुण), रितिका मगदूम (५ गुण), प्रतीक्षा बिराजदार (१.४०, २.४० मि, संरक्षण) यांनी सांगलीकडून महत्वाची खेळी केली. तर पराभूत संघातर्फे रत्नागिरी कडून पायल पवार (१.५०, २.३० मि. संरक्षण व २ गुण), अपेक्षा सुतार (१.५०, २.२० मि. संरक्षण), दिव्या पालये (३ गुण) यांनी चांगला खेळ केला.

दुसऱ्या सामन्यात पुण्याने सोलापूरचा १०-८ असा १ डाव २ गुणांनी पराभव केला. त्यात श्वेता वाघ (३.२० मि. संरक्षण), प्रियांका इंगळे (३, २ मि. संरक्षण व ३ गुण), स्नेहा महाले (२ मि. संरक्षण व १ गुण) यांनी विजयात मोलाची कामगिरी केली. तर सोलापूरकडून स्नेहा लामकाणे (१.३० मि. संरक्षण व २ गुण), साक्षी देठे (१ मि. संरक्षण) यांनी चांगली कामगिरी केली.

तिसऱ्या सामन्यात धाराशिवने मुंबईचा १ डाव १२ गुणांनी (१७-५) असा पराभव केला. त्यात विजयी संघाकडून संध्या सुरवसे (५, ४ मि. संरक्षण व ४ गुण), संपदा मोरे (६ गुण), अश्विनी शिंदे (२.५० मि. संरक्षण व ३ गुण) यांनी उत्कृष्ठ खेळ केला.

चौथ्या सामन्यात नाशिकने ठाण्याचा (९-८) १ गुणांने पराभव केला. विजयी संघातर्फे ज्योती मेढे (२, १.२० मि. संरक्षण व २ गुण), मनीषा पवार (२.५०, ३ मि. संरक्षण व १ गुण) यांनी चांगला खेळ केला. तर ठाणे कडून रेष्मा राठोड (२.२०, ३.३० मि. संरक्षण व २ गुण), दीक्षा काटेकर (१.१०, २.१० मि. संरक्षण) यांनी चांगला खेळ केला. दरम्यान, या स्पर्धेतील अंतिम सामने उद्या सायंकाळच्या सत्रात होणार आहेत.

# अनिष सहस्त्रबुद्धे 'आयपीएल'चे पंच

### जिल्हा क्रिकेट संघटनेच्या वतीने सत्कार



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ मार्च -**

आयपीएल २०२५साठी येथील अनिष सहस्त्रबुद्धे यांनी पंच म्हणून निवड झाली. त्यानिमित्त जिल्हा क्रिकेट संघटनेच्या वतीने त्यांचा माजी सचिव दिलीप बच्चुवार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. अत्यंत कमी वयात श्री. सहस्त्रबुद्धे यांनी क्रिकेट पंचमध्ये उत्कृष्ट कामगिरी करून आयपीएल स्पर्धेसाठी स्वतःची निवड सार्थ करून दाखवली आहे. भविष्यात वन डे, कसोटी क्रिकेटमध्ये ते पंच म्हणून कामगिरी करतील असा विश्वास मान्यवर व खेळाडूंनी व्यक्त केला.याप्रसंगी जिल्हा क्रिकेट संघटनेचे संयुक्त सचिव चंद्रकांत रेंबरसो, सुनील मालप, राजेंद्र गोटे, संतोष बडवे, संजय वडजे, संजय मोरे, शिवानंद अकलूजकर, किशोर बोरामणी, सत्यजित जाधव, चिराग शहा, संकेत शहा, सुखद जमादार, किरण मनियार, साक्षी वाघमोडे आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रकाश भुतडा यांनी केले.

**महिलांच्या अंतिम सामन्यासाठी संधी**

शनिवारी मुंबईतील ब्रेबॉर्न स्टेडियमवर झालेल्या मुंबई इंडियन्स विरुद्ध दिल्ली कॅपिटल या महिला प्रीमियर लीगच्या (डब्ल्यूपीएल) तिसऱ्या हंगामातील अंतिम सामन्यासाठी श्री. सहस्त्रबुद्धे यांनी पंच म्हणून भूमिका बजावली.

# सोलापूर महापालिकेचा महिला महोत्सव १७ व १८ मार्चला

**सोलापूर, दि. १५ मार्च -**

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून सोलापूर महापालिकेच्या वतीने १७ व १८ मार्च रोजी महिला महोत्सवाचे आयोजन केले आहे. दोन दिवस चालणार महिला बचत गट उत्पादित वस्तु व खाद्यपदार्थ विक्री प्रदर्शन होणार आहे. सोलापूर मनपा महिला कर्मचाऱ्यांसाठी विविध स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे.

या प्रदर्शनाचे उद्घाटन दि. १७ मार्च रोजी सकाळी १० वाजता आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या हस्ते होईल. मनपा महिला कर्मचाऱ्यासाठी सुदंर हस्ताअक्षर, निबंध,परंपरिक वेशभुषा,समहू गायन, ग्रुपडान्स रस्सीखेच, काव्य वाचन, पाककला आदी स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रम सोलापूर महानगरपालिका, इंद्र भवन परिसर, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, येथे आयोजित केले आहे.

महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या मार्गदर्शनाखाली उपायुक्त तैमुर मुलाणी यांच्या नियंत्रणाखाली महानगर पालिका, महिला बालकल्याण विभाग व दीनदयाळ अंत्योदय योजना राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान यांच्या संयुक्त विद्यमाने महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या मालाला बाजारपेठ मिळावी, त्याचा प्रचार व प्रसार व्हावा या हेतूने प्रदर्शन होणार आहे.

प्रदर्शनामध्ये शहरी महिलानी तयार केलेले साहित्याची विक्री प्रदर्शनामध्ये होणार आहे. नागरिकांनी प्रदर्शनास भेट द्यावी, असे आवाहन महापालिका उपायुक्त तथा शहर प्रकल्प अधिकारी तैमुर मुलाणी यांनी केले आहे.

Classifieds

**भाड्याने देणे**

युनिक हॉस्पिटलजवळ सलग २ गाळे ऑफिस, कुरिअर, डॉक्टर, वकील, थेरपीसेंटर, एजन्सी, गोडाऊन वगैरेसाठी भाड्याने देणे. विष्णू पंपटवार-९८८१२४३६९०

दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.

**SUYASH CENTRAL SCHOOL/GURUKUL,SOLAPUR**
Reputed Best School in Solapur
EXPERIENCED SENIOR TEACHERS
CBSE/STATE BOARD
(M.Sc./M.A. - English, Maths, Physics, Biology, SS.)
JUNIOR RESIDENTIAL TEACHERS
SPORTS/MUSIC (B.A/B.Sc.)
Good Salary, Free Environment, Job Satisfaction.
Send Biodata on - suyashgurukul@gmail.com

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन : डि. व सब डि. सोलापूर, तालुका दक्षिण सोलापूर पैकी मौजे मुळेगाव ग्रामपंचायत हच्चीतील भु.गट नं. १००/२ व १०१ पैकी यश नगर मधील प्लॉट नं.६१ यांसी क्षेत्र ८३.६४३ चौ. मीटर अथवा ९०० चौ. फुट इतके क्षेत्र. यासी चतुःसीमा - पुर्वेस - ३० फुट रस्ता, दक्षिणेस - २० फुट रस्ता, पश्चिमेस - प्लॉट नं. ६०, उत्तरेस - प्लॉट नं. ५९.

येणेप्रमाणे चतुःसीमेतील खुली प्लॉट जागा त्यातील दगड, माती वगैरे तदंगभूत वस्तूंसह, मालकी व कब्जेवहिवाटीचे हक्कासह.

ही मिळकत प्लॉट जागा १. सौ. गीता राजेंद्र दंडगळ, २. श्री.राजेंद्र व्यंकप्पा दंडगळ, रा. १४९, ते पाच्छा पेठ, सोलापूर यांचे मालकी व कब्जेवहिवाटीची असून ती त्यांनी आमचे अशिलास मालकी व कब्जेवहिवाटीचे हक्काने कायम खुष खरेदीने देण्याचे ठरवून इसारा पावती लिहून दिला आहे. त्यांनी ही मिळकत प्लॉट जागा निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची असल्याचे खात्री व भरवसा दिला आहे. तरीही वर नमूद मिळकत संदर्भात कोणाचाही, कसलाही गहाण, दान, बक्षिस,इसारा पावती, साठेखत, खरेदीखत, वारसा, पोटगी, टाच, बोजा, जप्ती, कोर्ट केसेस अथवा अन्य कोणत्याही स्वरुपाचा हक्क, हितसंबंध वा वाद असल्यास, त्यांनी खालील नमूद पत्त्यावर योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून सात दिवसांचे आत लेखी कळवावे. मुदतीत कोणाचेही हरकत न आल्यास सदर मिळकतीवर कोणाचाही, कोणताही, कसल्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध नसल्याचे समजून अथवा त्यांनी तो जाणीवपूर्वक स्वेच्छेने सोडून दिला असे समजून आमचे अशिल ठरल्यानुसार खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. नंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही, कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली असे दि. १५/०३/२०२५

सही/-
ॲड. राजरतन द. श्रीराम
ऑ.१६२१/१/१, कुचन नगर, सोलापूर-५
मो.नं. ९८८१२४०५१६

## नावात बदलाबाबत जाहीर नोटीस

तमाम लोकांस या नावात बदलाबाबत जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

आमचे अशिलाचे **लग्नापूर्वीचे नांव - शारदाबाई नातु पवार** असे होते, तर **लग्नानंतरचे नांव - सरीता राजेंद्र राठोड** असे झाले आहे, **शारदाबाई नातु पवार व सरीता राजेंद्र राठोड** या दोन्ही नावाची व्यक्ती मी एकटीच आहे.

ही जाहीर नोटीस दिली ता. १५/०३/२०२५

सही/-
ॲड. शिवानंद मल्लिकार्जून फताटे
ए-८, यशराज नगरी, अक्कलकोट रोड, सोलापूर
अशिलातर्फे ॲडव्होकेटस्
मो.नं. ९८८१२४२४०१

## जाहीर नोटीस

सिव्हील किरकोळ अर्ज नं. ७५/२०२५
नि.नं. ९

**सोलापूर येथील मे. जिल्हा न्यायाधिश साहेब, यांचे न्यायालयात**

**कुमारी पुष्पावती ऊर्फ पुष्पाबाई हणमंतसा मैत्राणी**
वय ७४ वर्षे, धंदा काही नाही,
रा. घर नं.२२/२३, गुरुवार पेठ, सोलापूर — **अर्जदार**

विरुध्द

**महाराष्ट्र शासन**
**(समन्स/नोटीस डी.जी.पी. कार्यालया, जिल्हा न्यायालय सोलापूर यांचेवर बचावण्यात यावे.)** — **सामनेवाला**

ज्याअर्थी श्री. श्रीनिवास हणमंतसा मैत्राणी हे जन्मताच वेडसर आहेत. त्यांचे नांवाने डि सब डि सोलापूर पैकी तालुका उत्तर सोलापूर पैकी सोलापूर महानगरपालिका हद्दीतील सिटी सर्व्हे नं.४७६८/ब/२, यांचे एकूण क्षेत्र ६८.८० चौरस मीटर इतकी बांधकामाची घरजागा यांत बांधलेल्या एकूण ३ खोल्या आहेत व न्हाणी व नळ व संडासची सोय आहे. सदर मिळकत इतर मालकांनी विक्री काही भाग विक्री केलेली आहे. श्रीनिवास हणमंतसा मैत्राणी यांचे मालकीचे हिस्सा देखील विक्री करावयाची आहे. त्यांमुळे त्यांचेवतीने वर नमूद मिळकत करणेकामी अर्जदारांनी मा. रेजिस्टरा दुय्यम निबंधक सोलापूर यांचेकडे विचारणा केली असता त्यांनी अर्जदारास असे सांगितले की मे. कोर्टाकडून गार्डियन सर्टिफिकेट घेवून आल्यावरच पुढील खरेदीखताचे व्यवहार केले जाईल. त्यांमुळे अर्जदारांने या मे. कोर्टात गार्डीयन/मॅनेजर म्हणून सर्टीफिकेट मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी कोणाची काही तक्रार/हरकत अथवा इतर काही म्हणणे असल्यास त्यांनी स्वतः अगर वकीलामार्फत या मे. कोर्टात दिनांक ११/०४/२०२५ रोजी अथवा नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसांत आपले लेखी म्हणणे मांडावयाचे आहे. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास कोणालाही म्हणणे मांडावयाचे नाही असे समजून मे. कोर्ट योग्य तो आदेश करील, याची नोंद घ्यावी. ही जाहीर नोटीस दिली तारीख १३/०३/२०२५

सही/- लिपीक | कोर्टाचा शिक्का | सही- अधिक्षक, सोलापूर जिल्हा न्यायालय यांचे न्यायालयात, सोलापूर

## अवसायक दि लक्ष्मी को ऑप बँक लि सोलापूर (अवसायनात)

मुख्य कार्यालय ३१९, दक्षिण कसबा, सोलापूर

**परिशिष्ट - IV-ए ८ (६) ची तरतूद**
**स्थावर मालमत्ता विक्री साठी विक्री सूचना.**

**सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्टक्शन ऑफ फायनान्शिअल असेटस अँड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरीटो इंटरेस्ट एक्ट २००२ तरतुदी या सिक्युरिटी इंटरेस्ट (इनफोर्समेन्ट) नियमावली २००२ च्या नियम ८ (६) नुसार अंतर्गत या सह वाचण्यात याव्यात. अचल मालमत्तेच्या विक्री साठी जाहीर लिलाव सूचना.**

सामान्य जनता आणि विशेषत कर्जदार / जामीनदार / गहाणकार यांना याद्वारे सूचित करण्यात येते खाली वर्णन केलेली स्थावर मालमत्ता ही बंकेकडे तारण ठेवली असून त्यावर सिकयूअर क्रेडिटर्स यांचा बोजा आहे. ज्याचा ताबा अवसायक दि लक्ष्मी को ऑप बँक लि. सोलापूर (अवसायनात) प्राधिकृत आधिकारी यांना घेतला असून या तारण मालमत्तेची विक्री दिनांक १६/०४/२०२५ रोजी सदर मालमत्ता जशी आहे तशी जी जेथे आहे तेथे जशी आहे तशी या तत्वावर कर्जदार/जमीनदार/गहाणकार श्री. बन्सीधर टेक्स्टाइलस चे प्रो.प्रा. श्रीमती. शोभादेवी जगदीश गौड यांच्या कडून रुपये ३५,२७,३९३/-(अक्षरी रुपये पस्तीस लाख सत्तावीस हजार तीनशे त्र्यान्नव फक्त) २५/०२/२०२५ पुढील व्याज. खर्च. इतर शुल्क आणि खर्चासह या रकमेचे वसुलीसाठी अवसायक दि लक्ष्मी को औप बँक लि सोलापूर (अवसायनात) सिकयूआ क्रेडिटर्स यांनी जाहीर लिलावाने विक्री करण्याचे ठरविले आहे. त्यासाठी राखीव किंमत व बयाणा रक्कम पुढीलप्रमाणे

**मालमत्तेचे विशिष्ट तपशील विक्री हेतु वर्णन केलेल्या संपत्तीची विशिष्ट माहिती खालील प्रमाणे देणेन येत आहे.**

जिल्हा व उपजिल्हा सोलापूर तालुका उत्तर सोलापूर सोलापूर महानगरपालिका हद्दीतील भवानी पेठ येथील टि.पी.नं २ फायनल प्लॉट नं ७०/१/अ/२ चनशेट्टी अपार्टमेंटमधील पहिल्या मजल्यावरील सदनिका नं ६ यासी क्षेत्रफळ ४१.४१ चौ. मीटर असून यासो चतुः सिमा येणेप्रमाणे

१) पूर्वेस - फायनल प्लॉट २० व सामाईक भिंत, २) पश्चिमेस - खुली जागा, ३) दक्षिणेस - जिना, ४) उत्तरेस - खुली जागा

| | |
|---|---|
| डिमांड नोटिस दिनांक | **१४/०७/२०२१** |
| (प्रतिकात्मक ताबा) ताबा दिनांक | १२/०१/२०२२ |
| कर्ज खाते नंबर | ००३००१०१७०००००९४ |
| लिलावाच्या ठिकाणचे दिनांक व वेळ | दि लक्ष्मी को-ऑप बँक लि. सोलापूर (अवसायनात) प्रधान कार्यालय, सोलापूर, १६/०४/२०२५ वेळ दुपारी १.०० |

**दिनांक : १५/०३/२०२५**
**स्थळ : सोलापूर**

सही/-
**प्राधिकृत अधिकारी**
दि.लक्ष्मी को-ऑप बँक लि.,
सोलापूर (अवसायनात)

## श्री महावीर अर्बन को-ऑप बँक लि, सोलापूर

६०/६१, पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर ४१३००२
फोन नं-०२१७-२६२२९३४४/२६२२९३३

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ च्या नियम १०७ मधील तरतुदीनुसार स्थावर मालमत्ताचे जाहिर लिलाव व विक्री नोटीस**

ज्या अर्थी खाली सही करणार विशेष वसुली व विक्री अधिकारी श्री महावीर अर्बन को-ऑप बँक लि, सोलापूर ही संस्था महाराष्ट्र कायदा १९६१ अन्वये नोंदणीकृत संस्था असून त्यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ च्या नियम १०७ मधील तरतुदीनुसार दिनांक २०/१०/२०२२ रोजी मागणी नोटीस कर्जदार गंगाधर भीमाशंकर ढंगापुरे चे प्रो.प्रा श्री गंगाधर भीमाशंकर ढंगापुरे रा.१०२क/७५ब/२, भवानी पेठ, सोलापूर व जामिनदार १) श्री अविनाश मनोहर बनसोडे रा. ३५, मंत्रीचंडक अंगण, हैद्राबाद रोड, सोलापूर, २) श्री नागेश बसवंत म्हेत्रे रा. बी ११३, मंत्रीचंडक अंगण, हैदराबाद रोड, सोलापूर व ३) श्री संगमेश्वर सिद्राम कलशेट्टी रा- ४,५,६ सग्गम नगर, मुळेगांव रोड, विडी घरकूल, सोलापूर यांना पाठवून रक्कम रूपये ४५,३६,०४९.०९/- या वर दिनांक ०१/१०/२०२२ पासून पुढे ही सर्व रक्कम परतफेड होईपर्यंत द.सा.द.शे १५% दराने होणाऱ्या व्याजाची रक्कम ची मागणी केलेली होती व आहे. सदर नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून थकबाकीदार यांनी सदर थकीत रक्कम जमा करण्यास कसूर केलेला आहे. तरी बँकेने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ च्या नियम १०७ मधील तरतुदीनुसार पुढील कारवाई करत सदर स्थावर मिळकतीचे कायदेशीर रित्या ताबा घेतलेले आहे. तरी सदर वर नमूद थकीत कर्ज रक्कमे पोटी बँकेने या खाली नमूद केलेले स्थावर मालमत्तेचा जहिर लिलाव जेथे आहेत व जैसे आहेत अशा त्या त्या मिळकती त्या त्या परिस्थीती मध्ये विक्री करणार आहेत.

**जाहिर लिलाव व विक्री करण्यात येणाऱ्या मालमत्तेचे वर्णन पुढील प्रमाणे असे**

| अं. क्र. | कर्जदाराचे व जामीनदार यांचे नाव व पत्ता | मिळकतीचे वर्णन | राखीव किंमत | कर्ज रक्कम बाकी दिनांक २८/०२/२०२५ अखेर |
|---|---|---|---|---|
| १ | **कर्जदार - गंगाधर भीमाशंकर ढंगापुरे चे प्रो.प्रा श्री गंगाधर** भीमाशंकर ढंगापुरे रा.१०२क/७५ब/२, भवानी पेठ, सोलापूर | सोलापूर महानगरपलिका हद्दीतील रविवार पेठ येथील फायनल प्लॉट नं ९२/ए/२/३/१६ क्षेत्र २४१.९० चौ मी व त्यावरील १२५.८५ चौ मी आर.सी.सी असलेली बांधकामाची मिळकत. | ७७,५४,७००/- | ६८,१९,२७६.०९/- |
| २ | **जामिनदार १) श्री अविनाश मनोहर बनसोडे** रा. ३५, मंत्री चंडक अंगण, हैदराबाद रोड, सोलापूर, **२) श्री नागेश बसवंत म्हेत्रे** रा. बी ११३, मंत्री चंडक अंगण, हैद्राबाद रोड, सोलापूर व **३) श्री संगमेश्वर सिद्राम कलशेट्टी** रा- ४,५,६ सग्गम नगर, मुळेगांव रोड, विडी घरकूल, सोलापूर | सोलापूर महानगरपलिका हद्दीतील रविवारपेठ येथील फायनल प्लॉट नं ९२/ए/२/३/१७ क्षेत्र २४७.०० चौ मी व त्यावरील २६.९५ चौ मी पत्रा शेड असलेली बांधकामाची मिळकत. | ३३,९२,४००/- | |

**लिलावाचे ठिकाण तारीख व वेळ : श्री महावीर अर्बन को-ऑप बँक लि. सोलापूर**
**६०/६१, पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर ४१३००२**
**बंद लिफाफ्यात निविदा सादर करणेचे दिनांक १६/४/२०२५**
**वेळ - सकाळी ११ ते दुपारी ५ वाजेपर्यंत**
**निविदा उघडण्याची वेळ सायंकाळी ५:३० वाजता**

**टिप-**

१. लिलावात भाग घेणाऱ्यांनी राखीव कमतीच्या १०% बयाणा रक्कम लिलाव सुरू होण्यापूर्वी भरणा केल्याशिवाय लिलावात भाग घेता येणार नाही. राखीव किमतीच्या १०% बयाणा रक्कम दि. १५/०४/२०२५ पूर्वी दुपारी ३.०० वाजेपर्यंत डीमां ड्राफ्ट अथवा पे ऑर्डर ने भरणा करावी.
२. लिलावाच्या शर्ती व अर्टी लिलावाच्या दिवशी लिलावापुर्वी वाचून दाखविण्यात येथील आणि त्या बँकेच्या सूचना पत्रकामध्ये दिले जातील.
३. लिलावापूर्वी थकवाकीदाराने रक्कम भरल्यास लिलाव रद्द करण्यात येईल.
४. लिलाव मिळकतीसंबंधी अधिक माहिती पहिजे असल्यास बँकेच्या प्रधान कार्यालयात संपर्क साधावा..
५. स्थावर मालमत्तेच्या जाहीर लिलाव ''जेथे आहेत व जैसे आहेत अशा त्या त्या मिळकती त्या त्या परिस्थितीमध्ये विक्री करण्यात येईल.''

**दिनांक : १५/०३/२०२५**
**स्थळ : सोलापूर**

सही/-
**विशेष वसुली व विक्री अधिकारी**
**श्री महावीर अर्बन को-ऑप बँक लि., सोलापूर**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

**शहा सरांनी चष्म्याआड बोट घालून डोळे टिपले. ते पुन्हा एकदा भर वर्गात भावुक झाले होते. कशी ही मुलगी? क्लासला पण येत नाही! दुसरेच उद्योग करत बसते. नियमित आली तर महाराष्ट्रात पहिली येईल. पण नाही! 'त्या' मुलीशी – म्हणजे लताशी – माझी पहिली गाठ पडली ती अशी : आमच्या लाडक्या शहा सरांच्या साउंड ट्रॅकवर. शहा सरांच्या आग्रहावरून डे. जि. भावे स्कूलमधली आम्ही नववीदहावीतली मुलं महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभेच्या प्रबोध, प्रवीण वगैरे हिंदीच्या परीक्षांना बसायचो. खूप कळकळीनं शिकवायचे सर. त्यांच्या शिकवण्यातली वाक्यंच्या वाक्यं अजून कानात गुंजतात, इतकं सुंदर शिकवायचे. त्यामुळे मी सकाळच्या शाळेत असले तरी पुन्हा संध्याकाळी शाळेत येऊन त्यांच्या क्लासला हजेरी लावायची. अशा व्याख्यानांची पर्वणी सोडून दुसरीकडेच भुरकळणारी, सरांच्या डोळ्यांत पाणी आणणारी ही दुपारच्या शाळेतली सुंदरी आहे तरी कोण?... माझ्या मनात उत्सुकता निर्माण झाली. मग हळूहळू तिचे 'दुसरेच उद्योग' समजायला लागले. ती तरी काय करणार? नाट्यवाचन स्पर्धेत 'वऱ्हाडी मानसं' मधला वऱ्हाडी लहजा पकडण्यासाठी बाईंना तीच हवी असायची. वक्तृत्व स्पर्धेत फड दुसरं कोण गाजवणार? तीच पाहिजे! आणि कॅलेस्थेनिक्समधे मानवी रांगांमधे रंग भरून मैदान गाजवायलाही तिच्याशिवाय पर्याय नाही. कुणाकुणाचे डोळे टिपणार बिचारी?**

# विश्वाचे आर्त

- हेमा अंतरकर, ज्ञानप्रबोधिनी

पुढे लक्षात आलं - दुसऱ्यांच्या डोळ्यांतल्या पाण्याशी या मुलीचा बराच गहिरा संबंध आहे. मोठेपणी कॅलेस्थेनिक्सची जागा अध्यात्मानं घेतली आणि शहा सरांची जागा ज्ञान प्रबोधिनीच्या अप्पांनी घेतली. ती अध्यात्मात वाहून गेली तर प्रबोधिनीचं समाजकार्य बाजूला पडेल अशी काळजी त्यांना पडायची. पण तिनं जसे प्रबोध परीक्षेत अव्वल मार्क मिळवून शहा सरांचे पांग फेडले, तशीच प्रबोधिनीचं कार्य वाढवून अप्पांच्या अश्रूंचीही फुलं केली. कोणत्याच आघाडीवर ती कमी पडली नाही. लताची आणि माझी मैत्री किती दीर्घ ? प्रबोधिनीत काम ती वयाच्या सतराव्या वर्षापासून करते आहे. शहा सरांच्या वर्गात (अखेर एकदाची! ) ती उगवली तेव्हा पंधरा वर्षांची असेल. प्रबोधिनीचं काम आम्ही बारा वर्षं सतत बरोबर केलं - अगदी एकाच विभागात मात्र नव्हे. आणि मग माझ्या बाजूनं -अधूनमधून खंड पडत - ते आजतागायत कमीअधिक प्रमाणात चालू आहे. लताची मैत्री मात्र अखंड चालू आहे. प्रबोधिनीतल्या तिच्या कामाचा पैस फार मोठा आहे. संघटनकार्याचं बाळकडू तिला घरातच मिळालं होतं. तिचे आई-वडील संघाच्या आणि समितीच्या कार्यात रमून गेलेले होते. घरी कार्यकर्त्यांची उठबस चालू असायची. बापूसाहेब 'तरुण भारत'चे संपादक असल्यामुळे साहित्यगुण लताच्या डीएनएमधेच जडवले गेले असणार. तिला घडवायला मात्र त्यांना वेळ देता आला नाही फारसा.

असं हे स्वयंभू रत्न अप्पांच्या हाती लागलं आणि त्याचं मूल्य ओळखायला त्यांना वेळ लागला नाही. युवती विभागातल्या जबाबदाऱ्या ते तिच्यावर सोपवत गेले आणि ती स्वभावगत निष्ठेनं, परिश्रमपूर्वक त्या पार पाडत गेली. सतरा-अठराच्या वयातच तिला ज्ञानेश्वरीची गोडी लागली होती. अवघड आणि विद्वत्ताप्रचुर असं लोकमान्य टिळकांचं गीतारहस्य तिनं जिज्ञासेनं वाचून काढलं होतं. तत्त्वज्ञान हा तिच्या आवडीचा विषय होता. मराठी, हिंदी, इंग्रजी आणि संस्कृत ह्या सगळ्याच भाषांवर तिचं प्रभुत्व होतं. फ्रेंचच्याही परीक्षांचा अभ्यास तिनं सुरू केला होता. वृत्तबद्ध काव्यरचना ती लीलया करू शकत असे. (आजही दिलेल्या विषयावर, दिलेल्या मुदतीत ती अत्यंत सुंदर आणि आशयघन रचना करून देते - अगदी हुकमीपणे!) युवतींच्या वैचारिक बैठकी घेणं, क्रीडा-दलं चालवणं, प्रबोधवर्गात शिकवणं हे दैनंदिन उपक्रम चालवताचालवताच ती अप्पांना विविध संस्कारांच्या पोथ्यांची रचना करण्यासाठी मदत करू लागली. आणखीही काही विद्वान लोक त्या उपक्रमात सहभागी होते. त्या कामासाठी त्या तरुण वयातही ती सर्वथा पात्र होती. तेवढी प्रगल्भता तिच्यापाशी होती. संस्कारांमागची धार्मिक आणि तात्त्विक पार्श्वभूमी तिला जाणून घेता येत असे. त्या विधींमधलं काव्य तिला भावत असे आणि ते मराठीच्या कवेत आणायला तिला प्रयास पडत नसत. आजही आपल्या संस्कारपोथ्या वाचताना त्यांतलं भावसौन्दर्य जाणवल्याखेरीज राहात नाही.

या पोथ्यांचा उपयोग करून वेगवेगळ्या संस्कारांचं पौरोहित्यही ती करू लागली. आधुनिक जीवनसरणीतल्या एका तरुण युवतीनं अशी जबाबदारी घेणं सोपं नव्हतं. लोकांच्या श्रद्धा आणि भावना ह्या विधींशी जोडल्या गेलेल्या असतात. लता सहृदयपणे त्यांच्याशी समरस होत असे. संस्कारांचा अर्थ समजून देतादेता त्या त्या घरच्या परिस्थितीनुसार योग्य ते समुपदेशनही करत असे. त्यामुळे अनेकांना आपल्या कार्यांचं पौरोहित्य तिनंच करावं असं वाटत असे. अमेरिकेत तर अशा विधींमधून तिनं अनेकांची हृदयं प्रबोधिनीशी जोडली.

स्वभावतः एकांतप्रिय असूनही हा अनेकांची अंतरे राखण्याचा आणि जोडण्याचा वसा लतानं सदैव मनःपूर्वक जपला. सुरुवातीपासूनच तिच्या परिचयातल्या अनेकांना तिनं प्रबोधिनीच्या वर्तुळात सहजपणे आकर्षून आणि सामावून घेतलं आहे. काही व्यक्ती तर इतक्या भिन्न प्रवृत्तीच्या असत की, त्यांचं पाऊल प्रबोधिनीत पडलंच कसं असा प्रश्न पडावा. सहजपणे आठवतं ते उदाहरण सिस्टर निष्ठा ह्यांचं. ह्या फ्रेंच मिशनरी बाई आम्हाला फ्रेंच शिकवत असत. बहुधा आमची ओळख आलियांस फ्रॉन्सेज ह्या संस्थेच्या कार्यक्रमात झाली असावी. इंग्रजी फारसं बोलू न शकणाऱ्या ह्या बाई प्रथम लताच्या घरी राहायला आल्या आणि मग प्रबोधिनी हेच त्यांचं घर बनून गेलं. त्यांच्या दुव्यामधून मग अनेक फ्रेंच मंडळी प्रबोधिनीशी जोडली गेली. वर्षारंभ, वर्षान्त अशा कार्यक्रमांना उपस्थित राहू लागली. त्यांची संख्या एवढी वाढत गेली की मग आपल्या पोथ्यांचा फ्रेंचमधे अनुवाद करण्याची वेळ आली. आपली कार्यवृत्तं आमच्या मदतीनं त्या फ्रेंचमधे भाषांतरित करून द्यायच्या. विविध उपक्रमांचे प्रस्ताव फ्रेंचमधून सादर व्हायला सुरुवात झाली आणि फ्रान्समधून प्रबोधिनीसाठी मदतीचा ओघ चालू झाला. सिस्टर निष्ठांना साहाय्यिका आणि दुभाषी म्हणून बरोबर नेऊन अप्पांनी फ्रान्ससह युरोपचा यशस्वी दौरा केला.

सिस्टर निष्ठांबद्दलची बातमी काही वर्षांपूर्वी कानावर आली ती, त्यांनी काश्मीरच्या थोर समन्वायक संत लालदेड ह्यांच्यावरच्या एका नाटकाचा फ्रेंचमधे अनुवाद केल्याची! मिता वसिष्ठ ह्या माझ्या मैत्रिणीनं ते नाटक दिग्दर्शित करून त्यात लालदेडची भूमिका केली होती. एका परभाषी, ख्रिश्चन मिशनरी स्त्रीला आपलंसं करून तिच्या दुव्यामधून एवढा कार्यविस्तार साधणं, तिला आपल्या देशाच्या सुखदुःखांशी इतकं समरस करून घेणं ही फारच मोठी उपलब्धी म्हणावी लागेल. लतानं अप्पांच्या साथीनं ती साधली, हे एक विलक्षणच कर्तृत्व.

अप्पांनी आणि अण्णांनी इतरही अनेक क्षेत्रांमधून प्रबोधिनीशी जोडलेल्या अनेक थोर व्यक्तींशी लतानं घनिष्ठ आपुलकीचे संबंध निर्माण केले. श्री. श्रॉफ, श्री. कारिया, श्री. आचार्य ही त्या काळातली आठवणारी आणखी काही नावं. प्रकाश आमटे, वीणा देव, विजय सरदेशमुख, ह्यांच्यासारख्या प्रसिद्ध व्यक्तींपासून ते दादा कानडे, श्रीनिवास कुलकर्णी, हेमाताई होनवाड वगैरे कामसू व्यक्तींपर्यंत असंख्य लोकांना तिनं प्रबोधिनीच्या परिवारात सामावून घेतलं आहे. पंजाब दौरा, राजस्थान दौरा, 'आशा इज होप' हा कार्यक्रम, प्रज्ञा मानस संशोधिकेचे उपक्रम अशी पुण्यातली कित्येक कामं यशस्वी केल्यानंतर १९८९ मधे लतानं सीमोल्लंघन केलं. तिची नेमणूक अण्णांनी सोलापूरची अवंतिकाबाईंची शाळा चालवण्यासाठी केली. सोपवलेल्या कामाला नकार देणं लताच्या रक्तातच नाही. खऱ्या कार्यकर्तीच्या आज्ञांकितपणे तिनं ही जबाबदारी स्वीकारली. पुण्यातलं बसलेलं बस्तान उठवून एका परक्याच गावात स्वतः नव्यानं रुजायचं आणि नव्या कामाची एकहाती पायाभरणी करायची, हे अवघडच म्हणायचं. आम्ही गमतीनं म्हणत असू की लता आता सासुरवाशीण झाली! (पुढे अण्णांनीही तिला भरपूर सासुरवास केला! त्यांच्या कठोर शिस्तीला अनेकजण वैतागत असत. पण लता त्यांच्या कसोटीला पुरेपूर उतरली. 'उतणार नाही, मातणार नाही, घेतला वसा टाकणार नाही' ह्या बाण्यानं, आत्यंतिक सोशिक वृत्तीनं ती कामाचे ढीग उपसत राहिली.) खरोखरच सासरी गेलेल्या मुलीनं खाव्या तशा अनेक खस्ता खाऊन, विविध मंडळींची मर्जी प्रयत्नपूर्वक संपादन करून, चिकाटीनं काम करून तिनं अवंतिकाबाईंच्या शाळेचं खऱ्या अर्थानं प्रबोधिनीकरण केलं. शाळेचे पूर्वीचे समर्थक व्यवस्थापन बदलल्यामुळे साशंक असायचे. त्यांचा विश्वास तिनं संपादन केला एवढंच नव्हे, तर द्विगुणित केला. शाळा अधिक नावारूपाला आणली आणि उत्तम सहकारी मिळवून साखरशाळा, प्रौढ साक्षरता वर्ग असे अनेक उपक्रम यशस्वी करून दाखवले.

हराळी हे महाराष्ट्राच्या नकाशातलं एक ठिपक्याएवढं गाव. अण्णांनी त्याच्या भौतिक प्रगतीचा पाया घातला. अनेक सोयीसुविधा, हिरवे मळे आणि शाळा उभारून तिथे कार्याचं रोपटं लावलं. लतानं अलौकिक आपुलकीचा ओलावा शिंपून हे रोप बहराला आणलं. इतक्या कोपऱ्यातल्या ह्या दुर्गम गावाकडे अनेकजण आज खेचले जातात ते लताच्या व्यक्तिमत्त्वातल्या सात्त्विक आकर्षणामुळे; इथे उभारल्या गेलेल्या कामाच्या सचोटीमुळे आणि त्यात सहभाग म्हणजे आयुष्याची खरी कृतार्थता हे मनोमन जाणवल्यामुळे.

एवढंच करून आयुष्याचं सोनं झालं, असं मानती तर ती लता कसली? प्रबोधिनीचा एवढा प्रचंड कार्यभार सांभाळत असताना तिची अध्यात्मसाधनाही दमदारपणे चालू होती. एकाच व्यक्तीला दोन भिन्न क्षेत्रांमधे एवढी उंची गाठता यावी, एवढी लोकमान्यता लाभावी ही किती दुर्मिळ गोष्ट आहे! मला तिच्या अध्यात्मसाधनेचा प्रवास अजून पुरता जाणून घेता आलेला नाही. त्याचे काही कवडसेच हाती लागल्यासारखे वाटतात. तिचं अध्यात्म पोथीबद्ध नाही; ती ते आचरणात आणण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न करत असते, हे मला जाणवलेलं आहे.

लताची रसाळ आध्यात्मिक प्रवचनं मी जिवाचे कान करून ऐकली आहेत. तिचा भर विद्वत्तापूर्ण विश्लेषणावर नसतो. घटपटाच्या लटपटी करायला तिला आवडत नाही, तर लोकांनी खरोखर साधना करून अलौकिक शक्तीचा प्रत्यय घ्यावा ही तिची तळमळ असते.



आपल्या भारतीय चित्रपटसृष्टीतल्या मजरुह सुलतानपुरी, शैलेन्द्र, लता, रफीसारख्या प्रतिभासंपन्न कलावंतांना गीतं परिपूर्ण वठवण्याचे निकष आपोआपच गवसले आणि त्या निकषांवर उतरणारं लेखन-गायन स्वयंभूपणे त्यांच्या लेखण्यांमधून किंवा गळ्यांतून अवतरलं. कुणाला त्यांना काही शिकवावं-पढवावं लागलं नाही. लताची प्रवचनकला हाही तितकाच उत्स्फूर्त, स्वयंप्रज्ञ आविष्कार आहे. आतला प्रकाश बाहेर फाकायला निमित्त शोधत होता, इतकंच. पुण्यातल्या सुविद्य आणि जाणकार श्रोत्यांनाही तिचं विवेचन समाधान देऊन जातं आणि बारामतीतल्या अशिक्षित बायांनाही अंतरीचे बोल आयुष्याची लढाई लढायला बळ देतात.

आमच्या सहप्रवासातले काही झळाळ सहजपणे आठवणीच्या जाळ्यात गवसतात. तेच इथे सगळ्यांसह वाटून घ्यावे म्हणते.

प्रथम फर्ग्युसन आणि नंतर स. प. महाविद्यालयात आम्ही अनेक उपक्रमांत बरोबर भाग घेतला आहे - साहित्य सहकारमधल्या मैफली; सॉक्रेटिस क्लबमधले वादविवाद; वर्गप्रतिनिधींच्या निवडणुका; 'डॉक्टर झिवॅगो', 'गॉन विथ द विंड', 'शहीद' ह्यासारख्या चित्रपटांचा आस्वाद; 'ऋतुचक्र', 'द लास्ट टेम्प्टेशन ऑफ ख्राइस्ट', 'चित्रलेखा', 'सावित्री', 'फाउंटन हेड' सारख्या असंख्य पुस्तकांवरच्या चर्चा; मोहन रानड्यांची तुरुंगातून सुटका झाल्यानंतरची सभा; १९७१ मधे ढाका पडल्यानंतर एकमेकींना फोन करून साजरा केलेला आनंद; कॉलेज- युवकांनी उत्स्फूर्तपणे काढलेली विजययात्रा; इंदिरा गांधींची रेस कोर्सवरची विराट सभा आणि तिथून घरी येताना बस न मिळाल्यामुळे करावी लागलेली पायपीट; काळ्याकुट्ट रात्री प्रबोधिकांना घेऊन शिवापूरच्या दिशेनं हसतखेळत केलेली वाटचाल; कितीतरी शिबिरं; स्वतःपाशी प्रावीण्य नसतानाही युवतींकडून बिनचूक करून घेतलेली हॉकी, भालाफेक वगैरे क्रीडांची नेत्रदीपक प्रात्यक्षिकं; ग्यानबा तुकारामांचा वारीबरोबर केलेला गजर; निवासी शिबिरात निधडेपणानं रांधलेल्या पाककृती...

एकत्र गप्पा मारतामारता आपापल्या आवडत्या कवीच्या एखाद्या कवितेची आवेगानं आठवण यावी आणि प्रत्येकीनं स्वतंत्रपणे (आणि एकसमयावच्छेदे!) त्या वेगवेगळ्या कविता म्हणत (की बरळत?) सैराट येरझारा घालू लागावं, अशी झपाटलेली काव्यसंमेलनं आम्ही मैत्रिणींबरोबर साजरी केली आहेत. कवितेप्रमाणेच कामाचीही नशा एकत्र अनुभवली आहे. चांदण्या रात्री राजगडावर स्वारी करण्यातला थरार अनुभवला आहे. पंजाब दौऱ्यात प्रसंगी आंघोळ न करणं हीसुद्धा कशी देशसेवा ठरू शकते, त्याचा अनुभव घेतला आहे. प्रबोधिनीच्या कामाच्या अतिरेकावरून एकमेकींच्या घरच्यांच्या शिव्या खाल्ल्या आहेत. एकमेकींच्या घरच्या मंगल आणि शोकसिक्त प्रसंगांत सहभागी झालो आहोत. एकमेकींची आजारपणं आणि उदास मनोवृत्त्या निस्तरल्या आहेत. 'सर देईन, परि सार न देईन' ह्या ओळींचा इंग्रजी अनुवाद करण्यातला वैताग एकत्र अनुभवला आहे ... आणि " I shall give my head, but not my soup!' अशी गर्जना करून तो संपवलाही आहे! वर्षारंभ उपासनेतली परब्रह्माची कल्पना कुणा फ्रेंच युवतीला तिच्या भाषेत समजावून देताना आम्हाला ब्रह्मांड आठवलेलं आहे. अप्पा-अण्णांच्या आजारपणातले चढउतार हातात हात घेऊन सहन केले आहेत. ...

*'कसा करावा आपुल्या*
*देण्याघेण्याचा हिशेब?*
*रत्नखचित रातीचे*
*खाली झुकलेले नभ ..'*

-शब्द दुसऱ्या कुणाचे? तिचेच... ऐन वेळी मदतीला धावून आलेले! फार पूर्वीच जाणवलं होतं की, ह्या मुलीपाशी इतरांना रडवण्याचं दुर्मिळ सामर्थ्य आहे! चुंबकानं लोखंडाचे कण खेचून घ्यावेत, तसे हिला लोकांच्या डोळ्यांतले अश्रू आकर्षून घेता येतात. हिच्या सहृदय मार्दवात दुसऱ्यांच्या शल्यांचा आपोआप निचरा होऊन जातो. ' जी में आता है, तेरे दामन में सर छुपा के हम रोते रहें, रोते रहें ' ... ही उत्कट गरज कुणाला नसते? पण अश्रूंनी भिजवायला पदरही तितकाच मायाळू आणि आश्वासक असावा लागतो. कुचेष्टा होणार नाही, कुठे उगाच बभ्रा होणार नाही ह्याची हमी असावी लागते. आपण आपल्या हक्काच्या घरी आलो आहोत असा दिलासा हवा असतो. आणि नंतर प्रसन्नतेच्या इंद्रधनुषी कमानीखालून आपला प्रवास पुन्हा धीरानं चालू राहील ह्याची ग्वाहीसुद्धा.

*' मैं भी क्या चीज़ हूँ, खाया था कभी तीर कोई*
*दर्द अब जाग उठा, चोट लगे देर हुई*
*तुम को हमदर्द जो पाया, तो मुझे याद आया*
*के मेरे दिल पे पड़ा आ था कोई ग़म का साया ...'*

ही मजरूह सुलतानपुरीची अनुभूती तिच्यामुळे तिच्या अनेक सुहृदांना आली. मीनाकुमारीवरचं गाणं आलंच आहे ओठावर, त्यामुळे वाटतं; तिच्याप्रमाणेच लता 'मैं चुप रहूंगी' बाण्यानं, आपल्या पोळलेल्या मौनावर आपणच फुंकर घालून समजूतदारपणे जगली. आणि आपल्या सर्वांच्या वाट्याला तिचं पौर्णिम बोलणंच फक्त यायला हवं, ह्याचंही समंजस भान तिला तुलनेनं लहान वयातच आलं. असाध्य सहनसिद्धी तिला खूप सहजसाध्य झाली होती.

दुसऱ्याचं दुःख किंवा समस्या जाणायला खूप संवेदनशीलता लागते आणि ते दूर करायला खरी कळकळ आणि अंतर्दृष्टी असावी लागते. नुसतं कोरडं विश्लेषण आणि मानसशास्त्रीय चिरफाड पुरी पडत नाही. प्रत्येक जिवाबद्दल खरी आस्था असावी लागते. तिच्या वागण्यातून ती सतत जाणवते. समोरच्या साध्यातल्या साध्या माणसालाही ती आदरानं वागवते, तो महत्त्वाचा आहे ह्याची त्याला जाणीव देते. मुख्य म्हणजे तिची आस्था माणसांपुरतीच मर्यादित नाही किंवा प्रबोधिनीच्या उंबरठ्यापाशीच थबकलेलीही नाही.

देशांतर करून हराळीला आलेलं कासवाचं पिल्लू एखाद्या संध्याकाळी एकटं, उदास व्हायचं. ते ओळखून ती इतर उद्योगांतून वेळ काढून, त्याला उचलून घेऊन, त्याच्या गळ्याखाली खाजवून त्याला दिलासा द्यायची. एखाद्या कार्यक्रमात दृष्टी अधू असलेल्या एका कार्यकर्तीकडे गायनाची जबाबदारी असायची, पण तिला मंचावर आपलं स्थान घेताना अडचण आली तर ती लक्षात येऊन झट्कन तिला हात द्यायचं भान हिलाच असायचं. अप्पा- अण्णांच्या आजारपणात तिचं त्यांच्याकडे बारीक लक्ष असायचं. अण्णांच्या बाबतीत तर धोक्याची जाणीव वेळीच होऊन तिनं दक्षता घेतली आणि वेळ निभावली, असं अनेकदा झालं.

माचणूरला ती एकांतसाधनेसाठी गेलेली असताना संसारात पिचलेली एक सामान्य, अशिक्षित बाई तिला सामोरी गेली. तिच्या सर्व भल्याबुऱ्या वैशिष्ट्यांसह हिनं तिचा पत्कर घेतला तो कायमचा - अगदी कायदेशीर बाबींची पूर्तता करून. तिच्या उपजीविकेसाठी हिनं स्वतःच्या पदराला खार लावून घेतला. हराळीतल्या अनेक बायांची दुखणीखुपणी सहानुभूतीनं जाणून घेऊन ती ओळखीतल्या डॉक्टरांकरवी त्यांच्यावर अल्प खर्चात उपचार करवून देते. शाळेपासूनच्या अनेक मैत्रिणींचे हात प्रबोधिनीच्या दैनंदिन धबडग्यात खरं तर सुटून जायचे. पण तिनं ते सुटू दिले नाहीत. देश-परदेशात, सत्संग परिवारात, जिथे कुठे कामाला जाईल त्या गावांत नवे, जिव्हाळ्याचे संबंध रुजवून जिवाच्या शर्थीनं तिनं ते सारे रेशमी धागे आजतागायत जपले आहेत. इतक्या सहजपणे हे बंध तिनं गुंफले आहेत की, हा एक चमत्कार आहे ह्याचंही भान कुणाला राहू नये.

कॉलेजच्या वयात बरोबरच्या कवी-कवयित्रींच्या कविता, त्यांचा साहजिक संकोच बाजूला सारत आग्रहानं वाचायला मागायचा आणि त्यांच्यावर सविस्तर, समतोल अभिप्राय द्यायचा तिचा शिरस्ता होता. आजही तरुण कवींच्या बाबत तेवढीच जिवंत उत्सुकता तिला असते.

सहवासात येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्याला तिनं केवळ स्पर्श केला आहे असं नाही; तर ते अधिक खुलावं-फुलावं, सार्थकी लागावं ह्यासाठी ती सहजस्फूर्तीनं, एखाद्या कुशल माळ्याप्रमाणे प्रयत्न करत आली आहे. दुर्धर आजारानं ग्रस्त असलेल्या पण अध्यात्माचं देणं देण्यासाठी तळमळणाऱ्या एखाद्या मैत्रिणीकडून तिनं कोणत्यातरी मौलिक पुस्तकाचा अनुवाद करून घ्यावा आणि त्याच्यावर आवश्यक ते संस्कार करून हर प्रयत्नानं तो प्रकाशित करावा. आणखी कुणाचा साहाय्यकाअभावी रखडलेला संशोधन प्रकल्प वेळात वेळ काढून आणि जिवाच्या पलिकडे काम करून मार्गी लावावा. एखादीचे साहित्यिक गुण हेरून तिला लिहायला उत्तेजन द्यावं. कुणाचा एकटेपणा लक्षात घेऊन तिच्या शस्त्रक्रियेसाठी सोबतीला धावून यावं. कुणाच्या जीवनक्रमाचा प्रवाह प्रिय व्यक्तीच्या व्याधी-वार्धक्यामुळे खंडित होत असेल, तर तिची जबाबदारी स्वीकारून तो पुन्हा वाहता-खेळता करून द्यावा. ... अनेक परींनी अनेकांच्या जिवाला खरा विसावा द्यावा - आणि हे सारं करून अलिप्त, नामानिराळं राहावं. कसलं श्रेय हाताला चिकटू देऊ नये.

तिच्या अशा गुणांचा गंध तिच्या सहवासात आलेल्या अनेक माणसांमधेही दरवळताना दिसतो, आणि ह्या सहजपणे घडून येणाऱ्या परागीभवनाचा विस्मयभरित आनंद होतो. 'आपणासारिखे करिती तात्काळ' ह्या संतलक्षणाचा प्रत्यय अशा वेळी येतो.

*' फळा हळदिव्या झाकी हिरवासा पंख*
*रस गळे, करी चोच लालसर डंख*
*अशी पांखरून छाया, लावोनिया माया*
*आनंदाचे आसू लावी कोण ओघळाया?'*

- ह्यातल्या आनंदाच्या आसवांशीदेखील तिचं जवळचं नातं आहे. मधे अनेक मैलांचं अंतर असलं तरी तिच्या प्रेमाची पाखर जाणवून जाते. त्याची कंपनं जाणवत राहतात.

२०१५ साली पुण्यात अनेकांना झाली, तशी मलाही चिकुनगुनियाची बाधा झाली. लता तेव्हा पुण्यात होती. तिलाही चिकुनगुनिया होऊन गेलेला असल्यामुळे त्या आजारात माणूस किती असहाय्य, परावलंबी होतो; त्याला किती वेदना होतात; हालचाल किती अवघड होते ह्याची तिला पुरेपूर कल्पना होती. माझ्याकडे राहून माझी शुश्रूषा करण्यासाठी तिचा जीव तळमळत होता. तर तिला पुन्हा बाधा होऊ नये, स्वतःचीच तब्येत नाजुक असताना तिनं माझ्यासाठी ताण घेऊ नये म्हणून मी तिला न येण्यासाठी विनवीत होते. अनेक जबाबदाऱ्या अंगावर असल्यामुळे शेवटी तिला माझं ऐकणं भाग पडलं.

फोनवर आमचं असं संभाषण झाल्यानंतरची गोष्ट. थोड्याच वेळात इमारतीत खालीच राहणारे आमचे सज्जन डॉक्टर, मी त्यांच्याकडे जाण्याची वाट न बघता स्वतःच उठून मला तपासायला आले. मला सूचना आणि औषधं देऊन ते निघून गेले. त्यानंतर बसल्या जागीच माझं ध्यान लागल्यासारखं झालं. मला अतिशय शांत, निवांत, स्थिर आणि विश्रांत वाटलं. विश्रब्ध वाटलं. ह्याचा काय अन्वयार्थ लावायचा, मला अजून नीट समजलेलं नाही. लताची तळमळीची प्रार्थना मला काहीतरी बाह्य साहाय्य आणि आंतरिक सामर्थ्य देऊन गेली, अशी माझी समजूत आहे. माझा चिकुनगुनिया आश्चर्यकारक रीत्या तीनचार दिवसांतच पळाला.

पुदुचेरीला योगी अरविंदांच्या आश्रमात सेवारत असणाऱ्या एक साधिका भेटल्या होत्या. अरविंदांच्या एका इंग्रजी ग्रंथाचा अनुवाद लतानं केला होता, तो आश्रमात त्यांच्या वाचण्यात आला. तो अनुभव सांगताना त्यांच्या डोळ्यांत आनंदाश्रू दाटले होते. वाचतावाचता माझ्या खोलीतलं वातावरण बदललेलं मला जाणवलं. ते अरविंदांच्या कंपनांनी भारलं आहे असं मला जाणवलं. त्यांच्या चिंतनलहरी त्या अनुवादातून साक्षात् झंकारत आहेत असा प्रत्यय मला आला. खोलीत जणू एक वेगळाच प्रकाश फाकला होता. अंगावर रोमांच उभे करणारी ही साक्षात्कारी अनुभूती! त्या अगदी भारावून बोलत होत्या.

हराळीला वीज खंडित होणं, इंटरनेटची सेवा नीट नसणं अशा अनेक अडचणी असल्या तरी परगावातल्या सुहृदांपर्यंत तिच्या वाढदिवसाच्या शुभेच्छा पोचणारच. पुण्यात आल्यावर वेळ आणि शक्ती जास्तीत जास्त ताणून ती अधिकात अधिक जनांना भेटून त्यांची खबरबात घेणारच. पोटाच्या विकारामुळे उभंसुद्धा राहवत नाही अशा शक्तिशून्य अवस्थेतही, केवळ प्रेमाखातर तिनं आपल्या विद्यार्थिनीच्या आईचा श्राद्धविधी स्वतः कसा संपन्न केला ते मी माझ्या डोळ्यांनी पाहिलं आहे. एक सुंदर कथा आहे. एका पुण्यशील माणसाला देवदूत स्वर्गात पाचारण करायला येतो. चिकित्सक पुण्यात्मा देवदूताला स्वर्गलोकाची माहिती विचारतो. स्वर्गातली चिरंजीव सृष्टी, अम्लान फुलं ह्यांच्याबद्दल सांगताना देवदूत ओघात सांगून जातो, की स्वर्गात अश्रूंना अजिबात स्थान नाही. हे ऐकल्याबरोबर तो पुण्यात्मा स्वर्गात जायला नकार देतो. जिथे अश्रू नाहीत, तिथे संवेदना नाही; तिथे जिव्हाळा नाही. तिथे प्रेमाला वाव नाही. अश्रूंमधून निर्माण होणारी कळकळीची नाती नाहीत. थोडक्यात, तिथे माणुसकीच नाही! मग कुणाला हवा आहे असला कोरडा, भावविहीन स्वर्ग? तिला मोक्ष हवा आहे हे आपल्याला माहीत आहे. पण तसला, अश्रूच नसलेला स्वर्ग तिला भावेल का? ...कुणास ठाऊक! एखादवेळेस दुसऱ्याच उद्योगात रमून ती ईश्वराच्या डोळ्यांतूनही पाणी काढेल.


## डॉ. लतातार्ईंचा जीवनपट

**१९६८-६९ - आदरणीय आप्पासाहेब पेंडसे - अद्यापी ज्ञान प्रबोधिनी सुरु व्हायची होती. सदाशिव पेठेतील दगडी बांधकाम असलेल्या वाड्यात आप्पा रहात असत. त्यावेळी त्यांच्याकडे लतातार्ई वास्तव्यास होत्या. त्या ११, १२ वीत असाव्यात त्यावेळी मी त्यांना प्रथम पाहिले. कै. बापूसाहेब भिशीकर यांच्या त्या कन्या. सोलापुरातील केळकर दांपत्याने बाल विकास मंदिर शाळा ज्ञान प्रबोधिनीकडे हस्तांतरिक केली. नंतर त्या सोलापूरला स्थायिक झाल्या. कर्मयोगी आप्पांची जीवनमूल्ये त्यांनी तरुण वयातच आत्मसात केली होती. सोलापूर येथे ज्ञान प्रबोधिनीची सुंदर वास्तु तसेच हरळी येथे भव्य वास्तुची निर्मिती केली. त्या वास्तुमध्ये क्षिण क्षेत्र असलेल्या मुलां-मुलींवर उत्तम संस्कार केले.**

आध्यात्मिक सांस्कृतिक कार्यात त्यांचे मोलाचे मार्गदर्शन हो. त्या अत्यंत विनयशील नम्र पण प्रसंगी अत्यंत कठोर व धाडसी निर्णय घेत होत्या. अमृतसरच्या सुवर्ण मंदिरात भिंद्रानवाले यांच्यावर त्या मोर्चा घेऊन गेल्या होत्या. हे केवढे धाडस. हरळीमधील प्रबोधिनीच्या बांधकामावर देखरेख करण्यासाठी मी जात असे. दोन, तीन दिवस मुक्काम असायचा. त्यावेळी त्यांच्या आगत्याचा लाभ मला लाभला. हे मी माझे मोठे भाग्य समजतो. लतातार्ई बऱ्याच वेळा आमच्या घरी येवून गेल्या. ब्रिगेडीयर हेमंत महाजन एकदा व्याख्यानासाठी सोलापूरला आले होते. ज्ञानप्रबोधिनीत मुक्कामास होते. मी त्यांना फराळाला माझ्याकडे निमंत्रित केले हो. त्यांना माझे घर सापडण्यास आडचण होऊ नये म्हणून मी लतातार्ईंना त्यांना माझ्या घरी घेऊन येण्याची विनंती केली. त्यानुसार त्या ब्रिगेडीयर महाजनांना माझ्या घरी घेऊन आल्या.

अबु निवासी आध्यात्मिक संत विमलाजीकार यांचा विशेष स्नेह होता. अलीकडे त्या बऱ्याचवेळा दोन दोन महिने क्षेत्राच्या ठिकाणी मौन धारणेसाठी, जप साधनेसाठी जात असत. त्यामुळे त्यांचा संपर्क कमी झाला. माझ्या वयोमानानुसार (वय वर्ष ९१ चालू) माझे घराबाहेर पडणे ही कठीण झाल्यामुळे त्यांच्याशी सतत संपर्क होऊ शकला नाही. त्या खूप आजारी होत्या आणि अचानक दि. १० मार्चच्या तरुण भारतमध्ये त्यांच्या निधनाची वार्ता समजली. त्यांच्या मार्गदर्शनाची समाजास जरुरी होती. पण विधात्याला हे मान्य नव्हते. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो. ही परमेश्वर चरणी प्रार्थना.

- सु.स. देशमुख
९८२२०४३९४९



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### दरोड्याच्या तयारीत असलेल्या इसमाकडून एक गावठी कट्टा व दोन कत्ती जप्त

**परंडा, दि. १५ मार्च**

पोलीस अधीक्षक धाराशिव संजय जाधव यांच्या आदेशाने अपर पोलीस अधीक्षक धाराशिव शफकत आमना व उपविभागीय पोलीस अधिकारी गौरीप्रसाद हिरेमठ यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस ठाणे परंडा प्रभारी दिलीपकुमार पारेकर यांच्या सुचनेप्रमाणे व त्यांना मिळालेली गोपनीय माहिती एका इसमाने त्याचे कब्जात अवैधरित्या शस्त्र बाळगलेले असून तो परंडा पोलीस ठाणे हददीत येणार असल्याबाबत माहिती मिळाली. त्यानुसार पोलीस ठाणे परंडा येथील सपोनि शंकर सुर्वे, पोलीस हवालदार नितिन गुंडाळे व पोलीस हवालदार विशाल खोसे व पोना मधुसुदन भोपेमहानुभव यांची एक टिम बनवुन गोपनीय बातमीच्या अनुशंगाने १४ मार्च रोजी ३.३० वाच्या सुमारास परंडा ते देवगाव जाणा-या रोडवर दिपक केरवा गरड यांच्या परंडा कात्राबाद रस्त्यालगत असलेल्या शेताजवळ सचिन नवनाथ इतापे, तुषार भारत शिंदे ( दोघे रा. लोणी, ता. परंडा, जि. धाराशिव, वैभव गोरख कोडलिंगे (रा. शेंद्री, ता. बार्शी) सुजित लक्ष्मण पवार व चैतन्य पांडुरंग शेळके (दोघे रा. भोत्रा, ता. परंडा) असे परांडा शहरात दरोडा टाकण्याचे उददेषाने एकत्र येवन दरोड्याचे तयारीनिशी विनापरवाना एक सिल्व्हर रंगाचे गावठी बनावटीचे पिस्टल व एक जिवंत राउंड, दोन धारदार कत्ती व एक विनानंबर हिरो होंडा कंपनीच्या फॅशन प्लस मॉडेलच्या मोटार सायकल असा एकुण ३८ हजार ५०० रूपयाचा मुददेमाल जप्त करण्यात आला.

## निधन वृत्त...

### रामचंद्र आधेली



**सोलापूर, दि. १५ मार्च-**

जुन्या काळातील प्रसिध्द राजकमल सोप फॅक्टरीचे मालक व जेकार्ड चादरीचे, व टॉवेलचे उत्पादक व कारखानदार रामचंद्र भूमय्या आधेली (वय ९१) यांचे गुरुवार दि. ११ मार्च रोजी दुपारी २च्या सुमारास निधन झाले आहे. त्यांच्यामागे २ मुले, २ सुना आणि ३ मुली नातु नातवंडे असा परिवार आहे.

### दत्तात्रय आंबट



**सोलापूर, दि. १५ मार्च-**

साखर पेठ येथील दत्तात्रय कृष्णप्पा आंबट यांचे १५ मार्च रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर सांयकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले. पदमशाली ज्ञाती संस्थेचे संचालक सिध्देश्वर आंबट यांचे वडील होत.

# आ. खरे यांच्यामुळे अवैध वाळू प्रकरणी कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**मोहोळ, दि. १५ मार्च-**

आमदार राजू खरे यांनी अर्जूनसोंड गावच्या सभेत ग्रामस्थांना भाषण करत दिलेला शब्द खरा करून दाखवला आणि मुरूम उपसा प्रकरणात माजी सरपंच शुक्राचार्य हावळे यांना ५१ लाखाचा दंड झाला अशी चर्चा या परिसरात सुरू झाली.

मागील तीन आठवडयापूर्वी अर्जूनसोंड गावात आमदार राजू खरे यांची सभा झाली होती. यावेळी ग्रामस्थांनी त्यांचे जंगी स्वागत करून काही व्यथा मांडल्या. तसेच काही समस्या समोर आणल्या होत्या. यावेळी यावेळी मी राजू खरे बोलतोय झारितील शुक्राचार्य कोण हे शोधून काढल्याशिवाय राहणार नाही अशी जणू भिष्म प्रतिज्ञा केली होती.

त्यानंतर अर्जुनसोंड (ता. मोहोळ) येथील रहिवासी महेश तुळशीराम आवळे यांनी



१३ जानेवारी रोजी तहसीलदार सचिन मुळीक यांच्याकडे लेखी तक्रार केली. त्यानुसार शुक्राचार्य हावळे यांनी त्यांच्या मालकीचा जेसीबी हायवा टिपर आणि ट्रॅक्टर याच्या साह्याने गावातीलच संभाजीनगर साठवण तलावातून बेकायदेशीरपणे १००० ब्रास मुरूमाचे उत्खनन केले. आणि स्वतःच्या फायद्यासाठी गावात अंतर्गत रस्ते करण्यासाठी वापरले.

मात्र त्यासाठी कुठल्याही प्रकारची रॉयल्टी भरलेली नाही याचीपुराव्यासह तक्रार केली. यावर तहसीलदारांनी सर्व प्रकारची चौकशी केली आणि १५ फ ेब्रुवारी रोजी शुक्राचार्य हावळे यांना पत्र देऊन ५१ लाख १ हजार रुपये सरकारी खजिन्यात दंड म्हणून भरावी असा आदेश दिला. त्यानंतर ही दंडाची रक्कम भरली गेली नसल्यामुळे शुक्राचार्य हावळे यांच्या जमीन गट नंबर ५१ / १ वर ५१ लाख १ हजार रुपयाचा बोजा नोंदविण्यात आला आहे.

यामुळे वाळू चोर, मुरूम चोर, यांच्यामध्ये प्रचंड खळबळ उडाली आहे. या प्रकरणात राजकारण आणले गेले असे काही जणांचे म्हणणे असले तरी ही आमदार राजू खरे यांनी दिला शब्द खरा केला अशी चर्चा या परिसरात सुरु झाली मुरूम चोरांना कायद्याचा जबरी दणका बसल्याने सर्वसामान्य नागरिकांमध्ये समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

# बार्शीच्या पाणी टंचाईबाबत आ. सोपल यांची जिल्हाधिकाऱ्यांकडे धाव

## तात्काळ चौकशी करुन सुधारणा करा; अन्यथा आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. १५ मार्च**

बार्शी शहरातील पाणी टंचाईला स्थानिक प्रशासनाचा बेजबाबदारपणा कारणीभूत असल्याचे सांगत बार्शीच्या पाणी टंचाईबाबत आमदार दिलीप सोपल यांनी जिल्हाधिकारी डॉ. कुमार आशीर्वाद यांच्याकडे धाव घेतली आह. तात्काळ चौकशी करुन सुधारणा करा अन्यथा आंदोलनात्मक पवित्रा घ्यावा लागेल, असा ही इशारा दिला आह.

सोपल यांनी पुढे म्हटले आह की, गेली ३-४ महिन्यांपासून सातत्याने बार्शी शहरवासियांना पाणी टंचाईला सामोरे जावे लागत आह. लाईन लिकेजच्या नावाखाली हा संपूर्ण सावळा गोंधळ सुरु आह. बार्शी कुर्डुवाडी संयुक्त पाणी पुरवठा अर्थात उजनी योजनेला सातत्याने लाईन लिकेज होते या नावाखाली शहर पाणी टंचाईने ग्रस्त आह. आ. सोपल पुढे म्हणतात की, मुख्याधिकारी तसेच जलदाय व्यवस्था अभियंता ही पाणी टंचाई गांभीर्याने घेत नाहीत. धरणात मुबलक पाणी साठा असताना बार्शीकरांना दहा दहा दिवस पाणी मिळत नाही. नेहमीच लाईन लिकेज हे गुळगुळीत उत्तर दिले जाते. बार्शी पाणीपुरवठा विभागाचे स्पेशल ऑडीट होणेची गरज यानिमित्ताने वाटते. आउट सोर्सिंगद्वारे उजनी चांदणी योजना देखभाल दुरुस्ती तसेच वॉल ओपनर या सेवावर लाखो रुपयांचा खर्च होऊनही बार्शीकरांना नियमित पाणी पुरवठा होत नाही. एक दिवसाआड ऐवजी चार दिवसाआड पाणीपुरवठा करुनही तो सुरळीत होत नाही. पुढे आ. सोपल म्हणतात की, कृत्रिम पाणी टंचाई काळात टँकरसारखी पर्यायी व्यवस्था प्रशासन करत नाही. लोकांत प्रचंड संताप असून या संपूर्ण टंचाईला स्थानिक प्रशासन त्यांचा बेजबाबदारपणा, ठेकेदार आणि प्रशासन यांची अभद्र युती याचा फटका सर्वसामान्य नागरिकांना बसत आह. सद्या सर्व धर्मीय सणासुधीचे दिवस आहेत. रमजानसारखा पवित्र महिना सुरु आह.

लिकेज होऊ नये झाले तर तात्काळ दुरुस्ती काम हाती घेणे, लाईनवर पेट्रोलिंग असणे, लिकेज दुरुस्तीसाठी युद्ध पातळीवर यंत्रणा राबविणे गरजेचे आह. मात्र या सर्व गोष्टीत असणारा गाभीर्याचा अभाव यामुळे बार्शीकर नागरिकांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आह. हे अत्यंत वाईट आणि लज्जास्पद आह. बार्शी शहरात वारंवार होणाऱ्या पाणी टंचाईची जबाबदारी निश्चित करुन दोषीवर कारवाई करावी आणि बार्शी शहाराचा पाणी पुरवठा सुरळीत करण्यात यावा अन्यथा मला आंदोलनात्मक भूमिका घ्यावी लागेल, असा इशारा आ. सोपल यांनी दिला आह.

# श्री मार्कंडेय सोलापूर सहकारी रुग्णालय येथे अत्याधुनिक इनबॉडी मशीन दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ मार्च .**

इनबॉडी मशीन हे अतिशय महत्त्वाचे मशीन आहे कारण ते तुमच्या शरीराच्या संरचनेचे तपशीलवार ब्रेकडाऊन प्रदान करते, जे तुम्हाला तुमचे एकूण आरोग्य आणि फिटनेस समजण्यास मदत करू शकते. ही माहिती तुम्हाला वैयक्तिक फिटनेस योजना तयार करण्यासाठी आणि आपला आहार तयार करण्यासाठी वापरली जाऊ शकते.

**इनबॉडी मशीन वापरण्याचे फायदे :-** तुमच्या शरीराची रचना कळते. इनबॉडी मशीन्स तुमच्या शरीरातील चरबीची टक्केवारी, स्नायूंचे प्रमाण, पाण्याची पातळी आणि बरेच काही याबद्दल माहिती देते. त्यामध्ये सुधारणा करणेसाठीची क्षेत्रे ओळखता येतात.

इनबॉडी मशीन्स तुम्हाला तुमच्या शरीराचे क्षेत्र ओळखण्यात मदत करू शकते ज्यावर अधिक लक्ष देऊन त्याचा फायदा होऊ शकतो, जसे की तुमची व्हिसेरल फॅट. (आतड्यावरील चरबी)

वैयक्तीक फिटनेस योजना तयार करता येते. इनबॉडी मशीन्स तुम्हाला फिटनेस योजना तयार करण्यात मदत करू शकतात त्यात सुधारणा करण्यासाठी विशिष्ट क्षेत्रांना लक्ष्य केले जाते. प्रगतीचा मागोवा घेता येतो. इनबॉडी मशीन्स तुम्हाला कालांतराने तुमच्या प्रगतीचा मागोवा घेण्यात मदत करू शकतात, त्यामुळे तुम्हाला प्रेरित राहण्यास मदत होऊ शकते. रोगाचा धोका कमी करण्यास मदत करते.

इनबॉडी मशीन्स तुम्हाला हृदयरोग, मधुमेह, उच्चरक्तदाब आणि कर्करोग यांसारख्या रोगांसाठीचे जोखीम घटक ओळखण्यास मदत करू शकते.

शरीराची रचना मोजण्यासाठी इनबॉडी मशीन बायो इम्पेडन्स टेक्नोलॉजी वापरतात. ही प्रकिया नॉन-आक्रमक, वेदनारहित आहे आणि दोन मिनिटांपेक्षा कमी वेळ लागतो. तरी नागरिकांनी सदरच्या मशीनचा उपयोग तंदुरुस्त राहण्यासाठी करून घ्यावा सदर मशीन हे रुग्णालयात ओपीडी न. १५. उपलब्ध असून डायटेशीयन अमृता बोल्ली यांचे मार्गदर्शन घ्यावे.



### श्री मार्कंडेय सोलापूर सहकारी रुग्णालयात

# डॉ. प्रदीप गजाकोष लॅप्रोस्कोपिक व एंडोस्कोपिक सर्जन म्हणून रुजू

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १५ मार्च**

येथील श्री मार्कंडेय रुग्णालयात डॉ. प्रदीप गजाकोष - एम. एस. लॅप्रोस्कोपिक व एंडोस्कोपिक सर्जन तज्ञ म्हणून रुजू झाले.



त्यांनी एम, एस. जनरल सर्जरी राजीव गांधी विद्यापीठ, बेंगलोर येथून केलेले आहे. त्यांनी FMS लॅप्रोस्कोपिक दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया करण्याचे विशेष प्रशिक्षण घेतले आहे. या व्यक्तिरिक्त त्यांना फिलोशीप G I एंडोस्कोपिक (चणक्ष - नाशिक) येथून केलेले आहे. ते SI, MSI and CRSI सारख्या प्रतिष्ठित संघटनाचे ते सदस्य आहेत. रुग्णालयात सोमवार ते शनिवार दररोज सकाळी १०:३० ते दुपारी १२:३० व संध्याकाळी ५:०० ते ६:३० या वेळेत उपलब्ध असतील. तरी गरजू रुग्णांनी त्यांच्या सेवेचा लाभ घ्यावा.

# भूलोकीचा देवचाफा

श्री ज्ञानेश्वरीत माऊलींनी वर्णिलेले, साच आणि मवाळ, मितले आणि रसाळ,शब्द जैसे कल्लोळ अमृताचे।।' हे अमृतमयी शब्द ज्या एका अत्यन्त संवेदनशील मनाच्या,

मृदू, सात्त्विक, शालीन, सोज्वळ आणि थोर व्यक्तिमत्त्वाशी तंतोतंत जुळतात अशा श्रद्धेय डॉ.स्वर्णलताताई भिशीकर या दि.३ मार्च २०२५ या दिवशी अनंतात विलीन झाल्या.या निमित्ताने डॉ.लताताई यांचे थोर जीवनकार्य उलगडून दाखवण्याचा एक प्रयत्न मी इथे करत आहे. लताताईंचा जन्म १ मे १९५१ ला नागपूर येथे भिशीकर कुटुंबात झाला. लताताईंचे पिताश्री कै.श्री.चं.प.तथा बापूसाहेब भिशीकर हे संघाचे प्रचारक आणि दै.तरुण भारतचे भूतपूर्व संपादक होते तर त्यांच्या आई कुसुमताई भिशीकर या राष्ट्रसेविका समितीच्या कार्यकर्त्या होत्या.लताताईंचे शालेय प्राथमिक शिक्षण पुण्यातील बालशिक्षण मंदिर येथे तर माध्यमिक शिक्षण तत्कालीन डेक्कन जिमखाना भावे स्कूलमध्ये झाले.बालपणापासूनच लताताईंना कसदार वाचनाचा छंद होता.त्यांची वृत्ती जन्म जात अनासक्त होती.

आपल्या मुलीने डॉक्टर व्हावे या वडिलांच्या इच्छेनुसार लताताईंनी पुण्यातील फर्ग्युसन महाविद्यालयात पूर्व पदवीचे शिक्षण शास्त्र शाखेतून केले.पण पुढे महाविद्यालयातील 'साहित्य सहकार' चळवळीशी आलेल्या संपर्कातून आपला पिंड साहित्याचा आहे असे लताताईंना प्रकर्षाने जाणवले,म्हणून त्यांनी स.प.महाविद्यालयात कला शाखेत प्रवेश घेऊन बी.ए.आणि १९७३ साली एम. ए. मानसशास्त्र प्रथम श्रेणीतून पूर्ण केले.

महाविद्यालयीन जीवनात लताताईंना नाट्यवाचन-लेखन,वक्तृत्व स्पर्धांमध्ये भाग घेणे, वृत्तबद्ध,आशयघन काव्यरचना करणे असे छंद होते.१७-१८व्या वर्षांपासूनच त्यांना तत्त्वज्ञान व ज्ञानेश्वरीची गोडी लागली होती. त्यांनी त्या वयातच लोकमान्य टिळकांच्या गीतारहस्याचे जिज्ञासापूर्वक वाचन केले होते. मराठी, हिंदी, इंग्रजी,संस्कृत या भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते,एवढेच नाही तर त्यांनी काही काळ फ्रेंच भाषेचाही अभ्यास केला होता.

घरातूनच संघटनेचे बाळकडू मिळालेल्या लताताई महाविद्यालयीन जीवनातच ज्ञान प्रबोधिनीचे संस्थापक-संचालक आदरणीय डॉ.वि.वि.तथा आप्पा पेंडसे यांच्या संपर्कात आल्या आणि त्यांच्या जीवनाला वेगळीच कलाटणी मिळाली.डॉ.आप्पा पेंडसे आणि डॉ. आण्णा ताम्हणकर यांच्या मार्गदर्शनानुसार, सन १९६७ ला झालेल्या कोयनेच्या भूकंपानंतरचे मदतकार्य त्यांनी केले.लताताई ज्ञान प्रबोधिनीच्या पुणे शाखेतील युवती संघटनेच्या दहा वर्षे सचिव होत्या.युवतींच्या वैचारिक बैठकी घेणं,क्रीडा दले चालवणं, प्रबोध वर्गात शिकवणं या दैनंदिन उपक्रमांबरोबरच वं.आप्पांना विविध संस्कार पोथ्यांची रचना करण्यास मदत करणं, स्फूर्तिदायी प्रबोधन गीतांची रचना करणं,पौरोहित्य करणं, पौरोहित्याच्या माध्यमातून व मानसशास्त्राच्या अभ्यासातूनही देश-विदेशातील लोकांचे समुपदेशन करणं,संस्कारांमागची अंधश्रद्धा विरहित धार्मिक आणि तात्त्विक पार्श्वभूमी लोकांना समजावून सांगणं,देश-विदेशांत दौरे करून असंख्य लहान-थोरांना प्रबोधिनी च्या परिवारात समाविष्ट करून घेणं असे अनेक उपक्रम ताईंनी केले.

या काळात ताईंनी शहरी आणि ग्रामीण भागांतून व्यक्तिमत्त्व विकसन शिबिरे घेतली. या शिबिरांमधून राष्ट्रीय आणि सामाजिक जाणीव जागृतीचे कार्य केले.दरम्यानच्या काळात राष्ट्रीय शिष्यवृत्ती मिळवून 'वाचन कौशल्यांचा विकास' या विषयात संशोधन करून लताताईंनी सन १९८१ला 'विद्या वाचस्पती'(पीएच.डी.) पदवी मिळवली. सन १९८३ ला वं.आप्पांच्या निर्वाणानंतर लताताईंनी ज्ञान प्रबोधिनीच्या पुणे शाखेमध्ये प्रज्ञा मानस संशोधिकेत ३-४ वर्षे प्रपाठक(ठशरवशी) म्हणून काम केले. सन १९८३ ते १९८८-ज्ञान प्रबोधिनीचे द्वितीय संचालक स्व.डॉ.व.सी.ताम्हणकर यांच्या सचिव म्हणून काम केले.सन १९८४ मध्ये पंजाब प्रांतातील अतिरेक्यांच्या प्रश्नांवर काम करण्यासाठी गेलेल्या सद्भाव यात्रेमध्ये पाकिस्तानच्या सीमेवरील फिरोझपूर ते अमृतसर पदयात्रेत तरण तारणपासून सुवर्णमंदिरापर्यंत लताताईंची प्रभावी प्रवचने झाली.

सन १९८६ मध्ये अमेरिकेतील इंडियाना युनिव्हर्सिटी ऑफ पेन्सिल्वेनिया या विद्यापीठात सन्माननीय अतिथी व्याख्याता म्हणून काम केले.१९८७ साली रूपकुंवर सती प्रकरणी राजस्थानातील जाणीव जागरणासाठी स्त्रियांवरील अत्याचारांविरुद्ध समर्थपणे व सक्षमपणे लताताई उभ्या राहिल्या. सन १९८९ला सोलापूरच्या सुप्रसिद्ध बालविकास मंदिरचे संस्थापक कै. सौ.अवंतिकाबाई आणि श्री.जनुभाऊ केळकर या दाम्पत्याने आपल्या संस्थेचे हस्तांतरण ज्ञान प्रबोधिनीकडे केले. त्यावेळी ज्ञान प्रबोधिनीचे द्वितीय संचालक कै. डॉ.व.सी.ताम्हणकर, आणि डॉ.स्वर्णलताताई यांनी प्रामुख्याने ही जबाबदारी स्वीकारली. मा.लताताईंनी डिसेंबर १९८९ ते २००१ या कालावधीत ज्ञान प्रबोधिनी सोलापूर केंद्राच्या कार्यवाह म्हणून काम पाहिले.

बालविकास मंदिरचे ज्ञान प्रबोधिनीकडे हस्तांतरण झाल्या नंतर सर्वप्रथम लताताई-आण्णांनी एका इयत्तेच्या दोन तुकड्या केल्या आणि सातवीपर्यंतची शाळा दहावीपर्यंत केली. सन १९९० ला सत्संग विभागाच्या रूपाने एक नवे आध्यात्मिक दालन सोलापूरकरांसाठी खुले केले. कोणताही सांप्रदायिक-धार्मिक अभिनिवेश न बाळगता सर्व धर्म - संप्रदायांना सामावून घेण्याचे महान कार्य प्रबोधिनीच्या सत्संग विभागात होते. ज्ञानेश्वरी, दासबोध, तुकारामगाथा, पातंजल योगसूत्रे अशा असंख्य धर्मग्रंथांवरील व्याख्याने, प्रवचने, निरुपणे आणि ध्यान - प्राणायाम, अंतरंग साधना,अभंग ज्ञानेश्वरी, सत्संग, गीता चेतना,अमृतानुभव, श्रीमद्भागवत अशी अनेक शिबिरे या विभागात घेतली गेली.



सन १९९० ते १९९२ या कालावधीत बालविकास शाळेला लागून असलेल्या ५०० चौ.मी.जागा व त्यावरील दोन पडव्यांच्या परवानगीसाठी लताताईंनी मुंबईला मंत्रालयात सुमारे ८५ हेलपाटे घालण्याचे अपरिमित परिश्रम घेऊन ती जागा मिळवली, जिथे आज ज्ञान प्रबोधिनी प्रशालेची इमारत उभी आहे. सोलापूरमध्ये मॉंटेसरी शिक्षणपद्धतीचे रोप आणून रुजवणाऱ्या सौ.अवंतिकाबाई केळकर यांचं सोलापुरात शिशु - शिक्षिकांचं एक शिक्षणकेंद्र असावं हे स्वप्न होतं. लताताईंनी यासाठी पुढाकार घेऊन,त्यासाठी प्रयत्न करून १ डिसेंबर १९९१ला शिशु अध्यापिका विद्यालय सुरू केले.या विद्यालयातील विद्यार्थिनी शाळा-शाळांमध्ये पोहोचल्या मुळे बालशिक्षणाची गुणवत्ता व शाळांमधील साहचर्य वाढले.

सन १९९५ ला सोलापूर शहर साक्षरता अभियानाचे निमंत्रकपद लताताईंकडे आले. त्या नात्याने त्यांनी विविध मुख्याध्यापक, शिक्षक,कार्यकर्ते,नागरिक व सामाजिक संस्थांचे संघटन केले. सोलापूर शहरातील निरक्षरांचे सर्वेक्षण करवून २७,५०० निरक्षरांपर्यंत पोचण्यासाठी १५ पूर्णवेळ कार्यकर्ते आणि १० झोन्स प्रमुख या कार्यकर्त्यांच्या साहाय्याने विविध वाड्या-वस्त्या, झोपडपट्ट्यांमधून २,७५० साक्षरतावर्ग आणि प्रौढ शिक्षण वर्ग सुरू केले.सोलापूर जिल्ह्याला त्या वर्षीचा साक्षरतेतला राष्ट्रीय पुरस्कार मिळाला.पुढे काही वर्षे साक्षरता प्रसाराचे हे कार्य झाले.१९९५ लाच बालकामगार पुनर्वसन शासकीय सुकाणू समितीच्या अध्यक्ष झाल्यानंतर सन २००१ पर्यंत काम पाहिले.त्यावेळी १८ बालकामगार सायंशाळांचा प्रारंभ झाला.सोलापुरातील विविध भागांमध्ये ६८ बालसंस्कार केंद्रे सुरू केली.

लताताईंच्या नियोजन आणि मार्गदर्शनांतर्गत सन १९९६ पासून पुढे सुमारे १० वर्षे चाललेल्या ऊस तोडकऱ्यांच्या मुलांसाठी सोलापुरातील श्रीसिद्धेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या परिसरात साखरशाळा सुरू झाल्या. मा.लताताई,मा.आण्णा यांनी सन १९९७ ला सोलापूर प्रबोधिनीत पौरोहित्य विभाग सुरू केला. विद्याव्रत,विवाह,वास्तुशांती, श्राद्ध इ.हिंदू धार्मिक संस्कारांचे, पूजांचे,शांतींचे मराठी,हिंदी, इंग्रजीमध्ये देश-विदेशांमध्ये अर्थवाही संचालन या विभागाद्वारे केले जाते. गेल्या ३५ वर्षांमध्ये सोलापूर आकाशवाणीवर पूजनीय श्रीरामकृष्ण परमहंस,स्वामी विवेकानंद, योगी अरविंद, स्वातंत्र्यवीर सावरकर, विमलाजी ठकार यांच्या विचारांचे सादरीकरण, अन्य काही थोर व्यक्तींच्या चरित्रमालिकांचे प्रसारण, प्रासंगिक विषयांवरील उद्बोधन केले. ज्ञान प्रबोधिनीच्या पुणे केंद्रातील(सन १९८४ ते १९९०) आणि सोलापूर केंद्रातील(सन १९९१ ते सन २०१६)वार्षिक वृत्तांचे लेखन, ज्यांत प्रबोधिनीचा ध्येयवाद आणि माणूस घडविणारे शिक्षण ललितरम्य शब्दसामर्थ्याने लताताई पोचवत असत. या वार्षिक वृत्तांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरांवरील असंख्य समाजमने ज्ञान प्रबोधिनीशी जोडली गेली आहेत. सन २००२ नंतर लताताई ज्ञान प्रबोधिनीच्या हराळी केंद्राच्या उपप्रमुख आणि २०१५-२०१६ या काळात केंद्रप्रमुख होत्या.

१९९३ च्या विनाशकारी भूकंपानंतर ज्ञान प्रबोधिनीने हराळी हे गाव निवडल्यानंतर डॉ. व. सी. ताम्हणकर तथा आण्णा आणि डॉ. स्वर्णलता भिशीकर यांनी असंख्य सहकाऱ्यांच्या साहाय्याने शिक्षण, शेती,आरोग्य,ग्रामविकसन, उद्योजकता,स्त्रीशक्ती प्रबोधन या कार्यदिशांना अनुसरून मोठेच कार्य उभे केले.त्यातील लताताईंचा सहभाग अत्यन्त महत्त्वाचा होता.१९९३ ते १९९५ या काळात हराळी गावाचे पुनर्वसन करताना भूकंपग्रस्त लोकांना उद्योग-व्यवसायासाठी त्यांनी आर्थिक मदतनिधी उभा केला.लताताईंनी सन २००० पासून कलशविराजित प्रबोधिनीची वास्तू, कृषी-तंत्र निकेतन,महिला निवास,भास्कर निवास,साधक निवास,श्रीरामकृष्ण परमहंस आरोग्यधाम,बहुविध उपयोगी सभागृह,साधक धाम या वास्तूंसाठी प्रकल्पलेखन,शासकीय पाठपुरावा, निधिसंकलन केले.लताताईंनी हराळी आणि परिसरातील लोकांचे आणि कार्यकर्त्यांचे मनुष्यघडणीचे शिक्षण,व्यसनमुक्तीचे प्रयत्न,अंधश्रद्धा निर्मूलनाचे कार्य केले. सन २००६ ला क्रांतिज्योति सावित्रीबाई आणि महात्मा जोतिबा फुले अभियान यशस्वी केले. सन २००६ ला लताताई आणि डॉ. जगन्नाथ वाणी यांच्या प्रयत्नांतून कॅनेडिअन इंटरनॅशनल डेव्हलपमेंट एजन्सी(सिडा)ने हराळी प्रकल्पाला साहाय्य केले.एप्रिल २००७ ते एप्रिल २००८ या वर्षात लताताईंनी माचणूर येथे मौनसाधना केली.सुमारे दहा वर्षे सलग पुण्याच्या रामकृष्ण मठात लताताईंची प्रवचने झाली.

लताताईंनी हराळी प्रबोधिनीतहीअनेक ध्यान,सत्संग,योग शिबिरांचे आयोजन केले. लताताईंनी किशोरी विकास प्रकल्प,प्रज्ञा विकास,पूरक शिक्षण उपक्रम,विज्ञान प्रयोगशाळा या उपक्रमांना मार्गदर्शन केले.मंदिराचे मशिदीत रूपांतर झालेल्या वास्तूत श्रीसिद्धेश्वर या हराळीच्या ग्रामदैवताची पुनर्स्थापना करून पुन्हा मंदिरात परिवर्तन करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले.देश-विदेशातील

स्नेही-सुहृद,माजी विद्यार्थी, आप्तेष्ट, कार्यकर्ते, विविध क्षेत्रांमधील तज्ज्ञ मंडळींचे संघटन करण्यात लताताईंनी आपली सर्व जीवनशक्ती खर्च करून प्रबोधिनीचे कार्य उभे केले. सन २०१७ ते २०२३ या कालावधीत मा.लताताई दैनंदिन कामात फार मोठ्या जबाबदाऱ्या घेत नसल्या, थोड्याशा निवृत्त झाल्या असल्या तरी पूर्व प्राथमिक व प्राथमिक शिक्षण कार्य दिशेच्या त्या प्रमुख होत्या. नवीन शैक्षणिक धोरण ठरवताना पूर्व प्राथमिक गटाच्या त्या सल्लागार होत्या.

हराळीचा पुढील कार्य संच तयार करण्यात ताईंचा सिंहाचा वाटा होता. हराळीतील नित्य बैठकींना,उपासनांना ताईंची उपस्थिती असे.याशिवाय अध्यात्म चिंतन,मनन,ध्यानसाधना,साधकांच्या भेटीगाठी आणि मार्गदर्शन,विविध ग्रंथांचे अनुवाद-संपादन,परिसरातील गावांशी,शाळांशी,व्यक्तींशी संपर्क,कार्यकर्त्यांना मार्गदर्शन,त्यांचे समुपदेशन,त्यांचे प्रश्न सोडवणे,कुणाला औषधे देणे इत्यादी असंख्य कामे अविरत सुरू होती.

त्या काळातही लताताईंनी काही ध्यान-सत्संग शिबिरे घेतली आहेत.दरम्यानच्या काळात आदरणीय आण्णांचे आजारपण, त्यांचे देहावसान यातही लताताई व्यग्र होत्या. सोलापुरातील चैतन्यभुवनची जागा कै. ताराबाई रानडे यांनी लताताईंच्या प्रेमापोटीच ज्ञान प्रबोधिनीला दिली आहे.त्या वास्तूच्या बांधकामासाठी तीन कोटी रुपयांचा निधी लताताईंनी उभा केला आहे.या वास्तूचे भूमिपूजन लताताईंनी केले आहे. शिशु अध्यापिका विद्यालयाच्या केंद्रशासनाच्या (छएझ) नवीन अभ्यासक्रम पुनर्रचनेत लताताईंचा उल्लेखनीय सहभाग होता.शालेय शिक्षणात व्यक्तीचा 'पंचकोशात्मक विकास' यावर लेखन करून अध्यापकांच्या कार्यशाळा लताताईंनी घेतल्या आहेत.

लताताईंची विपुल साहित्य संपदा प्रसिद्ध आहे.त्यात दहा स्वलिखित ग्रंथ व पुस्तके,दै. तरुण भारत व संचारमध्ये अनेक लेखमाला,नाटिका,एकांकिका,प्रवेश तसेच दहा संपादित आणि अकरा अनुवादित ग्रंथ यांचा समावेश आहे.लताताईंना शासकीय,मान्यवर सामाजिक संघटनाकडून १०० हून अधिक पुरस्कार मिळाले आहेत.

नोव्हेंबर २०२३ मध्ये लताताईंच्या बाबतीत आरोग्याची गंभीर समस्या निर्माण झाली.दुर्दैवाने आतड्याच्या कर्करोगाचे निदान झाले.त्यावर पुण्यातील रुबी हॉस्पिटलमध्ये शस्त्रक्रिया झाली.काही काळ पुण्यात विश्रांती घेतल्यानंतर योगोपचारासाठी आणि साधनेसाठी ताई बंगळुरूच्या प्रशांत कुटीरम् येथे काही महिने राहिल्या.प्रकृतीत सुधारणा होते आहे असे वाटल्यामुळे जानेवारी २०२५ मध्ये लताताई सोलापूर मुक्कामी आल्या.या सव्वा वर्षाच्या काळात कर्करोगाशी कणखरपणे लढत असतानाही लताताईंचे लेखन,ग्रंथानुवाद,ग्रंथ संपादन सुरूच होते.सोलापुरातआल्यावर काही काळात प्रकृतीच्या तक्रारींनी पुन्हा डोके वर काढल्यावर मात्र व्यावहारिक निरवानिरवी करून सोलापुरातील सत्पुरुषपू.पाटीलबाबा यांच्या पवित्र सान्निध्यात आणि त्यांच्या मार्गदर्शनानुसार लताताई अखंड अनुसंधानात होत्या.केवळ आणि केवळ लताताईंचे साधनानुसंधान भंग पावू नये,ताईंचा पुढचा प्रवास त्यांच्या इच्छेनुसार सुफलित व्हावा या सद्भावनेने आपल्यापैकी कुणाला ताईंना अंतिम टप्प्यात भेटता आले नाही. आणि ३ मार्च २०२५ला रात्री १०.२० मिनिटांनी सर्वांच्या लाडक्या लताताईंनी सोहम् असा अखेरचा शब्द उच्चारत या जगाचा निरोप घेतला.

**- डॉ.अपर्णा कल्याणी**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## क्राईम वृत्त...

### जमिनीचा बनावट दस्त तयार केल्याच्या प्रकरणातील एकाचा जामीन अर्ज फेटाळला

**पंढरपूर, दि. १५ मार्च -**

पंढरपूर तालुक्यातील देगाव येथील जमिनीचा बनावट दस्त तयार केल्याच्या प्रकरणातील संशयित आरोपी मीनाक्षी आनंद कारंडे (रा. इसबावी, हल्ली मुक्काम लक्ष्मीटाकळी) यांचा जामीन अर्ज येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश एस.बी.देसाई यांनी फेटाळून लावला. या प्रकरणाची हकीगत अशी की पंढरपूर



तालुक्यातील देगाव येथील जमीन गट नंबर १५५ या जमिनीचे मूळ मालक नागेश रामाचार्य उंब्रजकर यांच्या ऐवजी तोतया व्यक्ती उभा करून बनावट दस्त ( खरेदी खत ) बनावट सही शिक्क्यानिशी तयार करून तो खरा आहे असे भासवण्याचा प्रयत्न करून स्वतःच्या नावावर नोंदी करून घेण्याचा प्रयत्न संशयित आरोपी मीनाक्षी आनंद कारंडे यांनी केला असल्याचे तक्रार या जमिनीचे कुळ बाळासाहेब घाडगे यांचा मुलगा श्रीकांत बाळासाहेब घाडगे यांनी पंढरपूर शहर पोलीस ठाण्यात दाखल केली होती. याप्रकरणी पोलिसांनी आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करून त्यांना अटक केली आहे. यासंदर्भात संशयित आरोपीने येथील जिल्हा व सत्र न्यायालयात जामीन अर्ज दाखल केला होता. त्याची सुनावणी झाली. संबंधित कागदपत्रे आणि दोन्ही बाजूच्या युक्तिवादा नंतर संशयीत आरोपी मीनाक्षी कारंडे यांचा जामीन अर्ज अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश देसाई यांनी फेटाळला. यात मूळ फिर्यादीतर्फे ॲड. चंद्रशेखर पोरे यांनी तर आरोपीच्या वतीने ॲड. एस.आर. कुलकर्णी यांनी काम पाहिले.

### धूलिवंदनाच्या दिवशी २०८ किलो गोमांस पकडले; पंढरपूर शहर पोलिसांची कारवाई

**पंढरपूर, दि.१५ मार्च-**

ऐन धूलिवंदनाच्या दिवशीच पंढरपुरात विक्रीसाठी आणलेले २०८ किलो गोमांस पोलिसांनी पकडल्याने मोठी खळबळ उडाली आहे. ही कारवाई शुक्रवारी (ता.१४) दुपारी एक वाजण्याच्या सुमारास शहरातील जुनीपेठ परिसरात करण्यात आली. कारवाई दरम्यान पोलिसांनी दोन संशयित आरोपींकडून सुमारे २०८ किलो गोमांस ताब्यात घेतले आहे. धूलिवंदन असल्याने शहरातील अनेक भागात बकऱ्याचे मांस खरेदी करण्यासाठी अनेक दुकानांमध्ये मोठी गर्दी झाली होती.





अशातच पंढरपूर शहरातील जुनीपेठ परिसरात गोमांसाची विक्री सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी छापा टाकून दोन संशयित आरोपींसह २०८ किलो गोमांस पकडले. या प्रकरणी खंडू दत्तात्रय वायदंडे व सोहेल अस्लम कुरेशी (रा. पंढरपूर) यांच्या विरोधात पंढरपूर शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर अन्य दोघे संशयित आरोपी फरार असून पोलिस त्यांचा शोध घेत आहेत. आरोपींनी कुठून गोमांस आणले आणि ते किती लोकांना विकले याचीही माहिती पोलिस घेत आहेत.

### भैय्या चौकातील रेल्वे पुलावर दुचाकींची समोरासमोर धडक

**सोलापूर, दि. १६ मार्च -**

मरीआई चौक येथून भैया चौकाच्या दिशेने जात असताना दरम्यानच्या रेल्वे पुलावर दुचाकीची समोरासमोर धडक झाली यात तरुण जखमी झाला आहे. रोहन दिलीप कांबळे वय १८, रविवार पेठ गुजर वस्ती सोलापूर) असे जखमी तरुणाचे नाव आहे. शुक्रवार रात्री नऊ वाजताच्या सुमारास रोहन हा दुचाकी चालवीत मरिआई येथून भैया चौकाच्या



दिशेने जात होता. दरम्यान तेथील रेल्वे पुलावर आला, असता समोरून आलेल्या दुचाकी स्वाराने धडक दिली. या अपघातात चेहऱ्याला आणि उजव्या पायाला जखम झाल्याने त्यास भाऊ रोहित कांबळे यांनी रात्री साडेनऊच्या सुमारास शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हिल पोलीस चौकीत झाली आहे.

# रा.स्व. संघाचे कार्य १०० वर्षानंतरही चिरंतन





## ज्येष्ठ निरूपणकार विवेक घळसासी यांचे प्रतिपादन

### 'त्या' विचारातूनच 'बटेंगे तो कटेंगे'चे नवीन व्हर्जन

हिंदू धर्मात कोणत्याही प्रकारचे भेदभाव नसल्याचा ठराव संत संमेलनात मांडण्यात आला. त्यावेळी गोळवलकर गुरुजीनी हिंदू धर्मात अस्पृश्यता नसल्याचे सांगितले. त्या विचारातून बटेंगे तो कटेंगे हे नवीन व्हर्जन अस्तित्वात आले आहे.

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ मार्च,**

रास्व संघाचे चिरंतन व शाश्वत राष्ट्र कार्य, कार्यकर्ता निर्माण कार्य आजही शंभर वर्षानंतरही अव्याहातपणे निरंतर चालू असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ निरुपणकार विवेक घळसासी यांनी आज येथे केले.

हिंदू नववर्ष महोत्सव समिती, जुळे सोलापूर शाखेच्या वतीने राष्ट्रीय स्वयंसेवक संघ शताब्दी वर्ष निमित्त आयोजित केशव माधव या विषयावर रा.स्व. संघ संस्थापक डॉ. केशव बळीराम हेडगेवार व द्वितीय सरसंचालक माधव सदाशिव गोळवलकर यांचे चरित्र मांडणी करत थोर निरूपणकार विवेक घळसासी यांनी त्यांच्या कार्याची महती विशद केली.

कार्यक्रमाचा शुभारंभ मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने व प्रतिमापूजनाने झाला. यावेळी संस्थापक अध्यक्ष रंगनाथ बंग, जुळे सोलापूर अध्यक्ष प्रा. डॉ. नरेंद्र काटीकर, उपाध्यक्ष रवींद्र नाशिककर, कार्याध्यक्ष श्रीकांत कुलकर्णी, रा.स्व. संघ शहर संघ चालक राजेंद्र काटवे आदी उपस्थित होते.

प्रारंभी रा.स्व. संघ याची कार्यपद्धती, दैनंदिन शाखा तथा एकूणच त्याचे शिस्तबद्ध असणारे व्यवस्थापन या संदर्भातल्या उदाहरणांसह त्यांनी तपशीलवार मांडणी केली. संघ स्थापनेसाठी डॉक्टर हेडगेवार यांनी घेतलेले अपार कष्ट त्यांची जिद्द, संघाच्या जडणघडणीच्या माध्यमातून प्रकर्षाने जाणवली. त्या आधारे अपार चिकटपणाच्या माध्यमातून सुरुवातीला छोट्या संख्येच्या माध्यमातून सुरू झालेले संघाचे कार्य आज शंभर वर्षानंतर वटवृक्षाच्या रूपाने दृष्टीस पडत आहे. स्थापनेपासून छोट्या महत्त्वपूर्ण गोष्टी पासून मोठ्या संकल्पनेपर्यंत, प्रत्येक गोष्टीतून राष्ट्रधर्म-राष्ट्रसेवा ही संकल्पना दिसते. त्याविषयीही काही दाखले देत त्यांचे जीवन प्रसंग सांगितले.

डॉक्टर हेडगेवार यांच्यानंतर द्वितीय सरसंघचालक म्हणून माधव सदाशिव गोळवलकर यांनी सर्वात प्रदीर्घ अशा कालखंडासाठी संघाचे सरसंघचालक पदाची धुरा वाहिली. त्यांची पार्श्वभूमी ही शास्त्र या विषयातील असताना व आध्यात्मिक पार्श्वभूमी असलेले अभ्यासू व्यक्तिमत्व म्हणून गुरुजींनी, या राष्ट्रसेवा कार्यामध्ये ईदं न मम, म्हणत कार्याची आहुती दिली. त्यांच्या काळात आलेले अनेक बिकट प्रसंग, त्यातून मन चित्त स्थिर ठेवून, स्थितप्रज्ञतेच्या गुणवत्तापूर्ण विचार बुद्धीमुळे ते त्यातून मार्ग काढत गेले. भारतभर प्रवास करून, अत्यंत सखोल अभ्यास करत त्यांनी संघाचा प्रचार व प्रसार केला. संपूर्ण शंभर वर्षांमध्ये संघावरचा विश्वास, राष्ट्र कार्य, कार्यकर्त्यांची असणारी निरस-त्यागी वृत्ती, सहज व्यवहार भाव, उत्कृष्ट शिस्तबद्ध व्यवस्थापन, याची चौकट आजही दृष्टीस पडते व याची परिणीती म्हणजेच आज शंभर वर्षांमध्ये विविध क्षेत्रांमध्ये उच्च पदावर व नावलौकिक मिळवलेले अनेक संघ कार्यकर्ते याचे दाखले होय. प्रास्ताविक प्रा. डॉ. नरेंद्र काटीकर यांनी केले व सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन प्राध्यापिका शुभदा देशपांडे यांनी केले. याप्रसंगी हि.ने. किर्लोस्कर सभागृहात संपूर्ण क्षमतेने, मोठ्या प्रमाणावर रसिक श्रोते उपस्थित होते.

## राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत

# करमाळा तालुक्यासाठी ३ कोटी निधी मंजूर

### २०२१ पासूनची प्रलंबित आरोग्य उपकेंद्राची कामे मार्गी लागणार

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा दि.१५ मार्च -**

आरोग्य सेवा व अभियान संचालक आयुक्त राष्ट्रीय आरोग्य अभियान मुंबई यांच्या ४ मार्चच्या मंजूर टिपणीने २०२१ पासून निधी अभावी प्रलंबित असलेली ग्रामीण रुग्णालय व आरोग्य उपकेंद्रासाठी निधी मंजूर झाला आहे.

यामध्ये सोलापूर जिल्ह्यातील ८ ग्रामीण रुग्णालयांसाठी प्रत्येकी ५० लाख व २० आरोग्य उपकेंद्र बांधकामासाठी प्रत्येकी ६१ लाख १९ हजार याप्रमाणे निधी मंजूर झाला असून यामध्ये करमाळा तालुक्यातील १ ग्रामीण रुग्णालय तर ४ आरोग्य उपकेंद्र बांधकामाचा समावेश आहे.

१५व्या वित्त आयोगांतर्गत सन २०२४-२५ व २०२५-२६ चा प्रकल्प अंमलबजावणी आराखडा मंजूर झालेला आहे.

या आराखड्यानुसार ग्रामीण रुग्णालय करमाळा येथे इझक्रा बांधकाम करणेसाठी ५० लक्ष, प्रा.आ. उपकेंद्र करंजे बांधकाम करणेसाठी ६१.१९ लक्ष, प्रा. आ. उपकेंद्र निंभोरे बांधकाम करणेसाठी ६१.१९ लक्ष, प्रा. आ. उपकेंद्र फिसरे बांधकाम करणेसाठी ६१.१९ लक्ष, प्रा.आ. उपकेंद्र मांगी बांधकाम करण्यासाठी ६१.१९ लक्ष असा २ कोटी ९४ लक्ष ७६ हजार निधी मंजूर झाला आहे.

२०२१ पासूनच्या माजी आमदार संजयमामा शिंदे यांच्या सातत्याने केलेल्या पाठपुराव्याचे हे फलित आहे. यामुळे ग्रामीण भागातील आरोग्य व्यवस्था मजबूत होणार आहे.

> ही बांधकामे जलद गतीने करण्यासाठी त्वरीत कार्यवाही सुरु करण्यात यावी. या कामांचे प्रशासकिय मान्यता, सविस्तर अंदाजपत्रके, तांत्रिक मान्यता व निविदा प्रक्रिया नवीन मंजूर कार्यप्रणाली प्रमाणे करण्यात यावी. कृपया हे तातडीचे समजावे.
>
> **- देवेंद्र पवार, अधीक्षक अभियंता**
> **राष्ट्रीय आरोग्य अभियान, राज्य आरोग्य सोसायटी, मुंबई**

## विशेष पोलिस महानिरीक्षकांच्या तपासणीच्या पार्श्वभूमीवर

# पोलिस अधिक्षक कार्यालयात रंगरंगोटी व स्वच्छता

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १५ मार्च -**

कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलिस महानिरीक्षक सुनिल फुलारी २० मार्च पासून सोलापूर ग्रामीण जिल्हा पोलिस दलाच्या तपासणीसाठी सोलापूर दौऱ्यावर येणार आहेत. फुलारी यांच्या या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर सोलापूर पोलिस अधिक्षक कार्यालय तसेच विशेष पोलिस महानिरीक्षक भेट देणार असलेल्या पोलिस ठाण्यांची रंगरंगोटी व स्वच्छतेचे काम सध्या युध्दपातळीवर सुरु असल्याचे दिसून येते. पोलीस अधिक्षक कार्यालयातील अस्वच्छता, अस्ताव्यस्त पडलेली कागदपत्रे किंवा मुद्देमाल, फाईली, धुळ आणि बेशिस्त पार्किंग व्यवस्था यावर काम करण्यात येत आहे. पोलिस अधिक्षक कार्यालयातील फरशी बदलण्यात येत असून रंगरंगोटी करण्यात येत आहे. तसेच पोलिस मुख्यालयाच्या मैदानावर परेडचा कसून सराव करण्यात येत आहे.

**तपासणी होणाऱ्या पोलिस ठाण्यांचा परिसर चकाचक...**

पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्याकडून जिल्ह्यातील विविध पोलिस ठाण्यांची वार्षिक तपासणी करण्यात येत आहे. पोलिस अधिक्षक कुलकर्णी हे ज्या ज्या पोलिस ठाण्यांची तपासणी करणार आहेत, त्या पोलिस ठाण्यांचा परिसरातील स्वच्छता, इमारतीची रंगरंगोटी करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. गेल्या काही दिवसापासून तपासणी करण्यात येणाऱ्या पोलीस ठाण्याच्या आवारात नवीन झाडांची लागवड करण्याची लगबग सुरू आहे. लागवड केलेल्या सर्व झाडांना ठिबकद्वारे पाणी देण्याचे नियोजन केले जात आहे. पोलिस ठाण्यांमधील प्रत्येक रूममध्ये फायली व्यवस्थित लावणे, माहिती फलक लावण्यात आले आहेत. पोलिस स्टेशन चकाचक दिसावे यासाठी शोभेची झाडे असलेल्या कुंड्या ठेवण्यात आल्याने पोलिस स्टेशनचे रुपडे पालटले असल्याचे दिसून येत आहे.

# कौटुंबिक हिंसाचारामुळे महिला विकासापासून दूर

## डॉ. विजया महाजन यांचे प्रतिपादन

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १५ मार्च -**



काही कुटुंबात महिलांचे भावनिक शारीरिक लैंगिक शोषण होत असल्याने महिला या सर्वांगीण विकासापासून दूर आहे यासाठी कुपोषण, बालविवाह, कौटुंबिक हिंसाचार या समस्यांवर काम करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन वालचंद समाज कार्य विभागाच्या प्रमुख तथा कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी डॉ. विजया महाजन यांनी केले.

डॉक्टर हेडगेवार रक्तपेढीच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त सावित्रीबाई फुले यांच्या स्मृतिदिनाचे औचित्य साधून श्राविका प्रशालेच्या मुख्याध्यापिका राखी देशमाने, आदर्श शिक्षिका डॉ. मीना गायकवाड, सामाजिक कार्यकर्त्या ममता कुलकर्णी, वुमन्स पॉलिटेक्निकच्या प्राध्यापिका प्रतिभा पाटील यांचा शाल, बुके आणि सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी डॉ. विजया महाजन बोलत होत्या. यावेळी आय.एम.ए.च्या अध्यक्षा तथा रक्तपेढीच्या संचालिका डॉ. किरण सारडा, रक्तपेढीच्या मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. सुमेधा कंदलगांवकर, डॉ. मंजिरी धामणगांवकर व्यासपीठावर होत्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षा डॉ. किरण सारडा यावेळी म्हणाल्या, पोषणमूल्य असलेला आहार महिलांना मिळत नाही, परिणामी त्यांना अनेक आरोग्य विषयक समस्यांना सामोरे जावे लागते. महिलांच्या विकासासाठी आहार, विहार याबरोबरच शिक्षणही महत्त्वाचे आहेत. एक महिला शिकली तर पूर्ण कुटुंब शिकते परिणामी समाजाचा विकास झपाट्याने होतो, त्यामुळे महिला साक्षर व स्वावलंबी होणे गरजेचे आहे. कार्यक्रमाची सुरुवात रूपाली लोंढे यांच्या स्वागत गीताने झाली. त्यानंतर भारतमाता आणि सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. इनरव्हील क्लबच्या अध्यक्षा कल्पना दरगड, संगीता पारशेट्टी आणि रक्तपेढीतील सर्व महिला कर्मचाऱ्यांचाही सत्कार करण्यात आला. यावेळी सर्व सत्कारमूर्तींनी आपले मनोगत व्यक्त केले. राखी देशमाने, भारती कोळी, मीनाताई गायकवाड यांनी प्रत्येकी ५ ००० रुपयांची देणगी रक्तपेढीस दिली. कार्यक्रमास रक्तपेढीचे संचालक नितीन कवठेकर, व्यवस्थापक रंगनाथ जोशी आदी उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. सुमेधा कंदलगावकर यांनी केले, प्रमुख पाहुण्यांचा परिचय प्रतिक्षा कुलकर्णी यांनी तर सत्कारमूर्तींचा परिचय माधुरी शिंदे यांनी करुन दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जनसंपर्क अधिकारी संगीता कोरे यांनी केले. अनुजा शिंदे यांनी आभार मानले.

# तिघांना लुटणाऱ्या टोळीतील पाच जणांना अटक

## दोघांचा शोध सुरु

### सदर बझार पोलिसांची कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १५ मार्च -**



आईच्या आजारपणासाठी भावजीकडून घेतलेली १ लाख २० हजारांची रोकड घेऊन रिक्षातून जाणाऱ्या केबल ऑपरेटसह तिघांना कोयत्याचा धाक दाखवून जबर मारहाण करून रोकड लुटणाऱ्या टोळीतील पाचजणांना सदर बझार पोलिसांनी अटक केली असून दोघांचा शोध सुरु आहे.

मुन्ना मुर्तुज सय्यद (वय २७, रा. घर नंबर ६४, विनायक नगर, राजराजेश्वरी शाळेशेजारी, एमआयडीसी), सागर विजय शिंदे (वय २०, रा. भगवान नगर झोपडपट्टी, पोलीस मुख्यालय शेजारी), विशाल रमेश बंदपट्टे (वय २०, रा. घर नंबर बी-५, पोलीस मुख्यालय शेजारी, भगवान नगर झोपडपट्टी), संतोष महेश हुंडेकरी (वय ३०, रा. घर नं. ४५८, भगवान नगर झोपडपट्टी), जयेंद्र युवराज जाधव (वय २६, रा. न्यु पाच्छा पेठ, अशोक चौक, ईगल टेलर दुकानसमोर) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. याबाबत आनंद नरसप्पा कत्तुल (वय ५३, रा. नवनाथ नगर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. अटक केलेल्याया पाचजणांना न्यायालयाने दोन दिवस पोलिस कोठडी दिली आहे.

आनंद कत्तुल हे केबल ऑपरेटर असून त्यांच्या आईच्या आजारपणासाठी त्यांनी त्यांच्या भावजीकडून १ लाख २० हजार रुपये घेतले होते. ते पैसे घेऊन कत्तुल हे १३ मार्च रोजी पहाटे पावणे तीनच्या सुमारास कुमठा नाका येथील नाईस बेकरी समोरून एमएच १३ सीटी २६९५ क्रमांकाच्या रिक्षातून जात होते. त्यावेळी दुचाकीवरून रिक्षाचा पाठलाग करीत आलेल्या अज्ञात पाच ते सहा जणांनी नाईस बेकरीसमोर रिक्षा अडवली. रिक्षातील आनंद कत्तुल, रिक्षा चालक इस्माईल नबीलाल नदाफ व सहप्रवासी महेश पांडुरंग आवार यांना मारहाण केली. मारहाण करणाऱ्या अनोळखी व्यक्तींपैकी एकाने कत्तुल यांच्या गळ्यास कोयता लावून हालला तर खलास करीन अशी धमकी देऊन इतरांनी कत्तुल यांच्या खिशातील रोख १ लाख २० हजार रुपये जबरदस्तीने काढून घेऊन पोबारा केला. गुन्हा दाखल करण्यात आल्यानंतर पोलिसांनी या गुन्ह्यातील आरोपींचा शोध घेत असताना पोलिस शिपाई सागर गुंड व हणमंत पुजारी यांना या गुन्ह्यातील संशयित आरोपी हे कुमठा नाका येथील शासकीय मैदान येथे असल्याची माहिती मिळाली. त्यावरुन पोलिसांनी शासकिय मैदानास सर्व बाजूंनी घेरून संशयितांना ताब्यात घेतले. त्यांनी हा गुन्हा केल्याचे सांगितले. गुन्ह्यात गेलेल्या रकमेपैकी ६५ हजार रुपये व कोयता पोलिसांनी जप्त केला आहे.

ही कामगिरी पोलिस आयुक्त एम. राजकुमार, उपायुक्त विजय कबाडे, सहायक पोलिस आयुक्त यशवंत गवारे, पोलिस निरीक्षक अजित लकडे, भालचंद्र ढवळे यांचे मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक नितीन शिंदे, सहायक फौजदार औदुंबर आटोळे, हवालदार शहाजहान मुलाणी, राजेश चव्हाण, संतोष पापडे, सागर सरतापे, एयाज बागलकोटे, पोलिस शिपाई सागर गुंड, सोमनाथ सुरवसे, हणमंत पुजारी, अनमोल लड्डे, उमेश चव्हाण, राम भिंगारे, परशुराम म्हेत्रे यांनी केली.

**रिक्षाचा पाठलाग करून आरोपींनी केला गुन्हा**

या गुन्ह्यातील आरोपींना संशयितांना अटक केल्यानंतर त्यांच्याकडे करण्यात आलेल्या तपासामध्ये आरोपी मुन्ना सय्यद यांस कत्तुल यांच्याकडे रोकड असल्याचे माहिती होते. सय्यद यानेच आपल्या साथीदारांना याबाबत माहिती देऊन गुन्हा करण्याचे प्लॅनिंग केले. ७० फुट रोड येथून कत्तुल हे रिक्षात बसून घराकडे जात असताना त्यांच्या रिक्षाचा पाठलाग आरोपींनी दुचाकीवरून करून कुमठा नाका येथील नाईस बेकरीसमोर रिक्षा आडवली व रक्कम लुटली. पोलिसांनी अटक केलेल्या आरोपींकडून ६५ हजार रुपये जप्त केले असून उर्वरीत रक्कम ही फरार असलेल्या दोघां आरोपीकडे असण्याची शक्यता पोलिसांकडून वर्तविण्यात आली आहे.




हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## औरंगजेबचे स्टेटस ठेवणाऱ्यांना पोलिसांचा दणका

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ मार्च-**

सध्या राज्यभरात औरंगजेबाच्या मुद्द्यावरुन प्रकरण तापले आहे. दरम्यान सोलापुरातून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. अक्कलकोटमध्ये औरंगजेबचे स्टेटस ठेवणाऱ्या १४ जणांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अक्कलकोट तालुक्यातील मैंदर्गी गावामध्ये औरंगजेबचे स्टेटस ठेवणाऱ्या १४ व्यक्तींच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी विधानसभेत औरंगजेबचे स्टेटस ठेवणाऱ्यांच्या विरोधात कारवाईच्या मागणीनंतर सोलापूर ग्रामीण पोलीस ॲक्शन मोडवर आले आहे. मैंदर्गी गावातील १४ जणांच्या विरोधात तर तालुक्यातील एका व्यक्तीच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अक्कलकोट विधानसभा मतदारसंघांमध्ये औरंगजेबचे स्टेटस ठेवण्याचे प्रमाण वाढत असल्याची खंत आमदार कल्याणशेट्टी यांनी अलीकडेच विधानसभेत व्यक्त केली होती. सामाजिक सलोखा बिघडवला जात असल्याचा ठपका ठेवत पोलिसांनी ही कारवाई केली. यापुढे अशा पद्धतीचे कृत्य करणाऱ्यांच्या विरोधात आणखी कडक कारवाई करणार असल्याचा इशारा सोलापूर ग्रामीण पोलिसांकडून देण्यात आला आहे.



# दशक्रियेसह अन्य विधी आता इतरत्र स्मशानभूमीमध्ये

**● गणपती घाटावरील फाटक प्रशासनाकडून बंद ● धर्मवीर संभाजी तलाव, किल्ला परिसर सतर्कता भाग घोषित ● जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. १५ मार्च-**

महानगरपालिका हद्दीतील धर्मवीर संभाजी तलाव परिसर व किल्ला परिसर येथील कावळे, घार व बगळा या पक्षांमध्ये अनैसर्गिक मरतूक होती, म्हणून दि. १० मार्च रोजी त्याचे नमुने तपासणीसाठी भोपाळ येथील लॅबला पाठविण्यात आलेले होते. सदरचे नमुने बर्ड फ्लू लक्षणे असल्याचे आढळून आल्याने हा परिसर सतर्कता भाग म्हणून घोषित करण्यात आला आहे. याबाबतचे आदेश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी निर्गमित केले आहेत. गणपती घाट प्रतिबंधित क्षेत्र केल्यामुळे येथे होणारे दशक्रिया विधी, काकस्पर्श हे आता इतरत्र स्मशानभूमीमध्ये करता येतील, असे गुरुजी योगेश खेडकर यांनी स्पष्ट केले आहे.

यारोगाचा प्रसार जिल्ह्यातील इतर ठिकाणी होण्याची शक्यता नाकारता येत नसल्यामुळे प्रतिबंधात्मक उपाय योजना म्हणून प्राण्यांमधील संक्रमक व संसर्गिक रोग प्रतिबंध व नियंत्रण अधिनियम २००९ मधील तरतुदीनुसार सोलापूर महानगरपालिका हद्दीतील छत्रपती संभाजी तलाव परिसर व किल्ला परिसर येथे सर्वेक्षणाचे काम पूर्ण होईपर्यंत प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे अत्यावश्यक असल्याने जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांनी सदर परिसरातील येथील दहा किलोमीटर त्रिज्येतील क्षेत्र सतर्क भाग घोषित करण्याचे आदेश दिले आहेत. बाधित क्षेत्राच्या ठिकाणी नागरिकांच्या हालचालीस व इतर पक्षी व प्राण्यांच्या वाहतुकीस प्रतिबंध करण्यात येत आहे. सदर शहरातील दोन्ही बाधित परिसरांची २ टक्के सोडियम हायपोक्लोराइड किंवा पोटॅशियम परमॅग्नेट निर्जंतुकीकरण करावे तसेच चुन्याची फक्की मारावी. प्रभावित क्षेत्राच्या दहा किलोमीटर त्रिज्येतील कुक्कुट पक्षांचे सर्वेक्षण करून नमुने प्रयोगशाळा तपासणीसाठी पाठवावेत, असेही आदेशित केले आहे.या आदेशाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त सोलापूर यांची आवश्यकतेनुसार महानगरपालिका आरोग्य विभाग, पोलीस विभाग, महसूल विभाग, ग्राम विकास विभाग, वन विभाग, जलसंपदा विभाग, बांधकाम विभाग व परिवहन विभाग इत्यादी विभागावी आवश्यक मनुष्यबळ यंत्र व साधनसामग्री पुरवठा करावा.

पशुसंवर्धन विभाग, ग्रामपंचायत, आरोग्य विभाग, पोलीस विभाग, महसूल विभाग, वन विभाग, जलसंपदा व परिवहन विभाग इत्यादी विभागांनी प्राण्यांमधील संक्रमक व संसर्गिक रोग प्रतिबंध व नियंत्रण अधिनियम २००९, बर्ड ब्ल्यू रोग प्रतिबंध नियोजन व रोगप्रसार रोखणे कृती आराखडा (सुधारित) २०२१ आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ व सात रोग नियंत्रण अधिनियम १८९७ मधील तरतुदीनुसार सोलापूर महानगरपालिका क्षेत्रातील बाधित क्षेत्र येथून ० ते १ किलोमीटर त्रिजेच्या बाधित क्षेत्रात व १ ते १० किलोमीटर त्रिज्येच्या सर्वेक्षण क्षेत्रात कार्यवाहीचे आदेशही जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण कुमार आशिर्वाद यांनी दिले आहेत.



**सोलापूर : बर्ड फ्लूमुळे शनिवारी सिद्धेश्वर तलाव परिसरातील वॉकिंग ट्रॅक बंद करण्यात आला आहे. परंतु तलावातील नौका विहार सुरू आहे. (छायाचित्र : केवल तिवारी)**

### गुरुजी योगेश खेडकर यांची माहिती

गणपती घाट परिसरामध्ये काही कावळे मृत अवस्थेत आढळून आल्यानंतर प्रशासनाने हा परिसर प्रतिबंधित म्हणून जाहीर केला आहे. गणपती घाटावरील फाटक महानगरपालिकेने बंद केले असून तिथे फलक लावला आहे. दशक्रिया विधी या ठिकाणी कोणाला येता येणार नाही. दशक्रिया आणि अन्य विधी यापुढे २१ दिवस स्मशानभूमी मध्ये करता येतील, अशी माहिती गुरुजी योगेश खेडकर यांनी दिली. या परिसरात नियमित सकाळ संध्याकाळ फिरण्यासाठी येणाऱ्यांना तसेच गणपती घाट आणि नजीकच्या मंदिरात येणाऱ्यांना यामुळे प्रतिबंध झाला आहे.

याचबरोबर गणपती घाट परिसरात असलेल्या दशक्रिया विधी येथेही कोणाला येता येणार नाही. गणपती घाटावरील फाटक महानगरपालिकेने बंद केले असून तिथे फलक लावला आहे. एखाद्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर नातेवाईक त्यांचा दशक्रिया अकरावा आणि बारावा हे विधी सोलापुरात गणपती घाटा मागील बाजूस असलेल्या परिसरात करतात. आरोग्य विभागाने खबरदारी म्हणून ही उपाययोजना केली असल्याने दशक्रिया आणि अन्यविधी होत राहतील फक्त याचे ठिकाण २१ दिवसांसाठी स्मशानभूमी येथेच असेल असे गुरुजी योगेश खेडकर यांनी सांगितले.

आज प्रतिबंध क्षेत्र जाहीर होऊन पहिला दिवस मात्र आज कोणताही विधी या ठिकाणी पूर्वनियोजित नव्हता. यामुळे उद्यापासूनचे सर्व विधी स्मशानभूमीत होणार आहेत. क्षेत्र प्रतिबंधित करण्यात आल्याने या ठिकाणीही लोकांना मज्जाव करण्यात आला आहे. दशक्रिया आणि अन्य विधी यापुढे २१ दिवस स्मशानभूमी मध्ये करता येतील, असे गुरुजी योगेश खेडकर यांनी स्पष्ट केले आहे.

## शहरात शनिवारीही १२ कावळ्यांचा मृत्यू

**▸▸१०० घरगुती पक्षांचे घेतले नमुने**
**▸▸बर्ड फ्लू कंट्रोलसाठी '१४ टीम' कार्यरत**

**सोलापूर :** शनिवार, दि. १५ मार्च रोजीही १० ते १२ कावळ्यांचा यामुळेच मृत्यु झाल्याने जिल्हा प्रशासन अलर्ट झाले असून, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी संबंधित अधिकाऱ्यांना घरगुती पक्षी तपासणीचे आदेश दिले आहेत. यामुळे आज दिवसभरात १४ टीमनी शहरातील विविध भागातून १०० घरगुती कोंबड्यांचे, कबुतरांचे नमुने तपासणीसाठी आणले आहेत. हे सॅम्पलही पुणे आणि भोपाळ येथील लॅबला सोमवारी पाठविण्यात येणार असल्याची माहिती पशु चिकित्सालयाचे सहाय्यक आयुक्त डॉ. भास्कर पराडे यांनी दिली. दरम्यान, याचा अहवाल आल्यावर पुढील कडक उपाययोजना करण्यात येणार आहेत.

किल्ला परिसर, छत्रपती संभाजी महाराज तलाव परिसरातील गोल १ किलोमीटर परिघातील सर्व्हे करून काही पक्षाचे नमुने शुक्रवारी घेवून पुणे लॅबकडे पाठविले आहेत. यानंतर शहरातील घरकुल, सैफूल, सात रस्ता, विमानतळ, बाळेगाव आदी विविध भागात संबंधित कर्मचाऱ्यांना पाठवून तब्बल १०० घरगुती पक्षाचे नमुने शनिवारी घेतले आहेत. हे नमुने सोमवारी पुणे आणि भोपाळ लॅबला पाठविण्यात येणार आहेत. जर घरगुती पक्षात बर्ड फ्लू पॉझिटिव्ह आढळला तर ० ते १ किलोमीटर परिसर प्रतिबंधित करण्यात येणार असल्याचे आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाने स्पष्ट केले आहे.

**▸▸संक्षिप्त वृत्त...**

### दुचाकींच्या धडकेत दोघे जखमी

**सोलापूर, दि. १५ मार्च -**

उत्तर सोलापूर तालुक्यातील वांगी गाव ते वडाळा दरम्यान दुचाकींचा समोरासमोर अपघात होऊन दोघे जखमी झाले. हा अपघात शुक्रवारी रात्री ७:४५ च्या सुमारास घडला.भीमराव तुकाराम माळी ( वय ५० ) व विजय रामचंद्र साठे (वय ५५, रा. वडाळा ता. उ. सोलापूर) अशी जखमी झालेल्या दोघांची नावे आहेत. शुक्रवारी रात्री ७.४५ च्या सुमारास भीमराव आणि विजय असे दोघे वांगी रोड येथून वडाळा गावाकडे दुचाकीवरून जात होते. दरम्यान वडाळा गावाच्या शिवेजवळ आले असता, समोरून आलेल्या दुचाकी स्वाराने त्यांच्या दुचाकीला धडक दिली. या अपघातात भीमराव आणि विजय या दोघांच्या पायांना जखम झाली. वडाळा येथील सरकारी रुग्णालयात प्राथमिक उपचार करण्यात आला. त्यानंतर पुतण्या दिलीप माळी यांनी रात्री नऊ ४० च्या सुमारास दोघांना उपचारास शासकीय रुग्णालयात दाखल केल्याची नोंद सिव्हिल पोलीस चौकीत झाली आहे.

### शिंगोली पुलावर चारचाकी वाहनाच्या धडकेत तरुण जखमी

**सोलापूर, दि. १५ मार्च -**

मंगळवेढा येथून सोलापूरच्या दिशेने येत असताना शिंगोली येथील पुलावर पाठीमागून आलेल्या चार चाकी वाहनाने दुचाकीला धडक दिली. यात औंढी गावातील तरुण जखमी झाला. हा अपघात शुक्रवारी सकाळी १०.३० च्या सुमारास घडला. सचिन रामचंद्र गाडगे ( वय ३०, रा. औंढी या. मोहोळ) असे जखमी झालेल्या तरुणाचे नाव आहे. सचिन हा शुक्रवारी सकाळी १०.३० च्या सुमारास दुचाकी चालवीत मंगळवेढा येथून सोलापूरच्या दिशेने येत होता. दरम्यान शिंगोली गावाच्या जवळील पुलावर आला असता पाठीमागून येत असलेल्या चार चाकी वाहनाच्या चालकाने दुचाकीला धडक दिली. यात खाली पडल्याने डोक्याला आणि छातीला जखम झाली तसेच हात आणि पायाला खरचटल्याने सचिन यास सोलापूर येथील खाजगी रुग्णालयात उपचार करून शासकीय रुग्णालयात चुलत्याने दाखल केले. या घटनेची नोंद सिव्हिल पोलीस चौकी झाली आहे.

### दारु पाज म्हणून मारहाण

**सोलापूर, दि. १५ मार्च -**

मार्केट यार्ड समोरील परिसरात दारू पाज म्हणून तरुणाला मारहाण झाली. हा प्रकार शुक्रवारी सायंकाळी ६:३० च्या सुमारास घडला. लल्लाजी लक्ष्मण ढंगेकर ( वय २२, रा. टिळक चौक सोलापूर) असे मारहाण झालेल्या तरुणाचे नाव आहे. लल्लाजी हा मार्केट यार्ड समोरील एका चप्पल दुकानासमोर थांबला होता. त्यावेळी तेथे आलेल्या रहेमान याने दारू पाज असे म्हणत लल्लाजीला लाकडाने बेदम मारहाण केली. त्यास शासकीय रुग्णालयात उपचारात दाखल केले असून या घटनेची नोंद सिव्हिल पोलीस चौकीत झाली आहे.

## गुंजेगाव दुहेरी खून; दोघांना अटक

**● स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १५ मार्च -**

मंगळवेढा तालुक्यातील गुंजेगाव येथे शेतीच्या वादावरुन झालेल्या दुहेरी खूनाच्या गुन्ह्यातील फरार दोघांना सोलापूर ग्रामीण पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेने अटक केली.

निशांत तुकमाराम ढोबळे (वय २७, रा. गुंजेगाव) आणि सतीश किशन कारंडे (वय ३५, रा. गुंजेगाव) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. चंद्रकांत पाटील (वय ४०) व रिना आप्पा ढोबळे (वय ३५) अशी खून झालेल्यांची नावे आहेत.

११ मार्च रोजी जमिनीच्या वादावरुन चंद्रकांत पाटील (वय ४०) व रिना आप्पा ढोबळे (वय ३५) या दोघांचा जागेवर खून करण्यात आला. या प्रकरणी रावसाहेब तात्यासाहेब पाटील (वय ४०, रा. राजापूर, ता, सांगोला) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन लक्ष्मण विठोबा ढोबळे (वय ३०), ज्ञानेश्वर बाळकृष्ण खुळपे (वय ४०), सतीश किसन कारंडे (वय ३०), प्रदीप किसन कारंडे (वय ३३), गणेश लक्ष्मण ढोबळे (वय ३२), कैलास किसन कारंडे (वय ३६), निशांत तुकाराम ढोबळे (वय ३४, सर्व रा, गुंजेगाव) यांच्याविरुध्द मंगळवेढा पोलिस ठाण्यात खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ११ मार्च रोजी सकाळी ९च्या सुमारास रिनाचे दीर लक्ष्मण ढोबळे व त्याच्या नातेवाईकांनी शेतीच्या वहिवाटीच्या कारणावरून लोखंडी पाईप, लोखंडी हातोडा, काठ्या, कोयता अशा हत्यारांनी मारून त्यांचा खून केला. या घटनेनंतर पोलिस अधिक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधिक्षक प्रितमकुमार यावलकर, अपविभागीय पोलिस अधिकारी विक्रांत गायकवाड, पोलीस निरीक्षक दत्तात्रय बोरीगिड्डे यांनी घटनास्थळी भेट देवून तपासाच्या सूचना दिल्या होत्या.या गुन्ह्यातील फरार आरोपींच्या मागावर स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस असताना पोलिसांना मिळालेल्या माहितीवरून पोलिसांनी टेंभुर्णी येथून आणि गावातूनच निशांत ढोबळे व सतीश कारंडे या दोघांना ताब्यात घेऊन मंगळवेढा पोलिसांच्या ताब्यात दिले.

ही कारवाई पोलिस निरीक्षक सुरेश निंबाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक विजय शिंदे, पोलिस उपनिरीक्षक श्रीकांत गायकवाड, हवालदार रवि माने, पोलिस नाईक धनराज गायकवाड, सुरज रामगुडे, विनायक घोरपडे, मनोज राठोड, सलीम बागवान, सतीश बुरकुल यांनी केली.

## कौटुंबिक भांडणातून पत्नीला बेल्टने मारहाण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ मार्च -**

घरगुती कारणातून झालेल्या वादात पतीने पत्नीला कंबरेच्या बेल्ट मारहाण केली. यात चेहऱ्याला जखम झाली असून सर्वांगास मुक्कामार लागल्याने शासकीय रुग्णालयात उपचारात दाखल करण्यात आले.

तेजश्री अमोल कांबळे (वय २६, रा. सिद्धार्थ सोसायटी) असे मारहाण झालेल्या विवाहितेचे नाव आहे. शुक्रवारी रात्री आठ वाजता तेजश्री आणि त्यांचे पती अमोल यांच्या कौटुंबीकरणातून वाद झाला. या वादातून चिडलेल्या अमोल याने पत्नी तेजश्री यांना कमरेच्या बेल्टने तसेच लाथा बुक्क्यांनी बेदम मारहाण केली. बेल्टने मारल्याने चेहऱ्यात जखम झाली आहे तर लाथाबुक्क्यांनी मारहण झाल्याने सर्वांगास मुका मार लागल्याने स्वतः तेजश्री या उपचाराकरिता शासकीय रुग्णालय दाखल झाल्या या घटनेची नोंद सिव्हिल पोलीस चौकीत झाली आहे.



## मड्डी वस्ती येथील तरूणाच्या खूनप्रकरणी दोघांना पोलिस कोठडी



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १५ मार्च -**

दारू पित असल्याचे तसेच जुगार मटका खेळण्याबरोबरच बाईचे लफडे पत्नीला सांगितल्याच्या करणावरून शहरातील मड्डी वस्ती परिसर येथे तरूणाचा खून करणाऱ्या दोघांना मंगळवार पर्यंत पोलिस कोठडभत ठेवण्याचा आदेश न्यायालयाने दिला

अभिषेक अंबादास बंदपट्टे (रा. जुना घरकुल, सोलापूर), अविनाश अंबादास बंदपट्टे (रा. महालक्ष्मी झोपडपट्टी, सोलापूर) अशी पोलिस कोठडी मिळालेल्यांची नावे आहेत. तर नागेश संतोष विटकर (वय २०, रा. महालक्ष्मी झोपडपट्अी, वीरतपस्वी शाळेसमोर, भवानी पेठ, सोलापूर) असे खून झालेल्या तरूणाचे नाव आहे. याबाबत लिंबुबाई संतोष विटकर (वय ३५) यांच्या फिर्यादीवरुन जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अभिषेक बंदपट्टे यांची पत्नी लक्ष्मी हिस नागेश विटकर याने अभिषेक याला दारूचे व्यसन आहे, तो जुगार मटका खेळतो, बाईचे लफडे करतो असे सांगितले होते. त्याचा राग मनात धरून १२ मार्च रोजी रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास महालक्ष्मी झोपडपट्टी येथे अभिषेक बंदपट्टे याने मयत नागेश याला हातोडीच्या व लाकडी दांडक्याने तोंडावर जबर मारहाण करून जखमी केले'' तसेच उजव्या पायावर छातीवर पाठीवर मारहाण केले. तसेच अविनाश बंदपट्टे यांनी देखील हाताने लाथाबुक्याने मारहाण करून गंभीर जखमी करून नागेश यास जीवे ठार मारले आहे म्हणून जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी लागलीच अभिषेक बंदपट्टे व अविनाश बंदपट्टे या दोघांना अटक करून न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने दोघांना मंगळवारपर्यंत पोलिस कोठडीत ठेवण्याचा आदेश दिला. पुढील तपास जोडभावी पेठ पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक चव्हाण हे करीत आहेत.

### दुचाकी घसरल्याने सय्यद वरवडे येथील तरुण जखमी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १५ मार्च -**

राहत्या घरासमोर दुचाकी घसरल्याने तरुण जखमी झाला. हा प्रकार शुक्रवारी दुपारी मोहोळ तालुक्यातील सय्यद वरवडे या गावात घडला. प्रदीप सिद्धार्थ कांबळे (वय २५ रा. सय्यद वरवडे ता मोहोळ) असे जखमी झालेल्या तरुणाचे नाव आहे.

सय्यद वरवडे शिवारात प्रदीप कांबळे यांचे घर आहे. तेथून दुचाकी घेऊन जात असताना अचानक दुचाकी घसरल्याने खाली पडून प्रदीपच्या कपाळास जखम झाली. मोहोळ येथील सरकारी रुग्णालयात उपचार करून सोलापूर येथील शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल करण्यात आले या घटनेची नोंद सिव्हिल पोलीस चौकीत झाली आहे.



# राज्यात इलेक्ट्रिक बसेसचा पुरवठा रखडला

**● कंत्राट रद्द करणार; हैदराबादच्या ट्रान्स कंपनीला एसटी महामंडळाचा इशारा**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१५ मार्च-**

एसटी महामंडळाच्या बसेस जास्तीत जास्त प्रदूषणविरहीत इंधनावर चालवण्यासाठी दीड वर्षापूर्वी ५ हजार १५० विद्युत (इलेक्ट्रीक) बस पुरवठा करण्याचे कंत्राट हैदराबाद येथील ईव्हरी ट्रान्स कंपनीला दिले होते. परंतु या कंपनीने आतापर्यंत केवळ २२० बसेसचा पुरवठा केला आहे. यातून एसटीचे १३ रुपये प्रतिकिलोमीटरचे नुकसान होत आहे. करारानुसार या कंपनीने ३१ जानेवारी पर्यंत १ हजार ३४५ बस पुरवठा करणे अपेक्षित होते. परंतु वेळेत बस पुरवठा न करणाऱ्या कंपनीचे कंत्राट अखेर रद्द करण्याचा इशाराच एसटी मंडळाने दिला आहे.

राज्याच्या ग्रामीण भागातील प्रवाशांच्या हक्काचे दळणवळणाचे साधन असलेल्या एसटीतील ७५ टक्के बस भंगारात जाण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे एसटीच्या ताफ्यात टप्प्याटप्प्याने नवीन बस दाखल करणे क्रमप्राप्त आहे. नोव्हेंबर २०२३ रोजी एसटी महामंडळाने प्रदूषणविरहीत विद्युत इंधनावर चालणाऱ्या ५,१५० बस खरेदी करण्याचा निर्णय घेतला. हे काम हैदराबाद येथील ईव्हरी ट्रान्स प्रा. लि. या कंपनीला देण्यात आले होते. कंत्राट करारनाम्यानुसार २४ महिन्यांत बसपुरवठा आणि एक वर्षात विद्युत पायाभूत सुविद्या उभारल्या जातील, असे नमूद करण्यात आले आहे. करारनाम्यानंतर १६ महिन्यांत ५,१५० पैकी केवळ २२० बस या कंपनीने एसटीच्या ताफ्यात दाखल केलेल्या आहेत. या कंपनीने येत्या दोन महिन्यांत म्हणजे मे महिन्यापर्यंत बसपुरवठा केला नाही, तर हे कंत्राट रद्द करण्याचे पाऊल एसटी महामंडळाला उचलावे लागेल, असा अप्रत्यक्ष इशारा एसटी महामंडळाने दिला आहे.

विद्युत इंधनावर एसटीच्या ताफ्यात जास्तीत जास्त बस याव्यात, अशी सर्वांची इच्छा आहे. पण या कंपनीने कराराचा भंग केला. त्यामुळे एसटीचे खूप मोठे नुकसान होत आहे. ही कंपनी मुदतीत विद्युत बस देईल याची खात्री नाही. विश्वासार्हता गमावलेल्या या कंपनीची निविदा रद्द करून एसटीने नव्याने बस खरेदी कराव्यात अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

### तारीख पे तारीख

जानेवारी २०२५ पर्यंत १,८२५ आणि सर्व ५,१५० बस नोव्हेंबर २०२५ पर्यंत पुरवठा करू, असे पत्र कंपनीने दिले आहे. काही दिवसांत या आश्वासनात बदल करून जानेवारीपर्यंत १,३९४ आणि डिसेंबर अखेरपर्यंत सर्व बस देऊ, असे कंपनीने सांगितले. नंतर जानेवारीअखेर १,३४५ बस देऊ शकतो, असे स्पष्ट केले. आता तर चक्क जानेवारी २०२६ पर्यंत सर्व बस पुरवठा करू, असे या कंपनीने सांगून टाकले आहे. या बस लवकर येत नसल्याने एसटीचे दररोज १३ रुपये प्रतिकिलोमीटरचा तोटा होत आहे.




## पोलीस अधीक्षकांनी घेतली सांगोला पोलीस आधिकारी व कर्मचाऱ्यांची झाडाझडती

**विविध पोलिस ठाण्यांचे अधिक्षकांकडून वार्षिक तपासणी**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर. दि. १५ मार्च -**

वर्षभरात किती गुन्हे दाखल झाले, किती उघडकीस आले, पोलीस ठाण्याचे कामकाज अद्ययावत आहे का?, हद्दीमध्ये गुन्हेगारी रोखण्यासाठी कोणती मोहीम राबविली, पोलीस ठाणे परिसर स्वच्छता यासह अन्य कामांची माहिती घेत पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी पोलीस ठाण्यातील पोलिस निरीक्षक, सहायक निरीक्षक, उपनिरीक्षकांसह, कर्मचाऱ्यांची शुक्रवारी झाडाझडती घेतली.

पोलीस अधीक्षक कुलकर्णी यांच्याकडून जिल्ह्यातील विविध पोलिस ठाण्यांची वार्षिक तपासणी करण्यात येत आहे. शुक्रवारी सांगोला पोलिस ठाण्याची त्यांनी तपासणी केली. कुलकर्णी यांनी सुरुवातीला संपूर्ण पोलीस ठाणे फिरून पाहणी केली. त्यानंतर अधिकारी व कर्मचारी यांच्यासोबत वैयक्तिक संवाद साधला. काहींना कडक शब्दात सुचना दिल्या.

वर्षभरातील कामकाजाचा आढावा घेतला. वाहतूक समस्या, दाखल गुन्हे, निर्गत गुन्हे, प्रलंबित गुन्हे, सामाजिक उपक्रम यांसह रोजकीर्द नोंदवही, महत्त्वाची कागदपत्रे, बँक पासबुके, चलनाने जमा करण्यात आलेल्या महसुली जमेची पडताळणी, सर्व प्रकारची दंड वसुली, आदी प्रशासकीय कामकाजाची माहिती घेतली. काही अधिकाऱ्यांची काम काजामध्ये प्रगती दिसून येत नसल्याने त्यांची थेट कानउघाडणी केली. पोलीस ठाणे परिसर फिरुन स्वच्छतेची माहिती घेतली.

तसेच पोलिसांच्या निवासस्थानाची पाहणी करून सूचना दिल्या. अचानक भेटीने काहीजणांच्या चेहऱ्यावर तणाव व भीती दिसत होती. काम काजात ताबडतोब सुधारणा करा, अन्यथा कारवाई केली जाईल, असा स्पष्ट इशाराही पोलीस अधीक्षकांनी सर्व अधिकाऱ्यांना दिला. यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रांत गायकवाड, पोलिस निरीक्षक भीमराव खणदाळे उपस्थित होते.

## ज्ञानामृत आनंदलहरी - १०५७

**म्हणोनि अभ्यासासि कांही । सर्वथा दुष्कर नाही ।**
**या लागीं माझ्या ठायीं। अभ्यासें मीळ ।।**

सर्व प्राणीमात्र म्हणजेच आपण असल्याचे भगवंतानी यापूर्वीच स्पष्ट केले आहे. आपल्याशी एकरुप होण्यासाठी. मीपणा, अभिमान टाकून द्यावा लागतो असेही भगवंत म्हणतात स्वार्थ, मीपणा, द्वेष, मत्सर, अभिमान या सहजासहजी आपल्यातून नष्ट होणाऱ्या गोष्टी नसल्यातरी त्या अभ्यासाअंती सहज शक्य होतात. विषयात अडकलेले व इंद्रियाधिन असलेले मन त्यातून बाहेर काढणे सुध्दा अभ्यासाने शक्य होते. अभ्यासाने पाहिजे ते इच्छित प्राप्त होऊ शकते असे म्हणतांना भगवंत म्हणाले,

**म्हणोनि अभ्यासासि कांही । सर्वथा दुष्कर नाही ।**
**या लागीं माझ्या ठायीं । अभ्यासें मीळ ।।**

अर्थात, अभ्यासयोगाला कोणतीही गोष्ट मुळीच अवघड नाही. अभ्यासाने माणूस भगवंताशी एकरुप होऊ शकतो. अभ्यासाला प्रारंभ केल्यानंतर हळू-हळू नको ते विषय सुटू लागतात.. पौर्णिमेपासून चंद्रबिंब हळू-हळू कमी-कमी होत जाते. त्याचप्रमाणे अभ्यासाला प्रारंभ केल्यानंतर मन विषयाला हळू-हळू सोडू लागते. अभ्यासाने प्राप्त होत नाही, असे कांही नाही. मनाचा निग्रह करुन आत्मविश्वासपूर्वक



अभ्यासाला प्रारंभ केल्यानंतर निश्चितच एके दिवशी इच्छित साध्य होत असते. हा अत्यंत महत्वाचा दृष्टात भगवंतांनी अर्जुनाला माध्यम करुन तुम्हा-आम्हाला दिला आहे. कठिण परिश्रमाला यश हे हमखास येत असते त्यामुळे आपण ज्या क्षेत्रात आहोत, त्याक्षेत्रात मनःपुर्वक कष्ट केले तर आपण इच्छित उदिष्टापर्यंत पोहचू शकतो, हे विसरु नये. अर्ध्यावर अभ्यास सोडून हार मानणे चुकीचे असते. अभ्यासाच्या सामर्थ्याने कित्येकांनी आकाशात फिरण्याची गती प्राप्त केली तर कित्येकांनी वाघ सर्पासारख्या प्राण्यांना आपल्या स्वाधीन केल्याचे माऊली सांगतात. अभ्यासाच्या योगाने विष सुध्दा पचनी पाडणारे लोक आहेत. समुद्रातही पायवाट, अभ्यासाअंती होऊ शकते. असे सांगण्यामागे माऊलींचा हेतू असा आहे की, माणसाने अभ्यास सतत चालू ठेवला तर अयशस्वी होण्याचे कारणच नाही. लोक लग्गा, वशिला लावून, पैशाची देवाण घेवाण करुन पुढे जात आहेत. माझ्याकडे काही नाही, त्यामुळे मी त्या क्षेत्रातून माघार घेतली, असे म्हणून अभ्यासकाने माघार घेऊ नये. अभ्यासाची किंमत हमखास होतच असते. आपला आपल्या कष्टावर, अभ्यासावर विश्वास असला म्हणजे पुरे झाले. कष्टाला फळ मिळतच असते, म्हणून आपण निवडलेल्या क्षेत्रात सतत अभ्यास, कष्ट करण्याची आपली मानसिकता टिकवून आपले प्रयत्न चालू ठेवू या. यश हे निश्चितच मिळेल यात शंका नाही.

**जय जय राम कृष्ण हरी ।।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : रविवार**
**दि. १६ मार्च २०२५**
**विक्रम संवत् २०८०-८१**
**शके - १९४६**
**संवत्सर - क्रोधी नाम**
**मास - फाल्गुन**
**कृ. द्वितीया (१६.५७)**
**ऋतु - वसंत**
**नक्षत्र - हस्त (११.४४)**
**योग - वृध्दि (१४.४७)**
**करण - वणिज (३०.१४)**

**दिनविशेष - चांगला दिवस, संत तुकाराम बीज - देहू, राजाराम महाराज जन्मोत्सव**

**....राहू काल....**
**रविवार : दु.४.३० ते ६.००**
**सोमवार : स. ७.३० ते ९.००**
**मंगळवार : दु. ३.०० ते ४.३०**
**बुधवार : दु. १२ ते १.३०**
**गुरुवार : दु. १.३० ते ३.००**
**शुक्रवार : स.१०.३० ते १२**
**शनिवार : स. ९ ते १०.३०**

### राशीभविष्य

**मेष :** कोणतेही काम करतांना दोनदा विचार करा. आई वडिलांचे आरोग्य चांगले राहील. नौकरीमध्ये अपक्षेप्रमाणे बदली किंवा बढती मिळण्याचे योग आहे.

**वृषभ :** आपल्या कामात दुसऱ्याची मदत घ्या. समाजात कुटुंबात आपले महत्व वाढेल. व्यावसायिक वाद संपुष्टात येतील. दुसऱ्याचा द्वेष करू नका. व्यापारात प्रगती राहील.

**मिथुन :** सामाजिक स्थिती चांगली राहून कार्यक्षेत्रात वाढ होईल. मनोरंजनाच्या संधी उपलब्ध होतील. व्यापारात अपेक्षीत लाभ होईल. घराच्या संबंधी समस्या वाढतील.

**कर्क :** व्यापारात फायदा होईल. शत्रू परेशान होतील. यश, माान, प्रतिष्ठा यामध्ये वाढ होईल. कौटुंबिक वातावरण समाधानकार राहील. दुसऱ्याची नक्कल करू नका. आनंदी रहा.

**सिंह :** प्रतिस्पर्ध्यावर विजय संपादन कराल. व्यवसायात नवीन संबंध जुळून येतील.कौटुंबिक समस्याची चिंता राहील. नौकरीत आपल्याला बढोत्तरी मिळण्याची शक्यता आहे.

**कन्या :** उत्पन्न व खर्च यामध्ये संतुलन राहील. प्रयत्न केला असता व्यापारात येणाऱ्या अडचणी दुर होतील. कौटुंबिक परिस्थती चांगली राहील्यामुळे आनंदी रहाल.

**तुळ :** आजचा दिवस चांगला जाणार आहे. बुद्धी चातुर्याने येणारे संकट दूर होणार आहे. धार्मिक प्रवास होऊ शकतो. व्यापारात प्रगती राहील.

**वृश्चिक :** कुटुंबातील वातावरण तणावपूर्ण राहील. आज आपणास उत्साह वाटणार नाही. व्यापारात नुकसान होण्याची शक्यता आहे. कर्ज वाढणार आहे. मित्रांचे सहकार्य मिळेल.

**धनु :** सर्वच ठिकाणी आपणास यश मिळणार आहे. नवीन संधी मिळतील. कोणचाही राग करू नका. आरोग्याच्या तक्रारी संपणार आहेत.

**मकर :** दुसऱ्यावर विसंबून राहिल्याने नुकसान होण्याची शक्यता आहे. अचानक आलेल्या अडचणीमुळे निराश रहाल. घरातील सदस्यांची चिंता राहील.

**कुंभ :** व्यापारात अचानक फायदा होईल. अपूण राहीलेले कामे पूर्ण होतील. मित्रांना आपण मदत कराल. उत्पन्नापेक्षा जास्त खर्च करू नका.

**मीन :** श्रम व धावपळ झाल्यामुळे आपल्या कामाची गती वाढणार आहे. नवीन संबंध फायदेशीर ठरतील. विद्यार्थ्यांना शिक्षणात यश मिळेल.मुलांच्या कामामुळे दुःखी रहाल.

# जिल्ह्यातील ११२९ शिक्षकांचे ९ कोटी ३२ लाख वितरित



## वैद्यकीय बिल पंचायत समितीकडे वर्ग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ मार्च-**

सोलापूर जिल्ह्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागातील ११२९ सेवेत कार्यरत असणाऱ्या व सेवानिवृत्त झालेल्या शिक्षकांचे मागील तीन वर्षांपासून प्रलंबित असलेले वैद्यकीय बीलाचे ९ कोटी ३२ लाख ३३ हजार ६२४ रक्कम जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागाने सर्व पंचायत समिती गटविकास अधीकारी बँक खात्यात वर्ग केली आहे.

जिल्ह्यात ११२९ शिक्षकाचें वैद्यकीय बिले प्रलंबित होती. महाराष्ट्र राज्य सेवानिवृत्त शिक्षक संघटनेने राज्याचे शिक्षण सचिव रणजितसिंह देओल शिक्षण संचालक प्राथमिक पुणे शरद गोसावी यांच्याकडे पाठपुरावा केला होता. जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधीकारी कुलदीप जंगम, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मनिषा वाकडे, शिक्षणाधिकारी कादर शेख आदींनी पाठपुरावा केल्यानंतर जिल्ह्यातील काहीं शिक्षक कोवीड काळात मृत्युमुखी पडले होते. त्यांचेही वैद्यकीय बिले आदा केली असल्याचे सेवानिवृत्त शिक्षक संघटनेचे अध्यक्ष शिवानंद भरले यांनी सांगितले. सेवानिवृत्त शिक्षक संघटनेच्या वतीने जिल्हा अध्यक्ष सुभाष फुलारी, कार्याध्यक्ष रमेश गायकवाड, मल्लिकार्जुन बडदाळ, काळप्पा सूतार, बसवणप्पा जिरगे, बादशहा मुल्ला आदींनी प्रशासनाचे आभार मानले.

### वितरित केलेले तालुके व रक्कम

अक्कलकोट ७८ लाख , बार्शी ६५ लाख ९८ हजार, करमाळा ८४ लाख ५ हजार, माढा ५४ लाख १३ हजार , माळशिरस १ कोटी २२ लाख , मंगळवेढा ५६ लाख ४३ हजार , मोहोळ १ कोटी ४६ लाख ६० हजार, पंढरपूर १ कोटी ३४ लाख ८५ हजार , सांगोला १ कोटी १२ लाख ९५ हजार, दक्षिण सोलापूर ६० लाख, उत्तर सोलापूर १७ लाख ६९ हजार असे एकूण ९ कोटी ३२ लाख ३३ हजार ६२४ रक्कम वितरीत केले.

# शिवदारे महाविद्यालयातील दुसऱ्या आंतरराष्ट्रीय परिषदेची सांगता

## ३२० संशोधकांनी सादर केले शोधनिबंध

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर दि.१५ मार्च-**

दक्षिण सोलापूर तालुका शिक्षण मंडळ संचलित व्ही. जी. शिवदारे कॉलेज ऑफ आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स सोलापूर, जैवतंत्रज्ञान विभाग आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेची यशस्वी सांगता झाली. याप्रसंगी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या मुख्य लोक अभिरक्षक तथा न्याय रक्षक ॲड. मा. स्नेहल राऊत मुख्य अतिथी म्हणून उपस्थित होत्या. विद्यार्थ्यांना संबोधित करताना त्या म्हणाल्या की, जिल्हा विधी प्राधिकरण हे वेगवेगळ्या योजना राबवत असते.



अनेक नवे उपक्रम चालवत असते. याची माहिती सर्वांना व्हावी हे अत्यंत गरजेचं आहे. कायद्याची व प्राधिकरणाची जनजागृती होणं ही काळाची गरज आहे. या परिषदेत देशविदेशातील तज्ञांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाप्रसंगी विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषद मध्ये संशोधक विद्यार्थ्यांनी पोस्टर व सादरीकरण केले.त्या बक्षीस प्राप्त विद्यार्थ्यांचे यादीचे वाचन प्रा.एम. बी. पाटील यांनी केले. संस्थेचे विश्वस्त प्रा. बी. व्ही. शेटे यांनी परिषदेचे कौतुक केले. या परिषदेत ३२० संशोधकांनी नोंदणी करून शोधनिबंध सादर केले. याप्रसंगी या परिषदेमध्ये सहकार्य करणाऱ्या सर्व प्राध्यापक वर्गाचा सत्कार करण्यात आला. प्रारंभी कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. गोपिका मंजुनाथ यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. शुभदा उपासे यांनी करून दिला. आभार डॉ.अनमोल वळसंगे यांनी मानले. यावेळी व्यासपीठावर ॲड. स्नेहल राऊत, प्रा. भिमाशंकर शेटे, प्राचार्य डॉ. सुत्रावे , डॉ. मंजुनाथ, डॉ. देबश्री खान, प्रा. गोपिका मंजुनाथ उपस्थित होते.



# रेशीम शेतीतून शेतकऱ्यांच्या आर्थिक स्वावलंबनाला चालना मिळेल!

## उपजिल्हाधिकारी अमृत नाटेकर यांचे प्रतिपादन

### रेशीम शेती मूल्यसाखळी विकास चर्चासत्र

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ मार्च-**

जिल्ह्यात रेशीम शेतीला पूरक हवामान आहे. तसेच हिरज येथे रेशीम बाजारपेठ निर्माण झालेली आहे. त्यामुळे सोलापूर जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी तुतीची लागवड करून रेशीम शेती करण्यासाठी रेशीम विभाग व सर्व संबंधित शासकीय यंत्रणांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे. हे पीक कॅश क्रॉप असल्याने यातून शेतकऱ्याच्या आर्थिक स्वावलंबनाला चालना मिळेल, असे प्रतिपादन उपजिल्हाधिकारी महसूल अमृत नाटेकर यांनी केले.

नियोजन भवन, सोलापूर येथे 'एकात्मिक पर्यटन विकास प्रकल्प' अंतर्गत रेशीम शेती मूल्यसाखळी विकास चर्चासत्र आयोजित करण्यात आले. या चर्चासत्रात जिल्ह्यातील प्रगतशील रेशीम उद्योजक, तज्ज्ञ आणि अधिकारी यांनी सहभाग घेतला. याप्रसंगी सहाय्यक जिल्हा नियोजन अधिकारी श्रीमती प्रितम कुंटला, रेशीम विकास अधिकारी विनीत पवार, सिंहगड इन्स्टिटयूटचे संचालक डॉ. एस. एच. पवार, कृषी विकास तज्ञ जितेंद्र नाईक व शिरीष तेरखेडकर, प्रमुख समन्वयक भरत काळे, उपजीविका तज्ञ प्रविण कु-हे, स्थापत्य अभियंता विनायक जवळकोटे, क्षेत्र समन्वयक राहुल डफळ यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख समन्वयक भरत काळे यांच्या प्रास्ताविकाने झाली. त्यानंतर शिरीष तेरखेडकर यांनी बैठकीच्या उद्दिष्टांवर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचा समारोप समन्वयक भरत काळे यांनी उपस्थितांचे आभार मानून केला. माळशिरस आणि पंढरपूर तालुक्यातील ३० प्रगतशील रेशीम उद्योजक या चर्चासत्रात सहभागी झाले होते.

# कथाकथन स्पर्धेत रेणुका पट्टनशेट्टी प्रथम



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ मार्च-**


महिला दिनानिमित्त झालेल्या कथाकथन स्पर्धेत रेणुका पट्टणशेट्टी यांनी प्रथम क्रमांक पटकाविला. साक्षी सुराणा, शुभदा मित्रगोत्री यांनी अनुक्रम द्वितीय व तृतीय स्थान मिळविले. डॉ. लतिका व्हनबिंदगी व प्राजक्ता पौळ यांना उत्तेजणार्थ पारतोषिक देण्यात आले

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या शाखा सोलापूरच्या वतीने या स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेचे परीक्षक म्हणून नागेंद्र माणेकरी व हेमा मोडक यांनी काम पाहिले. याचे पारितोषिक वितरण सूर्या एक्झिक्यूटिव्हच्या सीईओ वैशाली सुरवसे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी डॉ. श्रुतीश्री वडगबाळकर, शोभा बोल्ली, गोविंद काळे, जे.जे. कुलकर्णी, डॉ. देविदास गुरव, फैय्याज शेख आदी उपस्थित होते. प्रथम, द्वितीय व तृतीय यांना अनुक्रमे अडीच, दीड व एक हजार रुपयांचे पारितोषिक व उत्तेजणार्थ यांना साडी भेट देण्यात आली. ही पारितोषिके सूर्य एक्झिक्युटिव्हतर्फे दत्ताअण्णा सुरवसे यांनी पुरस्कृत केली होती. पारितोषिक वितरण वाचन डॉ. सुवर्णा गुंड व भीमगोंडा पाटील यांनी केले. पाहुण्यांचा परिचय डॉ. नरेंद्र काटीकर यांनी दिला. शोभा बोल्ली यांनी आभार मानले. वंदना कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले. अध्यक्षीय मनोगत डॉ. श्रुतीश्री वडगबाळकर यांनी व्यक्त केले.

## समाज ऋणातून उतराई होण्याचा प्रयत्न करणारे
# कौस्तुभ वधु-वर सूचक मंडळ

समाजाची निरपेक्ष सेवा करणे हा भारतीय सांस्कृतिचा विचार आहे. 'सेवा परमो धर्मः' असे आपल्या शास्त्रामध्ये म्हटले आहे. त्याच सेवेची कास धरून आपण मातृ-पितृऋणातून थोडेतरी उतराई व्हावे म्हणून गुरुवर्य हरिभाऊ वासुदेव नाशिककर यांनी १९९१ साली सेवानिवृत्तीनंतर सर्व मित्रांचे मनोगत आणि विचार घेऊन व त्यावर सुक्ष्म विचार करुन त्या काळी होणाऱ्या वधू-वर पालकांची समस्या लक्षात घेऊन हरिभाऊ नाशिककर यांनी कौस्तुभ ब्राह्मण वधू-वर सूचक केंद्राची निर्मिती केली.

वास्तविक पाहता इतर पेन्शनरांप्रमाणेच हरिभाऊंना सेवानिवृत्तीनंतर स्वस्थपणे घरात बसून आपले आयुष्य घालवता आले असते. पण आपण समाजाचे काही देणे लागतो म्हणून उर्वरित आयुष्यात आपण काहीतरी समाजउपयोगी कार्य करावे असा निश्चय हरिभाऊंनी निवृत्तीनंतर केला. त्या माध्यमातून वधू-वर परिचय अंक प्रकाशित केला आणि अल्पावधीतच हे वधू वर सूचक मंडळ घरोघरी पोहोचले. ब्राह्मण समाजातील अडचणींवर सकारात्मक दृष्टीने विचार करुन सर्व समावेशक अशा सर्व शाखीय ब्राह्मण वधू-वर केंद्राची स्थापना करण्याच्या दृष्टीने त्यांनी महत्त्वाचे पाऊल उचलले.



त्या काळातील दिग्गजांशी संवाद साधुन पण त्यांच्या अनास्थेमुळे विचलीत न होता आपले ध्येय पूर्णत्वास नेणाऱ्या हरिभाऊंनी एकला चलो रे ची साथ देत सर्व शाखेतील अनेकांना प्रस्थापित केले. यामुळेच पुरोगामी तत्वाची व सामाजिक बांधिलकी तसेच मातृभूमी वंदनीय असे मनाशी ठाम निश्चय घेऊन चालणाऱ्या साने गुरुजींना पूज्य स्थानी मानणाऱ्या या हरिभाऊ नाशिककर यांनी आपला सामाजिक लढा । माझे सामाजिक कर्तव्य हाच माझा धर्म याच निष्ठेने शेवट पर्यंत घेऊन ते चालत राहिले. काळाच्या ओघात जे शक्य ते त्यांनी करण्याचा यशस्वी प्रयत्न केला. हरिभाऊंनी त्यांच्या काळात ५०० च्या वर विवाह जमवण्याचा प्रयत्न केला त्यांच्या या कार्यामध्ये त्यांच्या पत्नी कै. शोभना हरिभाऊ नाशिककर यांनी त्यांना तशीच धीराची साथ दिली.

निरपेक्ष भावनेने समाजसेवा करताना जो आत्मिक आनंद मिळतो, तो शब्दांत व्यक्त करता येत नाही. कालांतराने हरिभाऊ नाशिककर यांच्या निधनानंतर काळातील बदल ओळखून त्यांच्या कुटुंबातीलच त्यांचा मुलगा रवींद्र आणि स्नुषा सौ. रश्मी रविंद्र नाशिककर यांनी ह्या सामाजिक कार्याचा भाग समजावून घेऊन आणि त्याचा सखोल अभ्यास करून अधिकृत नोंदणीच्या आधारे या सर्वशाखीय ब्राह्मण वधू- वर केंद्राचे काम पुढे चालविण्याचा निर्धार केला. त्याचीच ही फलश्रुती आहे. म्हणजे ब्राह्मण वधू-वर परिचय मंडळाचे काम त्याकाळी हरिभाऊंनी अंगिकारले त्याचाच आधार घेत रवींद्र आणि रश्मी नाशिककर या उभयता पती-पत्नींनी हा जगन्नाथाचा रथ म्हणजेच वधू-वर केंद्राचे सारथ्य करण्याचा प्रयत्न केला. आणि त्याला थोडेफार यश मिळाले.

प्रत्येक व्यक्तीवर समाजऋण असतेच समाजामुळेच प्रत्येकजण घडत असतो. समाजऋणातून थोडे तरी उतराई होणे हे प्रत्येकाचे कर्तव्य ठरते. समाजात तर प्रत्येकालाच वावरावे लागते. असे वावरताना प्रत्येकालाच बरे-वाईट अनुभव येतात. जे चांगले अनुभव आपल्या वाट्याला येतात त्यांमुळेच तर आपण घडत असतो. वाईट अनुभवातूनही आपण काही धडा घेत असतो. या सगळ्याच बर्या-वाईट अनुभवांतून आपले व्यक्तिमत्त्व घडते. असेच अनुभव रवींद्र आणि रश्मी नाशिककर यांना आले. समाजासाठी चांगले काम करणाऱ्या संस्था असतात त्यात सोलापूरची कौस्तुभ ब्राह्मण वधू-वर सूचक केंद्र आजही मोठ्या हिमतीने कार्यरत आहे. या पुस्तकाचे प्रकाशन होत असताना आजही रवींद्र नाशिककर यांनी ३७० मुले आणि ३५० मुलींची कौस्तुभ ब्राह्मण वधु वर सुचक केंद्रात नोंद झाल्याचे सांगितले आहे.

**- पद्माकर मा. कुलकर्णी**
**सोलापूर.**

# कॉसमॉस बँकेच्यावतीने महिला दिन साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १४ मार्च-**

कॉसमॉस बँकेच्या वतीने महिला सन्मान सप्ताह दिनाचे औचित्य साधत समाजातील अन्यन्य क्षेत्रातील कर्तुत्ववान व कर्तबगार महिलांचा सन्मान करण्यात आला.

कॉसमॉस को ऑप बँकेच्या वतीने महिला दिनाचे औचित्य साधून दरवर्षी प्रमाणे यंदाही महिला दिन सोलापूर शाखेत साजरा करण्यात आला.यावेळी व्यासपीठार माधवी रायते, रुपाली कुलकर्णी, सुप्रिया महिंद्रकर शाखाधिकारी स्वाती कुलकर्णी होत्या.त्यात समाजातील अन्यन्य क्षेत्रातील कर्तृत्ववान व कर्तबगार महिला यांचा सन्मान करण्यात आला. शाखाधिकारी स्वाती कुलकर्णी म्हणाल्या की पूर्वीच्या काळी स्त्रियांना केवळ 'चूल आणि मूल' या मर्यादेत पाहिले जात असे.






मात्र, आजच्या काळात स्त्रिया कुटुंब सांभाळण्यासोबतच शिक्षण, व्यवसाय, संशोधन, प्रशासन अशा सर्वच क्षेत्रांत स्वतःची ओळख निर्माण करत आहेत. त्या केवळ घराचे घरपण जपत नाहीत, तर समाज आणि राष्ट्राच्या प्रगतीतही मोलाची भूमिका बजावत आहेत. त्यामुळे आजचा दिवस केवळ त्यांचा सन्मान करण्याचा नाही, तर त्यांच्या योगदानाची जाणीव ठेवण्याचा आहे. यावेळी या महिलांचं सन्मान करण्यात आला डॉ. मधुरा बुरटे, उद्योजक श्वेता पुलगम, स्वाती जोशी, वास्तूविशारद शिल्पा कुलकर्णी, डॉ. अश्विनी दोंड, उथ उमा नागणसुरे, ॲड. नरसूबाई गदवालकर, डॉ. सुराणा पल्लवी, आर्टिस्ट गौरी कुलकर्णी, शिक्षिका नंदिनी देशपांडे, व महिला वर्ग तसेच बँकेतील संपूर्ण कर्मचारी उपस्थित होते.

## संघ हीच जीवनगाथा

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार (जन्म १ एप्रिल १८८९, मृत्यू २१ जून १९४०). आपल्यासमोर संघ हीच जीवनगाथा या शीर्षकाखाली मी छोट्या छोट्या कथा लिहित आहे. या कथांचे स्वरूप आहे अलक. म्हणजे अति लघु कथा. ही कथा वाचायला सोपी; स्मरणात ठेवायला सोपी; समजायला सोपी; अशी असेल असा माझा प्रयत्न आहे. आधीच सांगते कथा म्हणजे निव्वळ गोष्ट नव्हे एवढे ध्यानी ठेवावे. जसे यथा म्हणजे येन प्रकारेण; तथा म्हणजे तेन प्रकारेण; सर्वथा म्हणजे सर्वे प्रकारेण तसेच कथा म्हणजे केन प्रकारेण, या अर्थाने मी अलक लिहिले आहे.



**- सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती, मो. ९९६००५३५२१

### अलकः- (७९) राष्ट्रवादी

नागपुरातील एका संघ शिक्षा वर्गात स्वयंसेवकांबरोबर परिचय बैठक सुरू होती. त्यात एका तरुणांनी परिचय करून दिला व गावाचे नाव बेळगाव सांगितले. गुरुजीः- बेळगाव म्हणजे आजकाल ज्यावर विवाद चालू आहे, ते का?

तरुणः-हो

गुरुजीः- मग तू कुठला वादी आहेस.

तरुणः - मी महाराष्ट्र वादी आहे. बेळगाव महाराष्ट्रात झालेच पाहिजे .

गुरुजीः- सध्या बेळगाव कुठे आहे तरुणः-कर्नाटकात

गुरुजीः- कर्नाटक कुठे आहे?

तरुणः- भारतात

गुरुजीः- तू कोण आहेस

तरुणः- भारतीय

गुरुजीः- मग तू असा एखाद्या वादात का गुरफटतोस. आपण राष्ट्रवादी आहोत व विशेषत्वाने हिंदू राष्ट्रवादी आहोत हे ध्यानी धर.

**- क्रमशः**

## संक्षिप्त वृत्त



### जिल्हाप्रमुख पदाचा कार्यकाल स्वामी चरणांना समर्पित : संतोष पाटील

**अक्कलकोट दि. १५ मार्च -**

मला लाभलेले शिवसेना जिल्हा प्रमुख पद व त्याचा कार्यकाल हा स्वामी चरणांना समर्पित असल्याचे मनोगत शिवसेना उध्दव ठाकरे गटाचे नूतन जिल्हाप्रमुख संतोष पाटील यांनी व्यक्त केले. त्यांनी पदभार स्विकारल्यानंतर श्री.वटवृक्ष स्वामी महाराज मंदीरास भेट देवून श्री. स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. यावेळी मंदीर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन महेश इंगळे यांनी पाटील यांचा स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देवून यथोचित सन्मान केला. यावेळी प्रथमेश इंगळे,मनोज पवार, रवी डोळे, सोपान निकते, स्वामीराव मोरे, श्रीशैल पाटील, कोळी महासंघ प.महाराष्ट्र प्रमुख अरुणभाऊ लोणारी, मंदीर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, श्रीकांत मलवे, ऋषिकेश लोणारी, स्वामीनाथ लोणारी, दिपक गवळी, विपूल जाधव, सागर गोंडाळ व कोळी समाजाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

### अकलूज येथे रामनवमी निमित्त मोफत गर्भसंस्कार शिबिर

**अकलूज, दि.१५ मार्च -**

मनशक्ती सेवा विज्ञान केंद्र अकलूज आणि रोटरी क्लब ऑफ अकलूज यांच्यावतीने रामनवमीनिमित्त रविवार दि. ६ एप्रिल रोजी सकाळी १० ते दुपारी १ या कालावधीत स्मृतीभवन शंकरनगर येथे गर्भवती महिलांसाठी मोफत वैज्ञानिक गर्भ संस्कार शिबिर आयोजित केले असल्याची माहिती मनशक्ती केंद्र अकलूज चे केंद्रप्रमुख हनुमंतराव (आप्पा) खडके यांनी दिली.या शिबिरात कोणत्याही महिन्यातील गर्भवती मातापित्यांना सहभाग घेता येईल. या शिबिरात संस्कार म्हणजे काय व ते कसे करावेत, गर्भासाठी स्वागत, प्रार्थना, संगीत, गोष्ट, गर्भाला कळते याचे पुरावे, स्ट्रोबोस्कोप चाचणी आणि उपाय याबाबत सविस्तर मार्गदर्शन होणार आहे. सुदृढ सतेज सुसंस्कारी पिढीसाठी हा विनामूल्य उपक्रम असून यामध्ये गर्भसंस्कारा संबंधीत मोफत पुस्तके ही देण्यात येणार आहेत. याकरिता नाव नोंदणी आवश्यक असून नाव नोंदणीसाठी अँड. प्रवीण कारंडे ९९२२२३९९०६, हनुमंत (आप्पा) खडके ९९६०००२७३४, प्रिया नागणे ९८६०८९१६१६, गजानन जवंजाळ ९४ २३३२७९०३ यावर संपर्क साधावा.

### निर्मलाराजे प्रशालेस जिल्हा आदर्श शाळा पुरस्कार

**अक्कलकोट, दि. १५ मार्च-**

मराठा मंदिर मुंबई संचलित श्रीमंत राणी निर्मलाराजे कन्या प्रशालेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. अक्कलकोट येथील मराठा मंदिर श्रीमंत राणी निर्मलाराजे कन्या प्रशालेला सोलापूर जिल्हा माध्यमिक शिक्षक व सेवक सहकारी पतसंस्था मर्या.बाळे सोलापूर यांच्याकडून दिला जाणारा जिल्हास्तरीय आदर्श शाळा पुरस्कार प्राप्त केला आहे. पुरस्कार वितरण सोहळा हुतात्मा स्मृती मंदिर या ठिकाणी संपन्न झाला. बाळे सोसायटीचे मार्गदर्शक माजी आमदार दत्तात्रय सावंत यांच्या हस्ते प्रशालेचे मुख्याध्यापक शरद जंगाले यांनी सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांच्या समवेत पुरस्कार स्वीकारला. यावेळी सहशिक्षिका प्रमिला नीळपाटील, अर्चना जाधव, स्मिता जगदाळे, मनीषा मोरे, रेखा चव्हाण, एस. डी. सावंत, संभाजीराजे गाटे, प्रकाश सोनटक्के, विकास गोडसे, राजेद्र गोन्डाळ, एस. बी. साळुंखे उपस्थित होते. जिल्हास्तरीय आदर्श शाळा पुरस्कार मिळाल्याबद्दल मराठा मंदिरचे उपाध्यक्ष विलासराव देशमुख व मराठा मंदिर विद्यावर्धिनीचे अध्यक्ष योगेश पवार यांनी अभिनंदन केले.

### बचेरीत आ. राम सातपूते यांच्या वाढदिनानिमित्त अभ्यासिकेची सुरवात

**पिलीव, दि. १५ मार्च -**

माळशिरस तालुक्याचे माजी आमदार रामभाऊ सातपुते यांच्या वाढदिवसानिमित्त बचेरीत मच्छींद्र मामा खुर्द वाचनालय व पुणयशलोक गणेशोत्सव मंडळ यांच्या वतीने १४ मार्च पासुन वाडयावस्तयावरील विदयार्थ्यांसाठी क्रांतीज्योती सावित्रीबाई अभ्यासीका सुरू करण्यात आली. आतापर्यंत या वाचनालयात अभ्यास करुन अनेक विदयार्थी अधिकारी झाले आहेत. सदरची अभ्यासीका प्रा. सदाशिव शिंदे व अस्मीता शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

### पंढरपूर तहसीलदार सोमवारी अन् गुरुवारी नागरिकांना भेटणार

**पंढरपूर, दि.१५ मार्च -**

पंढरपूर तालुक्यातील नागरिकांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी तहसीलदार यांना दर सोमवारी व गुरुवारी दुपारी ३ ते ५ पर्यंत नागरिकांना आपल्या कामानिमित्त भेटता येईल, अशी माहिती तहसीलदार सचिन लंगुटे यांनी दिली. नागरिक ग्रामीण भागातुन आल्यावर तहसीलदार बैठकीस किंवा गावभेटीच्या निमित्ताने बाहेरगावी असल्यास त्यांची भेट होत नाही. त्यासाठी आठवड्यातून दोन वेळेस लोकांच्या समस्या सोडवण्यासाठी तहसीलदार उपस्थित असाणार आहेत. दरम्यान संबंधित वेळेत तक्रारदार नागरिक, अभ्यागत आणि शेतकऱ्यांनी त्यांच्यासाठी निश्चित केलेल्या वेळेत तहसील कार्यालयात भेट द्यावी तसेच महत्त्वाच्या प्रशासकीय कामानिमित्त तहसीलदार बाहेरगावी असतील तर निवासी नायब तहसीलदार यांची भेट घ्यावी असे आवाहन तहसीलदार श्री.लंगुटे यांनी केले आहे.

### लोकसेवा शाळेजवळ तरुणाला बेदम मारहाण

**सोलापूर, दि. १५ मार्च -**

लोकसेवा शाळेजवळ कचरा गाड्या थांबण्याच्या ठिकाणी तरुणाला चौघांनी बेदम मारहाण केली. हा प्रकार शनिवारी पहाटे चार २० च्या सुमारास घडला. प्रवीण दगडू माने (वय २७ रा बुधवार पेठ) असे मारहाण झालेल्या तरुणाची नाव आहे. लोकसेवा शाळेजवळील कचरा गाड्या थांबण्याच्या ठिकाणी प्रवीण शनिवारी पहाटे गेला होता. त्यावेळी तेथे काळे व इम्या तसेच इतर दोन अनोळखी लोकांनी अज्ञात कारणातून प्रवीण यास फायटर तसेच लाथा बुक्क्यांनी बेदम मारहाण केली. यात प्रवीणच्या चेहऱ्याला जखम झाली. दोन्ही हाताला व त्याच्या छातीला खरचटले असल्याने तो स्वतः शासकीय रुग्णालयात उपचाराकरिता दाखल झाल्याची नोंद सिव्हिल चौकीत झाली आहे.

## आ. सचिन कल्याणशेट्टींमुळे अक्कलकोट आगारात

# १० नवीन लालपरी दाखल

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट, दि. १४ मार्च -**

अक्कलकोट शहरात वातानुकूलित बस स्थानकाचे बांधकाम होत असताना दहा नवीन आरामदायी बसेस आणल्याने आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या कार्याचे कौतुक होत आहे.

आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी यांच्या विशेष प्रयत्नातून अक्कलकोट तालुक्याचा सर्वांगीण विकास होत असताना अक्कलकोट तालुक्यातील स्वामी भक्तांसाठी वातानुकूलित बसस्थानक इमारतीचे बांधकाम पूर्णत्वास येत आहे. आता अक्कलकोट आगारास अशोक लेलँड कंपनीच्या नवीन आरामदायी प्रवासाच्या दहा नवीन बसेस मंजूर करून आणल्या असून त्या पैकी पाच बसेस आगारात दाखल झाल्या आहेत तर पाच मार्गावर आहेत. आमदार कल्याणशेट्टी यांच्या काम करण्याच्या हातोटीबाबत अक्कलकोट तालुक्यातुन व स्वामी भक्तातून समाधान व्यक्त होत आहे. एसटी कर्मचाऱ्यांमध्येही उत्साहाचो वातावरण आहे. या बसेसचा लोकार्पण सोहळा आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी यांच्या हस्ते लवकरच होणार असून अक्कलकोट आगारास बसेस उपलब्ध करून दिल्याबद्दल आ. कल्याणशेट्टी, सोलापूर विभागाचे विभाग नियंत्रक अमोल गोंजारी, यंत्र अभियंता शितल बिराजदार, सुरक्षा दक्षता अधिकारी खंदारे, विभागीय वाहतूक अधिकारी पाटील, विभागीय वाहतूक अधीक्षक नकाते, तत्कालीन आगार व्यवस्थापक नागेश जाधव व विद्यमान आगार व्यवस्थापक रणजीत साळवे व कार्यशाळा अधीक्षक संजय कांबळे यांचे सेवा शक्ती संघ एस. टी. कर्मचारी संघ अक्कलकोट आगार यांच्यावतीने आभार व्यक्त करण्यात आले.



> अक्कलकोट शहरात सुसज्ज वातानुकुलीत बस स्थानक होत असताना काही मोडकळीस आलेल्या बसेस कायमस्वरूपी सेवेतून मुक्त करून नवीन आरामदायी बसेस आणण्याची मागणी एका एसटी कामगार संघटनेने केली होती. त्याचे गांभीर्य लक्षात घेऊन १० आराम दायी बसेस मंजूर करून आणल्या आहते. गरज पडल्यास आणखीन बसेस आणणार आहे.
>
> **- आमदार सचिन कल्याणशेट्टी, अक्कलकोट**

> अक्कलकोट आगारासाठी बी सिक्स च्या दहा बसेस आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या प्रयत्नातून मंजूर झाल्या असून त्यापैकी पाच बसेस अक्कलकोट आगारात पोहोचल्या आहेत आणखी पाच बसेस येत्या दोन-चार दिवसात येणार आहेत
>
> **- रणजीत साळवे, आगार व्यवस्थापक, अक्कलकोट**

> अक्कलकोट येथे श्री स्वामी समर्थांच्या दर्शनासाठी देशभरातून दररोज हजारो भक्त येतात. त्यांच्या सोयीसाठी नव्या ३० बसेसची मागणी आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्याकडे केली होती. त्यानुसार त्यांनी आगामी काळातील गांभीर्य लक्षात घेऊन १० नवीन बसेस मंजूर करून आणल्या आहेत. पैकी पाच बसेस आगारात आल्या असून आणखीन पाच बसेस मार्गावर आहेत. आमदार कल्याणशेट्टी यांनी केलेल्या लाखमोलाच्या सहकार्याबद्दल एसटी कर्मचारी संघटना मनापासून आभार व्यक्त करीत आहे.
>
> **- संजय हराळे, उपाध्यक्ष, सेवाशक्ती संघर्ष एसटी कर्मचारी संघ, महाराष्ट्र राज्य, शाखा अक्कलकोट.**



## अन्नछत्र मंडळ धार्मिक क्षेत्रातील शिखर संस्था : हार्डीकर

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट : दि १५ मार्च**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जन्मेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाकडून सुरु असलेली अखंड महाप्रसाद सेवा पाहता न्यास हे धार्मिक क्षेत्रातील शिखर संस्था असल्याचे मनोगत नाशिक, केंद्रीय अतिरिक्त आयकर आयुक्त अनुश्री हार्डीकर (मुंबई) यांनी व्यक्त केल्या.

त्या श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ येथे आल्या असता न्यासाचे पुरोहित अप्पू पुजारी यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र, श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी त्या बोलत होत्या. यावेळी न्यासाचे सौरभ मोरे, नामा भोसले, अतिश पवार, स्वामिनाथ बाबर, गोटू माने, निखील पाटील, सतीश महिंद्रकर, शहाजीबापू यादव, बाळासाहेब घाडगे, संभाजीराव पवार, श्रीनिवास गवंडी, दत्ता माने, तानाजी पाटील, राजू पवार, रमेश हेगडे, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, बसवराज क्यार, अनिल बिराजदार, चंद्रकांत हिबारे, एस के स्वामी, शावरेप्पा माणकोजी, कल्याण देशमुख, विशाल घाडगे, रोहित कदम, संभाजीराव पवार, विठ्ठल रेड्डी, समर्थ चव्हाण यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

## श्रीशैल नवले यांचा सायकलीवर श्रीशैल प्रवास

**तभा वृत्तसेवा,**
**वळसंग १५ मार्च-**

यंदाचे तरुण वर्ग मोटरसायकलीचा नाद असून ऐश आरामी जीवन व प्रवासाची सर्वांना ओढ असतो परंतु सोलापूरचे रहिवासी तीन मित्रांनी वयाचा परवा न करता सायकलीवर श्रीशैलचा प्रवास यशस्वी केले आहे. सायकल स्वारी करणाऱ्या श्रीशैल नवले, विठ्ठल कदम, डॉ.रतनलाल संगेवाडेकर यांनी वयाच्या पन्नासाव्या वरती गाठले असून श्रीशैल नव्हे तर सोलापूर ते कन्याकुमारी, केदारनाथ, बद्रीनाथ, वैष्णव देवी, जगन्नाथ पुरी असे प्रवास यशस्वी केले आहे. श्रीशैल प्रवास करून परत सोलापूरला जाताना वळसंग मध्ये सरपंच व इतर सहकारी वतीने त्यांचे सत्कार करण्यात आले. यावेळी ग्रामपंचायत सरपंच जगदीश आंटद, ग्रामपंचायत सदस्य श्रीशैल भुसणगी,सुरेश नवले, यासीन कुरेशी,डॉ. पंडिताराध्य हिरेमठ, संजय चव्हाण, सुनील भैरामडगी, गौरीशंकर धनशेट्टी, धानलिंग टक्कळकी, विश्वनाथ निंबाळकर आदी मान्यवर उपस्थित होते.

> श्रीशैल प्रवास जाण्यासाठी तीन दिवस,परत येण्यासाठी तीन दिवस लागले. आम्ही दिवसा १५०किमी. आसपास प्रवास करत असून कोणताही त्रास झाला नाही. जगामध्ये नैसर्गिक साधन संपत्ती वाचवा पुढचा पिढीला पर्यावरण सुरक्षित ठेवण्याची प्रयत्न करा याद्वारे आम्ही संदेश देऊ इच्छितो.
>
> **- श्रीशैल नवले, सायकल स्वार**



## 'वीरशैव लिंगायत'तर्फे बार्शीत कर्तृत्ववान महिलांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि.१५ मार्च -**

जागतिक महिला दिनानिमित्त येथील वीरशैव लिंगायत महिला प्रतिष्ठानच्यावतीने स्त्रीरोग तज्ञ डॉ. मीरा गोदेपुरे यांच्या हस्ते कर्तृत्ववान महिलांचा सन्मान करण्यात आला.

यशवंतराव चव्हाण सभागृहात हा कार्यक्रम झाला. यावेळी डॉ. गोदेपुरे यांनी स्वतःच्या आरोग्यासाठी वेळ देण्याचे महिलांना आवाहन केले. प्रमुख वक्त्या पंढरपूरच्या आशा पाटील यांनी महिलांचे सक्षमीकरण लघुउद्योग, व्यवसाय याबाबत मार्गदर्शन केले. प्रस्तावना अपर्णा पाटील शिराळ यांनी केली. संयोजक अर्चना विश्वेकर, अनुराधा कोल्हे, अपर्णा पाटील- शिराळ, दिपा गंगावणे, उल्का डोंबे, चैताली गोटे- अंधळकर, प्रियांका अवदूत, वंदना वाघमारे, वंदना देवाणे या आहेत. या कार्यक्रमात नऊजणींना आदर्श आणि यशस्वी महिला सन्मान देण्यात आला. त्यामध्ये मीना निंबर्गीकर (आदर्शमाता), पूनम चंद्रशेखर (यशस्वी उद्योजिका), डॉ. अमृता साखरे पाटील (यशस्वी त्वचा रोगतज्ञ् ), अॅड. श्वेता भादुले (विधीज्ञ् ), प्रार्थना ठोंबरे (जागतिक टेनिस खेळाडू) वीरशैव लिंगायतरत्न पुरस्कार सोनल गुळमिरे (यशस्वी सामाजिक व शैक्षणिक कार्य ), अनिता चिपडे (आदर्श शिक्षिका), माधवी कुंकूकरी (यशस्वी उद्योजिका), बालिका चिपडे (यशस्वी उद्योजिका). मिस लिंगायात आणि मिसेस लिंगायत बार्शी या स्पर्धेमध्ये महिलांनी आणि मुलींनी खूप छान वेशभूषा साकारल्या होत्या. दीपाली कापसे हिने मिसेस लिंगायतचा मुकूट, सर्टिफिकेट, बक्षीस, मेडल आणि शिवशाही पैठणी पटकवली , द्वितीय क्रमांक मयुरी गाढवे यांना मिळाला तर तृतीय क्रमांक मीरा स्वामीला मिळाला. उत्तेजनार्थ स्नेहा पिसेला मिळाला. मिस लिंगायतमध्ये छोटा गट मध्ये प्रथम प्रिशा वायचाळला तर द्वितीय भारती मस्तुद तर तृतीय श्रीशा हगरे यांना मिळाला. मोठा गट मिस लिंगायतमध्ये प्रथम प्रती बगले, गोजिरी पैसे यांना द्वितीय तर तृतीय श्रावणी बिडवे यांना मिळाला. परीक्षक म्हणून वर्षा रसाळ आणि रुपाली बगले यांनी काम केले. पल्लवी उंबरे, शिवशाही पैठणी, बकलीवाल ट्यूटोरिअल्स, अशा कल्याणी, नवयुग आणि अनुराधा कोल्हे, प्राईम कॉम्प्युटर, आयरीस मेकअप अॅकेडमी, बार्शी हे प्रायोजक म्हणून लाभले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चैताली अंधळकर व उल्का डोंबे यांनी केले. अनुराधा कोल्हे यांनी आभार मानले.

## पंढरपुरात रस्त्यावरील खड्ड्यातच पेटवली होळी

### महर्षी वाल्मिकी संघाचे हटके आंदोलन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १५ मार्च -**

पंढरपुरात महर्षी वाल्मिकी संघाच्या वतीने होळीदिवशी नगरपरिषदेच्या जुन्या इमारतीसमोरील रस्त्यावर पडलेल्या मोठ्या खड्ड्यात होळी पेटवून हटके आंदोलन केले.

पंढरपूर नगरपरिषदेच्या जुन्या इमारतीसमोरच्या रस्त्यावर मोठा खड्डा पडला आहे. नगरपरिषद प्रशासनाचे पंढरपूर शहरातील स्वच्छता, रस्ते आदी मुलभूत सुविधांकडे अक्षम्य दुर्लक्ष आहे. याकडे लक्ष वेधत खड्यातच होळी पेटवत महर्षी वाल्मिकी संघाचे संस्थापक अध्यक्ष गणेश अंकुशराव व कार्यकर्त्यांनी पंढरपूर नगरपरिषदेच्या निष्क्रीय प्रशासन व अधिका-यांच्या नावाने बोंब ठोकली. सर्वप्रथम सर्व कार्यकर्त्यांनी परंपरेनुसार होळीचं पुजन केलं आणि होळी समोर घोषणा देत बोंबाबोंब केली. यासंदर्भात बोलताना अध्यक्ष श्री.अंकुशराव म्हणाले, सध्या पंढरपूर नगरपरिषदेचा संपुर्ण कारभार प्रशासनाकडे आहे. परंतु या प्रशासकीय अधिकारी व एकुणच नगरपरिषद प्रशासनाचे पंढरपूर शहरातील स्वच्छता, रस्ते आदी मुलभूत सुविधांकडे अक्षम्य दुर्लक्ष झाले आहे. पंढरपूर शहर हे तिर्थक्षेत्र असुनही शहरात सर्वत्र धुळीचे व घाणीचे साम्राज्य आहे, शहरातील अनेक मार्गांवर मोठमोठे खड्डे आहेत परंतु याकडे प्रशासकीय अधिकारी डोळेझाक करत आहेत. पंढरपूर नगरपरिषदेच्या जुन्या पुरातन इमारतीच्या समोरच गेल्या दोन वर्षांपासून एक भला मोठ्ठा खड्डा असून या खड्ड्यांमुळे अनेक अपघात घडले आहेत. पावसाळ्यात या खड्ड्यात पाणी साठल्यामुळे हा खड्डा अतिशय धोकादायक ठरत आहे. आम्ही वारंवार हा खड्डा बुजवण्याची विनंती करूनही नगरपालिका प्रशासनाला जाग येत नाही. त्यामुळे आज याच खड्ड्यात होळी पेटवून होळीचा सण साजरा करत असतानाच पंढरपूर नगरपरिषदेच्या निष्क्रीय प्रशासन आणि अधिकाऱ्यांचा आम्ही निषेध केला आहे. वास्तविक पंढरपूर हे तिर्थक्षेत्र असल्यामुळे शासनाकडून कोट्यावधींचा निधी पंढरपूर नगरपरिषदेला येतो. याचबरोबर नागरिकांकडूनही कररूपाने मोठी कमाई होते तरी सुद्धा येथील मुलभूत सोयी सुविधा नगरपालिका प्रशासन पुरवू शकत नसेल तर हा कोट्यावधींचा जमा झालेला निधी कुठं जातो? असा खडा सवाल ही यावेळी अंकुशराव यांनी उपस्थित केला. यावेळी गणेश अंकुशराव, रामभाऊ सुरवसे, सुरज कांबळे, आण्णा अधटराव, मारूती अधटराव, यश अंकुशराव, अप्पा करकमकर, माऊली कोळी, सुरज अभंगराव, बालाजी कोळी, कैलास कांबळे, आबा अधटराव, प्रेम अधटराव, श्रावण कोताळकर, विनायक अभंगराव, आण्णाप्पा मंगुडे, नितीन कडलासकर, भैया तारापूरकर, संतोष थोरात, प्रकाश जोशी यांचेसह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.



## मालवंडी येथे गोवंश मांस विक्रीप्रकरणी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी दि १५ मार्च-**

तालुक्यातील मालवंडी येथे गोवंश मांस विक्री करत असल्याची गोपनीय माहिती मिळाल्यानंतर प्राणीमित्र संघटनेच्या मदतीने पोलिसांनी छापा टाकून एका आरोपीला रंगेहात पकडले असून, दुसरा आरोपी फरार झाला आहे.प्राणीमित्र संघटनेचे कार्यकर्ते वैभव काथवटे यांना दि. १४ मार्च रोजी सकाळी ८ वाजता गोपनीय बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, मालवंडी येथे दोन इसम गोवंश जातीचे मांस विक्री करत आहेत. त्यांनी बार्शी तालुका पोलीस ठाण्याचे सपोनि ढेरे यांना याची माहिती दिली. त्यांच्या आदेशानुसार पोलीस पथक आणि प्राणीमित्र संघटनेचे सदस्य घटनास्थळी पोहोचले. धानोरे रोडवरील पाण्याच्या टाकीजवळ दोन इसम पांढऱ्या गोणी व पिशवी घेऊन बसलेले आढळले. पोलिसांनी त्यातील एकाला ताब्यात घेतले तर दुसरा इसम पळून जाण्यात यशस्वी झाला. पकडलेल्या व्यक्तीने आपले नाव सर्फराज खलील कुरेशी (वय ३२, रा. पापनस, ता. माढा, जि. सोलापूर) असल्याचे सांगितले. त्याने पळून गेलेल्या व्यक्तीचे नाव शहानवाज खलील कुरेशी (रा. पापनस, ता. माढा, जि. सोलापूर) असे असल्याचे कबूल केले.



## अन्नछत्रातील सेवाभाव मनोभावे : न्यायमूर्ती सिद्धार्थ करपे

**अक्कलकोट, दि १५ मार्च-**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जन्मेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली स्वामी भक्तांना देत असलेल्या सुविधा ह्या उत्तम असून, न्यासाचे पदाधिकारी व सेवेकऱ्याकडून मनोभावे सेवा देत असल्याचे मनोगत मुंबई उच्चन्यायालयाचे न्यायमूर्ती सिद्धार्थ करपे यांनी व्यक्त केले.

ते श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ येथे सहपरिवार आले असता न्यासाचे पुरोहित अप्पू पुजारी यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र, श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी ते बोलत होते. यावेळी अक्कलकोट पंचायत समितीचे विस्तार अधिकारी अमर दोडमनी, शिवप्पा विभूते न्यासाचे सौरभ मोरे, नामा भोसले, अतिश पवार, स्वामिनाथ बाबर, गोटू माने, निखील पाटील, सतीश महिंद्रकर, शहाजीबापू यादव, बाळासाहेब घाडगे, संभाजीराव पवार, श्रीनिवास गवंडी, दत्ता माने, तानाजी पाटील, राजू पवार, रमेश हेगडे, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, बसवराज क्यार, अनिल बिराजदार, चंद्रकांत हिबारे, एस के स्वामी, शावरेप्पा माणकोजी, कल्याण देशमुख, विशाल घाडगे, रोहित कदम, संभाजीराव पवार, विठ्ठल रेड्डी, समर्थ चव्हाण यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

## अन्नछत्राचे कार्य उल्लेखनीय : मंत्री चंद्रकांत पाटील

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट, दि १५ मार्च**

अन्नछत्र मंडळाकडून एकाच छताखाली महाप्रसाद सेवेबरोबरच विविध उपक्रम उल्लेखनीयरित्या राबविले जात असल्याचे मत राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी व्यक्त केले.

त्यांनी नुकतीच सहपरिवार श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळास भेट दिली. न्यासाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले व अमोलराजे भोसले यांच्या उपस्थितीत आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या हस्ते श्रींची मूर्ती, कृपावस्त्र, पुष्पहार श्रीफळ देऊन मंत्री पाटील यांचा सत्कार करण्यात आला. त्यांच्या समवेत पत्नी अंजली पाटील उपस्थित होत्या. मंत्री पाटील पुढे म्हणाले, श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाने गेल्या ३८ वर्षाच्या कालखंडात श्री स्वामी भक्तांच्या सेवेबरोबरच न्यासाकडून सुरु केलेल्या दिव्यांग व निराधारांना समर्थ महाप्रसादसेवा, शहर व तालुक्यातील कुस्तीगीरांसाठी प्रसादरुपी खुराक दिला जातो. ही बाब कौतुकास्पद असून, राज्यातील धर्मादाय संस्थांनी अन्नछत्र मंडळाचा आदर्श घेतला पाहिजे. श्रीक्षेत्र अक्कलकोटच्या विकासात अन्नछत्र मंडळामुळे भर पडली आहे.

यावेळी मोहन डांगरे, राहूल डांगरे, मल्लिनाथ स्वामी, महेश हिंडोळे, प्रदिप पाटील, धनंजय गाढवे, मल्लिकार्जुन आळगी, लखन झंपले, मनोज निकम, अरविंद शिंदे, दत्ता माने, बाळासाहेब कुलकर्णी-देसाई-बबलादकर, उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे काका, आप्पा हंचाटे, पुरोहित अप्पू पुजारी, सोमकांत कुलकर्णी, रवी वाघमोडे, बालाजी कटारे, सचिन कलबुर्गी,निखील पाटील, गोटू माने, गोविंदराव शिंदे, सरफराज शेख, मैनुद्दीन कोरबू, राहूल इंडे, सतीश महिंद्रकर, शहाजीबापू यादव, नामा भोसले, बाळासाहेब घाडगे, राजू पवार, प्रसाद हुल्ले, श्रीनिवास गवंडी, दत्ता माने, तानाजी पाटील, रमेश हेगडे, , अनिल बिराजदार, चंद्रकांत हिबारे, रोहित कदम, एस के स्वामी, मल्लिनाथ कोगनुरे, शावरेप्पा माणकोजी, कल्याण देशमुख, धनंजय निंबाळकर, भाग्येश बंडू चुंगीकर, विशाल घाडगे, विठ्ठल रेड्डी यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.



CMYK

आपला
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## नियतकालिक स्पर्धेत शिवाजी महाविद्यालय द्वितीय

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. १५ मार्च-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या वतीने घेण्यात आलेल्या 'सृजनरंग नियतकालिक स्पर्धा २०२३-२४' मध्ये येथील श्री शिवाजी महाविद्यालयाने विविध कला प्रकारांत दहा पारितोषिकांसह द्वितीय क्रमांकाचे सर्वसाधारण विजेतेपद पटकावले.




मराठी भाषेसाठी कथात्म लेखन (प्रथम) स्नेहा देबडवार, समीक्षात्मक लेखन (प्रथम) सोमनाथ शेंडगे, संस्कृत भाषेसाठी काव्यात्म लेखन (द्वितीय) ऋतुजा उकिरडे, कथात्म लेखन (प्रथम) ऋचा देशमुख, नाट्यात्म लेखन (द्वितीय) पूजा जाधव, नाट्यात्म लेखन (तृतीय) ऋषिकेश चौरे, वैचारिक लेखन (तृतीय) अमृता वांगदरे, इंग्रजी भाषेसाठी वैचारिक लेखन (प्रथम) रामेश्वर बागल तर नियतकालिकाचे सर्वोत्कृष्ठ मुखपृष्ठ तयार केल्याबद्दल गायत्री देशमुखे या विद्यार्थिनीस तृतीय क्रमांकाचे पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.



## संक्षिप्त वृत्त...



### पिलीवचा सारंग पाटील राज्य वेटलिफ्टिंग स्पर्धेत प्रथम

**पिलीव, दि.१५ मार्च -**

पिलीव (ता. माळशिरस) येथील सारंग पाटील याने पुणे जिल्ह्यातील भोर कॉलेज मध्ये पार पडलेल्या राज्यस्तरीय वेटलिफ्टिंग स्पर्धेत ९४ किलो वजनगटात प्रथम क्रमांक मिळविला. तो सध्या पानीव येथील श्रीराम शिक्षण संस्थेत शिक्षण घेत आहे. सारंग पाटील यास सुखदेव घूले, महादेव काळे, विक्रम शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल श्रीराम शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील, मार्गदर्शक श्रीलेखा पाटील, उपाध्यक्ष करण पाटील, सचिव डॉ. अभिषेक पाटील, विशेष कार्यकारी अधिकारी विनोद बाबर, प्राचार्य प्रकाश धाईंजे तसेच पिलीव, झिंजेवस्ती, कुसमोड परीसरातील राजकीय, शैक्षणिक, सामाजिक व इतर विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून या यशाबद्दल सारंगचे अभिनंदन व कौतुक होत आहे.

### पिलीव येथील हुमैरा व सुलेमान या बहीण-भावांचा पहिला रोजा

**पिलीव, दि. १५ मार्च -**



पिलीव (ता. माळशिरस) येथील पाच वर्षाच्या हुमेरा जुबेर पठाण व सुलेमान शाबीर पठाण या दोघांनी पवित्र रमजान महीन्यातील पहीला रोजा केला. एवढया छोट्या वयात सुद्धा आपल्या धर्मातील पवित्र रोजा ठेवून पावित्र्य जपल्याबददल हुमेरा व सुलेमान यांचे अभिनंदन व कौतुक होत आहे.




### अक्कलकोटमधे लहुजी शक्ती सेनेने सुरू केली पाणपोई

**अक्कलकोट, दि.१५ मार्च -**

तीव्र उन्हाळ्यात तहानलेल्यांना स्वच्छ, शुद्ध, थंड पाणीसहज मिळावे यासाठी येथील लहुजी शक्ती सेनेच्यटावतीने पाणपोई सुरू करण्यात आली. त्याचा प्रारंभ पोलीस निरिक्षक राजेद्र टाकणे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी लहुजी शक्ती सेना जिल्हाध्यक्ष वसंत देडे, अहमदपाशा पिरजादे, स्टेट बँकेचे दिवाणजी, कमल होटकर, मंजुर टिनवाला, श्रीमंत गंगा, स्वामीनाथ गवळी आदि मान्यवर उपस्थित होते. उन्हाची तीव्रता वाढल्याने अंत्यंत गजबजलेल्या न्यायालय, शाळा, बँक परिसरात पाणपोई सुरू झाल्याने नागरिकातून समाधान व्यक्त होत आहे.

### श्री नरसिंह गणेश मंदिरातील दानपेटी चोरीतील आरोपी अखेर जेलबंद

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभूर्णी, दि. १५ मार्च -**

**टेंभुर्णी पोलीस स्टेशन व अकलूज पोलीस स्टेशन यांची संयुक्त कामगिरी**



टेंभुर्णी शहरातील महादेव गल्ली येथील ७ जुलै २०२४ रोजी आठ महिन्यापूर्वी टेंभुर्णी पोलीस स्टेशन हद्दीतील श्री नरसिंह नगर टेंभुर्णी येथे नरसिंह प्रतिष्ठान नरसिंह नगर टेंभुर्णी यांच्या वतीने उभारण्यात आलेल्या श्री गणेश मंदिरातील दानपेटी अज्ञात चोरट्याने चोरून नेले होती बाबत नरसिंह प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रमोद केशव पवार यांनी फिर्याद दाखल केली होती. श्री गणेश मंदिरातील उपलब्ध सीसीटीव्ही फुटेच्या माध्यमातून आरोपीचा शोध घेतला असता यातील आरोपी नामे युवराज उर्फ सोन्या दादा खंडागळे वय २२वर्ष रा. महर्षी कॉलनी अकलूज ता. माळशिरस जिल्हा सोलापूर येथील असल्याची व तो १४ मार्च रोजी रोजी अकलूज येते आल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती.. टेंभुर्णी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक दीपक पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे अन्वेषण पथकाचे पोलीस उपनिरीक्षक कुलदीप सोनटक्के,पोलिस अंमलदार विनोद साठे, पोलीस अंमलदार संदीप गिरामकर, विलास नलवडे, प्रवीण साठे तसेच अकलूज पोलीस स्टेशन कडील पोलीस अंमलदार शिवकुमार मदभावी यांनी अकलूज येथे सदर आरोपीला ताब्यात घेतले व अधिक चौकशी केली असता आरोपीने दानपेटीतील पैसे चोरी केल्याचे कबूल केले आहे. पुढील तपास टेंभुर्णी पोलीस स्टेशनचे पोलीस अंमलदार संदीप गिरमकर हे तपास करत आहेत. नरसिंह प्रतिष्ठानच्या वतीने पोलीस निरीक्षक दीपक पाटील व सर्व स्टाफचे अभिनंदन करून आभार मानण्यात आले. तसेच येत्या संकष्ट चतुर्थीला सर्व स्टाफचा भव्य सत्कार समारंभ नरसिंह प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात येणार असल्याची माहिती मंडळाचे अध्यक्ष पवार यांनी दिली

## औरंगजेबाची कबर शौर्याचे नव्हे क्रुरतेचे प्रतिक : देशमुख

**बेजबाबदार वक्तव्य केल्याने माढ्याच्या लोकप्रतिनिधीवर गुन्हा दाखल करण्याची प्रशांत देशमुखांची मागणी**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१५ मार्च -**

पंढरपूर तालुक्याचे सुपुत्र व माढ्याचे लोकप्रतिनिधी यांनी औरंगजेबाची कबर शौर्याचे प्रतीक असल्याचे बेजबाबदार वक्तव्य केले आहे. आपली मतपेढी कमी होऊ नये यासाठी त्यांनी हे वक्तव्य केले असून याची चौकशी होऊन त्यांच्यावर राज्य शासनाने मराठी बांधवांच्या भावना दुखावण्याचा गुन्हा दाखल करावा अशी मागणी पंढरपूर तालुका पंचायत समितीचे माजी उपसभापती प्रशांत देशमुख यांनी केली आहे

या संदर्भात देशमुख यांनी एक निवेदन प्रसिद्धीस दिले असून त्यात त्यांनी नमूद केले आहे की, ज्या औरंगजेबाने सत्तेसाठी सख्या चार भावांचा खून केला, वडिलांना तुरुंगात टाकले त्या औरंगजेबानेच आपल्या छत्रपती संभाजी राजांचे हाल हाल केले. त्याची कबर शौर्याचे प्रतीक कशी असू शकते ? वास्तविक त्याची कबर ही क्रूरतेचे प्रतीक आहे. मात्र माढ्याच्या लोकप्रतिनिधींनी त्याच्या कबरीस शौर्याचे प्रतीक म्हणून तमाम मराठी बांधवांचा अपमान केला असून याचा निषेध व्यक्त करतो. छत्रपती शिवाजी महाराजांचे वंशज खासदार उदयनराजे भोसले यांनी औरंगजेबाची कबर काढून टाका अशी भावना व्यक्त केली होती. राज्यभरातील जनतेने याला पाठिंबा दिला असताना पंढरपूर तालुक्याचे सुपुत्र व माढ्याचे लोकप्रतिनिधी यांनी औरंगजेबाची कबर शौर्याचे प्रतीक असल्याचे बेजबाबदार वक्तव्य केले आहे. यातून त्यांनी संपूर्ण महाराष्ट्राचा अपमान केला आहे.

खरे तर अफजलखानाने महाराष्ट्रात आल्यानंतर आई तुळजाभवानी व श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरावर देखील हल्ला केला होता. याच अफजलखानाच्या तावडीतून संत प्रल्हाद महाराज बडवे यांनी श्री विठ्ठलाची मूर्ती पंढरपूर नजीक असणाऱ्या देगाव येथील सूर्यकांत पाटील यांच्या विहिरीत लपवून ठेवली होती. या सूर्यकांत पाटील यांचे वंशज म्हणून विद्यमान माढ्याचे लोकप्रतिनिधी अभिमानाने सांगतात. एकीकडे श्री विठ्ठलाचे मूर्तीचे संरक्षण केले म्हणायचे आणि दुसरीकडे महाराष्ट्र दृष्ट्या व स्वराज्याचा विरोधक असणाऱ्या औरंगजेबाची कबर शौर्याचे प्रतीक मानणाऱ्या प्रवृत्तीचा आम्ही निषेध करतो असेही देशमुख यांनी आपल्या निवेदनात नमूद केले आहे.

या बरोबरच माढ्याच्या लोकप्रतिनिधींनी हे वक्तव्य केवळ राजकीय लाचारीतून केले असून त्यांच्या पक्षाचा हा अनेक वर्षापासूनचा छुपा अजेंडाच आहे. आपली मतपेढी कमी होऊ नये यासाठी त्यांनी हे वक्तव्य केले असून याची चौकशी होऊन त्यांच्यावर राज्य शासनाने मराठी बांधवांच्या भावना दुखावण्याचा गुन्हा दाखल करावा अशी मागणी देखील पंचायत समितीचे माजी उपसभापती प्रशांत देशमुख यांनी आपल्या निवेदनाद्वारे केली आहे.

## मंद्रूपमध्ये आज हिंदू स्मशानभूमी स्वच्छता अभियान

**सोलापूर दि.१५ मार्च -**

आम्ही मंद्रूपकर, रानवेध फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि.१६) सकाळी सहा ते दहा वाजेपर्यंत हिंदू स्मशानभूमीची स्वच्छता अभियान राबविण्यात येईल. स्वयंस्फुर्तीने स्मशानभूमी स्वच्छता करून, सामाजिक कार्याची संकल्पना 'आम्ही मंद्रूपकर' तर्फे राबवण्यात येत आहे. गावातील तरुणाई खराटा घेऊन स्मशानभूमी स्वच्छता करतात. तेथील राख झाडांना घालण्यात येते. तिरडीच्या बांबूपासून त्या परिसरातील झाडांना संरक्षक कुंपन करण्यात येते. मागील चार वर्षांपासून या उपक्रमास मंद्रूप ग्रामपंचायतीतर्फे सहकार्य मिळते. स्वयंस्फुर्तीने 'रानवेध व आम्ही मंद्रूपकर'ची दखल घेऊन जिल्हा परिषदेच्या स्वच्छता व पाणी पुरवठा विभागातर्फे सन्मान करण्यात आला होता.



## आमदार म्हणून नागरिकांच्याच बाजूने राहणार : आ. आवताडे

**पंढरीतील कॅरीडोर प्रकरणी घेतली नागरिकाची बैठक**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१५ मार्च -**

पंढरपूर शहराच्या विकासासाठी सरकारने कॅरीडॉर राबविण्याचा विचार पक्का केला आहे. मात्र यासाठी पंढरपूर येथील नागरिकांची मते आजमावणे हे माझे पहिले कर्तव्य आहे. त्यासाठी आपण ही बैठक आयोजित केली आहे. त्यामुळे शासन दरबारी नेमकी माझी भूमिका काय असावी. ही दाखविण्याची वेळ आल्यास आपण चुकीच्या पद्धतीने काम व अन्याय होत असेल तर मी आमदार म्हणून नागरिकांच्याच पाठीशी उभा राहीन असे आश्वासन आमदार समाधान आवताडे यांनी दिले.

पंढरपूर येथिल कारीडॉरबाबत नागरिकांची मते जाणून घेण्यासाठी पंढरपूर-मंगळवेढा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांनी शासकीय विश्रामगृहात गुरुवारी बैठक घेतली. यावेळी पंढरपूर शहर आणि श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसरातील रहिवाशी नागरिक आणि व्यापारी यांना निमंत्रित केले होते. गेल्या काही वर्षांपासून पंढरपूर कॅरीडॉर विषय चर्चेत असून मंदिर परिसरातील बाधित लोकांनी विरोध दर्शवला होता .तर पंढरपुरातील काहीजण कॅरीडॉरचे समर्थन देखील करत आहेत. यावर या बैठकीत साधक बाधक चर्चा झाली.नागरिक आणि व्यापाऱ्यांनी आपापली मते या बैठकीत नोंदवली. त्यानंतर आमदार समाधान आवताडे यांनी कॅरीडॉरबाबत प्रशासनाकडून अजून कोणताही आराखडा आलेला नाही. परंतु सभागृहात जर हा विषय चर्चेला आला तर लोकांचे मत काय आहे हे लोकप्रतिनिधी म्हणून मला माहित असावे यासाठी ही बैठक घेतली असून जे इथल्या लोकांचे मत आहे तेच माझे देखील मत आहे. परंतु कॅरीडॉरला विरोध आहे असा याचा अर्थ नाही. तर ते करताना कोणालाही त्रास होणार नाही अशा पद्धतीने करणे गरजेचे आहे असे सांगितले. त्याचबरोबर पंढरपूरकरांचा कॅरीडॉरला विरोध आहे असे माध्यमांनी म्हणू नये. केवळ काहीं भागांतील नुकसान होत असल्याने त्या भागाचा योग्य विचार करू. मात्र याचा सर्वार्थ येथील कॅरीडोर प्रकल्पालाच पूर्णतः विरोध असल्याचे बसवू नये असेही आ.समाधान आवताडे यांनी सुचवले. विकासात्मक गोष्टीला विरोध न करण्याचेही आवाहन यावेळी आमदार समाधान आवताडे यांनी केले.

## रस्त्यावरील खड्ड्याबाबत स्वाभीमानीचे ठिय्या आंदोलन

**सार्वजनिक बांधकाम विभागाने सुरू केली तत्काळ दुरुस्ती**

**तभा वृत्तसेवा**
**पिलीव, दि. १५ मार्च -**



> उपकार्यकारी अभियंत्यांच्या कार्यालयात स्वाभिमानीच्या कार्यकर्त्यांनी ठिय्या आंदोलन केले यावेळी सा बां विभागाने तात्काळ दुरुस्ती करण्याचे लेखी पत्र दिले आणि १५ मार्च रोजी या रस्त्यावरील खड्डे भरून रस्ता दुरुस्त केला जात आहे. स्वाभिमानीच्या आंदोलनाला यश आल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाचे आम्ही आभार मानतो.
>
> **- अजित बोरकर, स्वाभिमानी शेतकरी संघटना**

अकलूज-निमगाव रस्त्यावर मोठे खड्डे पडून रस्ता खराब झाल्यामुळे हा रस्ता मृत्यूचा सापळा बनला आहे. अक्षरशः जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे अनेक अपघातही या रस्त्यावर झाले आहेत. याकडे लक्ष वेधण्यासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे तालुकाध्यक्ष अजित बोरकर यांच्या नेतृत्वाखाली अकलूज येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उपकार्यकारी अभियंता कार्यालयात ठिय्या आंदोलन केले. तर रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यांमध्ये वृक्षारोपण करण्याचा इशारा दिला त्यामुळे या विभागाला जाग येऊन त्यांनी शनिवार १५ मार्च रोजी या रस्त्यावरील खड्डे बुजविण्यास सुरुवात केली आहे.

माळशिरस तालुक्यातील अकलूज ही मोठी बाजारपेठ असल्याने अकलूज मेडिकल हब, महाविद्यालय, शासकीय कार्यालये असल्याने सतत लोक ये जा करीत असतात साखर कारखाना असल्याने या रस्त्यावरून ऊस वाहतूक करणाऱ्या अवजड वाहनांच्या वाहतुकीमुळे रस्त्याला मोठ मोठे खड्डे पडले आहेत. खराब रस्त्यामुळे वाहन चालवताना तारेवरची कसरत करावी लागत आहे तर वाहन चालक प्रवासी शालेय विद्यार्थ्यांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. नागरिकांना मणक्याच्या आजाराचा त्रास होत आहे. तात्काळ उपचार कराव्या लागणाऱ्या रुग्णांना खराब रस्त्यामुळे वेळेत हॉस्पिटलमध्ये नेता येत नसल्यामुळे उपचार वेळेत न झाल्याने रुग्णांचे हाल होत आहेत. बांधकाम विभागाने तात्काळ हे खड्डे भरून देखभाल दुरुस्ती करून घ्यावी अन्यथा बांधकाम विभागाचा निषेध म्हणून खड्ड्यामध्ये वृक्षारोपण करण्यात येणार होते. यावेळी स्वाभिमानीचे ज्येष्ठ नेते मगन काळे, विजय नेवसे, तालुकाध्यक्ष अजित बोरकर, तेजस भाकरे, साधू राऊत, विलास काळे, संतोष सूर्यवंशी, शिवाजी वाघमारे, सचिन बोरकर, नानासाहेब जानकर, उमेश काळे, सागर सावंत, अनिकेत मदने, विजय वाघबरे आदी उपस्थित होते.

## नवीन शैक्षणिक पध्दती आत्मसात करावी

**तज्ञ मार्गदर्शक हिरेमठ यांचे मत**

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट दि. १५ मार्च**



> **भविष्यात विद्यार्थ्यांच्या क्षमता विकसित होणार**
>
> नवीन शैक्षणिक धोरण, राज्य अभ्यासक्रम आराखडा, शाळा गुणवत्ता आणि आश्वासन आराखडा, क्षमता आधारित अध्यापन व मूल्यांकन कार्यनीती, स्तरनिहाय समग्र प्रगतिपत्रक आदी विषयांवर प्रशिक्षणार्थी शिक्षकांना प्रात्यक्षिकांसह सखोल मार्गदर्शन मिळत आहे. या प्रशिक्षणातून शिक्षकांच्या क्षमता समृद्ध होऊन भविष्यात विद्यार्थ्यांच्या क्षमता विकसित होणार आहे.
>
> **- शरद कुंभार, प्रशिक्षण समन्वयक, पंचायत समिती अक्कलकोट.**

शिक्षकांनी नवीन शैक्षणिक पद्धती आत्मसात करून विद्यार्थ्यांना उत्तम ज्ञान देणे हेच या शिक्षक क्षमता वृद्धी प्रशिक्षण कार्यक्रमाचे प्रमुख उद्दिष्ट असल्याचे मत तज्ञ मार्गदर्शक बसय्या हिरेमठ यांनी व्यक्त केले.

अक्कलकोट तालुक्यातील कोन्हाळी येथील आश्रम शाळेत १० मार्च ते १५ मार्च २५ पर्यंत खासगी अनुदानित, जिल्हा परिषद, नगर परिषद, आश्रम शाळेतील पहिली ते बारावीपर्यंत अध्यापन करणाऱ्या शिक्षक व मुख्याध्यापकांच्या क्षमता वृद्धी प्रशिक्षणाच्या चौथ्या टप्प्यातील शिक्षक प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन करताना बसय्या हिरेमठ हे बोलत होते. यावेळी प्रशिक्षणाचे समन्वयक शरद कुंभार, डॉ प्रभाकर बुध्दाराम, गणेश अंबुरे, गोविंद राठोड तर तज्ञ मार्गदर्शक म्हणून परमेश्वर व्हसुरे, अविनाश मोरे, दत्तात्रय सावंत, ज्ञानोबा केंद्रे, रविराज खडाखडे, इंद्रसेन पवार, जीवराज खोबरे, तुकाराम जाधव आदी सह तालुक्यातील पहिली ते बारावी पर्यंतचे ३०७ शिक्षक प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

## पंढरपूर अधिवक्ता संघामध्ये महिला दिन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१५ मार्च -**




पंढरपूर अधिवक्ता संघातर्फे जागतिक महिला दिनानिमित्त समाजात न्यायदानाचे कार्य करणाऱ्या वकिलरुपी सरस्वतींचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दिवाणी न्यायाधीश पाखले मॅडम तर प्रमुख पाहुण्या राष्ट्रपती पुरस्कार विजेत्या चंदाताई तिवाडी होत्या.

पाखले मॅडम म्हणाल्या, अर्धे जग हे स्त्रियांनी व्यापलेले असून उर्वरित जग हे स्त्रियांवरच अवलंबून आहे.कार्यक्रमाचे प्रास्ताविक विधीज्ञ धनश्री घाडगे यांनी केले. अधिवक्ता संघाचे अध्यक्ष राजेश चौगुले यांचेही यावेळी भाषण झाले. सचिव अभयसिंह देशमुख यांनी सर्व न्यायिक अधिकाऱ्यांचें स्वागत केल व महिलांबद्दलच्या कायद्याचा वापर करून महिलांनी अधिकाधिक प्रगती करावी असे आवाहन केले. पंढरपूर न्यायालयात नव्याने रुजू झालेले अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश एस. जी. नंदीमठ यांचाही सत्कार अधिवक्ता संघातर्फे यावेळी करण्यात आला. यावेळी विधीज्ञ शिर्के, क्रांती कदम, फुगारे उपस्थित होत्या. सूत्रसंचालन अँड. वर्षा हिरणवाले यांनी केलं. उपाध्यक्ष महेश कसबे यांनी आभार मानले.

## करकंब पोलिसांची सराईत गुन्हेगार बालाजी पवारवर स्थानबद्धतेची कारवाई

**येरवडा जेलमध्ये केली रवानगी**

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि.१५ मार्च-**

खेडभोसे (ता.पंढरपूर) येथील रेकॉर्डवरील गुन्हेगार बालाजी हनुमंत पवार हा करकंब पोलीस ठाणे व इतर पोलीस ठाणे अंतर्गत खुनाचा प्रयत्न, वाळूचोरी, विनयभंग, जबरी चोरी, मारामारी अशा विविध गुन्ह्यांमध्ये सक्रिय असून त्यास दोन वेळेस तडीपार करूनही वारंवार गुन्हे करीत होता. करकंब पोलीस पथकाने दि.११ मार्च रोजी मोहोळ येथून ताब्यात घेऊन त्यास स्थानबध्द करून पुण्याच्या येरवडा जेलमध्ये रवानगी केली.



यापुढेही रेकॉर्डवरील सर्व गुन्हेगार, दोन पेक्षा जास्त गुन्हे असलेले आरोपी, हातभट्टीवाले, वाळुतस्कर, गुंड व दादा, गुन्हेगारी टोळीवर करकंब पोलिस तडीपार, हद्दपार व स्थानबद्ध अशा इसमांवर कडक कारवाई करणार आहेत. करकंब पोलीस ठाणे हद्दीतील रेकॉर्डवरील या सराईत गुन्हेगारावर दोनपेक्षा जास्त दखलपात्र गुन्हे असून त्यामध्ये जामिनावर असतानाही तो पुन्हा पुन्हा मारामारी, खुनाचा प्रयत्न, चोरी व जबरी चोरी यासारखे गुन्हे करीत आहे. तसेच त्याचेवर प्रतिबंधात्मक कारवाई करूनही त्याच्यामध्ये फरक पडत नसल्याने सराईत गुंड याचेवर महाराष्ट्र झोपडपट्टी दादा, हातभट्टीवाले, औषधी द्रव्यविषयक गुन्हेगार धोकादायक व्यक्ती, दृकश्राव्य कलाकृतीचे विनापरवाना प्रदर्शन करणारे व्यक्ती (व्हिडिओपायरेट्स),वाळू तस्कर, अत्यावश्यक वस्तूंच्या काळाबाजार करणारे व्यक्तींच्या विघातक कृत्यांना प्रतिबंधक सुधारित अधिनियम २०१५चे कलम ३(१)प्रमाणे १ वर्षाकरिता स्थानबद्ध करणेकरीता पोलीस अधीक्षक व उपविभागीय पोलीस अधिकारी पंढरपूर यांचेमार्फत प्रस्ताव पाठविण्यात आला होता.

ही कामगिरी जिल्हाधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी व अप्पर पोलीस अधीक्षक प्रितम यावलकर तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी पंढरपूर विभाग डॉ.अर्जुन भोसले, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक निंबाळकर यांचे मार्गदर्शनाखाली करकंब पोलीस ठाण्याचे प्रभारी सहाय्यक पोलीस निरिक्षक सागर कुंजिर, पोलीस उपनिरीक्षक निलेश गायकवाड, संजय मुळे यांचेसह सहाय्यक फाजदारै शेंडगे, हवालदार आर.आर.जाधव, मोरे, कांबळे, सागर भोसले, शिकतोडे, पोलीस हजारे, लेंगरे, गायकवाड तसेच स्थानिक गुन्हे शाखेचे अनिस शेख यांनी कामगिरी बजावली.

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## दरोड्याच्या तयारीत असलेल्या पाच जणांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१५ मार्च -**

परंडा पोलिसांनी दरोड्याच्या तयारीत असलेल्या पाच जणांना अटक करून त्यांच्या ताब्यातून गावठी पिस्तूल, जिवंत काडतूस आणि लोखंडी कत्त्या जप्त केल्या आहेत.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, सचिन नवनाथ इतापे, तुषार भारत शिंदे (रा. लोणी, ता. परंडा), सुजित लक्ष्मण पवार, चैतन्य पांडुरंग शेळके (रा. भोत्रा, ता. परंडा), आणि वैभव गोरख कोडलिंगे (रा. शेंद्री, ता. बार्शी) हे पाचजण १४ मार्च रोजी पहाटे तीन वाजता परंडा ते देवगाव रोडवरील दीपक केरबा गरड यांच्या शेताजवळ दरोड्याच्या उद्देशाने एकत्र आले होते.

गुप्त माहितीच्या आधारे परंडा पोलिसांनी घटनास्थळी छापा टाकला असता आरोपींकडून एक गावठी पिस्तूल (सुमारे १०,००० रुपये किमतीचे), एक जिवंत काडतूस आणि दोन लोखंडी कत्त्या जप्त करण्यात आल्या. तसेच, आरोपींनी हद्दपार आदेशाचे उल्लंघन केल्याचेही निष्पन्न झाले.

याप्रकरणी पोलीस कर्मचारी नितीन प्रकाशराव गुंडाळे यांनी फिर्याद दिली असून, आरोपींवर भादंवि कलम ३१० (४), ३१० (५) सह ३, ४, २५ शस्त्र अधिनियम आणि महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ५६(अ)/१४२ अन्वये परंडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास परंडा पोलीस करत आहेत.



### संक्षिप्त वृत्त...



#### हनुमान मंदिराच्या शिखर दुरुस्ती कामाचे उद्‌घाटन

**लातूर, दि.१५ मार्च -**

येथील सावेवाडी, रामलाल नगर येथील हनुमान मंदिर येथे ९ मार्च रोजी समाज बांधवाची शिखर दुरुस्ती कामाची बैठक पार पडली होती. यामध्ये सर्वानुमते शिखर दुरुस्ती काम करण्याचा ठराव मंजूर झाल्याप्रमाणे दि. १५ मार्च रोजी या शिखर दुरुस्ती कामाचा शुभारंभ मा.पप्पूभाई धोत्रे यांच्या हस्ते पूजा करुन कामास सुरुवात करण्यात आली. सदर शिखर नूतनीकरणाचे काम १२ एप्रिल हनुमान जन्मोत्सवापर्यंत शिखराचे काम पूर्ण होईल. तसेच सुंदर व सुबक नूतन शिखराचे काम करण्यात येणार असल्याची माहिती पप्पूभाई धोत्रे यांनी यावेळी दिली. यावेळी पुजारी विश्वनाथ स्वामी, शिखराचे शिल्पकार भीम राव अण्णा, यल्लाप्पा इरकल, रमाकांत इरकल, बालाजी धोत्रे, नागनाथ मुद्दे, मरगू धोत्रे यांच्या आदी समाजबांधव यावेळी उपस्थित होते.



#### वागदरी येथे कचरा जाळून होळी साजरी

**जळकोट, दि.१५ मार्च -**

पारंपारिक पद्धतीला फाटा देवून तुळजापूर तालुक्यातील भिमनगर, वागदरी येथे कचरा जाळून आधूनिक पद्धतीने होळी साजरी करण्यात आली. येथील समाज मंदिरासमोरील पटांगण समोरील सर्व कचरा एकत्र करून कचऱ्याचा ढीग केला आणि कचऱ्याच्या ढीगाची होळी पेटवून स्वच्छतेचा संदेश देत आधुनिक पध्दतीने होळी सण साजरा करण्यात आला. यावेळी भीमशाहीर शिवाजी वाघमारे, अनिल वाघमारे, नामदेव वाघमारे, एस.के. गायकवाड, कार्यकर्ते उपस्थित होते.

# अर्थसंकल्पात जिल्ह्याला निधी नाही; सरकारने आश्वासने पूर्ण करावीत

**खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर ,आमदार कैलास पाटील आणि आमदार प्रवीण स्वामी यांची संयुक्त पत्रकार परिषद...**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१५ मार्च -**



राज्य सरकारच्या अर्थसंकल्पात जिल्ह्याला कोणताही विशेष निधी न मिळाल्याने आमदार कैलास पाटील यांनी नाराजी व्यक्त केली आहे. त्यांनी आयोजित पत्रकार परिषदेत याबाबत माहिती दिली. केंद्र सरकारच्या कृषी मंत्रालयाने ३० एप्रिल २०२४ रोजी काढलेल्या परिपत्रकामुळे नुकसान भरपाई मिळण्यास अडचणी निर्माण झाल्याचाही ते म्हणाले. यावेळी खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर, उमरगा लोहाऱ्याचे आमदार प्रवीण स्वामी आदींची उपस्थिती होती.

आमदार पाटील म्हणाले, जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी विशेष तरतुदींची गरज होती. मात्र, यंदाच्या अर्थसंकल्पात जिल्ह्यासाठी कोणताही विशेष निधी घोषित करण्यात आलेला नाही. अपूर्ण प्रकल्प, रस्ते, सिंचन योजना आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष झाले आहे. जिल्ह्यातील विविध भागात मागील काही वर्षांपासून मोठ्या विकासकामांची प्रतीक्षा आहे, मात्र सरकारकडून कोणतीही ठोस मदत मिळत नसल्याची त्यांनी खंत व्यक्त केली.

केंद्र सरकारच्या कृषी मंत्रालयाने ३० एप्रिल २०२४ रोजी जारी केलेल्या परिपत्रकानुसार, नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना मदत मिळण्यासाठी काही नवीन अटी लागू करण्यात आल्या आहेत.

या अटी शेतकऱ्यांसाठी प्रतिकूल ठरत असून, नुकसान भरपाई मिळण्यास अनेक तांत्रिक अडचणी येत आहेत. या परिपत्रकामुळे हजारो शेतकऱ्यांना मदत मिळण्यास विलंब होत असल्याचे आमदार पाटील यांनी सांगितले.

राज्य सरकारने केंद्राकडे पाठपुरावा करून हे परिपत्रक शिथिल करावे, जेणेकरून शेतकऱ्यांना वेळेत नुकसान भरपाई मिळू शकेल, अशी मागणी आमदार पाटील यांनी केली. तसेच जिल्ह्याच्या विकासासाठी तातडीने आर्थिक तरतुदी करण्यात याव्यात, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही त्यांनी दिला. यावेळी बोलताना खासदार ओमराजे निंबाळकर म्हणाले की जिल्ह्यात ५०० खटांचे रुग्णालय मंजूर करण्यात आले आहे. त्यासाठी दोन हजार कोटीचा निधी मंजूर केल्याचे सांगण्यात आले. यासाठी मित्राचे कार्यकारी अधिकारी परदेशी यांच्या हस्ते त्याचे उद्घाटनही झाले मात्र ते काम अद्याप पर्यंत पूर्ण झालेले नाही. तसेच परंडा तालुक्यातील लोणावळा येथील ट्रामा केअर सेंटर साठी ही निधी मिळणे अपेक्षित होते. परंतु त्यासही निधी मिळाला नाही त्यासोबतच तुळजापूर येथील न्यायालयासाठी निधी मिळालेला नाही.

प्रकल्प अर्धवट स्थितीत असल्याने त्यांची दर वर्षा गणित प्रकल्प किंमत वाढत असून या झालेल्या अर्थसंकल्पात तरतुदी कमी आणि प्रकल्पाच्या प्रत्यक्ष किमती जास्त झाले आहेत. तरीही काहीही तरतूद करण्यात आलेले नाही. जिल्ह्यात मंजूर झालेले शासकीय वैद्यकीय महाविद्यालय याचे बांधकामाचे उद्घाटन ही झाले नाही. धाराशिव जिल्ह्यात मंजूर झालेल्या वैद्यकीय महाविद्यालयानंतरच्या जालना आणि सिंधुदुर्ग येथील महाविद्यालयाच्या कामांची पायाभरणी झाली आहे. शक्तीपीठ महामार्ग बनवण्यापेक्षा निवडणुकीच्या अगोदर दिलेली आश्वासने या सरकारने पूर्ण करावीत असेही ते यावेळी म्हणाले.

जिल्ह्यातील नागरिक आणि शेतकरी सरकारच्या धोरणांमुळे त्रस्त असून, योग्य निधी आणि मदतीच्या अभावी विकास प्रक्रियेवर परिणाम होत असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

## शिर्डी संस्थानचे माजी अध्यक्ष सुरेश हावरे यांची श्री तुळजाभवानी मंदिरास भेट

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१५ मार्च -**

शिर्डी संस्थानचे माजी अध्यक्ष सुरेश हावरे यांनी श्रीतुळजाभवानी मातेचे दर्शन घेतले. यावेळी त्यांची सपत्नीक तुळजाभवानी मातेची पूजा व आरती पुजारी नंदु गंगणे यांनी केली. मंदिर संस्थान मध्ये चालू असलेल्या विकासकामांच्या पाहणीबरोबरच येथील संपूर्ण व्यवस्थेची पाहणी करून मार्गदर्शक सूचना दिल्या.

प्रत्यक्ष दर्शनरांगेमध्ये जाऊन दर्शनव्यवस्थेची पाहणी केली. मंदिर संस्थानमध्ये चालविले जाणारे विविध उपक्रम जाणून घेतले. संपूर्ण परिसराच्या आणि व्यवस्थेच्या पाहणीनंतर त्यांनी मंदिर संस्थानच्या अधिकाऱ्यांना व्यवस्थेतील उपाययोजनांबद्दल आणि भविष्यकालीन योजनांबाबत मार्गदर्शन केले.

मंदिर प्रशासकीय कार्यालयात मंदिर संस्थानच्या वतीने त्यांचा देवीजींची प्रतिमा, महावस्त्रे, श्रीतुळजाभवानी ग्रंथ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी श्रीतुळजाभवानी मंदिर संस्थानचे तहसिलदार तथा व्यवस्थापक अरविंद बोळंगे, सहाय्यक व्यवस्थापक (स्थापत्य) राजकुमार भोसले, सहाय्यक व्यवस्थापक (विद्युत) अनिल चव्हाण, सॉफ्टवेअर अभियंता सुधीर कदम, नेटवर्क अभियंता शुभम वायकोस, सचिन रोचकरी, सुजित जमदाडे तसेच मंदिर संस्थांचे अन्य कर्मचारी उपस्थित होते.

## धाराशिव जिल्ह्यातील ५४२ ग्राम पंचायत सदस्य अपात्र

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१५ मार्च -**

धाराशिव जिल्ह्याचे नवनियुक्त जिल्हाधिकारी कीर्ती कुमार पुजार यांनी पदभार स्वीकारताच मोठा निर्णय घेतला आहे. जिल्ह्यातील आठही तालुक्यातील ग्रा.पं.मधील एकूण ५४२ सदस्यांना अपात्र ठरविण्यात आले आहे. यामध्ये सरपंचांची संख्याही लक्षणीय असून, या निर्णयामुळे जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली आहे.

ग्रा.पं. निवडणुकीत राखीव जागांवर निवडून आलेल्या सदस्यांना एक वर्षाच्या कालावधीत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक असते. मात्र, जानेवारी २०२१ नंतर झालेल्या ग्रा.पं. सार्वत्रिक निवडणुकीत निवडून आलेल्या काही सदस्यांनी मुदतीत जात प्रमाणपत्र सादर केले नाही. त्यामुळे जिल्हाधिकारी कीर्ती कुमार पुजार यांनी त्यांच्यावर कठोर कारवाई करत अपात्रतेची कार्यवाही केली आहे.

इतक्या मोठ्या प्रमाणात झालेली ही पहिलीच कारवाई असून, यात जिल्ह्यातील आठही तालुक्यांतील सरपंच आणि सदस्यांचा समावेश आहे. या निर्णयामुळे अनेक गावांमध्ये नवीन सरपंच व सदस्य निवडण्याची प्रक्रिया हाती घेण्याची वेळ आली आहे.

**पुजारी असल्याचे भासवून भाविकांची आर्थिक लूट... बनावट पुजारी आणि एजंटांना आळा घालणे गरजेचे...**


# तुळजाभवानी मंदिर परिसरात एजंटांचा सुळसुळाट

**मुखदर्शन आणि धर्मदर्शनच्या लाईनमध्ये एजंट येतातच कसे... सुरक्षारक्षक आणि एजंटांचे आर्थिक लागेबांधे?...**



**तभा वृत्तसेवा / सचिन ताकमोघे**
**धाराशिव, दि.१५ मार्च -**

महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानी मातेच्या मंदिर परिसरात बनावट पुजारी आणि एजंटांमार्फत भाविकांची आर्थिक लूट खुलेआम होताना दिसत आहे. सोशल मीडियावर अधिकृत पुजारी या विरोधात संताप जनक पोस्ट टाकून निषेध व्यक्त करताना दिसत आहेत मंदिर प्रशासनाने बनावट पुजारी आणि एजंटांना मंदिर परिसरात आळा घालण्यासाठी ठोस उपाययोजना करण्याची गरज असल्याची चर्चा तुळजाभवानी पुजारी वर्गात चालू आहे.



भाविकांची होणारी आर्थिक लूट थांबवण्यासाठी मंदिर प्रशासनाने आशा बनावट पुजारी आणि एजंटांना मंदिर परिसरात मज्जाव करावा अशी मागणी देखील पुजारी वर्गातून जोर धरत आहे. मुख दर्शन आणि धर्मदर्शनच्या लाईन मध्ये पुजारी असल्यासारखे एजंट वावरत असल्याचे मंदिराच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात स्पष्ट दिसून येतात. फुटेज बघून मंदिर प्रशासनाने अशा एजन्टांवर कारवाई करणे अपेक्षित आहे. तर दर्शन लाईनमध्ये सिंह गाभाऱ्यात हे एजंट आणि बनावट पुजारी येतात कसे त्यांना सुरक्षारक्षक सोडतात कसे सुरक्षारक्षक आणि एजंटांचे आर्थिक लागेबंधे आहेत का असे विविध प्रश्न सध्या पुजारी आणि तुळजापूरकरांना पडले असून याबाबत शहरात चर्चेला उधाण आले आहे. संपूर्ण महाराष्ट्राची कुलस्वामिनी असणाऱ्या श्री तुळजाभवानी देवीला लोक आपली आराध्य मानतात आणि अवघ्या महाराष्ट्रातूनच नाही तर इतर राज्यातूनही तुळजापूर येथे शक्तीपीठ असलेले आई तुळजाभवानी मातेच्या भाविक भक्त भारत देशातूनच नव्हे तर दर्शनासाठी विदेशातून सुद्धा लोक दर्शनासाठी येत असतात. खरंतर ही महाराष्ट्रासाठी अभिमानाची गोष्ट आहे. दर्शनासाठी आलेल्या लोकांच्या मनात देवीबद्दल श्रद्धा भक्ती भाव घेऊन लोक देवीच्या दर्शनाला आलेले असतात. पण तुळजापूर मंदिर परिसरात त्यांच्या पदरी तेथील व्यवस्थेतून निराशाच पडताना दिसते. कारण देवीच्या मंदिराच्या परिसरात एजंटचा सुळसुळाट असल्यामुळे तेथील धर्मदर्शन आणि मुखदर्शनासाठी एजंट आपापल्या परीने त्या भाविकांशी त्यांच्या भावनेशी खेळून आपले खिसे भरण्याचा प्रयत्न करतात. अशा एजंटच्या मनस्ताप मुळे भावीक भक्तातून प्रचंड नाराजी निर्माण होत आहे. विशेष बाब म्हणजे एजंट मंदिर परिसरात खुलेआम भाविकांची फसवणूक करतात नेहमीच भाविकांसोबत अशा एजंटांचे खटके उडतात मंदिर परिसरात भाविकांचे आणि अशा एजंटांचे शाब्दिक बाचाबाची होताना दिसते. सुरक्षारक्षक आणि मंदिर कर्मचारी यांच्याकडून याला थांबवण्यासाठी कुठलाही प्रयत्न केला जात नाही. तिन्ही पुजारी मंडळ देखील हातबल होऊन अशा एजंट विरोधात कुठलीही क्शन घेत नाहीत. मंदिर प्रशासनाने अशा एजंटचा हस्तक्षेप थांबवून सर्व भाविकांना समान वागणूक मिळेल याकडे लक्ष द्यावे अशी अपेक्षा भाविकांतून व्यक्त होत आहे.

### छापे मारणारे भाविकांकडून बळजबरीने पैसे वसूल...

तुळजाभवानी देवीच्या मंदिरात चिंतामणीच्या समोर शहरातील अनेक युवक दारू पिऊन तोंडात मावा ठेवून भाविकांना बळजबरीने छापे मारतात. छापे मारून भाविकांकडे एवढेच पैसे द्या म्हणून दबाव टाकतात. पैसे न देणाऱ्या भाविकांसमोर उभे राहून त्यांच्या कपाळावर कुंकाचा हात ठेवून शिव्या शाप देतात. सुशिक्षित भाविक त्यांच्या नादी न लागता हातात येतील तेवढे पैसे त्यांना देऊन मोकळे होतात. मंदिर प्रशासनाकडून कुठलीही क्शन घेतली जात नसल्याने दिवसेंदिवस अशा युवकांची संख्या वाढत चालली आहे. सुरक्षारक्षकांसोबत नेहमीच अशा छापे मारणाऱ्या एजंटाची तू तू- मैं मैं होत असल्याचे भाविकांच्या नजरेस पडते. तुळजाभवानी देवीच्या अधिकृत पुजाऱ्यांकडून आशा एजंट बनावट पुजारी आणि छापे मारणाऱ्या युवकांना मंदिर प्रवेश बंद करण्याची मागणी होत आहे.

## बनावट पत्र प्रकरणी संपादक सुनील ढेपे यांची पोलिसांकडे तक्रार

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१५ मार्च -**

धाराशिव लाईव्हचे संपादक सुनील मधुकर ढेपे यांनी आपल्या वृत्तसंस्थेविषयी बदनामीकारक व खोटा मजकूर असलेले बनावट पत्र सोशल मीडियावर व्हायरल करण्यात आल्याने यासंदर्भात पोलीस अधीक्षकांकडे तक्रार दाखल केली आहे.

तक्रारीत नमूद केल्याप्रमाणे, बीड जिल्ह्यातील आष्टी विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुरेश धस यांच्या लेटरहेडवर खोटे मजकूर लिहून आणि खोटी सही करून बनावट पत्र व्हायरल करण्यात आले आहे. याबाबत आ. सुरेश धस यांनी एका चॅनलला दिलेल्या मुलाखतीत स्पष्ट केले आहे की, हे पत्र त्यांचे नसून, त्यावर असलेली सहीसुद्धा खोटी आहे. तसेच, त्यांनी या प्रकरणाला खोडसाळपणा व बदमाशी असे संबोधले आहे.

ढेपे यांनी तक्रारीत म्हटले आहे की, हा प्रकार जाणूनबुजून त्यांच्या प्रतिष्ठेला आणि व्यावसायिक कार्याला धक्का पोहोचवण्याच्या उद्देशाने घडवण्यात आला आहे. त्यामुळे हे बनावट पत्र तयार करणाऱ्या आणि व्हायरल करणाऱ्या व्यक्तींचा शोध घेऊन कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. याप्रकरणी पोलीस प्रशासन काय कारवाई करते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# पीक विम्याचे रू. २५० कोटीहुन अधिक १५ दिवसात मिळणार शेतकऱ्यांच्या खात्यावर

**पीकविमा व अनुदानाच्या इतर रू. १००० कोटींसाठी सातत्यपूर्ण लढा सुरुच राहणार : आ. राणाजगजितसिंह पाटील**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१५ मार्च -**

मागील वर्षी खरीप हंगामात झालेल्या नैसर्गिक आपत्तीपोटी जिल्ह्यातील शेतकऱ्यांना रु. २५० कोटीहून अधिकचा दिलासा मिळणार आहे. पुढील १५ दिवसांच्या आत ही पीक विम्याची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणार आहे. याव्यतिरिक्त पीकविमा तसेच इतर अनुदानाच्या रू. १००० कोटीसाठी आपला सातत्यपूर्ण लढा सुरू असून लवकरच त्यालाही यश मिळेल असा विश्वास आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला आहे.

गतवर्षी खरीप हंगामात जिल्ह्यातील ७,१९,१६७ शेतकऱ्यांनी ५,७९,८१६.२१ हेक्टर क्षेत्रासाठी विमा संरक्षित केला होता. त्यापैकी स्थानिक नैसर्गिक आपत्तीच्या अनुषंगाने अंदाजे ५ लाख ३० हजार शेतकऱ्यांना २५० कोटींहून अधिक पीक विमा नुकसान भरपाई मिळणार आहे. तसेच काढणी पश्चात आलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने ७९००० शेतकऱ्यांना अंदाजे ८० कोटी रुपये मिळणार आहेत. जे शेतकरी दोन्ही कडे पात्र आहेत त्यांना दोहोंपैकी अधिकचा एक लाभ मिळणार आहे.



खरीप हंगाम २०२० मध्ये तत्कालीन उद्धव ठाकरे सरकारच्या अनास्थे मुळे शेतकऱ्यांच्या हक्काच्या पैशासाठी आपणास न्यायालयीन लढा द्यावा लागला व तो आजतागायत सुरूच आहे. याबाबत पुढील न्यायालयीन सुनावणी १५ एप्रिल २०२५ रोजी आहे. यातून २२५ कोटी रुपये शेतकऱ्यांना मिळतील असे प्रयत्न चालू आहेत. महायुती सरकारने मदती साठी खास बाब म्हणून ज्येष्ठ विधिज्ञ.अँड.धोरडे पाटील यांची नियुक्ती केली आहे. खरीप २०२१ मध्ये नुकसान भरपाईच्या अनुषंगाने ३२७ कोटी रुपये येणे प्रलंबित आहेत. याबाबत देखील न्यायालयात लढा सुरू असून २१ मार्च २०२५ रोजी याप्रकरणी पुढील सुनावणी होणार आहे.

खरीप हंगाम २०२३ मध्ये शेतकऱ्यांच्या खात्यात तब्बल २९७ कोटी रुपयांची विमा रक्कम जमा झाली. लोकसभा निवडणुकी दरम्यान केंद्र शासनाच्या अधिकाऱ्यांनी काढलेल्या परिपत्राकमुळे ३२ मंडळातील शेतकऱ्यांना नुकसानीची तक्रार करून देखील विमा भरपाई मिळाली नाही. त्यामुळे त्याबाबत केंद्र शासनाकडे पाठपुरावा चालू आहे परंतु हा संबंध देशभरातील शेतकऱ्यांच्या बाबतीत असलेला विषय आहे म्हणून याला थोडा विलंब लागत असला तरी यातून रू २०० कोटीहुन अधिकची रक्कम शेतकऱ्यांना मिळण्याची अपेक्षा आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केली आहे.

खरीप २०२४ मध्ये अतिवृष्टी, अवेळी झालेला पाऊस, वादळी वारा व गारपीटी मुळे अनेक शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले होते. यासाठी शासनाकडून आता पर्यंत ५,४७,७८९ शेतकऱ्यांसाठी तब्बल रु.५७२.४५ कोटी एवढा निधी मंजूर करण्यात आला आहे. या व्यतिरिक्त १ ऑक्टोबर २०२४ ते ११ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत अवेळी पाऊस वादळी वारा यामुळे लोहारा व उमरगा तालुक्यातील ६०३५६० हेक्टर क्षेत्रावरील ३३ % पेक्षा जास्त नुकसान झालेल्या ७९८८० शेतकऱ्यांचे ८६.४६ कोटी रुपये अनुदान मिळणे अद्याप बाकी आहे. तसेच माहे सप्टेंबर व ऑक्टोबर २०२४ मध्ये अतिवृष्टी झालेली व अनुदान मिळालेली ३२ महसूल मंडळे वगळता सततच्या पावसाने झालेल्या नुकसानीपोटी इतर महसूल मंडळासाठी नुकसान भरपाई मिळावी याकरिता आपला शासनाकडे सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. याचा अहवालही शासनाकडे सादर करण्यात आला असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी म्हटले आहे.

### अज्ञानी लोकप्रतिनिधीनी थोडा अभ्यास करावा

जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या वतीने केंद्र व राज्य सरकारने मागील वर्षी ५९६ कोटी रुपयांचा विमा हप्ता भरला. त्याबदल्यात जिल्ह्यातील शेतकऱ्यांना २५० कोटी रुपयांची नुकसान भरपाई मिळाली आणि उर्वरित ३४६ कोटी रुपये विमा कंपनीचा फायदा झाल्याचा जावईशोध अज्ञानी लोकप्रतिनिधीनी लावला आहे. वस्तुतः मागील दोन वर्षांपासून राज्यात विम्याचा बीड पॅटर्न लागू करण्यात आला आहे. १००-८०-११० असे त्याचे स्वरूप आहे. कोणत्याही विमा कंपनीच्या फायद्याची रक्कम वीस टक्क्यांपेक्षा अधिक असत नाही. उर्वरित रक्कम सरकारच्या तिजोरीत जमा केली जाते. उदाहरण द्यायचे झाल्यास जर १०० रुपये विमा हप्ता असेल आणि नुकसानभरपाईपोटी ५० रुपये शेतकऱ्यांना देण्यात आले असतील तर उर्वरित ५० रुपयांमधील तीस रुपये सरकारच्या तिजोरीत जमा होतात आणि केवळ २० रुपये कंपनीला दिले जातात. मात्र हीच नुकसान ११० टक्के असेल तर कंपनीने स्वतःच्या खिशातून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देणे बंधनकारक आहे. ११० टक्क्यांपेक्षा अधिक नुकसान असेल तर सरकारकडून कंपनीला वरील रक्कम दिली जाते. मात्र केवळ आरोप-प्रत्यारोप, वायफळ बडबड आणि जनतेची दिशाभूल करण्यात पटाईत असलेल्या अज्ञानी लोकप्रतिनिधींनी पुढच्या वेळी किमान अभ्यास करून व्यक्त व्हावे.

धाराशिव
# जिल्हा
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## वाशीत ‘अजिंक्य’चे स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.१५ मार्च -**

येथील अजिंक्य प्राथमिक व माध्यमिक शाळेचे दोनदिवशीय स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले.

कार्यक्रमामध्ये दोन दिवस प्रमुख उपस्थितांमध्ये केंद्रप्रमुख कैलास चौधरी नागनाथ नाईकवाडी (नगरसेवक न. पं. वाशी) दादासाहेब चेडे (सामाजिक कार्यकर्ते)श्यामलताई कवडे, वर्षा कवडे, वंदनाताई कवडे (नगरसेविका न. पं. वाशी), कैलास चौधरी, तुकाराम वीर, विजय कागदे, काकासाहेब मोरे, बाळासाहेब औताडे,अतुल चौधरी, सदाशिव जगताप यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दीपिका सौताडेकर, पल्लवी क्षीरसागर, प्रीती गडगडे, स्वाती शिंदे, सारिका जगताप यांनी केले. स्नेहसंमेलनात देशभक्तीपर गीते, शिववंदना, भक्तीगीते भावगीते, नाट्यछटा यांची रेलचेल होती. यामध्ये आकर्षण ठरले ते महाभारत द्रौपदि वस्त्रहरण दृश्य, गौरव महाराष्ट्र संस्कृतीचा कथथक या नृत्यांनी प्रेक्षकांनामंत्रमुग्ध केले. बिग स्क्रीन वरचा स्नेहसंमेलनाचा पहिलाच भन्नाट प्रयोग कुतूहल चर्चेचा विषय ठरला. सदर कार्यक्रमात संस्थेने आदर्श शिक्षक -शिक्षिका पुरस्कार २०२४-२५ प्रदान करण्यात आले. यामध्ये शिक्षकांची शाळेवर असणारी निष्ठा आणि विध्यार्थी सर्वांगीण विकासासाठी दशकभर कार्य करणाऱ्या संध्या शरद कोल्हे, नाईकवाडे मनीषा मछिंद्र, स्वप्नाली सयाजी सांडसे, शिंदे रामहारी मसा, यांचा सन्मानचिन्ह, रोख रक्कम ५००१, तसेच सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला.

हा गौरव केंद्रप्रमुख, संस्थाध्यक्ष, मुख्याध्यापक यांच्या हस्ते करण्यात आला.



▶▶ जिल्ह्यात एकूण आठ ठिकाणी होणार रस्ता रोको आंदोलन.... ▶▶ पहिला रस्ता रोको २५ मार्चला नारंगवाडी चौक उमरगा येथे होणार...

# केंद्र शासनाच्या परिपत्रकाविरोधात जिल्ह्यात रस्ता रोको, आंदोलनाची होणार मालिका

▶▶ सामाजिक कार्येकर्ते, पिक विमा अभ्यासक अनिल जगताप यांची प्रसिद्धी पत्रकाद्वारे माहिती...



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१५ मार्च -**

लोकसभेची आचारसंहिता सुरू असताना केंद्र शासनाने अचानकपणे काढलेल्या ३० एप्रिल २०२४ च्या परिपत्रकामुळे धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्यांना केवळ सहा हजार दोनशे रुपये प्रति हेक्टर विमा नुकसान भरपाई स्वीकारण्याची नामुष्की आली आहे. या अगोदर लोकशाही मार्गाने धाराशिव, तुळजापूर, उमरगा, लोहारा येथे आंदोलन करून देखील शेतकऱ्याच्या पदरात काहीच पडत नसल्याने आता रस्ता रोको आंदोलन करण्याचे नियोजन केले असल्याची माहिती सामाजिक कार्यकर्ते अनिल जगताप यांनी दिली.

एचडीएफसी पिक विमा कंपनी चालू वर्षाच्या पिक विमा नुकसान भरपाई पोटी शेतकऱ्यांना केवळ ६२०० रुपये प्रति हेक्टर नुकसान भरपाई देण्याच्या तयारीत असून तशा हालचाली सुरू झाल्या आहेत. २६ जून २०२३ च्या पिक विमा परिपत्रकाप्रमाणे शेतकऱ्यांना २५ हजार ६७८ रुपये मिळणे अपेक्षित असताना तुटपुंजी रक्कम देऊन शेतकऱ्यांना उध्वस्त करण्याचे काम केंद्राच्या पत्रकामुळे होत आहे. चालू वर्षी धाराशिव जिल्ह्यातील सात लाख १९ हजार १६७ अर्जदार शेतकऱ्यांनी पिक विमा भरला होता विमा हप्त्यापोटी



कंपनीला ५९६ कोटी रुपये इतकी रक्कम देय आहे. मात्र प्रति हेक्टर ६२०० प्रमाणे कंपनी केवळ २५७ कोटी रुपये वाटप करणार आहे याचा अर्थ कंपनीचा चालू वर्षातला खरीप हंगामाचा फायदा ३३९ कोटी रुपये इतका आहे. पिक विमा कंपनीला शेतकरी केंद्र व राज्य शासनाच्या हिश्यापोटी एक हेक्टर ला दहा हजार ७८० रुपये दिले जातात मात्र शेतकऱ्यांना कंपनी केवळ ६२०० देत आहे. याचा अर्थ प्रती हेक्टर कंपनीला ४५८० रुपयाचा फायदा होत असून यावर्षी सोयाबीनचे क्षेत्र चार लाख ६२ हजार ३५६ हेक्टर एवढे आहे.

पिक विमा भरते वेळेस च्या परिपत्रकानुसार अर्थात २६ जून २०२३ च्या परिपत्रका नुसार शेतकऱ्यांना प्रतिहेक्टर २५ ६७८ रुपये मिळणे अपेक्षित असताना केवळ तुटपुंजी रक्कम दिली जात आहे, असेही अनिल जगताप यांनी म्हटले आहे.

### अग्रीम नव्हे अंतिम विमा ...

अनेक जण हे केवळ २५ टक्के अग्रीम असल्याचे सांगत आहे मात्र ही अग्रीम रक्कम नसून चालू वर्षीचा अंतिम विमा आहे खरीप २०२३ मध्ये देखील गेल्या वर्षी केवळ पाच हजार दोनशे रुपये रक्कम देऊन शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान केले होते याही वर्षी त्याचीच री ओढली जात आहे. केंद्रात राज्यात एकाच पक्षाची सत्ता असताना कळीचा मुद्दा ठरलेले ३० एप्रिल २०२४ चे परिपत्रक रद्द करण्याऐवजी शेतकऱ्यांना६२०० प्रतिहेक्टर देण्यात काही जणांना आनंद वाटत आहे ही शेतकऱ्याची शुद्ध फसवणूक आहे. केंद्राच्या परिपत्रकामुळे खरीप २३ व खरीप २४ मध्ये मिळून शेतकऱ्याचे पंधराशे कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे याला जबाबदार कोण. शेतकऱ्याच्या नुकसानीला जबाबदार कोण? या सर्व प्रकाराविरुद्ध आता जिल्ह्यात आठ ठिकाणी रस्ता रोको आंदोलन करण्यात येणार असून त्याची सुरुवात २५ माच रोजी नारंगवाडी फाटा येथे रस्ता रोको आंदोलन करून करण्यात येणार आहे

### अतिवृष्टी अनुदानाची अर्धा धाराशिव जिल्हा वगळला..

यावर्षीचे अतिवृष्टीचे अनुदान देत असताना केवळ धाराशिव कळम वाशी व परंडा या चारच तालुक्यांना अनुदान दिले आहे लोहारा, उमरगा तालुक्यातल्या प्रस्ताव उशिराने गेल्याने अद्यापही दोन्ही तालुके अतिवृष्टी अनुदानाच्या प्रतीक्षेत आहेत तर तुळजापूर भूम तालुक्यातील अतिवृष्टीचे काय होणार याबाबत निश्चितता आहे तुळजापूर तालुक्याला तर गेल्या वर्षी व याही वर्षी अतिवृष्टी अनुदानातून वगळले गेले आहेत हा शेतकऱ्यावर अन्याय आहे जराशी जिल्ह्यात सर्वत्र सारखा पाऊस असताना काही तालुके का वगैरे जातात हे मात्र बळीराजाला पडलेले कोडे आहेजिल्हा प्रशासनाला या संदर्भात लवकरच माहिती देऊन परिपत्रक रद्द करावे अशी विनंती करणारल आहोत अन्यथा जी काय परिस्थिती निर्माण होईल त्याला शासन जबाबदार असेल असेही सामाजिक कार्यकर्ते, पिक विमा अभ्यासक अनिल जगताप यांनी परिपत्रकात म्हटले आहे.

## बंजारा होळी महोत्सवात महिलाकडुन पुरुषांची काठीने धुलाई

### नळदुर्ग वसंतनगर येथे होळी महोत्सव संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१५ मार्च -**

नळदुर्ग वसंतनगर येथे बंजारा समाजाची होळी अनोख्या पद्धतीने साजरी करण्यात आली. या होळी उत्सवात चक्क महिलांनी पुरुषांची काठीने धुलाई केली.

बंजारा समाजात होळी हा सण विशेष मानला जातो होळी महोत्सवानिमित्त बंजारा समाजात महिला, पुरुष एकत्र येऊन हलगीच्या तालावर पारंपारिक नृत्य सादर करत असतात. या महोत्सवात महिलांकडुन पुरुषांना काठीचा मार दिला जातो. ही परंपरा आज ही कायम आहे. पुरुष मंडळी काठीचा मार झेलत होळीचा आनंद घेत असतात.बंजारा समाजाच्या होळी सणात महिलांना विशेष स्थान दिले जाते.

वसंतनगर नळदुर्ग येथील ज्योतिबा दगडु जाधव व सुनिता ज्योतिबा जाधव यांच्या घरी धुंड नावाचा कार्यक्रम घेण्यात आला. जाधव कुटूबियाच्या वतीने होळी महोत्सवास सुरुवात करण्यापुर्वी सार्वजनिक जागेत खड्डा करून दोन लाकडाच्या मधोमध नैवेद्याचा हंडा दोरीने बांधण्यात आले होते. या हंड्याजवळ पारंपारीक पद्धतीने महिलांनी हातात काट्या घेऊन गाण्याचा ठेका धरत नृत्य सादर केल्या.


यावेळी पुरुषांनी महिलांना तर महिलांनी पुरुषांना शेर शायरी करीत होत्या.

दोन काठीच्या मधोमध बांधण्यात आलेला नैवेद्याचा हंडा उपटुन काढण्यासाठी पुरुष मंडळी प्रयत्न करत होते. मात्र या हंड्या जवळ पुरुष मंडळी येताच महिला त्यांना काठीचा मार देतात.

पुरुष मंडळी आनंदात काठीचा मार झेलत हलगीच्या व होळी गीताच्या तालावर बेभान नाचत होते. बंजारा समाजाच्या या होळी महोत्सवात स्त्री-पुरुष समानतेचा संदेश दिसुन आला.

यावेळी वसंतनगरचे नायक फुलचंद राठोड, कारभारी विनायक जाधव, छमाबाई राठोड, निरंजन राठोड, सुरेश राठोड, संजय जाधव, विष्णु जाधव, मोतीराम राठोड, भानुदास राठोड, रवी महाराज, सचिन राठोड, बाबु राठोड, दत्ता जाधव, प्रवीण जाधव, प्रशांत जाधव, नेताजी जाधव, संजय राठोड, जेतालाल राठोड, मानसिंग राठोड, चांगदेव चव्हाण, लक्ष्मण चव्हाण चंदु जाधव, मुख्याध्यापक पाटील ए.ए., कोळी डी.एम., सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी वर्ग व वसंतनगर येथील महिला, पुरुष, युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ‘श्री तुळजाभवानी’त आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड मशीन लर्निंग मार्गदर्शन शिबिर



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१५ मार्च -**

श्री तुळजाभवानी अभियांत्रिकी महाविद्यालया मधील संगणक व इलेक्ट्रॉनिक आणि दूरसंचार विभागातील विद्यार्थ्यांना आर्टिफिशियल इंटेलिजन्स व मशीन लर्निंग या विषयावर एक अत्यंत यशस्वी मार्गदर्शन शिबिराचे आयोजन केले होते.

हा कार्यक्रम १५ मार्च २०२५ रोजी घेण्यात आला ज्यामध्ये लातूर येथील स्किल्सवे टेक्नॉलॉजीचे ऋतुज जाधव यांनी तज्ञ मार्गदर्शन केले. जाधव यांनी एआय आणि मशीन लर्निंगच्या नवीनतम ट्रेंड, तंत्रज्ञान आणि उद्योग अनुप्रयोगांबद्दल त्यांचे विस्तृत ज्ञान विद्यार्थ्यांना दिले. या मार्गदर्शन शिबिरामध्ये एआय अल्गोरिदम डेटा विश्लेषण, न्यूरल नेटवर्क, आरोग्य सेवा, वित्त आणि रोबोटिक्स सारख्या विविध उद्योगांमध्ये त्यांचे व्यवहारिक उपयोग यासारख्या महत्त्वाच्या विषयांचा समावेश होता. यावेळी विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नांना त्यांनी उत्तरे दिली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. विश्वास पतंगे यांनी केले. तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ईश्वर वर्पे, प्रवीण धवन या विद्यार्थ्यांनी केले.

या शिबिरावेळी इ अँड टीसी विभाग प्रमुख प्रा.पी.टी. सूर्यवंशी, कम्प्युटर विभाग प्रमुख प्रा.जे.एम. शेख, हेड डॉ. खुमणे, प्राचार्य मुदकना उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी होण्याकरिता कृष्णा प्रयाग व महेश नवगिरे यांनी प्रयत्न केले. या कार्यक्रमासाठी मोठ्या प्रमाणात विद्यार्थी वर्ग उपस्थित होता.

### जलयुक्त शिवार अभियान २.०

## जिल्ह्यात ६८१३ जलसंधारणाच्या कामातून जलसंपत्तीच्या विकासाला गती



(संग्रहीत)

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१५ मार्च -**

राज्यात जलसंधारणासाठी प्रभावी उपाययोजना करण्याच्या दृष्टीने जलयुक्त शिवार अभियान २.० राबविण्यात येत आहे. जिल्ह्यातील अभियानाच्या अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरीय समिती स्थापन करण्यात आली आहे. शासन निर्णयातील मार्गदर्शक तत्त्वांनुसार जिल्ह्यातील १६३ गावांची निवड करण्यात आली असून,या गावांमध्ये शिवार फेरी घेऊन जलसंधारण आराखडे तयार करण्यात आले. त्यानंतर जिल्हास्तरीय समितीच्या मंजुरीनंतर विविध विभागांच्या सहकार्याने १२५२ जलसंधारण कामे हाती घेण्यात आली आहेत.

याशिवाय, अन्य योजनांमधून केली जाणारी जलसंधारण कामे देखील जलयुक्त शिवार अभियान २.० मध्ये अभिसरणाच्या माध्यमातून समाविष्ट करण्यात आली आहेत. अशा एकूण ५५६१ कामांचा समावेश करण्यात आला असून, जलयुक्त शिवार आणि अभिसरण मिळून जिल्ह्यात एकूण ६८१३ जलसंधारण कामे सुरू आहेत. जलयुक्त शिवार अभियान २.० अंतर्गत हाती घेतलेल्या १२५२ कामांपैकी ५४६ कामे पूर्ण झाली आहेत,तर २४० कामे प्रगतीपथावर आहेत.

या कामांमुळे ४३६२.३६ घनमीटर पाणीसाठा निर्माण झाला असून, परिणामी ११९७.२९ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे.

जलयुक्त शिवार अभियान २.० च्या प्रभावी अंमलबजावणीमुळे जिल्ह्यातील जलसंपत्तीची स्थिती सुधारण्यास मोठा हातभार लागणार आहे. या अभियानातून भूजल पातळी वाढवणे, शेतकऱ्यांना सिंचनासाठी पुरेसा पाणीपुरवठा उपलब्ध करणे आणि दुष्काळी परिस्थिती रोखणे यासारख्या उद्दिष्टांना गती मिळणार आहे.

## जिल्ह्यात १० एप्रिलपर्यंत जमावबंदी आदेश लागू

**धाराशिव, दि.१५ मार्च -**

धाराशिव जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी १२ मार्च २०२५ ते १० एप्रिल २०२५ या कालावधीत महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) (३) अन्वये जमावबंदी आदेश लागू करण्यात आला आहे.

### जाहीर समन्स

**मे. उपनिबंधक, सहकारी संस्था, (परसेवा) सोलापूर, जिल्हा नागरी सहकारी बँक्स् को-ऑप. असोसिएशन लि., सोलापूर**

११३ (अ), सिध्देश्वर, स्टेट बँक ऑफ इंडिया, ट्रेझरी शाखेशेजारी, सोलापूर

**समर्थ सहकारी बँक लि., सोलापूर** - अर्जदार बँक
अंत्रोळीकर शॉपींग सेंटर, दत्तचौक, सोलापूर

विरूध्द

**(खालील तपशिलातील नमुद केलेले बँकेचे थकबाकीदार सभासद) - जाब देणार**

| अ. नं. | केस नंबर | दावा रक्कम | जाब देणार क्रमांक | जाब देणार यांचे नांव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| 1 | 1398/ 24-25 | 164512.00 | 1 | **पठाण सुलताना रतन** रा. मु.पोस्ट इटकळ, ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद, 413603 |
| | | | 2 | **पठाण रतन करीम** रा. मु.पोस्ट इटकळ, ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद, 413603 |
| 2 | 1399/ 24-25 | 178425.00 | 1 | **मुळे रंजना श्रीकृष्ण** रा.मु. पोस्ट इटकळ, ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद, 413603 |
| | | | 2 | **मुळे श्रीकृष्ण दत्तात्रय** रा.मु. पोस्ट इटकळ, ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद, 413603 |
| 3 | 1406/ 24-25 | 181264.00 | 1 | **शेख परविनाबी हुसेन** रा.मु. पोस्ट इटकल, उस्मानाबाद 413603 |
| | | | 2 | **शेख हुसेन उल्लाउद्दीन** रा.मु. पोस्ट इटकल, उस्मानाबाद 413603 |
| 4 | 1408/ 24-25 | 165916.00 | 1 | **शेख महतबाबी हसन** रा.आरवली रोड, मु. पोस्ट इटकल, ता. तुळजापूर, उस्मानाबाद 413603 |
| | | | 2 | **शेख यासीन हसन** रा.आरवली रोड, मु. पोस्ट इटकल, ता. तुळजापूर, उस्मानाबाद 413603 |
| 5 | 1409/ 24-25 | 172573.00 | 1 | **पठाण अंजुम मौला** रा. मु. पोस्ट इटकल, ता. तुळजापूर, उस्मानाबाद 413603 |
| | | | 2 | **पठाण नसिमा करीम** रा. मु. पोस्ट इटकल, ता. तुळजापूर, उस्मानाबाद 413603 |
| 6 | 1466/ 24-25 | 163314.00 | 1 | **दीक्षित अंबिका विलास** रा. मु. पोस्ट येरमाळा, ता. कळंब, उस्मानाबाद 413525 |
| | | | 2 | **दीक्षित विलास अंबादास** रा. मु. पोस्ट येरमाळा, ता. कळंब, उस्मानाबाद 413525 |
| 7 | 1467/ 24-25 | 166060.00 | 1 | **तंटक रेश्मा संदीप** रा. मंडई पेठ, आटावडा बाजार, मु. पो. परंडा, ता. परंडा, उस्मानाबाद 413502 |
| | | | 2 | **तंटक संदीप दिलीप** रा. मंडई पेठ, आटावडा बाजार, मु. पो. परंडा, ता. परंडा, उस्मानाबाद 413502 |
| 8 | 1475/ 24-25 | 131506.00 | 1 | **पठाण खाजाबी लाला** रा.राजपुरा गल्ली परंडा, ता. परंडा, उस्मानाबाद 413502 |
| | | | 2 | **पठाण लाला चांदसाब** रा.राजपुरा गल्ली परंडा, ता. परंडा, उस्मानाबाद 413502 |

या कामी अर्जदार यांनी दाखल केलेल्या अर्जातील जाब देणार यांना रजिस्टर पोस्टाने समन्स पाठविण्यात आलेले आहे. परंतु जाब देणार समन्स रुजू न झाल्याने/त्यांचा नवीन पत्ता उपलब्ध नसल्यामुळे सदरचे जाहीर समन्स देत आहोत.

**उपनिर्दिष्ठ अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वार - शुक्रवार, दि. ०४/०४/२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता दाव्यासंबंधीच्या कागदपत्रासह आपण या कार्यालयात हजर व्हावे.**

या नोटीसीद्वारे जाब देणार यांना असेही कळविण्यात येते की, वरील तारखेस आपण वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी. त्याचप्रमाणे वरील तारखेस अगर तत्पूर्वी आपला संपूर्ण पत्ता कळविण्यास कसुर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल. आज दि. १३/०३/२०२५ रोजी माझी सही व कार्यालयीन मुद्रेसह हे जाहीर समन्स दिले आहे.

शिक्का

**सही/-**
**उपनिबंधक**
**सहकारी संस्था, (परसेवा)**
**सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स् को-ऑप. असोसिएशन लि., सोलापूर**

# पत्रकारांना नोटीस पाठविणाऱ्या पवन ऊर्जा कंपनीवर कारवाईसाठी पत्रकार आक्रमक

▶▶ मे. रिन्यू एनर्जी ग्रीन सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड कंपनीच्या विरोधात संताप...



संबंधित कंपनी विरोधात योग्य ती कारवाई करण्यासाठी हे प्रकरण जिल्हास्तरीय तक्रार निवारण समितीमध्ये मांडले जाईल. या बैठकीस कंपनी प्रतिनिधी सोबतच पत्रकारांना देखील बोलावून सहभागी करण्यात येईल. विशेष म्हणजे अशा प्रकारचे कृत्य करणाऱ्या कोणत्याही कंपनीची गाय केली जाणार नसून त्यांच्यावर योग्य ती कारवाई करण्यात केली जाईल. त्यामुळे कुठल्याही कंपनीच्या नोटीस किंवा धमकीला पत्रकारांनी अजिबात घाबरु नये. विशेष म्हणजे जिल्हा प्रशासन पत्रकारांच्या पाठीशी ठाम असल्याचा विश्वास जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी पत्रकारांच्या शिष्टमंडळास दिला.

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१५ मार्च -**

एका शेतकऱ्याच्या शेतामध्ये पवन ऊर्जा कंपनीच्या अधिकाऱ्यांनी परस्परच कुठलीही परवानगी न घेता शेतकऱ्याच्या पिकांची करून जमीन खोदून पवन चक्कीसाठी आवश्यक असलेले सिमेंट काँक्रीटचे फाउंडेशन तयार केले. त्यामुळे त्या शेतकऱ्याने संबंधित कंपनीवर कारवाई करावी, अशी मागणी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली होती. त्या संदर्भातील बातमी पत्रकारांनी केली. त्यामुळे कंपनीचे पितळ उघडे पडल्यामुळे ती बातमी आमच्या कंपनीच्या विरोधात का केली? असा कांगावा करीत अब्रू नसलेल्या कंपनीने उलटपक्षी चक्क दोन पत्रकारांनाच कायदेशीर नोटीसा बजावत त्यांच्यावर प्रत्येकी दहा कोटी असा वीस कोटी रुपयांचा अब्रू नुकसानीचा दावा दाखल केला. त्यामुळे संबंधित कंपनीवर तात्काळ कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी पत्रकारांच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन एका निवेदनाद्वारे दि.१३ मार्च रोजी केली आहे.

दिलेल्या निवेदनात असे नमूद करण्यात आले आहे की, मे. रिन्यू एनर्जी ग्रीन सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड कंपनी पवन ऊर्जा कंपनीच्या माध्यमातून तुळजापूर तालुक्यातील गंधोरा येथील शेतकरी खेलो बाबुराव सोनटक्के यांची शेत जमीन गट नंबर २८६ क्षेत्र ०१ हेक्टर व त्यांच्या पत्नीच्या नावे ६० आर क्षेत्र आहे. या शेत जमिनीवर सोनटक्के कुटुंबाची कसलीही संमती न घेता मे. रिन्यू एनर्जी ग्रीन सोल्युशन प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीने अतिक्रमण करून पूर्ण क्षेत्र खोदून मोठ्या प्रमाणात नुकसान केले आहे. याची चौकशी करण्यासाठी सोनटक्के गेल्यानंतर त्यांना जीवे मारण्याची धमकी दिली. त्यामुळे त्यांनी वरील कंपनीच्या विरोधात जिल्हाधिकारी धाराशिव यांच्याकडे तक्रार करून संबंधित कंपनीवर कारवाई करण्याची मागणी दि.२५ फेब्रुवारी रोजी केली होती. याबाबतची बातमी तेरणेचा छावा व उस्मानाबाद न्यूज पोर्टल या चॅनलवर प्रसारित करण्यात आली होती. ती बातमी कंपनीच्या विरोधात का केली? असा जावई शोध लावत संपादक पांडुरंग अंगद मते व संपादक सलीम गफार पठाण यांना पवन ऊर्जा कंपनीमार्फत अॅड. सारंग एस. एस वडगांवकर यांनी नोटीसा पाठविल्या आहेत. तसेच कंपनीची अब्रू गेली असा उल्लेख करीत पत्रकारावरच प्रत्येकी दहा कोटी असावीस कोटीचा दावा ठोकला आहे. त्यामुळे अशा मुजोर कंपनी विरोधात तात्काळ कारवाई करावी अशी मागणी पत्रकारांनी केली आहे.

यावर राजाभाऊ वैद्य, देविदास पाठक, हुंकार बनसोडे, कालिदास म्हेत्रे, मच्छिंद्र कदम, जी.बी. राजपूत, प्रशांत कावरे, मल्लिकार्जुन सोनवणे, पांडुरंग मते, सलीम पठाण, आकाश नरोटे, जुबेर शेख, मुस्तफा पठाण, किरण कांबळे, असिफ मुलाणी, विशाल जगदाळे, प्रशांत मते, किशोर माळी, जफरोदिन शेख, कुंदन शिंदे, काकासाहेब कांबळे, शहबाज शेख, अल्ताफ शेख, शितल वाघमारे, सतीश मातने, कलीम शेख, आयुब शेख, कैलास चौधरी, अमजद सय्यद आदींसह पत्रकारांच्या सह्या आहेत.

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## राष्ट्रीय खेळाडू शंतनू धायगुडेचा लातुरात सत्कार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १५ मार्च -** भारतीय शालेय महासंघाद्वारे आयोजित महाराष्ट्र राज्य क्रीडा व युवक सेवा संचलनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तथा जिल्हा क्रीडा परिषद छत्रपती संभाजीनगर व महाराष्ट्र सॉफ्टबॉल असोसिएशन यांच्या तांत्रिक साह्याने तसेच छत्रपती संभाजीनगर सॉफ्टबॉल असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ६८ व्या राष्ट्रीय शालेय सॉफ्टबॉल क्रीडा स्पर्धा २०२४-२५ १४ वर्षे आतील मुले व मुली या स्पर्धेचे आयोजन विभागीय क्रीडा संकुल छत्रपती संभाजीनगर येथे करण्यात आले होते.

या स्पर्धेमध्ये श्री.स्वामी विवेकानंद विद्यालयातील खेळाडू शंतनु राहुल धायगुडे या विद्यार्थ्याची निवड महाराष्ट्राच्या संघात झाली होती. या राष्ट्रीय स्पर्धेमध्ये शंतनु याने उल्लेखनीय कामगिरी केली आणि मैदान गाजवले. त्यामुळे शंतनुला महाराष्ट्र सॉफ्टबॉल असोसिएशनचे सचिव प्रदीप तळवलकर गुरूजी, छत्रपती संभाजीनगर जिल्हा सॉफ्टबॉल असोसिएशनचे सचिव तथा माजी क्रीडा अधिकारी गोकुळ तांदळे, महाराष्ट्र शासनाचे सॉफ्टबॉल राज्य क्रीडा मार्गदर्शक किशोर चौधरी, संघटनेचे पदाधिकारी, पंच, मार्गदर्शक अक्षय येवले, गणेश बेटुदे यांच्यासह आदी मान्यवरांच्याहस्ते 'होमर बॉय' म्हणून सन्मान करण्यात आलेला आहे. याबरोबरच जेएसपीएम संस्थेच्यावतीने संस्थेचे उपाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर, संस्थेचे कार्यकारी संचालक रंजितसिंह पाटील कव्हेकर यांच्याहस्ते सत्कार करण्यात आला.

शंतनु धायगुडे हा खेळाडू वयाच्या १० व्या वर्षांपासून सराव करीत आहे. मेहनत, जिद्द व उत्कृष्ट क्रीडा शैलीच्या जोरावर आजतागायत अनेक राज्यस्तरीय स्पर्धेत त्याने अनेक पदके पटकाविली आहे.




https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत


### संक्षिप्त वृत्त...

## राजमाता जिजामाता विद्यालय खरी कमाई उपक्रमात प्रथम

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १५ मार्च -** भारत स्काऊट आणि गाईडच्यावतीने राबविण्यात येणाऱ्या 'खरी कमाई' उपक्रमात येथील राजमाता जिजामाता विद्यालयाने जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. याबद्दल शिक्षण विभाग व स्काऊट आणि गाईड कार्यालयाच्यावतीने मुख्याध्यापक संगमेश्वर केंद्रे यांचा सत्कार करण्यात आला.

पुस्तकी ज्ञानाबरोबरच विद्यार्थ्यांना व्यवहाराचे धडे मिळावेत, यासाठी 'खरी कमाई' उपक्रम राबविण्यात येतो. याअंतर्गत राजमाता जिजामाता विद्यालयात राबविण्यात आलेल्या उपक्रमाची दखल घेऊन जिल्हास्तरीय प्रथम पुरस्कार मुख्याध्यापक संगमेश्वर केंद्रे आणि स्काऊटचे शिक्षक ए. बी. मुंडे यांना देऊन माध्यमिकचे शिक्षणाधिकारी नागेश मापारी, प्राथमिकच्या शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे आणि जिल्हा चिटणीस चामे यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. याबद्दल संस्थाध्यक्षा के. ए. जायेभाये, सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे, अश्विनी केंद्रे, उपप्राचार्य कविता केंद्रे, मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, वैशाली केंद्रे, राजेंद्र जायेभाये, प्राचार्य जी. आर. मुंडे, राजीव मुंडे यांनी शिक्षक, कर्मचाऱ्यांचे कौतुक केले आहे.

## पालिकेच्या मालमत्ता कर नोटीसीची एमआयडीसीत होळी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १५ मार्च -** महापालिकेकडून आकरण्यात आलेला मालमत्ता कर मान्य नाही म्हणत येथील उद्योजकांनी बुधवारी आपल्या व्यवसायाच्या ठिकाणी मालमत्ता कर भरणार नाही... नाही असे फलक लावले होते तर गुरुवारी मनपाने दिलेल्या नोटिसांची त्यांनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ येथे होळी केली. येथील औद्योगिक क्षेत्रातील उद्योजकांनी कायम महापालिका प्रशासनाच्या मालमत्ता करास विरोध केला आहे.

मालमत्ता करच रद्द करावा अशी त्यांची मागणी आहे. औद्योगिक क्षेत्र हे 'ड' वर्गात येते. त्यामुळे येथील वातावरण उद्योगाला पुरक नसतानाही उद्योग चालवून रोजगार निर्मिती केली जाते. यातच कुठलीही सुविधा न देता, मनपाकडून मालमत्ता कर आकारला जात आहे. राज्यात अनेक ठिकाणी एमआयडीसी महापालिकेच्या हद्दीतून वगळण्यात आल्या आहेत. एवढेच नाहीतर नांदेड येथील उद्योजकांनाही हा मालमत्ता कर आकारला जात नाही मग आमच्यावर अन्याय का असा सवाल उपस्थित केला जात आहे. बुधवारी एमआयडीसीमध्ये जागोजागी आम्ही कर भरणार नाही, असे फलक लावण्यात आले तर गुरुवारी दुपारी येथील औद्योगिक विकास महामंडळासमोर उद्योजकांनी मनपाने दिलेल्या नोटिसांची होळी केली. यावेळी राजा राचट्टे, कृष्णा तिघिले, नितीन कडगंजी, कमलाकर जाधव, राकेश जांगीड, विलास बच्चेवार, जनार्धन नरहरे, सुधीर धुत्तेकर, शिरीष भुतडा, गिरधारीलाल तिवारी, प्रवीण पेन्सीलवार, ओमप्रकाश जाधव, सदानंद आटोळे, वैजनाथ जामगे, धनंजय वराळे, किशोर सोनी, पवन जखोटिया, प्रवीण सगर उपस्थित होते.

## महिला तक्रार निवारण समिती गठीत न केल्यास भरावा लागेल दंड

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १५ मार्च -** कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैंगिक छळाच्या तक्रारीची सखोल चौकशी व त्याचे निराकरण करण्यासाठी आस्थापनामध्ये तक्रार निवारण समिती गठीत न केल्यास ५० हजारांचा दंड भरावा लागू शकतो. त्यामुळे तक्रार निवारण समिती गठीत करावी, अशा सूचना जिल्हाधिकारी यांनी दिल्या आहेत. कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम २०१३ च्या कलम ४ (१) नुसार कार्यालयांतर्गत येणाऱ्या लैंगिक छळाच्या तक्रारीची सखोल चौकशी व त्याचे निराकरण करण्यासाठी ज्या आस्थापनामध्ये १० किंवा १० पेक्षा जास्त अधिकारी, कर्मचारी कार्यरत आहेत. अशा प्रत्येक ठिकाणी तक्रार निवारण समिती स्थापन करणे आवश्यक आहे.

एखाद्या मालकाने अंतर्गत तक्रार समिती स्थापन केली नाही, कायद्यातील व नियमातील विविध तरतुदीचे व जबाबदाऱ्यांचे पालन न केल्यास मालकाला ५० हजार रुपये दंड आकारणे, तसेच हाच प्रकार पुन्हा केल्यास आस्थापनेचा परवाना रद्द, दुप्पट दंड अशी तरतूद आहे.

# विकासाची गती कायम राखण्यासाठी एकत्रित प्रयत्न : ना.बाबासाहेब पाटील

### लोकशाही व्यवस्थेचा समतोल राखण्यासाठी विरोधी पक्षाची भुमिका समर्थपणे निभावण्याची आ. देशमुखांची ग्वाही



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १५ मार्च -** लातूरच्या विकासाची गती कायम राखण्या सोबतच या जिल्हयातील सांस्कृतिक, शिक्षण, क्रीडा यासह इतर क्षेत्रातील अनुकरणीय वारसा जपण्यासाठी पक्षाभिनीवेश बाजूला ठेऊन सर्वोतोपरी प्रयत्न केले जातील, अशी ग्वाही राज्याचे सहकार मंत्री, ना. बाबासाहेब पाटील यांनी येथील पीव्हीआर थियटरमध्ये आयोजित आतंरराष्ट्रीश चित्रपट महोत्सव शुभारंभनिमीत्त बोलतांना केले.

विलासराव देशमुख फाऊंडेशन, पुणे फिल्म फाऊंडेशन आणि महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने लातूर येथे आयोजित तिसऱ्या लातूर इंटरनॅशनल फिल्म फेस्टिवलचा शुभारंभ शुक्रवारी सायंकाळी, मोठ्या उत्साहाच्या वातावरणात माजी मंत्री आमदार अमित देशमुख, सुप्रसिद्ध दिग्दर्शक जब्बार पटेल, माजी मंत्री आमदार संजय बनसोडे, आमदार विक्रम काळे, माजी आमदार त्र्यंबक भिसे, मनपा आयुक्त बाबासाहेब मनोहरे, कृउबा सभापती जगदीश बावणे, चित्रपट समिक्षक समर नखाते, पूणे फेस्टिव्हलचे विशाल शिंदे, अदिती अंकलकोटकर, तंत्रज्ञ सौरंभ सांगवडेकर आदिंच्या उपस्थितीत पार पडला.

त्यानंतर राज्याचे सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील यांनी या कार्यक्रमात सहभागी होऊन शुभारंभाचा चित्रपट पाहीला. या प्रसंगी आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाला शुभेच्छा देतांना सहकार मंत्री बाबासाहेब पाटील म्हणाले, राज्याचे माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख व इतर मान्यवर नेत्यांनी लातूर जिल्हयाला कायम प्रगतीपथावर ठेवले आहे. माजी मंत्री अमित विलासराव देशमुख त्यांना मिळालेला वारसा समर्थपणे पूढे चालवत आहेत. जे जे नव ते ते लातूरला हव या भुमिकेतून कायमपणाने विविध योजना व विविध उपक्रम राबवत असतात. त्यांच्या त्या सर्व प्रयत्नांना पक्षअभिनीवेश बाजूला ठेऊन राज्याचा मंत्री म्हणून आपला कायम पाठींबा आणि सहकार्य राहील, अशी ग्वाहीही त्यांनी यावेळी दिली.

आ. देशमुख सर्वांनीच सत्ताधारी पक्षात गेले तर लोकशाही व्यवस्थेचा समतोल बिघडेल आणि ती बाब आपल्या कोणालाच परवडणारी राहणार नाही. त्यामुळे आम्ही आहोत तिथेच राहून विरोधी पक्षाची भूमिका समर्थपणे सांभाळणार आहोत. तुमच्यासारख्या अनेकांना तिकडे सत्ताधाऱ्यांच्या परड्यात गर्दी झाल्यासारखे वाटले तर आमच्याकडे या त्यामुळे कदाचित आपले पारडे जड होईल आणि तेच सत्ताधारी बनेल. या बदलासाठी धीर धरण्याची आमची तयारी आहे असे स्पष्ट प्रतिपादन मांजी मंत्री आ.अमित देशमुख यांनी या कार्यक्रमात राष्ट्रवादी कॉंग्रेसचे आमदार विक्रम काळे यांच्या राजकीय ऑफरवर बोलताना केले.

यावेळी बोलतांना माजी मंत्री देशमुख म्हणाले की, जे जे नवं ते ते लातूरला हवं ही भूमिका माजी मुख्यमंत्री आदरणीय विलासराव देशमुख साहेब यांची नेहमीच राहिली, त्यांचा तो वारसा जपण्याचाच एक भाग म्हणून आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे लातूरला आयोजन करण्यात आले आहे, जगात नेमके नवीन काय घडते आहे, याचे ज्ञान लातूर व परिसरातील जनतेला व्हावे त्यातून त्यांना अनेक नवीन गोष्टी शिकता याव्यात ही या आयोजना पाठीमागची भूमिका असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी बोलताना माजी मंत्री आमदार संजय बनसोडे यांचेही मार्गदर्शन झाले. यावेळी ज्येष्ठ चित्रपट दिग्दर्शक जब्बार पटेल, आ. विक्रम काळे यांच्यासह इतर मान्यवरांनी मार्गदर्शन केले. प्रारंभी उपस्थित मान्यवर तसेच सिनेरसिकांचे शब्दसुमनाने स्वागत करण्यात आले.

## खून करणाऱ्या भिकाऱ्यास अटक

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १५ मार्च -** किरकोळ कारणावरून खून करणाऱ्या भिकाऱ्याला काही तासातच स्थानिक गुन्हे शाखेकडून अटक करण्यात आली आहे.

याबाबत थोडक्यात हाकिकत अशी की, दिनांक १३ ते १४ मार्च रोजी मध्यरात्री एका अज्ञात आरोपीने चहाटपरी समोर फुटपाथवर झोपलेल्या एका अनोळखी इसमाच्या डोक्यात दगड मारून खून केल्याची घटना घडली होती. त्यावरून पोलीस ठाणे शिवाजीनगर येथे अज्ञात आरोपी विरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे यांच्या मार्गदर्शनाखाली, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांच्या नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेचे पथक तयार करून त्यांना सूचना व मार्गदर्शन करून तात्काळ तपासाची सूत्रे हलविण्यात आली.

स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाने काही तासातच अनोळखी मयताची ओळख पटवून तसेच गोपनीय व तांत्रिक माहितीच्याआधारे चहाच्या टपरी समोर फुटपाथवर झोपलेल्या अज्ञात इसमाच्या डोक्यात दगड मारून खून केलेल्या आरोपीला क्रीडासंकुलच्या गेट समोरून १४ मार्च रोजी सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास जेरबंद केले असून नमूद आरोपीचे नाव देविदास शेषेराव सोनकांबळे, (वय ५४ वर्ष, राहणार खाडगाव रोड, प्रकाश नगर, चंद्रोदय कॉलनी, रोड क्रमांक ५, लातूर). असे आहे. आरोपी दिवसभर भिक्षा मागून खातो. दुपारी तंबाखू घेण्या- देण्याच्या कारणावरून झालेल्या किरकोळ वादाचा मनात राग धरून मध्यरात्री चहाच्या टपरी समोर फुटपाथवर झोपलेल्या प्रकाश लिंबाजी भडके( वय ५८ वर्ष, खाडगाव रोड, लातूर) याच्या डोक्यात दगड घालून खून केल्याचेआरोपीने कबूल केले आहे.

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने काही तासातच दिवसभर भिक्षा मागून खाणाऱ्या व किरकोळ कारणावरून खून करणाऱ्या नमूद आरोपीला काही तासातच जेरबंद केले असून पुढील कार्यवाही करिता पोलीस ठाणे शिवाजीनगर यांचे ताब्यात देण्यात आले आहे.या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस ठाणे शिवाजीनगर चे पोलीस सहाय्यक पोलीस निरीक्षक चव्हाण हे करीत आहेत.

सदरची कारवाई वरिष्ठांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले, यांच्या नेतृत्वातील पथकामधील पोलीस उपनिरीक्षक संजय भोसले, पोलीस अमलदार सिद्धेश्वर जाधव, सुधीर कोळसुरे, राजेश कंचे, मोहन सुरवसे, सूर्यकांत कलमे, प्रदीप स्वामी आदिंनी केली आहे.

## अर्जुन पवार यास राष्ट्रीय युवक महोत्सवात सुवर्णपदक



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १५ मार्च -** दयानंद कला महाविद्यालय, लातूर येथे बी.ए. द्वितीय वर्गात शिकणाऱ्या अर्जुन पवार याने नक्कल कला प्रकारात राष्ट्रीय युवक महोत्सवात सुवर्णपदक प्राप्त केले. दिल्ली नोयडा येथे विद्यापीठ स्तरीय राष्ट्रीय युवक महोत्सवात त्याने स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांचे प्रतिनिधित्व करीत हे उत्तुंग यश संपादन केले आहे. या बरोबरच स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने शोभायात्रा या प्रकारात प्रथम क्रमांकाचा पुरस्कार पटकाला यातही अर्जुनने सहभाग नोंदवला आहे.

यापूर्वी अर्जुनने स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात २ वेळा नक्कल कला प्रकारात सुवर्णपदक, राज्यस्तरीय इंद्रधनुष्य स्पर्धेत एक वेळेस रौप्य पदक, पश्चिम विभागीय युवक महोत्सवात एक सुवर्ण पदक व एक वेळा कांस्य पदक तर राष्ट्रीय युवक महोत्सवात एक वेळा रौप्य पदक प्राप्त केले आहे. यानंतर यावर्षी राष्ट्रीय युवक महोत्सवात नक्कल कला प्रकारात सुवर्णपदक व शोभायात्रेत प्रथम क्रमांक पटकावला आहे.

अर्जुन पवार याच्या यशाबद्दल दयानंद कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. अर्जुन यास हास्य कलावंत बालाजी सुळ यांच्यासह डॉ.संतोष पाटील, डॉ. देवेंद्र कुलकर्णी, डॉ संदिपान जगदाळे, प्रा. विजय मस्के, प्रा.शरद पाडे, प्रा. सोमनाथ पवार, डॉ. मीना घुमे यांचे मार्गदर्शन लाभले.

अर्जुनाच्या या ऐतिहासिक यशाबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, उपाध्यक्ष ललीतभाई शाह, उपाध्यक्ष अरविंद सोनवणे, उपाध्यक्ष रमेशकुमार राठी, सचिव रमेश बियाणी, कोषाध्यक्ष संजय बोरा, प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, उपप्राचार्य डॉ. अंजली जोशी, उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे, पर्यवेक्षक डॉ.प्रशांत दीक्षित कार्यालयीन अधीक्षक संजय व्यास यांनी अभिनंदन केले आहे.

## कृषी संस्कृती महोत्सवातून ग्रामीण संस्कृतीचे दर्शन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १५ मार्च -** राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने लातूर येथील दयानंद सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या कृषि संस्कृती महोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी चैतन्य कुलकर्णी, विनल देशमुख, कुणाल वराळे, श्रावणी महाजन यांच्या चमूने सादर केलेल्या लोकगीतांचा लातूरकरांनी मनमुराद आनंद लुटला.



दुसऱ्या दिवशी या कृषी सांस्कृतिक कार्यक्रमाची सुरूवात चैतन्य कुलकर्णी यांनी सादर केलेल्या सुर निरागस हो........या गणपतीच्या आराधनेने झाली. नंतर विनल देशमुख यांनी सादर केलेले पड रं पाण्या कर पाणी पाणी, शेत माझं लई तन्हेल चातकावाणी.., माझ्या ढवळ्या नी पवळ्याची जोडी जिवाहूनी प्यारी .., निसर्ग राजा ऐक सांगतो.., राजा ललकारी..., जांभूळ पिकल्या झडाखाली.., ग साजणी.., या एकाहून एक सदाबहार कृषी जीवनाचे दर्शन घडविणारे, शेतकऱ्यांवर आधारीत व चित्रित केलेली गाणी सादर करण्यात आले. गायिका श्रावणी महाजन यांनी सादर केलेली यमुनेच्या तीरी काल पाहिला हरी, या गवळणीला प्रतिसाद देत या गाण्यावर सभागृहातील रसिक श्रोते ताल धरताना दिसले. यासोबतच घागर घुमू दे, घुमू दे.., झुंझुमुंझु पहाट झाली, कोंबडीन बांग दिली.. या गाण्यावर नृत्याविष्कार सादर करीत उपस्थितांना खिळवून ठेवले. प्रत्येक सादरीकरणाला लातूरकर रसिक श्रोते भरभरून प्रतिसाद देत होते.

या सुंदर कार्यक्रमाचे निवेदन.पुजा थिगळे यांनी करून कार्यक्रमाची रंगत वाढवली.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी समन्वयक बी. एम.घोलप, निमंत्रक अनिल पुरी यांचे सहकार्य होते.

## 'आरंभ २०२५' क्रीडा संमेलनाचे डॉ. हनुमंत कराड यांच्या हस्ते उद्घाटन

### धावणे, गोळाफेक व रिले स्पर्धेने आरंभ क्रिडा संमेलनाचा शुभारंभ



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १५ मार्च -** येथील माईर एमआयटी शिक्षण संकुल येथे एमआयडीएसआर दंत महाविद्यालयाच्या वतीने आयोजित 'आरंभ क्रीडा संमेलन २०२५' चे उद्घाटन कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी धावणे, गोळाफेक व रिले स्पर्धेने क्रिडा संमेलनाचा शुभारंभ करण्यात आला.

यावेळी एमआयडीएसआर दंत महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. यतीशकुमार जोशी, मुख शल्य तज्ञ डॉ. अमोल डोईफोडे, क्रिडा स्पर्धा संयोजक डॉ. वर्षा सांगळे, सहाय्यक संयोजक डॉ. सुजित झाडके, डॉ. विश्वनाथ पावडशेट्टी, क्रिडा शिक्षक बालासाहेब शेप, सोनाली माळी हे उपस्थित होते.

यावेळी १०० मीटर धावणे स्पेर्धेचा शुभारंभ कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड यांच्या उपस्थितीत करण्यात आला. १०० मीटर धावण्याच्या शर्यतीत मुलांच्या गटात रुशील पाटलेने प्रथम क्रमांक पटकावला, तर रोहन राठोड दुसऱ्या स्थानी आणि गजानन वाघमोडे तिसऱ्या स्थानी राहिला. मुलींच्या गटात विष्णुप्रिया आपसिंगकर याने सर्वांना मागे टाकत प्रथम स्थान मिळवले, अंजली राठोड ने दुसरे स्थान, तर स्नेहा अंबुलगे हिने तिसरे स्थान पटकावले. त्याचबरोबर २०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत मुलांच्या गटात गजानन वाघमोडे पहिल्या स्थानावर राहिला, रुशील पाटलेने दुसरे, तर जय करंजे ने तिसरे स्थान मिळवले. मुलींच्या गटात जयंती पांढरेने पहिले स्थान पटकावले, स्नेहल कोकाटे दुसऱ्या तर स्नेहा अंबुलगे तिसऱ्या स्थानी राहिली. तसेच रिले स्पर्धांमध्येही चुरशीच्या लढती पाहायला मिळाल्या. ४०० मीटर रिले स्पर्धेत मुलांच्या गटात टीम श्रेष्ठाने विजेतेपद मिळवले. या संघात सचिन बेल्लाळे, डॉ. आदित्य रेड्डी, रोहित ऐतवडे आणि डॉ. गजानन वाघमोडे यांनी उत्कृष्ट धाव घेतली. टीम रौद्र ने दुसरा क्रमांक, तर टीम शौर्यने तिसरा क्रमांक मिळवला. मुलींच्या गटात ४०० मीटर रिलेमध्ये टीम शौर्यने प्रथम क्रमांक पटकावला. उत्कर्ष वाणी, प्रीती सिंग, अंजली राठोड आणि पुजा कुमदले यांनी आपल्या संघासाठी विजेतेपद मिळवले विजेत्यांचे अनेकांनी अभिनंदन केले.

## श्री सद्गुरु वेदानंद प्राथमिक विद्यामंदिर व शिशु विहारचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १५ मार्च -** माऊली शिक्षण प्रसारक मंडळ,लातूर द्वारा संचलित श्री सदगुरु वेदानंद प्राथमिक विद्यामंदिर व शिशुविहारचे वार्षिक स्नेहसंमेलन नुकतेच अतिशय उत्साह पूर्ण वातावरणात संपन्न झाले. या स्नेहसंमेलनाचे उद्घाटन मराठवाड्याचे शिक्षक आमदार विक्रम काळे यांच्या शुभ हस्ते संपन्न झाले. या वार्षिक स्नेहसंमेलनात शिवतांडव, श्रीराम गाथा, महाराष्ट्रीयन लोकनृत्य, अशा विविध पारंपारिक गीतांचा समावेश होता.



विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ट नृत्याने उपस्थितांची मने जिंकली. उद्घाटक आ. काळे यांनी संस्थेच्या यशस्वी वाटचालीचे विशेष कौतुक केले व ग्रामीण भागात शैक्षणिक संकुल चालवत असूनही हे शैक्षणिक संकुल अतिशय प्रगतीच्या पथावर कार्यरत आहे असे त्यांनी नमूद केले. उपस्थित पालक व विद्यार्थ्यांना मोबाईल एडिक्शन बद्दल विशेष मार्गदर्शन दिले.

संस्था सचिव गंगाधर आरडले यांनी प्रास्ताविकातून संस्थेच्या भविष्यातील उपक्रमाबद्दल परिपूर्ण माहिती सांगितली. याप्रसंगी संस्थेचे कोषाध्यक्ष तानाजी बेवनाळे पाटील , प्राचार्याकविता आरडले , उपप्रचार्या काळे भाग्यश्री , मुख्याध्यापक रजनीकांत येरमे , महापूरच्या सरपंच कल्पना ताई संदीप माने , प्रा. अंकुश नाडे राजकुमार जाधव , राजकुमार मगर, लिंबराज आबा माने, विठ्ठल राव आबा माने, गणपतराव आप्पा ढमाले, साहेबराव माने, विश्वनाथ पांचाळ, उत्तमराव वरवटे, पंडित नाना ढमाले, गोविंद नांगराळे, बालासाहेब माने,मुख्याध्यापक भागवत भोसले, श्रीपती व्यवहारे, दत्ता पवार, प्राचार्य उमेश गिरवलकर, मुख्याध्यापक प्रकाश तुगावे, प्रकाश राठोड, गोपाळ करडिले, संपूर्ण शिक्षक वृंद ,परिसरातील नागरिक ,पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कला शिक्षिका भाग्यश्री उबाळे यांनी तर आभार बिरादार मारुती यांनी मानले.

# लातूर जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## अखिल भारतीय साहित्य संमेलन गाजवणाऱ्या साहित्यिकांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१५ मार्च -**

दिल्ली येथे पार पडलेल्या ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन मधील खुल्या कवी संमेलनात आणि पुणे येथे पार पडलेल्या पाचव्या अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संमेलनात भाग घेऊन धाराशिवचे नाव उंचावणाऱ्या कवींचा धाराशिव जिल्ह्यातील बालकुमार साहित्य संस्था, अखिल भारतीय साहित्य परिषद



पुरस्कृत साहित्य भारती, आणि अक्षर मानव या साहित्य संस्थांच्या वतीने सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या.

जेष्ठ बालरोग तज्ञ तथा सामाजिक क्षेत्रातील अग्रणी व्यक्तिमत्व असलेले डॉक्टर अभय शहापूरकर यांच्या हस्ते अखिल भारतीय मराठी संमेलनात भाग घेतलेले साहित्यिक रवींद्र शिंदे, तु.दा. गंगावणे, एडवोकेट जयश्री तेरकर, मीना महामुनी, समाधान शिकेतोड, अश्विनी घाट यांचा सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी येष्ठ साहित्यिक युवराज नळे, राजेंद्र अत्रे, भागवत घेवारे, सुषमा सांगळे, सुरेश शेळके यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

## ▸▸ संक्षिप्त वृत्त...

### इंदिरानगर तांड्याचा विभक्त ग्रा.पं.चा प्रस्ताव सादर

**जळकोट, दि.१५ मार्च -**

धाराशिव जिल्ह्यातील बहुतांश बंजारा तांडा वस्तीची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे. अनेक तांडे ग्राम पंचायत विभक्त नसल्याने तांड्याचा विकास म्हणाव तसं होत नाही. शासकीय योजना तांड्यापर्यंत पोहचत नाहीत. यासाठी जिल्ह्यातील बंजारा बांधवांनी आपापल्या तांड्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी विभक्त ग्रामपंचायतीचा प्रस्ताव शासनाकडे सादर करून तांडा समृद्धी योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रवीण पवार यांनी केले आहे. तुळजापूर पंचायत समिती कार्यालयात शासनाच्या श्री संत सेवालाल महाराज तांडा समृद्धी योजनेचे विभागीय अशासकीय सदस्य प्रवीण पवार व जिल्हा कमिटीचे अशासकीय सदस्य प्राचार्य संतोष चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली तर भाजपाचे जिल्हा सरचिटणीस ॲड. दीपक आलुरे व तुळजापूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी अमोल ताकभाते यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

### नंबर प्लेट शासनाने बदलून देण्याची मागणी

**उदगीर, दि.१५ मार्च -**

लातूर जिल्हातील व प्रत्येक तालुक्यातील वाहनाच्या नंबर प्लेट शासनातर्फे बदलून देण्यात याव्यात व उदगीर शहरातील वाढीव पाणी पट्टी कमी करण्यात यावी जिल्हा दक्षता समिती अशासकीय सदस्य अभिजीत औटे यांची मागणी लातूर येथील जिल्हाधिकारी कार्यालयात बैठकीत शासकीय जिल्हा दक्षता समिती अशासकीय सदस्य अभिजीत औटे यांनी शासनाने २०१८ पुर्वीच्या वाहनास नवीन नंबर प्लेट बसवण्याचे आदेश काढला आहे. पण ग्राहकांनी गाडी घेत अस्थाना त्या वेळेस नंबर प्लेट पैसे दिले आहेत. त्यामुळे शासनाने याची जवाबदारी घेऊन त्या शासनातर्फे बदलून ध्याव्यात व उदगीर शहरातील पाणीपट्टी इतर तालुक्यातील तुलनेत जास्त आहे. ती कमी करण्यात यावी, अशी मागणी लातूर येथील जिल्हा पुरवठा अधिकारी व सचिव जिल्ह्य दक्षता समिती यांच्याकडे पत्र देऊन करण्यात आल्याची माहिती शासकीय जिल्हा दक्षता समिती अशासकीय सदस्य अभिजीत औटे यांनी सांगितले आहे.

### कंदले परिवाराकडून छावा चित्रपटाचे प्रदर्शन

**तुळजापूर, दि.१५ मार्च -**

धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचा धगधगता, प्रेरणादायी दैदिप्यमान इतिहास दाखवणारा छावा चित्रपट तुळजापूर शहरातील नगर परिषद प्राथमिक शाळा क्र.२ च्या विद्यार्थ्यांना छत्रपती संभाजी महाराज बलिदान दिनाचे औचित्य साधून रुग्ण कल्याण समितीचे सदस्य तथा भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष आनंद कंदले मित्र परिवारच्या वतीने दाखवण्यात आला. सुरवातीला छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून मुलांना चित्रपट गृहात बसवण्यात आले. यावेळी नगरसेवक विजय कंदले, नरेश अमृतराव, मुख्याध्यापक गणेश रोचकरी, महेंद्र कावरे, राम चोपदार, सागर कदम, जीवनराजे इंगळे, अण्णा देवकर, महेंद्र पाटील, बाळासाहेब जेटीथोर, सुज्ञानी गिराम, किरण लोहारे, विद्यादेवी स्वामी, शिवाजी डाके सर्व शिक्षक, शिक्षिका, कर्मचारी वृंद उपस्थित होते.

### सलगऱ्यात दिव्यांग विद्यार्थ्याबरोबर वाढदिवस साजरा

**जळकोट, दि.१५ मार्च -**

तुळजापूर तालुक्यातील सलगरा (म) येथील महात्मा गांधी गाव तंटामुक्त समिती उपाध्यक्ष, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थी जिल्हा अध्यक्ष, तेरणा युथ फाउंडेशन शाखा अध्यक्ष बालाजी सराटे यांनी आपला वाढदिवस दिव्यांग विद्यार्थ्यांसोबत साजरा केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर अस्थिभंग निवासी विद्यालय, होर्टी येथे दिव्यांग विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व खाऊ वाटप करून वाढदिवस साजरा केला. यावेळी वस्तीग्रह अधीक्षक विजयानंद वर्दे, माने, सुरेश गायके, प्रशांत तूगावे, कैलास वाघमोडे, सामाजिक कार्यकर्ते उत्तरेश्वर सराटे, प्रशांत भोसले, अजय गूंजिटे, नागेश सराटे, अभिषेक जाधव, शिवाजी सराटे, धनेश सराटे आदि उपस्थित होते.

### सरस्वती रोकडे यांचे निधन

**अहमदपूर, दि.१५ मार्च -**

येथील यशवंत प्राथमिक विद्यालयाच्या सेवानिवृत्त सह शिक्षिका सरस्वतीबाई माधवराव रोकडे-पाटील यांचे अल्पशा आजाराने दि.१४ रोज शुक्रवारी रामप्रहारी राहत्या घरी वयाच्या ७५ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्यावर दि.१४ रोजी शुक्रवारी सायंकाळी अंतिम संस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात तीन मुले, सूना, नातवंडे, परतवंडे असा मोठा परिवार असून मुन्ना उर्फ बसवेश्वर रोकडे आणि महाराष्ट्र नागरी सहकारी बँकेचे कर्मचारी संगमेश्वर रोकडे यांच्या त्या आई होत.

## नळदुर्गच्या किल्ल्यास ९७ लाख रुपयांचा निधी उलब्ध करुन देण्याची पालकमंत्र्यांची शिफारस

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१५ मार्च -**

नळदुर्ग येथील ऐतिहासिक व प्राचिन असणाऱ्या भुईकोट किल्लूयात ध्वजस्तंभ उभारण्यासाठी जिल्हा वार्षिक योजना अनुसुचित जाती घटक कार्यक्रम सन २०२४-२५ अंतर्गत ९७ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात यावा अशी शिफारस राज्याचे परीवहन मंत्री तथा धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री प्रतापराव सरनाईक यांनी धाराशिवचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा नियोजन समितीचे सदस्य सचिव यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. पालकमंत्री प्रतापराव सरनाईक यांच्या या निर्णयाचे नळदुर्ग शहरातील नागरीकांसह गडप्रेमी नागरीक व पर्यटकांनी स्वागत केले आहे.

नळदुर्गचा किल्ला हा ऐतिहासिक व प्राचिन आहे. हा किल्ला राज्यातील भुईकोट किल्लयापैकी सर्वात मोठा किल्ला आहे. हा किल्ला जोड किल्ला असुन किल्लयाचा एक भाग हारणमंडळ म्हणुन ओळखला जातो. हाच सर्वात जुना आणि प्राचिन किल्ला आहे.

अतिशय भव्य दिव्य हा किल्ला असुन या किल्लयाचे क्षेत्रफळ मोठे असुन तब्बल ३ किमी. लांब किल्लयाची तटबंदी पसरली आहे. या तटबंदीमध्ये एकुण ११४ बुरुज आहेत. हा किल्ला पाहण्यासाठी दरवर्षी हजारो पर्यटक किल्यामध्ये येतात. आजपर्यंत अनेक मंत्री आणि पालक मंत्री धाराशिव जिल्ह्याला मिळाले.

मात्र एकाही मंत्री किंवा पालकमंत्र्यांच्या लक्षात नळदुर्गच्या ऐतिहासिक किल्लयात ध्वजस्तंभ उभारावा हे आले नाही. मात्र पहिल्याच झटक्यात धाराशिव जिल्ह्याचे विद्यमान पालकमंत्री प्रतापराव सरनाईक यांनी नळदुर्गच्या ऐतिहासिक किल्लयात भव्य असा ध्वजस्तंभ उभारण्यासाठी ९७ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्याची शिफारस जिल्हाधिकारी तथा जिल्हा नियोजन समितीचे सदस्य सचिव यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. हा ध्वजस्तंभ उभारल्यानंतर किल्लयाच्या



सौंदर्यात मोठी भर पडणार आहे. त्याचबरोबर या किल्लयात ध्वजस्तंभ उभारल्यानंतर खऱ्या अर्थाने हा किल्ला हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज महाराज यांचा किल्ला म्हणुन ओळखला जाणार आहे.

पालकमंत्री प्रतापराव सरनाईक यांच्या या निर्णयाचे नळदुर्ग शहरातील नागरीकांसह गडप्रेमी नागरीक व पर्यटकांनी स्वागत केले आहे.

## 'महाराष्ट्र' मध्ये रंगणार लातूर जिल्हा विद्यार्थी मराठी साहित्य संमेलन

**▸▸ महाराष्ट्र महाविद्यालयात रंगणार तिसरे विद्यार्थी मराठी साहित्य संमेलन...**

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.१५ मार्च -**

विद्यार्थी सहाय्यक मंडळ, लातूर आणि महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा यांच्या संयुक्त विद्यमाने तिसरे लातूर जिल्हा 'विद्यार्थी मराठी साहित्य संमेलन' यावर्षी निलंगा येथील महाराष्ट्र महाविद्यालयाच्या कर्मयोगी स्व.डॉ. शिवाजीराव पाटील निलंगेकर साहित्य नगरीत रंगणार आहे.

विद्यार्थी सहाय्यक मंडळाचे अध्यक्ष डॉ. जनार्दन वाघमारे, कार्याध्यक्ष प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार, सचिव प्राचार्य डॉ. नागनाथ मोटे, महाराष्ट्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. माधव कोलपूके, यांच्या समवेत झालेल्या बैठकीत सोमवार दि.२४ मार्च रोजी विद्यार्थी मराठी साहित्य संमेलन निलंगा येथे घेण्याचे निश्चित झालेले आहे.

या एकदिवसीय विद्यार्थी मराठी साहित्य संमेलनाचे उद्घाटन ज्येष्ठ समीक्षक, विचारवंत डॉ. जनार्दन वाघमारे यांच्या हस्ते होणार असून संमेलनाचे अध्यक्षस्थान महाराष्ट्रशिक शिक्षण समितीचे अध्यक्ष विजय शिवाजीराव पाटील निलंगेकर हे भूषविणार आहेत. तसेच सत्यशोधकी साहित्याची वाटचाल आणि मुस्लिम मराठी साहित्य एक सिंहावलोकन हे दोन परिसंवाद होणार आहेत. यात समीक्षक डॉ. जयद्रथ जाधव आणि कवी फ.म. शहाजिंदे यांचे प्रमुख मार्गदर्शन लाभणार आहे.

विद्यार्थ्यांच्या कवित्वाला चालना मिळावी म्हणून काव्यसंमेलनही आयोजित करण्यात आले आहे.

या संमेलनाच्या निमित्ताने थोर विचारवंत तथा साहित्यिक डॉ. जनार्धन वाघमारे, डॉ.नागोराव कुंभार, कवी. फ.म. शहाजींदे, कवी बाशीर पटेल, समीक्षक डॉ. जयद्रथ जाधव, प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे, प्राचार्य डॉ. संजय वाघमारे यांच्या व्याख्यानाचा लाभ या साहित्य संमेलनाच्या निमित्ताने होणार आहे.

लातूर जिल्ह्यातील महाविद्यालयांनी साहित्याची आवड असलेल्या चार विद्यार्थ्यांचा संघ पाठवून (दोन विद्यार्थी, दोन विद्यार्थिनी) 'विद्यार्थी मराठी साहित्य संमेलन' यशस्वी करण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. माधव कोलपूके, उपप्राचार्य डॉ. प्रशांत गायकवाड व संयोजन समितीने केले आहे.

## धन्वंतरीमध्ये स्व.डॉ.पी.डी. कुलकर्णी यांना श्रद्धांजली अर्पण

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.१५ मार्च -**

उदगीर येथील प्रसिद्ध भुलतज्ञ डॉ.पी.डी. कुलकर्णी यांचे नुकतेच ह्रदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. धन्वंतरी आयुर्वेद महाविद्यालय, उदगीर येथे आयोजित श्रद्धांजली कार्यक्रमात विविध चिकित्सा पद्धतीच्या वैद्यकीय व्यवसायिकांनी त्यांच्या निधनाबद्दल शोकसंवेदना व्यक्त करून व मौन पाळून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

या प्रसंगी प्राचार्य डॉ. दत्तात्रय पाटील, डॉ. संजय कुलकर्णी, डॉ. महेश जाधव, डॉ. नवनाथ सोनाळे यांनी आपल्या शोकभावना व्यक्त केल्या.

याप्रसंगी डॉ. राजेंद्र धाटे, डॉ. रविकांत पाटील, डॉ. प्रशांत बिरादार, डॉ. महेश धुमाळ, डॉ. अमोल पटणे, डॉ. नामदेव बनसोडे, डॉ. सचिन टाले, डॉ. प्राजक्ता जगताप, डॉ. मयुरी ठाकूर, डॉ.डॉ. विष्णुकांत जाधव, डॉ. प्रवीण बलुतकर, डॉ. शीतल घोरबांड, डॉ. शिवकुमार मरतूळे, डॉ. शिवकांता चेटलुरे, डॉ. विष्णुकांत जाधव, डॉ. मधुमिता चिद्रे, डॉ. श्रुती तिवारी, डॉ. अमोल पाटील यांच्यासह विद्यार्थीनी उपस्थित होते.

## नवोदय विद्यालयात दोन दिवसीय मूर्तिकला कार्यशाळा संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१५ मार्च -**

पीएम श्री जवाहर नवोदय विद्यालयात हेरिटेज क्लब अंतर्गत दोन दिवसीय मूर्तीकला कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते .या आयोजनासाठी सोलापूर येथील शिल्पकलाकार सचिन जाधव आले होते. यामध्ये सहावी ते आठवीतील ११६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या कार्यशाळेचे उद्घाटन विद्यालयाचे प्राचार्य के.वाय. इंगळे यांनी केले. याप्रसंगी व्यासपीठावरती एच.जी. जाधव, डीएस. देशमुख, बसवराज कोरकर होते.

या कार्यशाळेत प्रथम सचिन जाधव यांनी मातीचे वेगवेगळे प्रकार, माती पासून कोणकोणत्या वस्तू बनवल्या जातात. या वस्तू टिकवून ठेवण्यासाठी त्याची बनावट कशा पद्धतीने केली जाते. हे सांगून या मूर्तीच्याद्वारे आपली भारतीय परंपरा, चालीरीती, पुरातन जीवनशैली, वारसा कशा पद्धतीने जतन व त्याचे संवर्धन केले जाते. या संदर्भात सर्वप्रथम त्यांनी मार्गदर्शन केले. त्यानंतर या माती पासून वेगळे प्रकारच्या मुर्त्या, दिवे, पणत्या, अलंकार करून विद्यार्थ्यांना दाखविले व काही विद्यार्थ्याकडून वेगवेगळ्या प्रकारचे अलंकार, दिवे, पणत्या, मडके, वेगवेगळे मुखवटे प्रत्यक्ष बनवून घेऊन विद्यार्थ्यांच्या अंगी मूर्ती कलेद्वारे सृजनशीलता विकसित होते हे सांगून शब्दापेक्षा मूर्तीतून भाव कसे जास्त स्पष्ट होतात. हे अनेक मूर्तींचे चेहरे बनवून दाखवून दिले. शेवटी त्यांनी बनवलेल्या वेगवेगळ्या अलंकाराचे व मूर्तींचे प्रदर्शनही भरवण्यात आले होते.

कार्यक्रमाचे आयोजन हेरिटेज क्लबचे प्रभारी विद्यालयातील कला अध्यापक बसवराज कोरकर यांनी केले होते. या कार्यशाळेचे सूत्रसंचालन हरी जाधव यांनी केले.

## जिजाऊ ब्रिगेडच्या पुरस्काराने सुशिला मुट्ठे सन्मानित

**तभा वृत्तसेवा**
**शिरूर अनंतपाळ, दि.१५ मार्च -**

येथील शिवनेरी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रमुख डॉ.प्रा. पांडुरंग मुट्ठे यांच्या अर्धांगिनी शिवमती एस.पी. मुट्ठे यांना जिजाऊ ब्रिगेड लातूर जिल्हा शाखेच्या वतिने 'आदर्श माता व महिला पत्रकार' म्हणून एस पी मुट्ठे यांना जिजाऊ ब्रिगेडचा जिल्हा पुरस्कार देऊन जागतीक महिला दिनानिमित्त आयोजीत कार्यक्रमात त्यांना सन्मानीत करण्यात आले.

दरवर्षी प्रमाणे याही वर्षी मराठा सेवा संघ प्रणित 'जिजाऊ ब्रिगेड 'जिल्हा शाखा लातूर च्या वतिने विविध क्षेत्रातील कर्तत्वान महिलांचा' जागतीक महिला दिनाचे औचित्य साधून दि९ मार्च रोजी सकाळी ११ वा. लातूर येथे आदर्श माता, आदर्श पत्नी, आदर्श शिक्षीका, आदर्श वकील, आदर्श पोलीस अधिकारी, कर्मचारी, उद्योजकता




अशा विविध क्षेत्रात कर्तव्य बजावणाऱ्या कर्तत्वान महिलांचा आयोजीत कार्यक्रमात सन्मान करण्यात आला.

शिवमती सुशिला पांडूरंग मुट्ठे यांना 'आदर्श माता' व पत्रकार क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबदल त्यांचा जिल्हाधिकारी वर्षा ठाकुर घुगे, उपाजिल्हा अधिकारी आहिल्या गाठाळ, उपविभागीय अधिकारी अहमदपूरच्या मंजूषा लटपटे व जिजाऊ ब्रिगेडच्या प्रदेश उपाध्यक्षा शिवमती वर्षा माने, जिल्हा अध्यक्षा शिवमती अर्चना पाटील, जिल्हा उपाध्यक्षा शिवमती बबितताई सोळुंके, उमा इथापे, मिरा देशमुख, जिजाऊ ब्रिगेडच्या प्रदेश सदस्या शिवमती प्रा. लता बावणे, वनिता काळे, रंजनाताई चव्हाण, ताई बोराडे यांच्या उपस्थितीमध्ये सन्मानित करण्यात आले.

हा पुरस्कार मिळाल्याबदल त्यांचे सर्व स्तरातुन अभिनंदन होत आहे.

## राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहात साजरा

**उदगीर, दि.१५ मार्च -**

येथील छत्रपती शिवाजीराजे महाविद्यालयात वनस्पती विभागात राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या दिनानिमित्त पोस्टर प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयातील वनस्पतीशास्त्र विषयातील महत्वाच्या व आधुनिक मुद्द्यांवर विद्यार्थ्यांनी अभ्यासपूर्वक पोस्टर सादरीकरण केले.

## पर्यावरण पूरक होळीचा आनंद जिव्हाळा ग्रुपकडून साजरा

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.१५ मार्च -**

जिव्हाळा ग्रुपच्या वतीने पर्यावरणपूरक होळीचा आनंद एका आगळ्या वेगळ्या पध्दतीने साजरा करण्यात आला.

नागपूरच्या पशू वैद्यकीय व मत्स्य विद्यापिठाचे शिक्षण विस्तार संचालक डॉ.अनील भिकाने सरांच्या व श्री संत तुकाराम विधी महाविद्यालय उदगीरचे प्राचार्य यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम घेण्यात आला.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान अशोक बिरादार यांनी भूषविले. या कार्यक्रमाची संकल्पना राबविणारे विश्वनाथ मुडपे गुरुजींनी सर्वांना गुलाल लावला. तसेच होळीनिमित्त होळीचे महत्व विषद करणारे गीत सादर केले. हास्य, विनोद,



गाणी, असंबद्ध भाषण नकला इत्यादीचे सदस्यांनी सादरीकरण उत्तमरित्या केले. यात प्रामुख्यानी दशरथ शिंदे, शंकर केंद्रे, विश्वनाथ माळेवाडीकर, चंद्रकांत पांचाळ, चंद्रकांत रोडगे, शंकर साबणे, वैजनाथ पंचगल्ले, माने, अशोक हळ्ळे, हावगीराव आधारे, सचीन बापूरे, प्रा. रमाकांत मध्वरे, चंद्रकांत उप्परबावडे, रामराव मोमले प्रा.डी.आर. पाटील व देविदासराव नादरगे इत्यादी सदस्यांनी हिरीरिने सहभाग नोंदवला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जिव्हाळा ग्रुप अध्यक्ष रमाकांत बनशेळकीकर यांनी केले. डॉ. अनील भिकाने सरांचे समयोचित मार्गदर्शन झाले. अध्यक्षीय समारोप अशोक बिरादार यांनी केला. जिव्हाळा ग्रुपचे उपाध्यक्ष दशरथ शिंदे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

कार्यक्रमास व्हि.एस. कुलकर्णी व विक्रम हालकीकर दिलीप खंदारे, चंद्रकांत खटके सोपानराव माने यांची विषेश उपस्थिती होती.

## निलेगाव येथील जि.प. शाळेत स्वयंशासन दिन व निरोप समारंभ साजरा

**तभा वृत्तसेवा**
**इटकळ, दि.१५ मार्च -**

विद्यार्थ्यांना शालेय प्रशासनाचा अनुभव यावा त्यांच्यात नेतृत्व गुण विकसित व्हावे यासाठी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा निलेगाव तालुका तुळजापूर येथे स्वयंशासन दिन उत्साहात संपन्न झाला.

त्याचबरोबर आपल्या सहकारी बालमित्रांना शिकवण्याचा जो अनुभव मिळतो त्यातून त्यांना बरेच काही शिकायला मिळते हे त्यांनी अनुभवले.

आजच्या या कार्यक्रम प्रसंगी निलेगाव सरपंच शंकर जमादार, उपसरपंच मोहसीन इनामदार, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष समद पटेल, शाळेचे मुख्याध्यापक शिवाजी जाधव, शाळेतील ज्येष्ठ शिक्षिका चौधरी हे सर्वजण व्यासपीठावर उपस्थित होते.

## मरगम्मा वस्तीवरील पालावरच्या शाळेत वार्षिक उत्सव संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१५ मार्च -**

नळदुर्ग येथील मरगम्मा वस्तीवर असणाऱ्या पालावरील शाळेत दि.१२ मार्च रोजी वार्षिक उत्सव साजरा करण्यात आला. यावेळी या उत्सवात पालावरील शाळेत शिक्षणाचे धडे गिरविणारे व समाज व्यवस्थेपासुन कोसो दुर असलेल्या विद्यार्थ्यांनी जी कला सादर केली ती पाहुन उपस्थितीतांचे मन भरून आले.

नळदुर्ग येथे अक्कलकोट रोडवर मरगम्मा वस्ती आहे. या वस्तीवर पालावरची शाळा सुरु आहे. याठिकाणी मिरा मोटे व या पालावरील शाळेतील शिक्षिका वर्षा सोमवसे यांनी अतिशय मेहनत घेऊन मरगम्मा वस्तीतील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणले आहे. या विद्यार्थ्यांना शिक्षणाची साधी ओळखही नव्हती. सकाळी उठले की डोक्यावर टोपले घेऊन गावात भाकरी मागायला जाणे हा त्यांचा नित्यानियम असायचा. मात्र ज्यावेळेस याठिकाणी पालावरची शाळा सुरु झाली तेंव्हा या विद्यार्थ्यांना शाळा म्हणजे काय हे समजले. मिरा मोटे आणि वर्षा सोमवसे यांनी या वस्तीतील विद्यार्थ्यांना मोठे प्रयत्न करून शिक्षणाच्या प्रवाहात आणले.

दि.१२ मार्च रोजी सायंकाळी या पालावरच्या शाळेत वार्षिक उत्सव संपन्न झाला.

या वार्षिक उत्सवाच्या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणुन पत्रकार विलास येडगे, माजी नगरसेवक विनायक अहंकारी, जि.प.च्या शिक्षिका कविता पुदाले, अक्षरवेल ग्रुपच्या अध्यक्षा शांता ठाकुर, बचत गटाच्या प्रमुख प्रभावती बिराजदार, माधुरी घोडके, जि.प.चे शिक्षक आगलावे, राचुरे हे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्त्यांनी म्हटलेल्या स्वागत गीताने झाली. यानंतर सर्व मान्यवरांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. यावेळी कविता पुदाले यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मिरा मोटे यांनी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन वर्षा सोमवसे यांनी केले.

विद्यार्थ्यांची कला पाहुन उपस्थित प्रेक्षक भरावुन गेले होते. या विद्यार्थ्यांनी देव देवतांच्या गीतासाह सर्वच प्रकारच्या गीतांवर अतिशय सुंदर नृत्य करुन उपस्थितांची वाहवा मिळवली. या कार्यक्रमाचा शेवट आदिवासी गाण्यावरील नृत्याने झाला. आपल्या मुलांच्या कला गुणांना दाद देण्यासाठी मरगम्मा वस्तीवरील पुरुष व महिला उपस्थित होते.

हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मिरा मोटे, शिक्षिका वर्षा सोमवसे यांच्यासाह वस्तीतील राजकुमार कोळी व इतर युवकांनी परीश्रम घेतले.